# १

# सामाजिक तत्त्वज्ञानाची ओळख

**घटक रचना**

१.० उद्दिष्ट्ये
१.१ प्रस्तावना
१.२ सामाजिक तत्त्वज्ञानाची व्याख्या
१.३ सामाजिक तत्त्वज्ञानाचे स्वरुप
१.४ सामाजिक तत्त्वज्ञानाची व्याप्ती
१.५ सारांश
१.६ दीर्घोत्तरी प्रश्न

## १.० उद्दिष्ट्ये

१. सामाजिक तत्त्वज्ञान तत्त्वज्ञानाची एक शाखा आहे, हे जाणून घेणे.

२. सामाजिक तत्त्वज्ञानाचे स्वरुप समजून घेणे.

३. व्यक्तिच्या जीवनाशी सामाजिक तत्त्वज्ञानाचा संबंध लक्षात घेणे.

४. समाज जीवनामध्ये समंजसपणा तसेच संवेदनशीलता विकसित करणे.

## १.१ प्रस्तावना

तत्त्वज्ञान ज्ञानानुभव, सत्यता, सौंदर्य, न्याय, मन तसेच भाषिक अभिव्यक्ती या सारख्या व्यापक व मूलभूत विषयांशी संबंधित प्रश्नांचा अभ्यास करते. तत्त्वज्ञानाला सर्व शास्त्रांचे शास्त्र म्हटले जाते. तत्त्वज्ञानाला दर्शन असेही म्हटले जाते. दर्शन म्हणजे समग्र जीवनाकडे, स्वतःकडे तसेच सभोवारच्या विश्वाकडे पाहण्याची दृष्टी होय. तत्त्वज्ञान समग्र मानवी अनुभवाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करते. व्यक्ती, समाज व हे विश्व यातील परस्परसंबंध स्पष्ट करणारी एक सर्वसमावेशक विचारधारा निर्माण करण्याचा प्रयत्न तत्त्वज्ञानामध्ये केला जातो.

तत्त्वज्ञानासाठीचा इंग्रजी शब्द Philosophy आहे. याचा उगम ग्रीक भाषेमध्ये झाला. Philosophy या शब्दाचा अर्थ 'शहाणपणाचे प्रेम' असा होतो. सर्व ज्ञानशाखांची निर्मिती ह्या शहाणपणाच्या प्रेमातून, ह्या विश्वाविषयीच्या मानवी कुतुहलामधून झाली आहे. तत्त्वज्ञानाच्याही आजमितीस अनेक शाखा आहेत. तत्त्वज्ञानाच्या सत्ताशास्त्र, सौंदर्यशास्त्र, नीतिशास्त्र, तर्कशास्त्र, ज्ञानमीमांसा ह्या मूळ शाखांशिवाय अनेक शाखा निर्माण झाल्या आहेत. सामाजिक तत्त्वज्ञान, राजकीय तत्त्वज्ञान, धर्माचे तत्त्वज्ञान, शिक्षणाचे तत्त्वज्ञान, विज्ञानाचे तत्त्वज्ञान, भाषेचे तत्त्वज्ञान अशा अनेक तत्त्वज्ञानाच्या शाखा आहेत.

ह्या विश्वाविषयी, मानवी जीवनाविषयी तसेच ह्या विश्वातील मानवाच्या स्थानाविषयीचे प्रश्न तत्त्वज्ञानामध्ये विचारले जातात. मनुष्याची जीवनमूल्ये त्याचे हक्क आणि कर्तव्ये यांचीही चर्चा तत्त्वज्ञानामध्ये केली जाते. ज्ञान म्हणजे काय, ते प्राप्त कसे होते, सत्यता म्हणजे काय?

ह्यासारख्या प्रश्नांची समीक्षा तत्त्वज्ञान करते. दिक् , काल, सौंदर्य, कार्य-कारणता, आत्मतत्त्व तसेच मोक्ष यासारख्या अमूर्त संकल्पनांचा अभ्यास तत्त्वज्ञानामध्ये केला जातो.

सामाजिक तत्त्वज्ञान ही तत्त्वज्ञानाची एक महत्त्वपूर्ण शाखा आहे. समाजामधील मनुष्यांच्या परस्परसंबंधाचा अभ्यास या शाखेमध्ये केला जातो. सामाजिक तत्त्वज्ञानाचा अभ्यासक विवेकनिष्ठ दृष्टीने समाजाकडे पाहतो तसेच मानवी समाज व अंतिम सत्ता यांच्यामधील संबंधाचा चिकित्सक दृष्टीने अन्वयार्थ लावू पाहतो.

## १.२ सामाजिक तत्त्वज्ञानाच्या व्याख्या

मनुष्य एक सामाजिक प्राणी आहे. प्रत्येक मनुष्याचे जीवन समाजातील अन्य मनुष्यांच्या सहाय्याने टिकते, पोषित होते व समृद्ध होते. प्रत्येक मनुष्याचे व्यक्तिमत्त्व समाजातील अन्य घटकांच्या सक्रिय सहभागाने सर्व बाजूंनी विकसित होते. सामाजिक तत्त्वज्ञान मानवी नातेसंबंधांमध्ये तसेच समाजामध्ये कार्यरत नियमांचा शोध घेण्याचा प्रयत्न करते. समाजदर्शन मनुष्याच्या समाजामधील अस्तित्त्वाचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न करते.

पाश्चिमात्य परंपरेमध्ये प्लेटोच्या 'रिपब्लिक' या ग्रंथांमध्ये सामाजिक तत्त्वज्ञान आढळून येते. या ग्रंथात प्लेटोने एका आदर्श राज्याचे चित्र रेखाटले आहे. त्याने समाजामधील राज्यकर्ते, योद्धे व कामगार अशा तीन वर्गांचे वर्णन केले आहे. अरिस्टॉटलने समाजाचे वास्तवदर्शी चित्र रेखाटले आहे. ॲरिस्टॉटलच्या मते राज्याचे मुख्य उद्दिष्ट स्वतःची नैतिक कर्तव्ये पार पाडणाऱ्या सुजाण नागरिकांना घडविणे हे आहे.

सतराव्या शतकामधील भौतिकशास्त्र, गणित तसेच यांत्रिकीमधील प्रगतीचा सामाजिक तत्त्वज्ञानावर मोठा प्रभाव पडला. आधुनिक तंत्रज्ञानाने सामाजिक संस्थांमधील दोषांवर प्रकाश टाकला व सामाजिक वर्तनासाठी नवीन आदर्श प्रस्थापित केले. १९व्या व २० व्या शतकामध्ये समाजदर्शन अधिक सुव्यवस्थित व सर्वसमावेशक झाले. त्यामध्ये संपूर्ण मानवजातीच्या एकात्मतेसाठी समाजाच्या स्थानाचा विचार होऊ लागला.

प्रत्येक व्यक्तिचा जन्म विशिष्ट समाजात होतो व त्यानंतर त्या व्यक्तीचे संपूर्ण जीवन त्या समाजाने व्यापले जाते. व्यक्तिचे व्यक्तिमत्त्व समाजाच्या पृष्ठभूमीवर घडत जाते. समाजदर्शन समाजातील मनुष्यांच्या नातेसंबंधांचे शास्त्र आहे. समाज म्हणजे विशिष्ट ध्येयाने प्रेरित असलेल्या मानवांचा समूह असतो. मनुष्य हे समाजाचे केंद्रस्थान असून मानवी नातेसंबंधाचे जाळे म्हणजे समाज होय. सामाजिक तत्वज्ञानाच्या पुढीलप्रमाणे व्याख्या दिल्या आहेत.

**मॅकेन्झीच्या मते** मानवजातीमध्ये एक प्रकारची सामाजिक एकता आहे. या एकतेच्या आधाराने सामाजिक घटनांचा अर्थ लावण्याचे कार्य सामाजिक तत्त्वज्ञान करते.

**ब्लॅकमरच्या मते** समाजशास्त्राचा व सामाजिक तत्त्वज्ञानाचा निकटचा संबंध आहे. समाजदर्शन समाजाच्या स्वरुपाचा विचार करते तसेच समाजात प्रत्यक्ष घडणाऱ्या गोष्टींची ते दखल घेते.

**मॉरीस गिन्सबर्गच्या मताप्रमाणे** सामाजिक घटनांसंबंधी चिंतन करून माणसाच्या आचारविचारांसबंधी सर्वसामान्य नियम शोधून काढणे हे सामाजिक दर्शनाचे ध्येय आहे.

**सोरोकिनसारख्या तत्त्वज्ञचिंतकांना** समाजशास्त्र व सामाजिक तत्त्वज्ञान यांचा फार निकटचा संबंध आहे असे वाटते. समाजातील मानवी आचारांचे नियम शोधून काढण्यासाठी समाजशास्त्राच्या सिद्धांतांचा आधार आवश्यक आहे.

**बर्ट्रांड रसेलच्या मताप्रमाणे** सामाजिक तत्त्वज्ञान मनुष्यामधील प्रेम व परानुभूती सारख्या विधायक प्रवृत्तींना पोषक वातावरण कसे निर्माण होईल याचा शोध घेते. केवळ विधायक प्रवृत्तींची माणसेच ह्या समाजाला महाविनाशापासून वाचवू शकतात.

सामाजिक तत्त्वज्ञानाची व्याख्या पुढीलप्रमाणे करता येईल.

**''सामाजिक तत्त्वज्ञान व्यक्ती व त्यांचे समूह यांच्यामधील आंतरक्रिया व परस्परसंबंधांचा अभ्यास करते. ''**

**आपली प्रगती तपासा :-**

१. सामाजिक तत्त्वज्ञानाच्या विविध व्याख्या सांगा.

.........................................................................................................................

.........................................................................................................................

.........................................................................................................................

.........................................................................................................................

## १.३ सामाजिक तत्त्वज्ञानाचे स्वरुप

सामाजिक तत्त्वज्ञान एक उपयोजित शास्त्र आहे. समाजामध्ये काय योग्य अथवा इष्ट आहे याचा शोध या शास्त्रामध्ये घेतला जातो. समाजाचे संघटन, सामाजिक प्रगती तसेच समाजाचे विघटन यासंबंधीच्या प्रश्नांचा ऊहापोह सामाजिक दर्शन करते. सामाजिक जीवनातून व्यक्तीचे कल्याण साधण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे सामाजिक तत्त्वज्ञान सूचित करते.

प्रारंभीच्या काळामध्ये सामाजिक तत्त्वज्ञानाने समाज निसर्गनिर्मित आहे की मानवनिर्मित आहे' या सारख्या प्रश्नांच्या उत्तरांचा शोध घेतला. समाजजीवन मानवाचा एक अविभाज्य तसेच अपरिहार्य भाग ठरते. यातून समाजामधील 'सामाजिक करार' व ''सेंद्रिय एकात्मता' या सारख्या संकल्पनांचा उदय झाला. रुसोने असे प्रतिपादन केले की 'मनुष्य जन्मतः स्वतंत्र असतो मात्र प्रत्येक क्षणी कोणत्या ना कोणत्या शृंखलेचा भाग असतो.' समाजदर्शन, मानवी समाजामधील एकात्मता व सुव्यवस्थेचा अभ्यास करते.

मनुष्याच्या समाजामधील वर्तनाचे अध्ययन सामाजिक तत्त्वज्ञान करते. कुटुंब, शिक्षण संस्था, रोजगार यासारख्या सामाजिक संस्थांचा तसेच धार्मिक संस्थांचा विचार सामाजिक दर्शनामध्ये अपरिहार्य ठरतो. वंश, जात तसेच लिंग यावर आधारित सामाजिक वर्गीकरणाचाही विचार सामाजिक तत्त्वज्ञान करते.

समाजदर्शनाचे स्वरुप अत्यंत व्यापक आहे. समाजाचे घटक असलेल्या व्यक्तींचे परस्परसंबंध कसे असावेत याची तात्त्विक बाजू मांडण्याचे कार्य सामाजिक तत्त्वज्ञान करते. समाजातील नियम, कायद्यांची वैधता, विज्ञानाच्या प्रगतीचे समाजावर व संस्कृतिवर होणारे परिणाम, सामाजिक करार व परिवर्तन याचाही विचार तत्त्वज्ञानाच्या या शाखेमध्ये केला जातो. त्यामुळे सामाजिक तत्त्वज्ञानामधील अनेक प्रश्न नैतिक व राजकीय तत्त्वज्ञानामध्ये सुद्धा अभ्यासले जातात. सामाजिक तत्त्वज्ञानाचे स्वरुप पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**१) सामाजिक तत्त्वज्ञान आदर्शात्मक असते.**

मानव समूहांमध्ये आढळून येणाऱ्या एक प्रकारच्या एकात्मतेचा विचार सामाजिक तत्त्वज्ञान करते. मानव अस्तित्त्वाच्या वर्तमान, भूतकालीन तसेच भविष्यकालीन जीवनरीतींचा अर्थ व महत्त्व जाणून घेण्याचा प्रयत्न समाजदर्शनामध्ये केला जात असे. सामाजिक ध्येये व

मूल्ये यांचा अभ्यास करून मानव समूहाचे कल्याण कसे प्राप्त करून घेता येईल याची मार्गदर्शक तत्त्वे सामाजिक तत्त्वज्ञान सूचित करते.

सामाजिक तत्त्वज्ञान ध्येयदर्शक आहे. त्याचा भर समाजात घडणाऱ्या घडामोडींचे प्रयोजन शोधण्यावर तसेच त्यांचा अर्थ लावण्यावर असतो. आदर्श समाज कसे असावयास पाहिजे याचे चित्र सामाजिक तत्त्वज्ञान आपल्यापुढे रेखाटते. सामाजिक प्रवृत्तींमध्ये कोणत्या दिशेने परिवर्तन होणे इष्ट आहे याचे मार्गदर्शन सामाजिक तत्त्वज्ञान करते. कुटुंब, शिक्षण, राज्य यासारख्या संस्थांच्या माध्यमातून मानवसमूहाच्या कल्याणासाठीच्या मार्गदर्शक तत्त्वांकडे सामाजिक तत्त्वज्ञान लक्ष वेधते.

**२. सामाजिक तत्त्वज्ञान मूल्यमापनात्मक आहे.**

मनुष्यजातीच्या कल्याणासाठीच्या विविध साधनांचे मूल्यमापन सामाजिक तत्त्वज्ञान करते. विविध सामाजिक संस्था, परंपरा तसेच रीतीरिवाज ही सर्व समाजामध्ये सुव्यवस्था, स्थैर्य, एकात्मता व प्रगतिची साधने आहेत. विशिष्ट नियमांच्या आधारे तसेच रुढींच्या आधारे सामाजिक संस्था व परंपरा व्यक्तीचे समाजातील जीवन नियंत्रित करतात. समूहामधील आंतरक्रिया व समूहामधील घटकांचे परस्परसंबंध यांचे मूल्यमापन सामाजिक तत्त्वज्ञान करते. समाजातील वस्तुस्थितीचे मूल्यमापन करून परमप्राप्तव्याच्या श्रेणीमधील त्या वस्तुस्थितीचे स्थान निश्चित करण्याचे कार्य समाजदर्शन करते.

समाजातील व सामाजिक संस्थांमधील उणिवा दर्शविणे, त्या दूर करून सामूहिक प्रगतीचा मार्ग सुकर करण्याचे कार्य समाजदर्शन करते. सामाजिक एकात्मता राखण्यासाठी व आदर्श सामाजिक आंतरक्रिया असण्यासाठी सामाजिक तत्त्वज्ञान नियमावली तयार करते.

**३. सामाजिक तत्त्वज्ञान चिंतनात्मक आहे.**

सामाजिक संबंधांचे मूलभूत नियम, मानवी जीवनाचे परमप्राप्तव्य तसेच प्रयोजन याविषयीचे चिंतन म्हणजे समाजदर्शन होय. सामाजिक तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकासाठी सामाजिक घडामोडींचा अनुस्युत अर्थ अत्यंत महत्त्वाचा असतो. समाजातील प्रचलित धारणा, सामाजिक परिवर्तन तसेच मानवी वर्तनाचे आकृतीबंध यांचा मागोवा समाजदर्शनामध्ये घेतला जातो. सामाजिक मूल्ये, सामाजिक समस्या तसेच समाजातील घटकांचे परस्परांशी वर्तन याविषयीचे संशोधन सामाजिक तत्त्वज्ञानात केले जाते.

सामाजिक आदर्श हे सामाजिक घटकांच्या आंतरक्रियांमध्ये सामावलेले असतात. त्यांच्या अध्ययनासाठी अनुभवनिष्ठ पद्धतीपेक्षा चिंतनात्मक पद्धती उपयुक्त ठरते. सामाजिक मूल्ये ही सामाजिक नातेसंबंधांचा आधार असल्याने अशी मूल्ये अनुभवपूर्व ठरतात. सामाजिक मूल्यांचे आकलन प्रज्ञेने होऊ शकते.

**३. सामाजिक तत्त्वज्ञान समीक्षात्मक असते.**

गिन्सबर्गच्या मताप्रमाणे समाजदर्शनाने मानवी वर्तनाची सामान्य तत्त्वे निर्धारित करण्यापूर्वी समाजशास्त्राचे निष्कर्ष विचारात घेतले पाहिजेत. सामाजिक तत्त्वज्ञानाची समीक्षात्मक व रचनात्मक अशी दोन कार्ये आहेत.

सामाजिक तत्त्वज्ञानाचा प्रमुख हेतु विद्यमान सामाजिक संस्थांचे व संघटनांचे सामूहिक कल्याणाच्या दृष्टीने समीक्षण करणे हा आहे. वर्तमानातील समाजाची दखल घेऊन भूतलावर जणू स्वर्ग कसा निर्माण होईल या ध्येयाच्या दृष्टिकोनानुसार समाजदर्शन टीका करते. सामाजिक तत्त्वज्ञानाच्या समीक्षणाचे कार्य म्हणजे विविध दृष्टिकोन व पद्धती यांची वैधता तपासणे हे होय.

**४. सामाजिक तत्त्वज्ञान रचनात्मक आहे.**

गिन्सबर्गच्या मताप्रमाणे सामाजिक तत्त्वज्ञानाचे समीक्षणाचे कार्य रचनात्मक म्हणजे विधायक स्वरुपाचे आहे. सामाजिक तत्त्वचिंतक समाजातील घडामोडींची सामाजिक आदर्शांच्या दृष्टिकोनामधून दखल घेतो. सामाजिक एकसंघता व एकतानता टिकून राहण्याच्या दृष्टिने आवश्यक बाबींचा शोध सामाजिक तत्त्वचिंतक घेतो. सामाजिक आदर्शांची वैधता पारखून घेणे हे सामाजिक तत्त्वज्ञानाचे रचनात्मक अथवा विधायक कार्य आहे.

योग्य प्रशिक्षण मिळाल्यास कोणत्या मानवी प्रवृत्ती सामाजिक जीवन समृद्ध करू शकतात याचा शोध सामाजिक तत्त्वज्ञान घेते. त्याचबरोबर समाजातील घटकांमधील विघातक प्रवृत्ती शोधून काढून त्यांचे निराकरण कसे करता येईल याचाही विचार समाजदर्शनामध्ये केला जातो. सामाजिक तत्त्वज्ञान समाजातील आंतरक्रियांमधील दोष दाखवून दोष दूर करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वेसुद्धा सूचित करते. सामाजिक तत्त्वज्ञानाचे विधायक म्हणजे रचनात्मक कार्य निरोगी व प्रगतीशील समाजाची उभारणी करणे हे आहे.

**५. सामाजिक तत्त्वज्ञान अन्य शास्त्रांच्या निष्कर्षांच्या पलिकडे जाते.**

सामाजिक तत्त्वज्ञानाचा इतर सामाजिक शास्त्रांशी अत्यंत निकटचा संबंध आहे असे प्रतिपादन मॅकेन्झी, ब्लॅकमर, गिन्सबर्ग आणि सोरोकिन सारखे तत्त्वचिंतक करतात. सामाजिक घडामोडींचा शास्त्रशुद्ध पद्धतीने गोळा केलेल्या माहितीचा आधार घेऊन सामाजिक तत्त्वज्ञान समाज व व्यक्ती यांच्यावर भाष्य करते. समाजदर्शन म्हणजे विविध शास्त्रांनी गोळा केलेल्या माहितीचे एकीकरण नव्हे. सामाजिक तत्त्वज्ञान अशा विविध ज्ञानशाखांनी गोळा केलेल्या माहितीच्या पलिकडे जाऊन सामाजिक वर्तन व सामाजिक परिवर्तन याविषयी सामान्य सूत्र तसेच नियम यांचा शोध घेते.

सामाजिक तत्त्वज्ञान अनेक अध्ययन अवस्था पार करीत आले आहे. चिंतनात्मक, वर्णनात्मक, विश्लेषणात्मक अवस्थांमधून सामाजिक तत्त्वज्ञान तात्त्विक मंथनाकडे आले. आज समाजदर्शनामध्ये, एक पालक कुटुंब, विवाह, नाते संबंधाने राहणे (live-in-relation), लिंगभेद, नवीन प्रकारच्या शिक्षणसंस्था तसेच रोजगाराच्या बहुआयामी संधी, याविषयी विचार केला जातो. सामाजिक तत्त्वज्ञान ह्या सतत बदलणाऱ्या समाजव्यवस्थेमधील मानवी जीवनाच्या प्रयोजनाचा व अर्थाचा शोध घेत आहे.

**आपली प्रगती तपासा :-**

१) सामाजिक तत्त्वज्ञानाचे स्वरुप सांगा.

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

## १.४ सामाजिक तत्त्वज्ञानाची व्याप्ती

सामाजिक तत्त्वज्ञान समाजामधील मूलभूत मानवी नातेसंबंधाचा अभ्यास करते. सामाजिक संस्थांचे परस्पर संबंध तसेच व्यक्तींचे सामाजिक संस्थांशी संबंध याचाही अभ्यास सामाजिक तत्त्वज्ञान करते. मानवी वर्तनाच्या मूळाशी असणारी तत्त्वे, समूहांची रचना, त्यांचे कार्य तसेच त्यांचे तात्त्विक आधार हे समाजदर्शनाच्या क्षेत्रामध्ये येतात.

मानवी समूहांच्या रचना कशा होतात. सामाजिक प्रगती, समाजाचे परिवर्तन आणि समाजाचे विघटन यांच्यावर परिणाम करणाऱ्या घटकांचे अध्ययन सामाजिक तत्त्वज्ञान करते. अपराध, बाल गुन्हेगारी, बालमजुरी, अन्याय, लिंगभेद, असमानता व Honorkilling यामागच्या कारणांचा शोध घेणे सामाजिक तत्त्वज्ञानाचे कार्य आहे. सामाजिक दूरितांचा शोध घेऊन त्यावर उपाययोजना करण्याचे समाजदर्शन सुचविते. ज्याने समाजाची धारणा होते अशा सामाजिक बंधांची शोध घेऊन आस्थांची पुनर्बांधणी करण्याचा प्रयत्न सामाजिक तत्त्वज्ञानामध्ये केला जातो.

विज्ञान व तंत्रज्ञानाच्या वेगवान प्रगतीचा परिणाम मानव समाजावर होत आहे. विविध ज्ञानशाखाच्या निष्कर्षांची तात्त्विक बाजू सांगून सर्वसमावेशक विचारप्रणाली देण्याचे कार्य सामाजिक तत्त्वज्ञान करते. समाजदर्शनाचा विचार मूल्याधिष्ठित असतो. सामाजिक कल्याण, आनंद, शांतता, सुरक्षितता, न्याय, सौंदर्य, शिस्त व वक्तशीरपणा यासारख्या सामाजिक मूल्यांची व्याख्या समाजदर्शन करते.

व्यक्ती व समूह यांच्यातील परस्परसंबंधाचे अध्ययन करून त्यांची तात्त्विक बाजू समाजदर्शन स्पष्ट करते. समाजामध्ये अस्तित्त्व असणारा मनुष्य हा सामाजिक तत्त्वज्ञानाचा केंद्रबिंदू आहे. एक सामाजिक प्राणी म्हणून मनुष्याला नैतिक, आर्थिक, तसेच सांस्कृतिक बंध असतात. मनुष्याला त्याच्या विविध भूमिका रुढी, परंपरा व सामाजिक संस्थांच्या नियमांच्या चौकटीत राहून पार पाडाव्या लागतात. व्यक्तीचे जीवन म्हणजे नैतिक, राजकीय, आर्थिक व सामाजिक भूमिकांची एक समष्टी असते.

वर्तमान युगामध्ये विश्व आणि समाज छोटे होत चालले आहे. त्यामुळे सामाजिक प्रश्न वैश्विक स्वरुपाचे होत आहेत. जन्म, शिक्षण, कौशल्य, लिंग, वय, व्यवसाय आणि संपत्ती यामुळे समाजातील काही घटक उपेक्षित राहतात. यातून निर्माण होणाऱ्या समस्यांचा ऊहापोह सामाजिक तत्त्वज्ञानामध्ये केला जातो.

आपल्या धर्म, कुटुंब विवाह, शिक्षण यासारख्या पारंपारिक संस्थांमध्ये अमूलाग्र बदल होत आहेत. व्यक्तीच्या व समाजाच्या प्रगतीसाठी पारंपारिक सामाजिक मूल्यांची नव्याने व्याख्या करणे अनिवार्य होत आहे. समाजाची एकात्मता टिकविण्यासाठी व 'वसुधैव कुटुम्बकम्' या उद्दिष्टासाठी सामाजिक तत्त्वज्ञान नवनवीन आव्हानांना सामोरे जात आहे. अशा वैशिष्ट्यपूर्ण कुटुंबाचा उद्देश त्यातील सभासदांसाठी प्रेम, आस्था आणि न्याय प्राप्त करून देणे हा आहे. त्यामुळे सामाजिक तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रामध्ये जे जे मनुष्यासाठी व समाजासाठी महत्त्वाचे आहे त्याचा समावेश होतो.

**<u>आपली प्रगती तपासा.</u>**

१. सामाजिक तत्त्वज्ञानाचे क्षेत्र (व्याप्ती) सांगा.

............................................................................................................

............................................................................................................

............................................................................................................

............................................................................................................

## १.५ सारांश

सामाजिक तत्त्वज्ञान ही तत्त्वज्ञानाची अत्यंत महत्त्वपूर्ण शाखा आहे. या शाखेमध्ये समाजातील मानवी संबंधावर प्रभाव टाकणाऱ्या मूलभूत नियमांचा अभ्यास केला जातो. समाजाचे तसेच मानवी अस्तित्त्वाचे प्रयोजन काय आहे, त्यांचे उद्दिष्ट काय आहे याचा शोध समाजदर्शन घेते. संपूर्ण मानवजातीच्या एकात्मतेच्या दृष्टीने मानव समूहांचा अर्थ व तात्त्विक बाजू मांडण्याचे कार्य तत्त्वज्ञानाच्या या शाखेमध्ये केले जाते. सामाजिक तत्त्वज्ञान व्यक्ती व त्यांचे समूह

यांच्यामधील आंतरक्रिया व परस्परसंबंधाचा अभ्यास करते.

सामाजिक तत्त्वज्ञान आदर्शात्मक, मूल्यमापनात्मक आणि चिंतनात्मक असते. समाजदर्शनाची समीक्षात्मक व रचनात्मक अशी दोन प्रमुख कार्ये आहेत. सामाजिक तत्त्वज्ञान इतर शास्त्रांच्या निष्कर्षाच्या पलिकडे जाते.

समाजदर्शन विविध सामाजिक संस्थांच्या (कुटुंब, शिक्षण, राज्य इ.) परस्परसंबंधांचे तसेच व्यक्ती व संस्था यांच्यातील आंतरक्रियांचे अध्ययन करते. सामाजिक संस्था, त्यांची रचना, त्यांची कार्ये यांचे अध्ययन करून सामाजिक तत्त्वज्ञान त्यांचे तात्त्विक मूलाधार काय आहेत याचा शोध घेते. समाजदर्शनाच्या दृष्टीमधून संपूर्ण विश्व एक कुटुंब असून त्यातील सभासदांमध्ये बंधुभाव व वचनबद्धता आहे.

## १.६ दीर्घोत्तरी प्रश्न

१. सामाजिक तत्त्वज्ञानाच्या व्याख्या सांगा.

२. सामाजिक तत्त्वज्ञानाचे स्वरुप व व्याप्ती सविस्तर स्पष्ट करा.

❖❖❖

# २

# स्त्रियांची स्थिती

**घटक रचना**

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रस्तावना

२.२ ॲरिस्टॉटल : स्त्रीयांचे दुय्यम स्थान

२.३ जे.एस. मिल्ल : स्त्री पुरुषांमध्ये समानता

२.४ स्त्रीवाद

२.५ सारांश

२.६ दीर्घोत्तरी प्रश्न

## २.० उद्दिष्ट्ये

१. स्त्री व पुरुष यांच्या भूमिकांवरील सामाजिक प्रभाव समजून घेणे.

२. अरिस्टॉटलचा दृष्टिकोन जाणून घेणे.

३. जे.एस.मिल्लचे आधुनिक विचार समजून घेणे.

४. समकालीन स्त्रीवादी विचार जाणून घेणे.

५. स्त्री व पुरुषांच्या निसर्गाने नेमून दिलेल्या भूमिकांवर अधिक प्रकाश टाकणे.

## २.१ प्रस्तावना

मनुष्य एक सामाजिक प्राणी आहे. समाजापासून अलिप्त राहून तो स्वतःच्या गरजा पूर्ण करू शकत नाही. जीवन जगण्यासाठी मनुष्याला समाजातील अन्य व्यक्तींची गरज भासते. समाजामध्ये प्रत्येक व्यक्तीला एक विशिष्ट स्थान व त्यानुसार विहित कर्तव्ये असतात. विविध रीतीरिवाज, परंपरा, दंतकथा, रूपके, आचार तसेच वेळप्रसंगी दंड देऊन समाज मनुष्याचे वर्तन निर्धारित करीत असतो.

समाजामध्ये आढळून येणारी स्त्रीपुरुष असमानता समाजाच्या नियंत्रणाची परिसीमा दर्शविते. निसर्गाने स्त्री तसचे पुरुष हे दोन सजीव निर्माण केले आहेत. या दोन्ही सजीवांची वैशिष्ट्यपूर्ण शरीरचना असून त्यांची कार्ये परस्परपूरक आहेत. मानव वंशाचे सातत्य राखणे हे दोन्ही सजीवांचे उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट एकत्रितपणेच साध्य होऊ शकते. तरीही साधारणतः सर्वच समाजांमध्ये पुरुषांचे स्थान स्त्रियांपेक्षा उच्च दर्जाचे मानले जाते.

समाजामध्ये स्त्री-पुरुषांमधील असमानता हे एक वास्तव आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण ॲरिस्टॉटलचे व जे एस मिल्लचे तसेच स्त्रीवादी विचारांचा अभ्यास करणार आहोत.

## २.२ ॲरिस्टॉटलः स्त्रियांचे दुय्यम स्थान

स्त्री-पुरुषांबद्दल प्राचीन कालीन विचार, भारतीय अथवा ग्रीक, पौर्वात्य अथवा पाश्र्चात्य यामध्ये सारखेच दिसून येतात. स्त्री-पुरुषांचे सामाजिक स्थान तसेच त्यांची कर्तव्ये याविषयी प्राचीन विचारांमध्ये पुष्कळ सारखेपणा दिसून येतो.

'स्टॅगीरा'मध्ये एका कुलीन घराण्यामध्ये ॲरिस्टॉटलचा जन्म झाला. (खिस्तपूर्व ३८२-३२२) प्लेटोने स्थापन केलेल्या 'ॲकॅडमी' मध्ये अरिस्टॉटल २० वर्षे होता. प्लेटोच्या मृत्युनंतर ॲरिस्टॉटलने स्वतःचे 'पेरिपॅटेटिक स्कूल' सुरु केले.

ॲरिस्टॉटल अत्यंत प्रतिभाशाली विचारवंत होता. त्याने विपुल लेखन केले होते. मात्र काळाच्या ओघामध्ये त्यातील बरेचसे साहित्य नष्ट झाले.

ॲरिस्टॉटल तर्कशास्त्र व प्राणिशास्त्र या विषयांचा जनक मानला जातो. सत्ताशास्त्र, तर्कशास्त्र, नीतिशास्त्र, राज्यशास्त्र, कला, धातूशास्त्र, खगोलशास्त्र तसेच काव्यशास्त्र यावर ॲरिस्टॉटलने लिखाण केले. ॲरिस्टॉटल अत्यंत तर्कशुद्ध व वैज्ञानिक विचारांचा होता. शास्त्रशुद्ध तसेच चिकित्सक निरीक्षणांमधून त्याने विविध ज्ञानशाखांचा पाया घातला. त्यावेळच्या अपुऱ्या व मर्यादित सामग्रीच्या सहाय्याने ॲरिस्टॉटलने निसर्गाचा वैज्ञानिक व तर्कशुद्ध पद्धतीने अर्थ लावण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी नवनवे शब्द व पदे तयार केली.

अत्यंत स्वतंत्र, मर्मभेदी व विलक्षण बुद्धीच्या ॲरिस्टॉटलचे विचार स्त्रियांबाबत मात्र प्रतिगामी आहेत. प्राचीन ग्रीसमध्ये स्त्रियांना नागरिकत्त्वाचा दर्जा नव्हता. त्यांना मतदानाचा तसेच संपत्तीचा ही अधिकार नव्हता. स्त्रियांची बुद्धी कनिष्ठ दर्जाची आहे, असे गृहीत धरले जात असे. वयाच्या साधारण १४ व्या वर्षी स्त्रियांचा विवाह पित्याने ठरविलेल्या वराशी होत असे. त्यांना कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य नव्हते. केवळ घरामधील कामकाज व गुलामांवर देखरेख करणे हे स्त्रियांचे काम होते. धार्मिक कार्याशिवाय स्त्रियांचा बाह्य जगाशी संबंध येत नसे. ॲरिस्टॉटल स्त्रियांना कनिष्ठ वा दुय्यम दर्जाचा मानव, अपूर्ण पुरुष अथवा विरुप पुरुष मानतो. ॲरिस्टॉटलच्या तत्त्वज्ञानामध्ये तीन तत्त्वे दिसून येतात. या तत्त्वांचा प्रभाव त्याच्या स्त्री-विषयक विचारावर पडलेला दिसून येतो.

**१. निसर्गामध्ये उद्देश आहे.**

निसर्गातील प्रत्येक घटकाचे विशिष्ट गंतव्य व तदनुरुप कार्य असते. संपूर्ण जग गतिमान आहे व त्या गतीचे काही निश्चित उद्देश आहेत. प्रत्येक घटकाकडून त्याच्या कुवतीनुसार सर्वोत्तम सहभाग घेऊन उद्दिष्टाकडे वाटचाल सुरु असते. निसर्गामधील प्रत्येक हालचाल सहेतुक असते. विनाकारण काहीच घडत नाही.

**२. निसर्ग श्रेणीबद्ध आहे.**

निसर्गातील सर्व घटक परस्परांशी संबंधित असतात. त्यांच्यामध्ये श्रेष्ठ-कनिष्ठ दर्जाची मालिका असते. जड द्रव्य, वनस्पती, प्राणी व त्यानंतर मनुष्य अशी चढती कमान निसर्गामध्ये आहे. पुरुष या श्रेणीमध्ये सर्वश्रेष्ठ स्थानावर आहे. ॲरिस्टॉटलच्या मते श्रेष्ठ दर्जाच्या व्यक्ती कनिष्ठ दर्जाच्या व्यक्तींना अंकित ठेवण्याच्या व हुकुमत गाजविण्याच्या योग्य असतात. वनस्पती प्राण्यांसाठी, वनस्पती व प्राणी मानवासाठी असतात. मनुष्यांमध्ये स्त्रिया तसेच गुलाम निम्न स्तरावर असल्यामुळे त्यांनी उच्च स्तरावरील पुरुषांच्या अधिपत्याखाली असायला हवे.

### ३. राज्य हे नैसर्गिक आहे.

मनुष्य परावलंबी जीव आहे. माता पित्यांच्या संगोपनाशिवाय व्यक्ती जगू व वाढू शकत नाही. कुटुंब व समाजात राहूनच मनुष्याचा विकास होतो. राज्य अथवा शासनसंस्था मनुष्याला सुख व परिपूर्ण जीवन जगण्यासाठी पोषक वातावरण निर्माण करून देते. शासनसंस्था इतकी मुलभूत व महत्त्वाची असते की ती जणू निसर्गानेच निर्माण केलेली असते. ॲरिस्टॉटल म्हणतो, जो समाजात राहण्यास असमर्थ आहे, तो पशू असला पाहिजे. ईश्वर स्वयंपूर्ण असल्याने समाजाची आवश्यकता नाही तो ईश्वर असला पाहिजे.

### कुटुंब - एक नैसर्गिक सामाजिक संस्था

उपरोक्त तत्त्वे ॲरिस्टॉटल कुटुंब संस्था व कौटुंबिक नातेसंबंधानाही लागू करतो. स्त्री व पुरुष यांच्या एकत्र येण्याने कुटुंब ही संस्था निर्माण होते. कौटुंबिक एकी नैसर्गिक व स्वाभाविक असते.

ॲरिस्टॉटलच्या मते कुटुंबामध्ये तीन प्रकारचे नातेसंबंध असतात. १) मालक व गुलाम २) पती व पत्नी ३) वडील व मुले. या तीनही संबंधामध्ये मालक, पती आणि वडिल यांचा दर्जा उच्च असतो. गुलाम, पत्नी व मुले यांच्यावर त्यांचा अधिकार असतो. स्त्रियांचा निम्न दर्जा सिद्ध करण्यासाठी ॲरिस्टॉटल पुढीलप्रमाणे युक्तिवाद करतो -

### १. दार्शनिक युक्तिवाद / तात्त्विक युक्तिवाद

ॲरिस्टॉटलच्या मते मनुष्याचे 'शरीर व आत्मा' हे 'द्रव्य व आकार' या नात्यानने जोडलेले असतात. स्त्री मनुष्याचे शरीर, त्याचे पोषण म्हणजे मानवाचे 'द्रव्य' देते. पुरुष मनुष्याचा आत्मा, त्याचे सार म्हणजे मानवाचा 'आकार' देतो. मनुष्याला जीवनाचे तत्त्व पुरुषाकडून तर जीवनाची स्थिती स्त्रीकडून मिळते. ॲरिस्टॉटल 'आकार' हे तत्त्व 'द्रव्य' या तत्त्वापेक्षा श्रेष्ठ मानतो. त्यामुळे 'आकार' तत्त्व असणारा पुरुष श्रेष्ठ दर्जाचा व 'द्रव्य' तत्त्व असणारी स्त्री कनिष्ठ दर्जाची ठरते.

### २. जैविक युक्तिवाद

भारतीय परंपरेप्रमाणे ॲरिस्टॉटलसुद्धा स्त्रीला 'क्षेत्र' (soil) व पुरुषाला 'बीज' (Seed) मानतो. पुरुष जीवन देणारा व स्त्री जीवन धारण करणारी आहे. स्त्री निसर्गतःच सदोष व असमर्थ असते. ॲरिस्टॉटल स्त्रीसाठी 'वांझ पुरुष' (Infirtile Man) असा शब्द वापरतो. स्त्री निष्क्रियता स्वीकारणारी असून पुरुष दक्ष व निर्मिती करणारा आहे.

### ३. उपयुक्तता .युक्तिवाद

ज्याप्रमाणे राजा निर्विवादपणे व नैसर्गिकरित्या त्याच्या प्रजेपेक्षा श्रेष्ठ असतो त्याप्रमाणे पुरुष त्याचे गुलाम, मुले व पत्नी यांच्यापेक्षा निसर्गतः श्रेष्ठ असतो. तो इतरांवर हुकुमत गाजविण्यास योग्य व लायक असतो. कुटुंबामधील नातेसंबंधांप्रमाणे आधिपत्यसुद्धा तीन पकारचे असते. मालकाची गुलामावर अबाधित सत्ता असते. पतीची पत्नीवर प्राकृतिक सत्ता असते. वडिलांची अपत्यांवर राजाप्रमाणे प्रेम व आदराची सत्ता असते.

### ४. विवेकाच्या श्रेणीवर आधारित युक्तिवाद

प्रत्येक व्यक्ती इतर प्रत्येक व्यक्तीपेक्षा भिन्न असते. जीवनाच्या संघर्षाला प्रत्येकजण आपापल्या बुद्धिनुसार सामोरा जातो. काही व्यक्ती सक्षमपणे जीवनात हुकूमत गाजवितात. काही व्यक्ती गौणत्त्व पत्करून इतरांची आज्ञा पाळतात. प्रत्येकाने स्वतःच्या बौद्धिक म्हणजेच नैसर्गिक गुणधर्मानुसार वर्तन करावयास हवे. ॲरिस्टॉटलच्या मतानुसार अधिकार गाजविणे हा निसर्गतः बुद्धिमान पुरुषाचा सद्‌गुण आहे. तसेच निसर्गतः कमी बुद्धिमान स्त्रियांचा सद्‌गुण निःशब्दपणे आज्ञापालन करणे हा आहे.

### ५. प्रयोजनवादी युक्तिवाद

निसर्गामध्ये श्रेणीबद्धता आढळून येते. निम्नस्तरावरील जीव उच्चस्तरावरील जीवांवर अवलंबून असतात. कनिष्ठ दर्जातील जीव वरिष्ठ दर्जातील जीवांच्या आश्रयाने अस्तित्वात असतात. पाळवी प्राणी, गुलाम, स्त्रिया, तसेच लहान मुले यांच्यावर कुटुंबप्रमुखाची सत्ता असते. कुटुंबप्रमुख पुरुषामुळेच त्याचे संरक्षण व पोषण होते. म्हणून स्त्रियांनी पुरुषांच्या सत्तेमध्ये राहणे त्यांच्या फायद्याचेच आहे. ॲरिस्टॉटलच्या मते स्त्रीपुरुष विषमता ही नैसर्गिक व प्राकृतिक असते. निम्न दर्जाच्या जीवांनी उच्च दर्जाच्या जीवांच्या अधीन राहणे हे निम्न दर्जाच्या जीवांसाठी लाभदायक असते.

प्रगल्भ, वास्तववादी व विलक्षण बुद्धीचा विचारवंत तसेच विश्लेषक प्रवृत्तीचा संशोधक असूनही ॲरिस्टॉटलचे स्त्रियांविषयीचे विचार अनुदार व प्रतिगामी आहेत. ॲरिस्टॉटल आपल्या विचारांचे समर्थन करण्यासाठी विविध युक्तिवाद देतो, याबद्दल सखेद आश्चर्य वाटते.

**आपली प्रगती तपासा**

१. ॲरिस्टॉटलच्या विचारांना कोणत्या तत्त्वांचा आधार आहे?

...........................................................................................................

...........................................................................................................

...........................................................................................................

..........................................................................................,.........

२. स्त्रियांचा निम्न दर्जा सिद्ध करण्यासाठी ॲरिस्टॉटलने कोणते युक्तिवाद केले आहेत?

...........................................................................................................

...........................................................................................................

...........................................................................................................

..........................................................................................,.........

## २.३ जे.एस.मिल्ल : स्त्री-पुरुषांमध्ये समानता

जॉन स्टुअर्ट मिल्ल (१८०६-१८७३) हा जेम्स मिल्ल चा थोरला मुलगा होता. जेम्स मिल्ल ईस्ट इंडिया कंपनीमध्ये सचिव होते. जेम्स मिल्ल यांनी जे. एस. मिल्लला अत्यंत पद्धतशीरपणे शिक्षण दिले. जेरेमी बेंथाम यांच्या 'उपयुक्तता तत्त्वाचा' फार मोठा प्रभाव मिल्ल वर पडला होता. बहुआयामी शिक्षणामुळे मिल्लचे विचार उदार, मुक्त, निष्कपट, व्यवहार्य, उपयुक्ततावादी व निःपक्षपाती बनले. व्यावहारिक समस्यांची उकल करून त्यांचे निराकरण स्वतःच कसे करता येईल, याचेही प्रशिक्षण मिल्लला मिळाले होते. जे.एस.मिल्लला सामाजिक सुधारणा व मनुष्याचे सुख यामध्ये रस होता.

जे.एस. मिल्लचे विचार त्याच्या अनुभववादामधून निष्पन्न झाले आहेत. मिल्ल च्या मते मानवी ज्ञानाचा उगम इंद्रियानुभावामध्ये आहे. मिल्लच्या विचारांवर ''उपयुक्तता तत्त्वाचा' प्रभाव आहे. त्याच्या वेळेपर्यंत सामान्य माणसाला कोणतीही प्रतिष्ठा, कोणतेही स्वातंत्र्य अथवा स्वतोमूल्य नव्हते. सामान्य माणसाच्या अस्तित्त्वाला जगामध्ये काहीच महत्त्व नव्हते. सामान्य व्यक्तीलाही; स्त्री अथवा पुरुष, प्रतिष्ठा मिळवून देणे हे मिल्लचे ध्येय होते. प्रत्येक व्यक्ती अनमोल आहे. तिच्या सुखदुःखाचा विचार झालाच पाहिजे. **'ऑन लिबर्टी'** या पुस्तकामध्ये मिल्ल संपूर्ण मानव जातीचा विचार 'उपयुक्तता' तत्त्वानुसार करतो. या तत्त्वामध्ये मनुष्याच्या

प्रगत अस्तित्त्वासाठी बौद्धिक क्षमतांचा विकास व त्यांचा व्यवहारांमध्ये उपयोग अनुस्यूत आहे.

**'लिबर्टी'** व '**द सब्जेक्शन ऑफ वुमेन'** या लिखाणामधून **जे. एस. मिल्ल** व्यक्तीच्या संपूर्ण हक्कांचा पुरस्कार करतो. मिल्ल च्या मते समाजाचे कल्याण अपरिहार्यपणे व्यक्तीच्या कल्याणाशी जोडले गेलेले आहे. 'पुष्कळांचे पुष्कळ सुख' या तत्त्वानुसार मिल्ल व्यक्तिचा विकास व उन्नती आणि सामाजिक विकास व प्रगती यामध्ये समतोल राखू पाहतो. मिल्ल असे प्रतिपादन करतो की स्त्रियांना दास्यामध्ये ठेवण्यामुळे स्त्रियांपेक्षा संपूर्ण समाजाचे अधिक नुकसान होते.

जे.एस. मिल्ल ने स्त्रियांना राजकीय हक्क मिळवून देण्यासाठी पार्लमेंटमध्ये आवाज उठविला. त्याने स्त्री स्वातंत्र्याच्या चळवळीला पाठिंबा दर्शविला व 'अर्ध्या लोकसंख्येवर' होणाऱ्या अन्यायावर टीका केली मिल्लचे विचार पुढीलप्रमाणे सांगता येतील -

१. आजच्या समाजामध्ये कोणीही व्यक्ती स्त्री किंवा पुरुष यांचे स्वरुप अथवा स्वभाव जाणू शकत नाही. समाज केवळ पुरुषांचा किंवा केवळ स्त्रियांचा किंवा पुरुषनियंत्रणाशिवाय स्त्रिया व पुरुषांचा असला तरच स्त्री/पुरुष यांच्यातील नैसर्गिक, अंतर्हित, मानसिक व नैतिक गुणधर्मांचे आकलन होऊ शकते.

२. सद्य परिस्थितीतील स्त्रियांचे स्वरुप 'कृत्रिम' आहे. त्यांचे आयुष्य त्यांच्या मालकांच्या सुखासाठी घराशी व चुलीशी बांधले गेलेले आहे. पुरुषांना असे वाटते की त्यांनी जर काळजी घेतली नाही तर स्त्रिया मरुन जातील. मात्र एखादे झाड कोणतीही परिस्थिती असली तरीही वाढत राहते.

३. प्रत्येक समाजाच्या जीवनविषयक व समाजव्यवस्थेविषयी काही धारणा असतात. उदा. आयरिश आळशी असतात, तुर्की लोक मेहनती असतात. त्याचप्रमाणे स्त्रियांना राजकीय अथवा सामाजिक घडामोडींमध्ये स्वारस्य नसते ही सुद्धा अज्ञानातून न येणारी एक धारणा आहे.

४. वरकरणी स्त्री पुरुषांमध्ये नैतिक तसेच बौद्धिक फरक दिसून येतात. स्त्रिया किंवा पुरुषांमधील गुण वैशिष्ट्ये जर शिक्षण व बाह्य परिस्थिती यांच्याशी पडताळून पाहिली तर त्यांच्यामध्ये नैसर्गिक विषमता असल्याचा पुरावा मिळत नाही.

५. मनुष्य निसर्गाने आखून दिलेल्या मर्यादेबाहेर जाऊ शकत नाही. स्त्रियांना संपूर्ण स्वातंत्र्य मिळाले तरी त्या त्यांच्या नैसर्गिक मर्यादांचे उल्लंघन करु शकणार नाही. त्यामुळे स्त्रिया जे करु शकत नाहीत. त्यावर बंधन घालणे अनावश्यक ठरते.

६. स्त्रियांचा नैसर्गिकरित्या एखाद्या गोष्टीकडे ओढा असला तर त्या अधिक चांगल्या प्रकारे त्या विशिष्ट गोष्टी करू शकतील. जी गोष्ट स्त्रिया चांगल्या प्रकारे करू शकणार नाहीत त्या गोष्टी करण्याची सक्ती कोणीही करू शकणार नाही.

७. घरगुती जीवनात मिळणाऱ्या दुय्यम स्थानामुळे स्त्रिया व्यावसायिक किंवा अन्य काही कार्ये करु शकत नाही. सातत्याने मिळणाऱ्या दुय्यम वागणुकीमुळे स्त्रियांमधील आत्मविश्वास कमी होतो व बाह्य जगतामध्ये त्या अकार्यक्षम ठरतात.

८. स्त्रियांना म्हणजे अर्ध्या मनुष्यसमाजाला आर्थिक लाभ देणाऱ्या व्यवसायांपासून तसेच उच्चस्तरीय सामाजिक कार्यांपासून वंचित ठेवणे अन्यायकाकर आहे. स्त्रियांना त्यांच्या जन्मापासून अशा काही दडपणाखाली ठेवले जाते की त्या आर्थिक फायद्याचे व्यवसाय करण्यास किंवा समाजातील उच्च पद भूषविण्यास सक्षम ठरत नाहीत. मात्र अशी पदे अकार्यक्षम व साधारण बुद्धीचा पुरुष, केवळ पुरुष असल्यामुळे भूषवू शकतो.

९. अनेक व्यवसायांमध्ये पुरुषांचे स्वार्थ जपण्यासाठी कार्यक्षम व कुशल महिलांना प्रवेश नाकारला जातो. महिलांच्या बौद्धिक व मानसिक कुवतीवर नेहमी प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाते. केवळ सामाजिक, लाभासाठी महिलांच्या सेवा सामाजिक/आर्थिक क्षेत्रात स्वीकारल्या जातात. खरे तर तो मुद्दा समाजाच्या लाभाचा नसतो. तर पुरुषांच्या सोयीचा व लाभाचा असतो.

१०. आजच्या पुरुषप्रधान समाजात स्त्रियांसाठी जे काही वर्ज्य मानले जाते, ते करण्यास स्त्रिया लायक नसल्याचा युक्तिवाद केला जातो. त्याचबरोबर या प्रकारच्या बंधनांना स्वीकारले नाही तर स्त्रिया त्यांच्या खऱ्या आनंदाला गमावून बसतील, असाही प्रचार केला जातो. सामाजिक बंधने स्त्रियांच्या लाभासाठीच आहेत, असे त्यांच्यावर ठसविले जाते.

११. मिल्लच्या मते स्पर्धेमधून कार्यक्षमता पारखायची ठरवली तर अनेक महत्त्वाचे व्यवसाय सर्वसाधारण पुरुषांपेक्षा कमी दर्जाच्या मानल्या गेलेल्या स्त्रियांच्या हाती जातील. अनेक स्त्रियांनी त्याची कार्यकुशलता यशस्वीपणे सिद्ध केली आहे.

१२. उच्चस्तरीय बौद्धिक कार्ये नेहमी पुरुषांनी केली आहेत. मिल्लच्या मते संधी मिळाल्यास स्त्रियासुद्धा अशी क्लिष्ट बौद्धिक कामे तेवढ्याच कार्यक्षमतेने पार पाडू शकतील. मिल्ल असा प्रश्न विचारतो की, केवळ महिला आहे म्हणून एखाद्या कुशल व्यक्तीला काम नाकारावे का? यामध्ये समाजाचेच नुकसान नाही का?

महिलांना त्यांच्या इच्छेनुसार व्यवसाय निवडण्याचे स्वातंत्र्य नाकारणे हे अन्यायकारक आहे. कोणत्याही व्यक्तीला केवळ स्त्री असल्यामुळे वकिल किंवा डॉक्टर किंवा खासदार बनू न देणे अन्यायकारक आहे.

१३ अशा प्रकारचे निर्बंध केवळ स्त्रियांसाठी नव्हे तर संपूर्ण समाजासाठी तोट्याचे आहेत. मिल्लच्या विचारांमध्ये उपयुक्तता तत्त्व ठळकपणे दिसते. समाजाच्या कल्याणामध्ये लिंगभेद हा फार मोठा अडथळा आहे. स्त्री-स्वातंत्र्याच्या चळवळीला मिल्लच्या विचारांचा मोठाच तात्त्विक आधार मिळाला.

**<u>आपली प्रगती तपासा</u>**

१. मिल्लचे स्त्रियांच्या दर्जाविषयी विचार सांगा.

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

२. स्त्री-पुरुष समानतेसाठी मिल्ल कोणत्या तत्त्वाचा पुरस्कार करतो?

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

३. महिलांची विशिष्ट कार्यांसाठीच्या अपात्रतेची कारणे कोणती आहेत?

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

## २.४ स्त्रीवाद (Feminism)

समाजामध्ये आढळून येणाऱ्या स्त्री-पुरुष असमानतेमधून स्त्रियांच्या हक्कांसाठी स्त्री स्वातंत्र्याची चळवळ निर्माण झाली त्यातून राजकीय, सांस्कृतिक तसे आर्थिक बाबींचे विचारमंथन झाले. स्त्रियांचे राजकीय हक्क व कायद्याचे संरक्षण याचाही गंभीर विचार होऊ लागला. या सर्वातून 'स्त्रीवाद' ही विचारधारा निर्माण झाली. स्त्री स्वातंत्र्याच्या पुरस्कर्त्यांनी स्त्रियांना कराराचा हक्क, संपत्तीचा हक्क, मतदानाचा हक्क, कार्यालयामधील अधिकार व समान वेतन या सारखे कायदेशीर अधिकार मिळवून देण्यासाठी मोहीमच उघडली. स्त्रियांचा त्यांच्या शरीरावर हक्क असावा, मूल जन्मास घालणे/न घालणे याबाबत निर्णय स्वातंत्र्य असावे या गोष्टीसुद्धा स्त्री स्वातंत्र्याच्या कक्षेत येतात, याकडे स्त्रीवाद्यांनी लक्ष वेधले. घरगुती हिंसा, लैंगिक शोषण तसेच बलात्कार यापासून स्त्रिया व मुली यांचे रक्षण करण्याचा प्रयत्न स्त्री-स्वातंत्र्य/मुक्ती चळवळीच्या माध्यमातून झाला.

### २.४.१ स्त्रीवादातील मतप्रवाह

स्त्रीवादाला अनेक राजकीय तसेच सामाजिक विचारधारांची पार्श्वभूमी आहे. त्यामुळे स्त्रीवादामध्ये पुढील मतप्रवाह आढळून येतात.

**१. उदारमतवादी स्त्रीवाद** (Liberal Feminism)

व्यक्ती-स्वातंत्र्याच्या कल्पनेतून उदारमतवादी स्त्रीवाद निर्माण झाला. प्रत्येक व्यक्तीला समान महत्त्व आहे तसेच सर्व मानव समान आहेत. व्यक्ती कोणत्याही लिंगाची, वंशाची, रंगाची, जमातीची अथवा धर्माची असो, प्रत्येक व्यक्तीला समान वागणूक मिळावयास हवी. प्रत्येक मनुष्याला, मग स्त्री असो किंवा पुरुष, सामाजिक तसेच राजकीय क्षेत्रांमध्ये भाग घेण्याचा हक्क आहे. सर्व व्यक्तींना समान हक्क आहेत. लिंगभेद दूर करण्यासाठी समान कायदेशीर अधिकार असणे आवश्यक आहे.

**२. समाजवादी स्त्रीवाद** (Socialist Feminism)

समाजवादी दृष्टिकोनामधून स्त्री-पुरुष असमानता केवळ सामाजिक अथवा राजकीय क्षेत्रापुरती मर्यादित नाही. एकूण समाजाच्या आर्थिक व सामाजिक रचनेमध्ये लिंगभेद खोलवर रुजलेला आहे. स्त्रियांना समान वेतन, कामकाजाच्या ठिकाणी समान अधिकार व संपत्तीचा अधिकार यासारखे आर्थिक हक्क मिळावयास हवे. आर्थिक लाभांबरोबर स्त्रियांना समान सामाजिक दर्जासुद्धा मिळावयास हवा. लिंगभेदाच्या समस्येवर 'सामाजिक क्रांती' हे उत्तर नसून 'समाजसुधारणा' हे उत्तर आहे. केवळ समाज परिवर्तनामुळे स्त्रियांचा उद्धार होऊ शकतो.

**३. प्रागतिक किवां मूलगामी स्त्रीवाद** (Radical Feminism)

सर्व सामाजिक विभागणी लिंगावर आधारित आहे असे प्रागतिक स्त्रीवादी मानतात. लैंगिक शोषण हेच सर्व समस्यांचा आधार आहे. जातीय भेद, वर्ग भेद, वंशभेद व धार्मिक भेद तसेच आर्थिक व सामाजिक अन्याय हे सर्व लैंगिक शोषण व लैंगिक दडपशाहीपुढे दुय्यम ठरतात. वैयक्तिक व कौटुंबिक जीवनातील समानतेला प्रागतिक स्त्रीवाद प्राधान्य देतो. त्यांच्या

मते स्त्रीपुरुष समानता घरगुती जबाबदाऱ्या, बालसंगोपन, स्त्रियांचा स्वतःच्या शरीरावर अधिकार तसेच लैंगिक समाधान व अभिव्यक्ती यामध्ये प्राप्त व्हायला हवी.

**२.४.२ स्त्रीवादाच्या विकासातील मुलभूत संकल्पना**

स्त्रीवादी विचारांच्या विकासामध्ये पुढील प्रमुख अवस्था दिसून येतात. ह्या अवस्थांना पर्व (Waves) असे संबोधिले जाते.

**१. पहिले पर्व**

स्त्रीवादी विचारांची अभिव्यक्ती अठराव्या शतकापासून होत आहे. मेरी वोलस्टोनक्राफ्ट यांनी त्यांच्या **'व्हिंडीकेशन ऑफ राईटस् ऑफ वुमेन'** या ग्रंथामध्ये स्त्रीवादी विचार मांडले. एक मनुष्यप्राणी म्हणून स्त्रियाना मिळणारे सर्व हक्क व सवलती यांना पात्र आहेत असे मेरी वोलस्टोनक्राफ्ट यांनी प्रतिपादन केले. जे.एस. मिल्ल यांनी **'द सब्जेक्शन ऑफ वुमेन'** या ग्रंथामध्ये स्त्री-पुरुष समानता तसेच स्त्रियांच्या मतदानाच्या अधिकाराचा अत्यंत हिरिरीने पुरस्कार केला.

स्त्रीवादाच्या पहिल्या लाटेवर उदारमतवादाच्या मूल्यांचा व आदर्शांचा पगडा होता. १९व्या शतकामध्ये व विसाव्या शतकाच्या प्रारंभीचा काळ स्त्रीवादाचा पहिला टप्पा मानला जातो. स्त्रीवादाचा भर या कालखंडामध्ये कराराचा व संपत्तीचा समान अधिकार मागण्यावर होता. या कालखंडामध्ये विवाहित स्त्री व तिची मुले यांच्यावर पतीचा अधिकार असण्यास विरोध दर्शविण्यात आला. हुंडा (स्त्रीने अथवा पुरुषाने) देऊन होणाऱ्या विवाहांनाही विरोध करण्यात आला.

स्त्रीवादाच्या पहिल्या लाटेचे उद्दिष्ट स्त्रियांना मताधिकार मिळवून देणे हे होते. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने राजकीय व कायदेशीर अधिकार उपभोगता यावेत अशी या विचारधारेची मागणी होती. जेव्हा १९१८ मध्ये ब्रिटनमध्ये, १९२० मध्ये अमेरिकेमध्ये व १८२३ मध्ये न्यूझीलंड मध्ये स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळाला तेव्हा पहिल्या लाटेचे उद्दिष्ट पूर्ण झाले.

**२. दुसरे पर्व**

बेटी फ्रीडनच्या 'द फेमिनाइन मिस्टीक' व 'सिमॉन द बोए यांच्या 'द सेकंड सेक्स' या पुस्तकांमधून स्त्रीवादाचे दुसरे पर्व अधोरेखित होते. याचा कालखंड १९६० ते १९७० असा म्हणता येतो. स्त्रीवादाच्या दुसऱ्या लाटेचे उद्दिष्ट स्त्री-मुक्ती हे होते. त्यासाठी समाज रचनेमध्ये मूलभुत परिवर्तनाची मागणी होऊ लागली.

सिमॉन द बोए यांनी असे प्रतिपादन केले की, ''कोणतीही व्यक्ती स्त्री म्हणून जन्मास येत नाही, ती (जन्मानंतर) स्त्री म्हणून घडविली जाते.'' बेटी फ्रीडनचया मते स्त्रिया मिथकांच्या बळी आहेत. उदा. स्त्रीच्या अस्तित्त्वाला पती व मुले यांच्यामुळे अर्थ प्राप्त होतो. स्त्रिया कुटुंबामध्ये सुरक्षित असतात. कौटुंबिक व घरगुती जीवनातच स्त्री जन्माचे सार्थक असते. या प्रकारच्या भ्रामक आदर्शामुळे स्त्रियांचे अस्तित्त्व त्यांच्या कुटुंबामध्ये विरून नाहीसे होते. स्त्रियांचे वर्तन हे सुद्धा एक मिथक आहे. यामुळे सार्वजनिक क्षेत्र, सामाजिक क्षेत्र तसेच रोजगार या ठिकाणी प्रवेश करण्यास स्त्रिया कचरतात. केवळ गृहीणी व माता या भूमिका निभवाव्या लागणाऱ्या अनेक स्त्रियांना नैराश्य व दुःखाला सामोरे जावे लागते.

स्त्रीवादाच्या दुसऱ्या पर्वाचे लक्ष्य जीवनातील सर्व क्षेत्रांमध्ये स्त्रियांची मुक्ती हे होते त्यासाठी पुढील क्षेत्रांमध्ये सामाजिक परिवर्तन आवश्यक ठरते.

### अ) पितृसत्ता

कुटुंबामध्ये पिता किंवा पती किंवा वयस्कर पुरुष सभासदाची सत्ता असते. स्त्रीवादी असे मानतात की कुटुंबातील पितृसत्ता जीवनाच्या सर्वच क्षेत्रांमध्ये पसरलेली आहे. शिक्षण, रोजगार, राजकारण, समाजकारण या सर्व क्षेत्रांवर पुरुषांचा प्रभाव दिसून येतो. समाजरचनाच मुळी लैंगिक असमानता व लैंगिक शोषणावर आधारलेली आहे. स्त्रीपुरुषांविषयीचे विचार पुरुषप्रधान समाजाने व कुटुंबाने निर्देशित केलेले आहेत.

### ब) सार्वजनिक व खाजगी क्षेत्र

सर्वसाधारणपणे स्त्रियांची कामे त्यांची वैयक्तिक व खाजगी क्षेत्रांमधील मानली जातात. त्याचप्रमाणे पुरुषांची कामे राजकीय व सार्वजनिक क्षेत्रांमधील गणली जातात. स्त्रियांची कामे घरगुती व कौटुंबिक जबाबदाऱ्यांशी संबंधित असतात. पुरुषांची कामे राजकारण, समाजकारण, रोजगार, कला व साहित्य यासारख्या सार्वजनिक क्षेत्राशी संबंधित असतात. सार्वजनिक क्षेत्रातील कामे राजकीय म्हणजे सत्ताकेंद्रिय संबंधावर आधारित संरचनेमधील असतात.

दुसऱ्या लाटेमधील स्त्रीवादी असे मानतात की कोणत्याही सामाजिक समूहामधील कृती/कामे ही राजकीय कृती/कामे असतात. केवळ शासन व नागरिक आणि मालक व कर्मचारी यांच्यातील संबंध राजकीय नसतात. पती-पत्नी आणि पालक व पाल्य यांच्यातील संबंधसुद्धा राजकीय ठरतात. कौटुंबिक नातीसुद्धा सत्ताकेंद्रिय संरचनेमधील असतात. त्यामुळे महिलांची वैयक्तिक बाब खासगी न राहता राजकीय म्हणजे सार्वजनिक ठरते. कॅरोल हानिश यांनी असे प्रतिपादन केले की, 'जे वैयक्तिक आहे ते राजकीय आहे.''

दुसऱ्या पर्वातील स्त्रीवाद्यांनी महिलांवर होणाऱ्या सांस्कृतिक व राजकीय अन्यायाचा अपरिहार्य व आंतरिक संबंध निर्देशित केला. स्त्रियांचे खाजगी जीवन लिंगभेदावर आधारित राजकीय संरचनेने प्रभावित होते. आधुनिक तंत्रज्ञानाने घरगुती कामे कमी कष्टाची करण्यासाठी वॉशिंग मशीन, फूड प्रोसेसर सारखी उपकरणे निर्माण केली. त्यामुळे स्त्रियांची कामे फार निरर्थक व हीन दर्जाची ठरली. सर्वत्र, विशेषतः कुटुंबामध्ये स्त्रियांना दडपशाहीला सामोरे जावे लागते. घरगुती कामाची वाटणी, वैयक्तिक व सामाजिक वर्तनाचे नियम, यातून स्त्रियांचे शोषण ठळकपणे दिसून येते. म्हणजे स्त्रियांचे खाजगी क्षेत्र 'रोजचे राजकारण' ठरते.

### क) जैविक लैंगिकता लिंग व सामाजिक लैंगिकता

स्त्री पुरुषांमधील जैविक भेदांचा प्रभाव त्यांच्या सामाजिक प्रतिमांवर पडतो. स्त्रियांची प्रजननक्षमता त्यांच्या कौटुंबिक व सामाजिक क्षेत्रातील दुय्यम स्थानास कारणीभूत ठरते. त्यामुळे 'जैविकता ही नियती' ठरते.

दुसऱ्या पर्वामधील स्त्रीवाद्यांनी लैंगिकतेमध्ये जैविक लैंगिकता (Sex) व सामाजिक लैंगिकता (Gender) असा स्पष्ट भेद केला. जैविक लैंगिकता (Sex) ही मानव प्राण्याला निसर्गाने दिलेली तसेच न बदलता येणारी वस्तुस्थिती आहे. सामाजिक लैंगिकता (Gender) हा समाजाने निर्धारित केलेली स्त्री अथवा पुरुषांची भूमिका आहे. समाज स्त्री-पुरुषांवर स्त्रीत्त्वाच्या किंवा पुरुषत्त्वाच्या रुढीबद्ध धारणांचे साचे ठसवितो. सत्ताकेंद्रित नातेसंबंधांमधून म्हणजेच सामाजिक व राजकीय धारणांमधून लिंगभेदाची संरचना होत जाते.

दुसऱ्या पर्वामधील स्त्रीवादी स्त्रीपुरुष असमानतेचे निराकरण करण्यासाठी समाज परिवर्तन आवश्यक मानतात.

### ३. तिसरे पर्व - समकालीन स्त्रीवाद : -

इ.स. १९९० मध्ये स्त्रीवादाच्या तिसऱ्या पर्वाची सुरुवात झाली. या कालखंडातील विचारांना समकालीन स्त्रीवाद असेही म्हणतात. तिसऱ्या लाटेतील स्त्रीवाद्यांनी असे प्रतिपादन केले की प्रत्येक मनुष्यामध्ये स्त्रीचे तसेच पुरुषाचे गुणधर्म असतात. प्रत्येक मनुष्यामध्ये मातृत्त्व तसेच पितृत्त्व दडलेले असते. त्यामुळे प्रत्येकाला एक 'व्यक्ती' म्हणून वागविले पाहिजे. समकालीन स्त्रीवाद्यांचे उद्दिष्ट 'लिंगभेद विरहित व्यक्तित्त्व' प्राप्त करून घेणे हे आहे.

स्त्रीवाद्यांच्या विचारांमध्ये विकासाचे विविध टप्पे दिसून येतात. काही स्त्रीवादी 'पुरुष काय आहेत आणि त्यांनी काय प्राप्त करून घेतले आहे. याचा विचार करतात. त्याचे उद्दिष्ट स्त्रियांनी पुरुषांसारखे व्हा, पुरुषांना जे मिळते ते स्त्रियांना मिळावे हे आहे.

काही स्त्रीवाद्यांना स्त्रियांनी स्पर्धात्मक व आक्रमक भूमिका घेणे धोकादायक वाटते. त्यांच्या मते स्त्रियांना 'आत्मभान' येण्यामध्ये स्त्रीमुक्ती आहे. स्त्री व पुरुष यांच्यामध्ये जैविक तसेच मानसिक असे मूलभूत फरक आहेत. पुरुषांमधील आक्रमकता व स्पर्धात्मकता हे गुणधर्म तसेच स्त्रियांमधील सृजनशीलता व परानुभूती हे गुणधर्म अंतःस्त्राव (Hormone) व आनुवंशिकता यांचा परिणाम असतात.

स्त्रियांनी त्यांच्या जैविक लिंगाच्या विशेष गुणधर्मांना ओळखावे; स्त्रीत्त्वाच्या वैशिष्ट्यांचा सन्मान करावा आणि स्त्रीजन्माचा आनंदोत्सव करावा. स्त्रियांनी लिंगविरहित व्यक्तित्त्वापेक्षा 'संपूर्ण विकसित व सफल स्त्री' होण्यामध्ये सार्थकता मानली पाहिजे. स्त्रियांनी त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण लक्षणांचा अभिमान बाळगून स्वतःच्या खास स्त्रीत्त्वाचा विकास साधावा.

### २.४.३ भारतीय दृष्टिकोन

भारतातील वैदिक कालातील स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार होता. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर स्त्रियाही गृहस्थाश्रमामध्ये प्रवेश करीत असत. गृहस्थाश्रमामध्ये प्रवेश करणाऱ्या विद्वान स्त्रियांना 'सद्योवधू' म्हटले जात असे. मात्र केवळ ज्ञानार्जन करीत सन्यस्त जीवन जगणाऱ्या स्त्रियांना 'ब्रह्मवादिनी' म्हणत. लोपमुद्रा, घोषा, मैत्रेयी व गार्गी ह्या त्यांच्या विद्वत्तेबद्दल प्रसिद्ध होत्या.

रामायण व महाभारताच्या कालखंडामध्ये स्त्रियांना त्यांचा पती निवडण्याचा अधिकार होता. सीता, सावित्री तसेच द्रौपदी यांनी स्वतःचा पती स्वतःच निवडला होता. त्यानंतर मात्र स्त्री-स्वातंत्र्याचा दिवसेंदिवस संकोच होऊ लागला. मनुस्मृती मध्ये निर्धारित केलेली स्त्रियांसाठीची कर्तव्ये पाहता त्याकाळी स्त्रियांचे स्थान कनिष्ठ दर्जाचे असल्याचे स्पष्ट होते.

इ.स. १८८२ मध्ये श्रीमती ताराबाई शिंदे यांचे 'स्त्री पुरुष तुलना' हे पुस्तक प्रसिद्ध झाले. त्यातून त्यांचे पितृसत्ता व जाति-व्यवस्था यावर स्वतंत्र व स्त्रीवादी विचार दिसून येतात. स्त्रियांचे सर्व ठिकाणी सारख्या पद्धतीने शोषण होते असे ताराबाईंनी अत्यंत बोचऱ्या शब्दांमध्ये प्रतिपादन केले. धार्मिक ग्रंथ स्त्रियांच्या शोषणाचे स्रोत आहेत असे सांगून ताराबाईंनी धार्मिक ग्रंथांच्या प्रामाण्याला आव्हान दिले. स्त्रियांनी 'सद्‌गुणी स्त्री' व्हावे किंवा 'वेश्या' असा पर्याय अनेक बंधने घातलेल्या स्त्रियांसाठी ठेवला जातो. स्त्रियांनी 'सावित्री' व्हावे अशी अपेक्षा ठेवणारा समाज सावित्रीने स्वतःचा पती स्वतःच निवडला होता, हे मात्र सोयीस्करपणे विसरतो. श्रीमती ताराबाई शिंदे यांचे विचार स्त्रीवादाच्या पाश्चात्य परंपरेच्या दुसऱ्या पर्वाच्या विचारांसारखे आहेत.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मनुस्मृतीवर टीका करताना स्त्रियांचे लैंगिक शोषण हेच भारतीय समाजातील अन्यायाचे मूळ कारण असल्याचे प्रतिपादन केले. मनुस्मृतीमधील नियम मुख्यतः लिंगभेदावर आधारित असून जातिव्यवस्थेच्या कठोर नियमांनी सामाजिक विभागणी नियंत्रित केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचारसुद्धा स्त्रीवादाच्या दुसऱ्या पर्वाशी साम्य दर्शवितात.

डॉ. प्रतिभा राय यांना इ.स. २००७ मध्ये 'पद्मश्री' व इ.स. २०११ मध्ये 'ज्ञानपीठ' पुरस्कार मिळाला. त्यांच्या साहित्यामध्ये प्रेम, समता, शांती व एकात्मता यावर आधारित समाजव्यवस्थेचा शोध दिसून येतो. वर्गभेद, धर्मभेद, जातिभेद तसेच लिंगभेद विरहित; समानतेवर आधारित समाजव्यवस्थेचा डॉ. प्रतिभा राय पुरस्कार करतात. निरोगी समाजासाठी स्त्री पुरुषांना वेगवेगळ्या प्रकारे निर्माण करण्यात आले आहे. स्त्रियांना निसर्गाने जी खास गुणवैशिष्ट्ये प्रदान केली आहेत त्यांची जोपासना व्हायला हवी. एक मानव म्हणून स्त्री व पुरुषांमध्ये समानता आहे. डॉ. प्रतिभा राय स्वतःला 'स्त्रीवादी' म्हणण्यापेक्षा 'मानववादी' म्हणवतात. त्यांचे विचार स्त्रीवादातील तिसऱ्या पर्वाशी साम्य दर्शवितात.

**आपली प्रगती तपासा :-**

१. 'स्त्रीवाद' म्हणजे काय?

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

२. स्त्रीवादातील प्रमुख विचारप्रवाह कोणते आहेत?

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

३. स्त्रीवादातील पर्वे (Waves) कोणती आहेत?

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

## २.५ सारांश

समाजातील निसर्गाने केवळ जैविक भेद निर्माण केले आहेत. निसर्गनिर्मित भेदांची व्याप्ती मानवनिर्मित समाजामध्ये वाढत जाते. समाजातील पुरुषांचे स्थान स्त्रियांच्या स्थानापेक्षा उच्च दर्जाचे आहे. लिंगभेदासाठी स्थलकालाच्या मर्यादा दिसत नाहीत. भारतीय विचार असोत की ग्रीक विचार, मनू तसेच ॲरिस्टॉटल, स्त्रियांना दुय्यम दर्जा देतात. दोघेही स्त्रियांचे स्वतंत्र स्थान नाकारतात. दोघेही स्त्रियांना संपत्तीचा अधिकार, शिक्षणाचा अधिकार तसेच जीवनाचा

जोडीदार निवडण्याचा अधिकार नाकारतात.

जे. एस. मिल्लने समाजामध्ये स्त्रियांवर होणारा अन्याय जाणला. मिल्ल स्त्री व पुरुषांमधील संपूर्ण समानतेचे समर्थन करतो. मिल्लने स्त्रियांचा स्वतःचा रोजगार निवडण्याचा तसेच त्यांच्या राजकीय हक्कांची मागणी केली. मिल्लने असे प्रतिपादन केले की स्त्रियांचे सध्याचे स्थान पुरुषप्रधान समाजाने निर्धारित केलेले म्हणजे कृत्रिम आहे. मिल्लने उपयुक्तता तत्त्वाच्या आधाराने असे सांगितले की समाजाच्या अर्ध्या लोकसंख्येच्या (स्त्रियांच्या) कौशल्याचा व क्षमतांचा उपयोग करून न घेण्यामध्ये स्त्रियांपेक्षा समाजाचे अधिक नुकसान आहे.

स्त्रीवादी विचारधारा स्त्रीपुरुष समानतेचा जोरदार पुरस्कार करते. स्त्रीवादी विचारांमध्ये अनेक मतप्रवाह आढळून येतात. उदारमतवादी स्त्रीवाद हा राजकीय व कायदेशीर हक्कांवर लक्ष केंद्रित करतो. स्त्रियांचा मताधिकार ही त्यांची प्रमुख मागणी होती. समाजवादी स्त्रीवाद सामाजिक व घरगुती जीवनामध्ये स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर लक्ष केंद्रित करतो. सामाजिक क्रांती व सामाजिक परिवर्तन यातून स्त्रियांचा खरोखर उद्धार होऊ शकतो. प्रागतिक वा मूलगामी स्त्रीवाद केवळ समान दर्जा मागत नाही तर स्त्रीचा स्वतःवर पूर्ण अधिकार असण्याची मागणी करतो. स्त्रियांचे लैंगिक शोषण हे सर्व प्रकारच्या सामाजिक अन्यायाचे मूळ कारण आहे.

स्त्रीवादी विचारांच्या विकासामध्ये पहिल्या पर्वामध्ये समान राजकीय व कायदेशीर अधिकारांची मागणी करण्यात आली. स्त्रीमुक्तीच्या चळवळीचा आरंभ या पर्वामध्ये झाला. दुसऱ्या पर्वामध्ये सामाजिक, घरगुती, आर्थिक व राजकीय बाबींमध्ये स्त्रियांच्या समानतेची मागणी करण्यात आली. या पर्वातील स्त्रीवाद्यांची मागणी पुरुषांसारखे हक्क ही होती. तिसऱ्या पर्वातील म्हणजे समकालीन स्त्रीवाद्यांनी स्त्रियांच्या **'स्त्रीत्त्वाची जाणीव'** व **स्त्रियांचे 'आत्मभान'** यावर लक्ष केंद्रित केले. स्त्री पुरुष समानता प्राप्त करण्याच्या संघर्षाचा परिणाम म्हणून स्त्रीवाद्यांनी स्त्रीत्त्वाची परिपूर्णता कशात आहे याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. ह्या पर्वामध्ये निसर्गाने स्त्रीला दिलेली वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्मांचा स्वीकार करावयास हवा असा विचार रुजला. प्रागतिक स्त्रीवादी स्वतंत्र व्यक्तित्त्व आणि परिपूर्ण स्त्रीत्त्वाचा पुरस्कार करतात.

## २.६ दीर्घोत्तरी प्रश्न

१. ॲरिस्टॉटलचे स्त्रियांच्या स्थानाविषयी विचार सांगा.

२. जे.एस. मिल्लचे स्त्री-पुरुष समानतेविषयी विचार स्पष्ट करा.

३. 'स्त्रियांचे सद्यस्थितीतील स्वरुप हे कृत्रिम आहे' हे मिल्लचे विधान स्पष्ट करा.

४. स्त्रीवादी विचारांचा विकास कसा होत गेला ते विशद करा.

५. स्त्रीवादामधील मतप्रवाह सांगा.

❖❖❖

# ३

# गरीब/गरजू यांच्याप्रती सामाजिक उत्तरदायित्व

**(अ) सर्वोदयाचा दृष्टिकोन - मा. गांधी व आचार्य यथार्थ विनोबा भावे यांच्या संदर्भात**

**घटक रचना**

३.० उद्दिष्टये
३.१ प्रस्तावना
३.२ सर्वोदयाचा दृष्टिकोन : महात्मा गांधी
३.३ विनोबा भावे आणि सर्वोदय चळवळ
३.४ सारांश
३.५ दीर्घोत्तरी प्रश्न

## ३.० उद्दिष्टये

१) सर्वोदयाचा अर्थ समजून घेणे.
२) सर्वोदयावरील म. गांधीचे विचार काय आहेत याविषयी माहिती करुन घेणे.
३) पूर्वजांकडून आलेल्या सर्वोदय विचारांचा विनोबा भावे यांचा दृष्टिकोन समजून घेणे.

## ३.१ प्रस्तावना

आजही आपल्या समाजात काही घटक सामाजिक, आर्थिक व नैतिकदृष्ट्या उपेक्षित वा दुर्लक्षित आहेत. समाजातील अशा आर्थिक व सामाजिकदृष्ट्या दुर्बल, गरीब घटकांचा विचार अनेक विचारवंतानी केलेला आहे. अनेक गरीब वा गरजू आणि उपेक्षित लोक समाजापासून दुरावलेले आहेत. नैसर्गिक आणि मानवनिर्मित संसाधनामध्ये झालेल्या विषम वाटणीमुळे त्यांच्यावर ओढावलेली परिस्थिती अधिक गंभीर स्वरूपाची आहे. ही विषमता अनेक क्षेत्रांमध्ये झालेली पहावयास मिळते. शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, आरोग्य, नोकरी, ध्येयधोरणे इ. क्षेत्रातील विषमता आजही दिसून येते. ही एक जागतिक स्वरुपाची घटना आहे. समाजातील अशा पददलीत, दीनदुबळया व गरीब घटकांचा विचार म. गांधी, विनोबा भावे, आचार्य दादा धर्माधिकारी, जयप्रकाश नारायण या भारतीय विचारवंतानी प्रभावीपणे केला, तर पाश्चात्य विचारवंत रस्किन, पिटर सिंगर यांनी केलेला असून त्यांचे या घटकांप्रती महत्वाचे विचार काय आहेत ते आपण या पाठात समजून घेणार आहोत. सामाजिक तत्वज्ञानात सर्वोदय विचारप्रणाली म. गांधीनी प्रथम मांडली सर्वोदय म्हणजे समाजातील सर्वांचा विकास होय. समाजातील सर्वांचे व प्रत्येकाचे कल्याण हे सर्वोदयाचे तत्वज्ञान होय. सर्वोदय या विचारप्रणालीत आचार्य विनोबा भावे, जयप्रकाश नारायण, आचार्य दादा धर्माधिकारी यांचे योगदान महत्वाचे आहे.

## ३.२ सर्वोदयाचा दृष्टिकोन : महात्मा गांधी

सर्वोदय ही एक म.गांधीजींची अत्यंत महत्वाची सामाजिक व राजकीय चळवळ आहे आचार्य समंतभद्र या जैन मुनीच्या लेखनातून म.गांधीजीनी सर्वोदय हा शब्द घेतला आणि

आपल्या आत्मकथेत त्याचा प्रथम उल्लेख केला. त्यानंतर रस्किनच्या **'अन टु धिस लास्ट'** नामक पुस्तकाचा गुजराती अनुवाद केला. त्याचे शिर्षक म्हणून सर्वोदय शब्दाचा उपयोग केला. आचार्य दादा धर्माधिकारी यांच्या मते रस्किनच्या 'अन टु धिस लास्ट' या पुस्तकाचा अनुवाद म.गांधीजींनी प्रथम **'अंत्योदय'** केला होता. पुढे संशोधित शब्द सर्वोदय आला. जो सर्वात गरीब वा पददलीत आहे, त्यांचा उद्धार झाला तर सर्वांचा उद्धार म्हणजेच सर्वोदय ठरेल. सर्वोदय हा शब्द म. गांधीजीनी उपयोगात आणून तो विशिष्ट अर्थाने वापरला आहे. सर्वोदय म्हणजे सर्वांचा उदय, सर्वांचा उत्कर्ष, सर्वांचा विकास होय. समाजात उपलब्ध असलेल्या भौतिक आर्थिक, आध्यात्मिक साधनांचा सार्वजनिक कल्याणाच्या दृष्टिने अधिकाधिक उपयोग करुन घेण्याचे सर्वोदय हे एक शास्त्र आहे. अधिकाधिक लोकांचे अधिकाधिक सुख' (Greatest happiness of the greatest number) या उपयुक्ततावादी सूत्रापेक्षा सर्वोदयाचे उद्दिष्ट अधिक व्यापक आहे. समाजातील प्रत्येकाचे व सर्वांचे कल्याण सर्वोदयात अपेक्षित आहे. म्हणून समाजवादाच्या कोणत्याही प्रकारापेक्षा सर्वोदयाचे तत्त्वज्ञान अधिक समावेशक व सर्वस्पर्शा आहे. समाजातील गरीब श्रीमंत, समर्थ-असमर्थ, बुद्धिमान-मंदबुद्धी या सर्वांचा अभ्युदय सर्वोदयात सामाविष्ट आहे. 'जगा आणि जगू द्या' त्यापेक्षाही उच्च असा आदर्श सर्वोदयाने स्वीकारला आहे. इतरांकरीता जगा हा वेदांत तत्त्वज्ञानाचा अवलंब सर्वोदय विचारसरणीने अवलंबिलेला आहे.

महात्मा गांधीजींच्या आधी आधुनिक भारतातील कोणत्याही तत्त्वचिंतकाने त्यांच्याइतका सर्वस्पर्शी विचार केलेला दिसत नाही. धर्म, नीती, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, शिक्षण, कायदा शेती कोणतेही क्षेत्र असो. वैयक्तिक आत्मशांतीपासून विश्वशांतीपर्यंत, गावापासून विश्वापर्यंत असा प्रचंड मोठा आवाका म.गांधींजींच्या सर्वोदय विचाराने व्यापला आहे. सत्य ही त्यांची जीवनसाधना होती. त्यालाच त्यांनी **'सत्याचे प्रयोग'** असे नामाभिधान दिले. दीन दुबळया मनुष्य प्राण्यांना जगण्याचा अधिकार मिळावा म्हणून सर्वांना विकासाची समान संधी मिळावी व इतरांसाठी जगा हा व्यापक विचार म.गांधींनी सर्वोदय या विचारप्रणालीत आणला.

जॉन रस्किनच्या विचारांचा प्रभाव गांधींजींवर पडला. त्यांच्या 'Un to this Last' या पुस्तकाने ते प्रभावित झाले. रस्किनच्या या पुस्तकाची प्रत त्यांचा ब्रिटीश मित्र हेन्री पोलक यांच्याकडून वाचावयास मिळाली. त्यावेळी ते १९०४ मध्ये दक्षिण आफ्रिकेत वकीली व्यवसाय करीत होते. हे पुस्तक जोहान्सबर्ग ते डर्बन या रेल्वे प्रवासात त्यांनी वाचले. त्यांना या पुस्तकाने पकडून ठेवले, शिवाय संपूर्ण रात्रभर त्यांना झोप आली नाही. या पुस्तकातील विचार म.गांधीजींनी अमलात आणण्याचा विचार केला आणि त्यांचे गुजराती भाषांतर सर्वोदय या नावाने केले. या पुस्तकाच्या विचाराने त्यांचे जीवनच बदलून गेले. या बाबतीत ते आपल्या आत्मकथेत म्हणतात, **'सर्वोदयाचे सिद्धांत'** असे त्यास गांधीजी समजतात. ती तत्त्वे पुढीलप्रमाणे असून, त्यापासून गांधीजींनी धडा घेतला.

१) सर्वांच्या कल्याणात आपले कल्याण आहे.

२) वकील काय किंवा हजाम काय दोघोंच्याही कामाचे मूल्य सारखेच आहे कारण पोटापाण्याचा म्हणजेच काम करुन जगण्याचा व अर्थाजन करण्याचा अधिकार दोघानांही सारखाच आहे.

३) साधे अंगमेहनतीचे जीवन म्हणजेच कष्टकरी शेतकऱ्याचे जीवन हेच खरे जीवन होय.

वरील तत्त्वे सामाजिक उत्तरदायित्वच्या दृष्टिने प्राथमिक स्वरुपात गांधींजींच्या ठिकाणी जागृत झाली.

म. गांधींजीनी सर्वोदयाची संकल्पना एक राजकीय विचारप्रणाली म्हणून स्वीकारली आहे. **"समष्टिचे हित ते व्यक्तीचे हित"** हा सर्वोदयाचा प्रमुख विचार असून या विचारप्रणालीचा नैतिक पाया हा शारीरिक श्रम आणि आर्थिक सत्तेचे विकेंद्रिकरण हा आहे. म. गांधींजींच्या मते सर्वोदय म्हणजे सत्य व अहिंसा यावर आधारित परंतु स्पर्धा, विषमता, संघर्ष, शोषण यांना मुळीच स्थान नसलेली आणि समाजाच्या कनिष्ठ पातळीवरील व्यक्तीला म्हणजेच गरजू व गरीब व्यक्तीला विकासाची समान संधी उपलब्ध करुन देण्याची समाजरचना म्हणजे सर्वोदय होय' ह्या विचारपद्धतीत आध्यात्मिक, नैतिक सामाजिक व आर्थिक साधनांवर भर दिलेला आहे. सर्वोदय समाजाला आवश्यक असणारी गुणवैशिष्ट्ये म.गांधींजी सांगतात. त्यांना **'एकादश व्रते'** असे म्हणतात. त्यांना अत्यंत साधारण महत्व आहे. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह, शरीरशम्र, अस्वाद, अभय, सर्वधर्मसमभाव, स्वदेशी व स्पर्शभावना हीच म.गांधीजींची एकादशव्रते होत. एकूणच गांधीजींच्या सर्वोदय तत्त्वज्ञानात सत्य, अहिंसा, सत्याग्रह, नैतिक क्रांती, नैतिक आचरण, साधन-साध्य विवेक, राजकारण, धर्मकारण, असहकार, सविनय कायदेभंग, स्वराज्य, ग्रामस्वराज्य, व्यक्तिस्वातंत्र्य, आर्थिक विकेंद्रीकरण, ग्रामोद्योग, कुटीरोद्योग, श्रमप्रतिष्ठा, स्वयंपूर्ण खेडी, विश्वस्त वृत्ती आणि एकादश व्रते या सर्वांमधून सर्वोदय विषयीचे म.गांधीजीचे विचार प्रकट होतांना दिसतात.

सर्वोदयाचे तत्त्वज्ञान हे अपूर्ण मानवी मनाच्या व आत्म्याच्या विरुद्ध नियंत्रण वा तपासणी करणारी एक विचारधारा आहे. वास्तविक सामाजिक कल्याणाकडे नेणारा आणि मानवाला कल्याणकारी रुळावर आणणारा सर्वोदय हा एक प्रयत्न आहे. भारतात सर्वोदय समाज उभारणीसाठी म.गांधीजींनी १८ कलमी विधायक कार्यकम सांगितला. तो पुढीलप्रमाणे :-

१) सामुहिक ऐक्य / जातीय ऐक्य

२) अस्पृश्यता निवारण/जातीभेद निर्मूलन

३) खादी

४) ग्रामोद्योग

५) ग्रामस्वच्छता

६) नई तालीम

७) प्रौढ शिक्षण

८) स्त्रीयांचा उद्धार

९) आरोग्य शिक्षण

१०) प्रांतीय भाषा

११) राष्ट्रभाषा

१२) आर्थिक क्षमता

१३) शेतकऱ्यांचा उद्धार

१४) श्रमिकांचे कल्याण

१५) कुष्ठरोग निवारण

१६) आदिवासींचे कल्याण

१७) विधेयक कायदा

१८) विद्यार्थी कल्याण

सर्वोदय विचारप्रणालीत केवळ भौतिक प्रगती नव्हे तर मानसाची आध्यात्मिक प्रगती व्हावयास पाहिजे. सर्वोदय ज्या क्रांतीचे प्रतिवादन करतो तो साध्य होण्यासाठी जीवनातील

मूल्यांमध्ये परिवर्तन होणे गरजेचे आहे. त्याकरिता द्वैताकडून अद्वैताकडे, भेदाकडून अभेदाकडे जाणारी हा विचारधारा आहे. एकूणच ही विचारसरणी मानवी जीवनाच्या प्रत्येक अंगाशी संबंधीत आहे. मानवनिष्ठ दृष्टिकोन केंद्रवर्ती ठेवून सर्व मानवमात्रांचे सहजीवन समृद्ध करणे ही सर्वोदयाची प्रेरणा आहे. समाजातील तळागाळा पर्यंत सर्व लोकांचा उद्धार व कल्याणकारी कार्याचा प्रारंभ करणारी गतिशीलता सर्वोदय विचारप्रणालीत गृहीत धरलेली आहे. ह्या भूतलावर रामराज्य अवतीर्ण व्हावे ही त्याची वाटचाल आहे. विषमता, शोषण, संघर्ष नष्ट व्हावेत आणि सत्य व अहिंसा या तत्त्वांवर आधारित नवीन समाजरचना निर्माण व्हावी हे गांधीजींचे ध्येय होते तर समाजात उपलब्ध असलेल्या भौतिक आर्थिक व आध्यात्मिक साधनांचा सार्वजनिक कल्याणाच्या दृष्टीने अधिकाधिक उपयोग करुन घेण्याचे सर्वोदय हे एक शास्त्र आहे. श्रम प्रतिष्ठा, संपत्तीची समान वाटणी, सामुहिक सामंजस्य (ऐक्य) आणि व्यक्तिचे स्वातंत्र्य हे गांधींजीचे सामाजिक आदर्श आहेत.

अशाप्रकारे सर्वोदय ही एक सामाजिक विचारप्रणाली आहे. ही विचारप्रणाली अंमलात आणण्याने अपेक्षित अशी लोकनीति प्रस्थापित होऊ शकते. लोकनीति हा सर्वोदयातील एक महत्वाचा राजकीय विचार आहे. तसेच सामाजिक तत्त्वज्ञानात सर्वोदय ही विचारप्रणाली फार महत्वाची आहे. सर्वोदयाची आधुनिक समाजाशी सुसंबद्धता आपणास विज्ञान व समाज, समतेवर आधारित क्रांती, लोकनीति, स्त्रीपुरुष सहजीवन व्रत विचार, समाजरचनेतील बदल, सर्वधर्मसमभाव, शिक्षण या विविध गोष्टींवर दिसून येते. सर्वोदय विचारसरणीत आचार्य विनोबा भावे जयप्रकाश नारायण, दादा धर्माधिकारी यांचे योगदान महत्वाचे आहे.

**आपली प्रगती तपासा**

१) सर्वोदयाचा अर्थ काय?

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

२) 'अन टु धिस लास्ट' ' या जॉन रस्किनच्या ग्रंथातून म. गांधींजीनी कोणते तीन धडे घेतले?

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

## ३.३ विनोबा भावे आणि सर्वोदय चळवळ

म.गांधींजींचे अपूर्ण राहिलेले कार्य त्यांच्या निधनानंतर त्यांचे मानसपूत्र आचार्य विनोबा भावे यांनी हाती घेतले. गांधीजींच्या कार्यात आणि सर्वोदयाच्या तत्त्वज्ञानात विनोबाजींनी मौलिक भर टाकून आपले आयुष्य त्यांच्या कार्यासाठी वाहिले. ते गांधीजींच्या वर्धा येथील आश्रमात राहून सत्याग्रहाचे नेतृत्व, हरिजनांना मंदिर प्रवेश, १९३२ च्या चळवळीत सहभाग घेऊन एक कृतिशील गांधीवादी म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांच्या मते सर्वांचे भले करण्याची दृष्टी म्हणजे सर्वोदय होय. सर्वोदयात अन्याय व विषमता नाही. मी सर्वामध्ये आणि माझ्यात सर्व आहे ही **'सर्वभूतहित'** ही कल्पना त्यात आहे.

विनोबांनी भारतातील विषमता पाहिली. ही विषमता नष्ट झाल्याशिवाय सर्वांचे कल्याण अशक्य आहे. त्यांनी जमिनींची विषम वाटणी, भूमीहिन, जमिनदार या गोष्टी पाहिल्या. त्यांनी जमिनीवरील मालकी हक्क नष्ट करण्याच्या कार्याला प्रारंभ केला. त्यांच्या या कार्याला **'भूदानयज्ञ'** असे नाव दिले. त्यांनी भारतात पायी प्रवास करीत भुदान चळवळीला प्रारंभ करुन २ महिन्यात १२००० एकर जमिन मिळवून त्या जमिनीची सर्वलोकांना पुन्हा समान वाटणी करुन टाकली. त्यांच्यामते जमिनीची समान वाटप केल्याशिवाय ग्रामराज्याची उभारणी करता येणार नाही. या भूदानचळवळीचा मूळ उद्देश जमिनीच्या आणि संपत्तीच्या पायावर ग्रामोद्योग आणि अहिंसक समाजाची स्थापना करणे हा विनोबाजांचा उद्देश होता. भूदान म्हणून केवळ जमिनीची समान वाटप करण्याची चळवळ नव्हे तर मनुष्याच्या अंतःकरणातील भक्ती आणि प्रेम केलेली ईश्वराची आठवणी होय. भूमिहिनांना जमिनी मिळवून देणे या कार्यासाठी त्यांनी हिंसेचा अवलंब न करता शांती व प्रेम या दोन मार्गाने भूदान चळवळीचा त्यांनी अवलंब केला. भूदानयज्ञाच्या पाच पायऱ्या विनोबांनी सांगितल्या.

१) दुःख निवारण करणे

२) देशाचे लक्ष्य भूसमस्येकडे वेधून घेणे.

३) कार्यकर्त्यांमध्ये निष्ठा दृढ करणे

४) व्यापक भूमिदान

५) संपूर्ण गावाचे एकच कुटुंब बनविणे

वरील पाच पायऱ्यानंतर ग्रामराज्याचा आरंभ करणे म्हणजेच भूमिक्रांती होय. थोडक्यात भूदान यज्ञाची नवीन दृष्टी निर्माण करून जमिनदारात हृदय परिवर्तन करणे व शेवटी समाज परिवर्तन अर्थात प्रेमाने हृदय परिवर्तन जमिनदारांचे करणे व त्यांचा जमिनीवरील मालकी हक्क विसर्जित करणे हे विनोबांना श्रेयस्कर वाटते. केवळ जमिनी गोळा करणे आणि त्या दान करणे असा भूदान यज्ञाचा अर्थ नसून जमिनदारांमध्ये सर्वोदयाची मनोभूमिका तयार करणे हा अर्थ आहे.

विनोबाजींनी भूदान यज्ञाबरोबर **संपत्तीदान** व **ग्रामदान** यज्ञ सुरु केला. संपत्तीदान हा अपरिग्रह व अस्तेय (चोरी न करणे) या नैतिक तत्त्वांवर आधारलेला आहे. संपत्तीदानाच्या पुढेही जाऊन विनोबा म्हणतात की **प्रेमदान** व **बुद्धीदान** हे संपत्तीदानाचे दोन मार्ग आहेत. त्याहीपुढे जाऊन ते **'जीवनदान'** हा सर्वोत्कृष्ट मार्ग सांगतात. म्हणजेच संपत्तीदानाची परिणती जीवनदान यज्ञात झाली पाहिजे. आपले जीवन स्वार्थासाठी घालविण्यापेक्षा मानवी जीवनाच्या कल्याणासाठी खर्च करणे हेच खरे जीवनदान होय.

भूदान ते ग्रामदान अशी चळवळ उभी करून विनोबांनी गाव हेच एक मोठे कुटुंब मानून सर्व व्यवहार कौटुंबिक आदर्शानुसार पार पाडले जावे व सर्वांनी प्रेमाने राहावे असा ग्रामदानाचा अर्थ आहे. ग्रामदानातून आर्थिक फायदे होतील. जमिनीची व्यक्तिगत मालकी जाऊन त्यावर सर्वांची मालकी होईल, गावातील लोक सहकार्याने वागतील, लोकांचा नैतिक विकास होईल, माझे म्हणून काहीही राहणार नाही. **''मी सर्वांचा व सर्व माझे''** अशी मनोवृत्ती ग्रामदानाद्वारे निर्माण होईल. विनोबाजींच्या मते गावातील संपत्ती गावातच राहिली पाहिजे. छोटे मोठे उद्योगधंदे गावातून उभे राहिले तर सर्वांना काम व शिक्षण मिळेल अशी व्यवस्था गावातून निर्माण झालेली असेल. 'वसुधैव कुटुम्बकम्' या आदर्शाप्रत त्यांची ग्रामदानाची संकल्पना येऊन पोहोचते.

सर्वोदयाच्या स्वरुपाबाबत विनोबाजी म्हणतात, "सर्वोदय तत्त्वज्ञानाचा एकूण विचार समन्वयाचा आहे. विचाराचा मेळ घातल्याची आणि त्यांना एकत्र आणण्याची शक्ती उद्देश

सर्वोदयाच्या विचारात आहे. जातीयवाद, पांथिकवाद, बहुसंख्यवाद, अल्पसंख्यवाद अशा विचारांना सर्वेदियाचा विरोध आहे. विज्ञान आणि अहिंसा यांच्या संबंधात विनोबांनी असे प्रतिपादन केले की, विज्ञानाने अहिंसा स्वीकारली पाहिजे. आजच्या वैज्ञानिक विचारात अहिंसेचा विचार दिसत नाही. 'युद्ध नको, शांतता हवी'' असे म्हणत असतांना प्रत्यक्षात विज्ञानाचा उपयोग अधिकाधिक संहारक शस्त्रे निर्माण करण्याकरिता केला जातो. त्याऐवजी विज्ञानाचा हात अहिंसेच्या हातात दिला पाहिजे म्हणजे मनुष्य जीवन संपन्न व शांततामय होईल. या विचाराबाबत विनोबांनी एक समीकरण तयार केले.

हिंसा + विज्ञान = सर्वनाश

अहिंसा + विज्ञान = सर्वोदय

अशाप्रकारे 'अहिंसा व सर्वोदय' ही म.गांधी व विनोबांच्या विचारांची मूलतत्त्वे आहेत. अहिंसा त्या विचारांचा प्राण आहे तर सर्वोदय हे त्याचे शरीर आहे. विनोबांच्या मते सर्वोदयासाठी साधन-सूचितेची गरज आहे. सर्वोदयाच्या दृष्टीने समाजरचनेत जो बदल घडवून आणायचा आहे त्याचा आरंभ आपल्या खाजगी जीवनातील परिवर्तनाने करावयाचा आहे. एकूणच विनोबांच्या भूदान, संपत्तीदान, ग्रामदान, लोकनीती, ग्रामस्वराज्य, असहकार आणि प्रतिकार, सत्याग्रह, स्वराज्य, साम्ययोग, साम्यवाद, शासनमुक्त समाज या सर्वांमधून सर्वोदयविषयक विचार प्रतीत होतांना दिसतात.

**आपली प्रगती तपासा -**

प्र. आचार्य विनोबा भावे यांचे सर्वोदयासंबंधीचे विचार थोडक्यात सांगा.

.....................................................................................................................
.....................................................................................................................
.....................................................................................................................
.....................................................................................................................

## ३.४ सारांश

सर्वोदय विचारसरणी ही विविधांगी आहे. सत्य, अहिंसा ही सर्वोदय विचारसरणीतील मूलभूत व मध्यवर्ती तत्त्वे आहेत. सर्वोदय साकार व्हावयाचा असेल तर सत्य आणि अहिंसा यांचे पालन व आचरण करणे महत्त्वाचे आहे.

सर्वोदय म्हणजे सर्वांचा उदय, सर्वांचा विकास होय. ''अधिकाधिकांचे अधिकाधिक सुख'' या उपयुक्ततावाद्यांच्या मूलसूत्रापेक्षा सर्वोदय अधिक व्यापक आहे. सर्वोदयाचे तत्त्वज्ञान समावेशक व सर्वस्पर्शी आहे. म. गांधी, आचार्य विनोबा भावे, यांनी सर्वोदयाची व्यापक विचारसरणी मांडली. म. गांधीजींनी रस्किनच्या 'अन टु धिस लास्ट' या ग्रंथाचे गुजराती भाषांतर सर्वोदय या नावाने केले. म. गांधीजींनी सर्वोदयाची गुणवैशिष्ट्ये म्हणून एकदशव्रते सांगितली. तसेच सर्वोदय समाज उभारणीसाठी १८ कलमी विधायक कार्यक्रम सांगितला.

आचार्य विनोबांनी सर्वोदयाचे कार्य हाती घेऊन ती चळवळ कार्यप्रवण केली व एक कृतीशील गांधीवादी म्हणून प्रसिद्धीस आले. त्यांनी भूदानाची चळवळ हाती घेऊन ग्रामदान ह्या आदर्शाप्रत ते येतात. **''मी सर्वाचा व सर्व माझे''** अशी मनोवृत्ती ग्रामदानातून निर्माण होईल. त्यांच्या मते सर्वोदय तत्त्वज्ञानाचा एकूण विचार समन्वयाचा आहे. ''युद्ध नको, शांतता हवी'' असा वैज्ञानिक दृष्टिकोन ते मांडून त्यात अहिंसेचा विचार आला म्हणजे तो सर्वोदय होय.

अशाप्रकारे विनोबाजींचे भूदान, संपत्तीदान, ग्रामदान, लोकनीती, ग्रामस्वराज्य, सत्याग्रह, स्वराज्य, शासनमुक्त समाज, साम्ययोग या सर्वामधून सर्वोदयाचे विचार प्रकट झालेले दिसतात.

## ३.५ दीर्घोत्तरी प्रश्न

१) सर्वोदय म्हणजे काय? म. गांधीजींचे सर्वोदयाचे विचार स्पष्ट करा.

२) आचार्य विनोबा भावे यांची सर्वोदय चळवळीचे योगदान सांगून त्याचे सविस्तर विवेचन करा.

३) म. गांधीजींची सर्वोदय संकल्पना विनोबांनी वास्तवात कशी आणली?

४) टीपा लिहा : १) सर्वोदय चळवळ २) भूदान चळवळ ३) ग्रामदान

❖❖❖

# ४

# गरीब / गरजू यांच्याप्रती नौतिक उत्तरदायित्व

### ब) गरीबांप्रती / गरजूंप्रती नैतिक उत्तरदायित्व : पिटर सिंगर

**घटक रचना**


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रस्तावना

४.२ गरीबांप्रती / गरजू यांच्याप्रती नैतिक उत्तरदायित्व – पिंटर सिंगर

४.३ काही टीकात्मक भाष्य

४.४ सारांश

४.५ विद्यापीठीय दीर्घोत्तरी प्रश्न


## ४.० उद्दिष्ट्ये

- गरजूंच्या बद्दल नैतिक उत्तरदायित्व जाणून घेता येईल
- धमार्थ/दानशूर कृत्यांची गरज समजावून घेता येईल
- कोणत्याही वाईट गोष्टी घडू नयेत, यासाठी प्रतिबंधात्मक स्वरुपामध्ये असलेल्या आंतरिक शक्तीची ओळख करून घेता येईल.

## ४.१ प्रस्तावना

पिटर सिंगर यांचा जन्म ६ जुलै १९४६ रोजी झाला असून ते ऑस्ट्रेलियाचे नैतिक तत्त्वज्ञ म्हणून प्रसिद्ध आहेत. मुख्यतः ते उपयोजित नीतिशास्त्रामधील तज्ञ असून इहलोकांतील नैतिक समस्या सोडवतांना त्यांनी उपयुक्ततेच्या दृष्टिकोनाचा अंगिकार केलेला आहे. जैवकेंद्रवादाचे (Biocentrism) मुख्य प्रवर्तक आहेत ते 'Annimal Liberation' या पुस्तकाचे लेखक म्हणून ते प्रसिद्ध आहेत. 'Famine Affluence And Morality' यामध्ये पिटर सिंगर यांचा गरजूंप्रती असलेले सामाजिक व नैतिक उत्तरदायित्व दिसून येते. पिटर सिंगर म्हणतात, 'धर्मार्थ/दानशूर कृत आणि नैतिक विचारातील सुसंगतता परिणामी (शेवटी) नैतिक समस्या सोडविण्याचा चांगला दृष्टिकोन आहे. हे गृहितक माझ्या कार्याचा आधार आहे.''

## ४.२ गरिबांप्रती / गरजूंप्रती नैतिक सामाजिक उत्तरदायित्व

जेव्हा युद्ध, भूकंप, धरणीकंप इत्यादी नैसर्गिक आपत्ती येतात, तेव्हा गरीब किंवा गरजू लोकांना भयानक त्रासाला तोंड द्यावे लागते आणि त्यांचे जीवन दयनीय बनते. लाखो लोकांना केवळ एक डॉलर किंवा यापेक्षाही कमी मिळकतीवर आपला उदरनिर्वाह करावा लागतो. याबद्दल कोणाला काही करायचे असेल, तर नीतिमत्तेचा काय विचार आहे? नीतीमत्ता याबद्दल काय म्हणते? हे महत्त्वाचे प्रश्न आहेत.

या संदर्भात पिटर सिंगर दोन तत्त्वे सुचवितात. आणि जे बळकट, मजबूत आहे, त्याचे समर्थन करतात आणि जे कमकुवत आहे, ते माघार घेतले जाते.

**अधिक बळकट /मजबूत सिंगर तत्त्व :-**

एखादी वाईट घटना घडण्यापासून, तुलनात्मक नैतिक महत्त्व असलेल्या कोणत्याही गोष्टीचा त्याग न करता आंतरिक शक्ती प्रतिबंध करत असेल तर आपण ते नैतिक दृष्टिकोनातून करायला पाहिजे.

**कमकुवत सिंगर तत्त्व** : एखादी अतिशय वाईट घटना घडण्यापासून नैतिक महत्त्व असलेल्या कोणत्याही गोष्टींचा त्याग न करता आंतरिक शक्ती प्रतिबंध करत असेल, तर आपण ते नैतिक दृष्टिकोनातून करायला पाहिजे. सिंगर निश्चयपूर्वक सांगत आहेत की मोठ्या प्रमाणात वाईट घटना घडत असतील तर त्या घडू नयेत, यासाठी काहीतरी करायलाच पाहिजे. हे नैतिक कर्तव्य आहे. जर एखादी वाईट घटना घडू नये, त्यासाठी प्रतिबंध करण्यासाठी काहीही करत नसेल, तर हे काहीही न करणे, मुळात ही स्वतःच चुकीची घटना आहे.

समजा श्रीयुत 'अ' कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २००,००० डॉलर आहे आणि त्याच्या वाचनात आले की दूरचा एक अनोळखी गरजू व्यक्ती आहे, तेव्हा तो आपत्तीमध्ये साहाय्य/मदत करणाऱ्या वैश्विक संस्थेला दहा डॉलर देतो. आता, तो सिनेमाला जाण्याची योजना आखतो. परंतु दुसरे दहा डॉलर देईपर्यंत त्याला थांबायचे असते. पुन्हा दुसरे दहा डॉलर देईपर्यंत थांबायचे असते. असेच पुन्हा पुन्हा केले जाते. प्रत्येक वेळी स्वतःवर स्वतःसाठी खर्च करणारी रक्कम (अर्थात मौजमजेसाठी, चैनीसाठी) दूरच्या अनोळखी व्यक्तीसाठी योग्य पद्धतीने अधिक चांगले करण्यासाठी वापरली जाते. अशा पद्धतीने गरीबी आणि आपत्तीकाळी मदतीसाठी रक्कम दानाच्या स्वरूपात दिल्यास वाईट घडू नये. यासाठी प्रतिबंधक उपाययोजना केली जाऊ शकते. ढोबळमानाने दानाच्या स्वरुपात वैश्विक गरीब लोकांसाठी रक्कम दिल्यानंतर वैश्विक गरीबांच्या पातळीवरील मासिक मिळकत होईल याचा परिणाम जगात वारंवार घडणाया वाईट गोष्टी आणि त्याचे वाईट परिणाम महत्त्वपूर्णरित्या कमी होईल किंवा पूर्णतः बंद होतील. यासाठी श्रीमंत, समृद्ध असणाया व्यक्तीने वरीलप्रमाणे कृती करण्यासाठी आपले आयुष्य खर्च करायचे असते.

**उदाहरण** :

समजा मी जंगलातून तलावाच्या काठाने चालत आहे. मी एकटा आहे. एक लहान मूल पाण्यात बुडत असल्याचे पाहिले. मी सहजपणे, मला कोणताही धोका न होता. त्याला मी वाचवू शकतो. फक्त माझी पँट थोडीफार खराब होऊन थोडीशी गैरसोय होऊ शकते. या ठिकाणी पिटर सिंगर म्हणतात, ''नैतिक दृष्टिकोनातून त्या मुलाला पाण्यात बुडण्यापासून वाचविले पाहिजे. समजा, आपण हे मान्य करतो नैतिक दृष्टिकोनातून मुलाला पाण्यात बुडण्यापासून वाचवणे आणि आपत्तीच्या काळी, संकटाच्या काळी मदत करणाऱ्या संस्थेला मी स्वतःहून पैसे दिले. या दोन घटनेत नैतिक दृष्टिकोनातून काही फरक आहे का? पिटर सिंगर म्हणतात नाही. अशा पद्धतीने तळ्यात बुडणाऱ्या मुलाला नैतिक दृष्टिकोनातून वाचविले पाहिजे या उदाहरणामध्ये आपल्या न्यायाची पातळी वाढवून आपण पिटर सिंगरच्या मताशी सहमत होतो.

पिटर सिंगर स्वतःचे मत प्रदर्शित करताना म्हणतात की परंपरागत, रुढीगत नैतिक कर्तव्याचा मार्ग आणि दानधर्म करणे यामधील निश्चित प्रकारचा फरक करता येत नाही. सर्वसाधारण समजूतीप्रमाणे निश्चितपणे दुसऱ्याला आपल्यापासून त्रास होऊ नये, हे एक कडकपणे पाळले जाणारे कर्तव्य होय. परंतु दुसऱ्याला मदत करणे, हे नैतिक दृष्टिकोनातून ऐच्छिक आहे. जर आपण दुसऱ्याला थोडी जर मदत केली तर आपण प्रगतीपथाकडे आणि कर्तव्याच्या हाकेच्या पलिकडे जाऊ आणि दानधर्म केल्याने प्रशंसेस पात्र असू. अशाप्रकारे पिटर सिंगर यांच्या बळकट/मजबूत तत्त्व हे कर्तव्य आणि दानधर्म यांमधील संबंधाचे वैशिष्ट्य सांगते.

Outline of PETER SINGER : "Famine, Affluence, and Morality"

Singer's main argument:

1. Lack of food : shelter : medicine is bad.
2. If it is our power to prevent something bad from happening, without thereby sacrificing anything of comparable moral improtance, we ought, morality, to do it. (Later, he says," without thereby sacrificing anything morally significant'" which we,,,, the requirement placed on us.)
3. It is our power to prevent this bad thing.
4. We can prevent it without sacrificing anything of comparable moral importance.

   Conclusion : therefore, we ought to prevent lack of food : shelter.
5. The only way to prevent lack of food : shelter without sacrificing anything of comparable moral importance is to give maximally core at least very much more than we currently do)

   Conclusion : Therefore, we ought to give maximally core at least very much more than we currently do.)

Objection : Singer's analysis conflicts with our prevailing standards of charity. (Charity is super erogatory, i.e., beyond duty : beyond what is obligatory.)

Reply : People need to rethink their views about "Charity"

Objection : Singer's analysis requires us to do a great deal for others.

Reply : Yes, that's what morally requires. In fact, Its a traditional view; it was advocated by Thomas Aquines.

Objection : Direct relief just a short term solution. It simply delay additional problems.

Reply : In that case, we need to give direct relief now and in addition, promote population control.

Objection : Singer's ideas will hurt the economy.

Reply : But how much more can we do until that happens? this does not support the status quo (A mere 1% goingmto famine relief.) instead, it opens the door to our discussion of how far to increase relief we should give to the level that does not reduce spending in a consumltion based society (like ours) below the point that would start to decrease what we have available to give, So expecting people to give 1% is far too little, but expecting 25% from everyone would be too much)

Source : Web.mnstate.edu/gracyle/courses/../singer-famine-affluence.htm

**पिटर सिंगर शक्य असलेले काही आक्षेप निर्माण करून त्यांना उत्तरे देतो.**

आक्षेप १: वरील उदाहरणांतील पाण्यात बुडणारा मुलगा हा आता लगेच संकटात आहे परंतु एखाद्या गरजूला मदत करणे ही लांबची गोष्ट आहे. तसेच पाण्यात बुडणाऱ्या मुलाला आता लगेच वाचवायचे आहे. तर आपत्तीकालीन मदत करणाऱ्या संस्थेला मदत केल्यास ते भविष्यकाळातील होणाऱ्या मृत्युला प्रतिबंध करणार आहेत.

सिंगरचे प्रत्युत्तर : एखाद्याला नैतिक दृष्टिकोनातून काय करायचे आहे. यासाठी केवळ वेळ आणि अंतर यामधील तफावत ही सुसंगत नाही. एखाद्या निष्पाप व्यक्ती होणाऱ्या बळीपासून त्याला आता वाचवणे व नंतर वाचवणे. हे मनुष्याचा जीव वाचवण्याच्या दृष्टिकोनातून सारखेच आहे.

आक्षेप २ : पाण्यात बुडणाया मुलाला वाचवण्याच्या उदाहरणांमध्ये त्याला मुलाला मदत करणारे तुम्ही एकटे आहात, परंतु आपत्तीकालीन मदत करणाऱ्यामध्ये तुम्ही अनेकांपैकी एक आहात. कदाचित लाखो मदत करणाऱ्या लोकांपैकी तुम्ही एक असाल.

सिंगरचे प्रत्युत्तर : आपण स्वतः काय करायला पाहिजे आणि अनेक लोक विशिष्ट परिस्थितीमध्ये मदत करतात. हे नैतिक दृष्टिकोनातून काहीही फरक न पडणारे आहे. समजा तलावाच्या काठी १०,००० लोक आहेत आणि सर्वजण मुलाला पाण्यात बुडताना पाहतात. अशावेळेस १०,००० पैकी कोणीही मदत करू शकते. जर कोणीही मदत करत नसेल, लहान मुलाला पाण्यात बुडून होणाऱ्या मृत्युपासून वाचवण्यात अपयशी ठरून, प्रत्येक जण चूक करत आहे. परंतु दुसरे मदत करू शकले असते, म्हणून आपली स्वतःची जबाबदारी कमी होत नाही. अर्थात दुसरी व्यक्ती मुलाचा जीव वाचवण्यासाठी प्रत्यक्षात पुढे जात आहे, दुसऱ्यांचे उत्तरदायित्व न निभवण्यामध्ये थोडासा प्रमाद होऊ शकतो.

आक्षेप ३ : समजा तलावाच्या काठी पाण्यात मुल बुड्त आहे आणि तेथे उपस्थित असणारे १०००० लोक मदत करू शकतात आणि तुमच्या युक्तीवादाप्रमाणे हे १०००० लोक त्या पाण्यात बुडणाऱ्या मुलाला मदत करणे हे त्यांच्यावर बंधनकारक आहे. परंतु एकसाथ जर सर्वांनी प्रयत्न केला, तर परिणामी एकत्रित गोंधळ होईल आणि मदत करणाऱ्यांच्या गर्दीमुळे ते एकमेकांना पायदळी तुडवतील.

सिंगरचे प्रत्युत्तर : 'लोक त्यांच्या तत्त्वाप्रमाणे तंतोतंत वागत असताना, वरीलप्रमाणे कधीही घडणार नाही. एकदा का एक व्यक्ती संकटकाळी मदत करण्यासाठी प्रत्यक्ष जात असताना, इतरानी पाहिले असताना इतरांनी त्या परिस्थितीमध्ये काय करावे, हे निश्चित होते. जेव्हा पहिली व्यक्ती प्रत्यक्षात मदत करण्यासाठी पुढे सरसावते, तेव्हा सापेक्षतया इतर एका वेगळ्या परिस्थितीमध्ये असतात. तेव्हा त्या वेळी त्यांनी मदत करणे, हे त्यांच्यावर बंधनकारक नसते (अशावेळी इतरांनीही प्रयत्न केली तर ते उद्दिष्ट प्राप्तीत अडथळा आणणारे ठरेल)

आक्षेप ४ : कर्तव्याची आज्ञा, कठोरपणे नैतिकतेची गरज याचा संबंध समाजामध्ये शांततेने राहणाऱ्या लोकांसाठी कठोरपणे गरजेचे आहे आणि त्यांना एकमेकांना परस्पर फायद्याचे सहकार्य सांभाळण्यासाठी आहे.

सिंगरचे प्रत्युत्तर : कोणत्याही एका विशिष्ट समाजातील लोकांच्या हिताच्या पलिकडे पाहण्यासाठी, आपणास नितीमत्तेची गरज आहे. आपल्या पसंतीमुळे ज्यांच्यावर परिणाम होणार आहे, अशावेळी भेदभावरहित विचारासाठी (समजूतीसाठी) नितीमत्तेची आवश्यकता आहे.

पुढील भाष्य : सरकारी मदतीपेक्षा खाजगीरित्या केलेले दानधर्म का महत्त्वाचे?

सिंगरचे प्रत्युत्तर : आपण स्वतः केलेल्या कामाच्या मोबदल्यातूनच दानधर्म करणे महत्त्वाचे आहे. दुसऱ्या कोणत्याही पर्यायापेक्षा आपण स्वतः केलेल्या गोष्टींचे महत्त्व अधिक असते.

**यापुढील भाष्य** : शेवटी केलेल्या दानाचा चांगला उपयोग होतो का?

सिंगरचे प्रत्युत्तर : पुन्हा, एखाद्याने नितीमत्तेला लागू पडणारी, नितीमत्तेला गुणकारक असणारी गोष्ट करावी. उदाहरणार्थ, शेवटी निर्माण होणाऱ्या दयनीय अवस्था घालवण्यासाठी केलेल्या प्रयत्नापेक्षा लोकसंख्या कमी व्हावी म्हणून जन्मदरावर संतुलन राखण्यासाठी केले जाणारे प्रयत्न महत्त्वाचे आहेत.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न (१) पिटर सिंगरचे बळकट/मजबूत तत्त्व कोणते?

..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................

(२) पिटर सिंगरचे कमकुवत तत्त्व सांगा.

..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................

(३) पिटर सिंगरच्या मतानुसार दुसऱ्याला मदत करणे.

..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................

(४) पिटर सिंगरने शक्य असलेल्या आक्षेपांपैकी कोणताही एक आक्षेप सांगा व त्या संदर्भातील पिटर सिंगरचे प्रत्युत्तरही सांगा.

..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................

(५) पाण्यात बुडणाया मुलांना वाचवण्यासाठी जेव्हा १०००० जण प्रयत्न करतात, तेव्हा निर्माण होणाऱ्या गोंधळाच्या आक्षेपाबद्दल पिटर सिंगरने कसे प्रत्युत्तर दिले आहे?

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

(६) सरकारी मदतीपेक्षा खाजगी दानधर्म चांगला आहे, या संदर्भात पिटर सिंगरचे समर्थन स्पष्ट करा.

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

## ४.३ काही टीकात्मक भाष्य

(१) एखादी व्यक्ती असा विचार करण्याची शक्यता आहे की लोकांना भिकेला लावून त्यांना गरीब करण्यासाठीच्या समस्या प्रचंड प्रमाणात आहेत. तेव्हा एखादीदुसरी समस्या सोडवून काय फायदा आहे? जसे की पूर्ण भरलेल्या बादलीतील पाण्यामध्ये एक थेंब टाकून काय उपयोग आहे? परंतु या पद्धतीचा विचार भ्रमावर आधारीत आहे.

जर मी बाहेर हॉटेलमध्ये जाऊन जेवणासाठी शंभर डॉलर खर्च करून केवळ भौतिक आनंद मिळवण्याचा प्रयत्न करतो, त्याऐवजी मी ते शंभर डॉलर आपत्तीकालीन मदत करणाऱ्या संस्थेला दिले, साठ ते सत्तर डॉलर जेवणांवरती खर्च होतील आणि उरलेल्या रकमेतून काही लोकांना मच्छरदानी घेता येतील. त्यामुळे लोकांना मलेरिया होणार नाही. मलेरियापासून ते वाचतील. तेव्हा निश्चितपणे या उदाहरणातील माझ्या डॉलरचा दुसरा उपयोग निश्चितपणे पहिल्यापेक्षा चांगला आहे. या हिशोबामध्ये माझ्या डॉलरच्या दुसऱ्या प्रकारच्या उपयोगामुळे काही लोकांचा मलेरियापासून जीव वाचला, तरीही प्रत्येकवर्षी लाखो लोकांना प्रतिबंध करता येणार असूनसुद्धा लाखो लोक मरतात. या पद्धतीने विचार करणे अप्रासंगिक आहे.

(२) काही लोकांना अशा प्रकारची चिंता असण्याची शक्यता आहे की देणगीच्या स्वरुपात मिळणाऱ्या मोफत मदतीमुळे लोकांच्या मनामध्ये परावलंबनाची प्रवृत्ती निर्माण होते आणि स्वतःलाच मदत करण्याची प्रवृत्ती दाबून टाकली जाते. जे.एस.मिल्लने त्यांच्या लिखाणात कोठेतरी असे म्हटले आहे की सर्वसाधारणपणे बोलायचे म्हटल्यास साहाय्यता मिळाल्याचे परिणाम चांगले असतात. परंतु आपल्याला साहाय्यता मिळावी, अशी इच्छा करून त्या साहाय्यतेच्या परिणामावर अवलंबून राहणे, हे वाईट आहे. परंतु या ठिकाणी एखाद्याने वरील प्रश्न उपस्थित करण्यापेक्षा कोणत्या प्रकारची उत्कृष्ट स्वरुपाचे साहाय्य दिले जाते, यावरून समस्येवर परिणाम घडेल, असे वाटते. समजा एक लहान मुलगी मलेरियापासून वाचते, मलेरियापासून तिचा बचाव होतो. कारण तिच्या आईवडिलांना साहाय्यतेच्या स्वरूपामध्ये मच्छरदाणी मिळालेली असते. अशा मुलीचा जीव वाचून जेव्हा ती प्रौढ बनेल, तेव्हा तिचे चारित्र्य बिघडले तर हे पाहणे कठीण आहे. कोणाची तरी

उपासमार होत आहे. त्याला खायला अन्न न मिळाल्याने तो अस्वस्थ, बेचैन होतो. तेव्हा जर त्याला साहाय्यतेच्या स्वरूपामध्ये खायला अन्न मिळून त्याचा जीव वाचला तर त्याने त्याच्या जीवनातील शक्तीचा जास्तीत जास्त वापर स्वतःला सुधारण्यासाठी करायला पाहिजे. नाहीतर मदत देण्याचे नाकारले जाईल. अर्थात प्रत्यक्ष व्यवहारातील समस्या ह्या गुंतागुंतीच्या व नाजूक आहेत. यात शंका नाही.

## ४.४ सारांश

पिटर सिंगर यांचा गरजूंप्रती/गरिबांप्रती सामाजिक व नैतिक उत्तरदायित्त्वाचा दृष्टिकोन आकलनीय आणि व्यापक आहे. त्यांच्या मतानुसार आपल्याकडे असलेल्या आंतरिक शक्तीचा वापर करून कोणतीही वाईट घडणारी गोष्ट आपण थांबवू शकतो आणि हे करत असताना तुलनात्मक दृष्ट्या कोणत्याही महत्त्वाच्या नैतिक गोष्टीचा त्याग करावा लागत नसेल तर ती गोष्ट आपण करायला पाहिजे. तसेच त्यांनी धर्मार्थ/दानशूर कृत्याबद्दलचा आपल्या दृष्टिकोनाविषयी पुन्हा विचार करण्यासाठी आपल्याला सांगितले आहे.

## ४.५ विद्यापीठीय दीर्घोत्तरी प्रश्न

(१) गरीबांप्रती/गरजूंप्रती पिटर सिंगर यांचा सामाजिक व नैतिक उत्तरदायित्त्वाच्या दृष्टिकोनाची सविस्तर चर्चा करा.

(२) गरजूंप्रती/गरीबांप्रती नैतिक उत्तरदायित्त्वाच्या संदर्भातील संभाव्य वादविवादातील निर्माण होणारे आक्षेप आणि त्यांना पिटर सिंगरने दिलेले प्रत्युत्तर हे सविस्तर लिहा.

(३) गरजूंप्रती/गरीबांप्रती पिटर सिंगर यांचा असलेला नैतिक उत्तरदायित्वाच्या दृष्टिकोनाची चिकित्सकपणे चर्चा करा.

❖❖❖

# ५

# युद्ध आणि शांततावाद

## (War and Pacifism)

**घटक रचना**

५.० उद्दिष्ट्ये

५.१ प्रस्तावना

५.२ Principle of Jus ad Bellum (कोणत्या तत्त्वांच्या आधारे युद्धाचे समर्थन करावे)

५.३ Principle of Jus in Bello (कोणत्या नियमांच्या आधारे युद्ध लढले जावे)

५.४ शांततावाद

५.५ सारांश

५.६ विद्यापीठीय दिर्घोतरी प्रश्न

## ५.० उद्दिष्ट्ये :

१) युद्धाचे समर्थन व युद्ध लढण्यासाठी लागणाऱ्या नियांमाचे अध्ययन करता येईल.

२) शांततावाद म्हणजे काय ? याचा अभ्यास करता येईल.

## ५.१ प्रस्तावना :

मानवी जीवन हे संघर्षातून विकसित होत असते आणि अशा संघर्षातून अनेक विध्वंसही घडून येतात. प्राचीन काळापासून ते आजतागायत जगावर अनेक युद्धांचे प्रसंग आले. काही युद्धेही काही प्रदेशापुरती मर्यादित असतात, तर काही युद्धे ही जागतिक स्वरुपाची असतात. मर्यादित युद्धे ही भारत-पाकिस्तान, अमेरिका-इराक, इराक-इराण, अमेरिका-अफगाणिस्तान, भारत-चीन ह्यांच्यात खेळली गेली. तर पहिले व दुसरे महायुद्ध जागतिक पातळीवर लढले गेले.

धर्म हा मानवी संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. म्हणूनच मानवी समाजाच्या संस्कृतीचा इतिहास धर्म भावनेने समजतो. चांगल्या गोष्टींचे रक्षण करण्यासाठी जे लढले जाते त्याला धर्मयुद्ध म्हणतात. अन्याय सहन करणे हे गैर असून नैतिकतेसाठी लढणे हे धर्मयुद्ध आहे. कारण धर्म हे बाहेरुन लादलेले एखादे कर्तव्य नसून व्यक्तीच्या व समाजाच्या गरजा भागविण्यासाठी आणि स्वार्थासाठी आखून दिलेली व्यवस्था आहे. म्हणून धर्माचा समाजमनावर परिणाम होतो असे म्हणण्यापेक्षा 'लोकव्यवहाराकरिता धर्म' अस्तित्त्वात आला आहे असे म्हणणे अधिक योग्य ठरेल.

## ५.२ न्याय युद्ध : (कोणत्या तत्त्वाच्या आधारे युध्दाचे समर्थन करावे)

"एका देशातील दोन गटांमधील किंवा दोन देशांमधील उघड सशस्त्र संघर्ष म्हणजे युद्ध होय." मानवी जीवनाचा सर्वसाधारण विकास होण्यासाठी युद्धाची आवश्यकता आहे. शांततावादानुसार युद्ध हे कोणत्याही परिस्थितीत अनैतिक असून लष्कर आणि शस्त्रात्रे बंदी करावीत.

सेंट आगस्टीनंच्या मतानुसार ख्रिस्ताने दिलेल्या प्रेमाच्या संदेशानुसार कोणत्याही व्यक्तींने स्वसंरक्षणार्थ देखील दुसऱ्याला ठार करु नये. परंतु याउलट, शांतता रक्षणासाठी युद्ध करण्याचा अधिकार राज्यकर्त्यांना आहे. किंबहुना ते राज्याचे कर्तव्यच आहे. अतिशय गंभीर आक्रमण झाल्यास शेवटचा पर्याय म्हणून युद्ध करावे. ते युद्ध देखील चांगुलपणाने दयाळूतत्त्वाने आणि शांततेचे उद्दिष्ट ठेवूनच लढले गेले पाहीजे.

प्रत्येक राष्ट्राला अंतिम पर्याय म्हणून आपल्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी किंवा आपल्या स्वतःच्या एखाद्या मुलभूत हक्कांचा इतर राष्ट्रांनी भंग केला असता मुलभूत हक्क परत मिळविण्यासाठी संरक्षण युद्ध योग्य आहे आणि तेव्हाच ते योग्य ठरेल.

## ५.३ न्याय युद्धाच्या अटी : (कोणत्या नियमांच्या आधारे युध्द लढले जावे)

१) युद्ध योग्य अशा सत्ताधाऱ्याकडून घोषित झाले पाहिजे.

२) ते उचित अशा कारणांसाठी असायला हवे.

३) अगदी शेवटचा पर्याय म्हणून युद्ध करावे.

४) युद्ध हे माणुसकी राखून लढले गेले पाहिजे.

**पोप जॉन २३ म्हणतात की,**

1) संरक्षण युद्ध हे न्याय युद्ध ठरविता येईल, कारण मानवी समाजाच्या विकासासाठी आणि संरक्षणासाठी काही हक्क इतके महत्त्वाचे असतात की त्याच्यावर झालेला अन्याय, आक्रमणापासून त्याचे संरक्षण करणे हे निसंशयपणे आद्य कर्तव्य असून समर्थनीय देखील आहे.
2) पाशवी हिंसाचाराला आणि सद्सदविवेक बुद्धीच्या अभावास मुक्त वाव मिळेल.
3) इतर सर्व वाजवी मार्ग संपुष्टात आलेले असावेत आणि युद्ध हाच शेवटचा पर्याय उरलेला असावा.
4) युद्धाचा मार्ग अवलंबिताना यशाची खात्री असावी.
5) बळाचा वापर मर्यादित असावा व आण्विक अस्त्राचा वापर नसावा.
6) युद्धामध्ये विविध गोष्टींचे मुख्यतः हिंसेचे तारतम्य राखले जावे.
7) सामान्यांची जीवीतहानी आणि संपत्तीच्या हानीचा अभाव असावा.

**जिनिव्हा करार :**

1) निःशस्त्र व्यक्तींना हेतूपूर्वक ठार मारु नये.
2) जखमी व्यक्तींना युद्धकैद्यांना व सामान्य नागरिकांना क्रूर वागणूक देऊ नये.
3) अनावश्यक विध्वंस टाळला जावा.
4) निरपराध युद्ध कैदी आणि नागरिकांची हत्या करु नये.

5) बिगर सैनिकांची निरपराध्यांमध्ये गणना करावी.

सर्व धर्मांचा विचार करता असे लक्षात येते की, कोणताच धर्म आण्विक युद्धाचे समर्थन करीत नाही. कारण आण्विक शस्त्राने संहार करणे हे त्या संहाराचे परिणाम सहन करण्यापेक्षा देखील जास्त वाईट आहे. हक्काचे अतिगंभीर परिणाम झाले तरी युद्धाचे आणि अणुयुद्धाचे समर्थन योग्य होणार नाही.

**आपली प्रगती तपासा :**

प्रश्न : न्याय युद्ध म्हणजे काय? ते स्पष्ट करुन त्याचे विश्लेषण करा.

.......................................................................................................................

.......................................................................................................................

.......................................................................................................................

.......................................................................................................................

## ५.४ शांततावाद (Pacifism) :

युद्ध म्हणजे एका समुदायाने किंवा देशाने दुसऱ्या देशांवर जबरदस्तीने केलेली कुरघोडी, की ज्यामध्ये हिंसा, हत्या करणे या क्षुल्लक गोष्टी समजल्या जातात. युद्ध म्हणजे वास्तव जाणून बूजून केलेले दोन समुदायातील किंवा देशातील संघर्ष जी युद्धे देशांतर्गत लढली जातात त्यांना 'गृहयुद्ध' असे म्हणतात.

कार्टव्हान हा युद्धाचा पुरस्कार करणारा तत्त्ववेत्ता असून, त्याच्या मतानुसार "युद्ध ही अशी प्रक्रिया आहे की जी दुसऱ्याला आपल्या इच्छेप्रमाणे वागण्यास भाग पाडते." टोळी युद्ध व्यापारी युद्ध, दहशतवादाविरुद्ध युद्ध, शीतयुद्ध इत्यादी युद्धांचे वेगवेगळेप्रकार आहेत. युद्ध हे नेहमी राजनितिक घटनामध्ये असते किंवा जे लोक राजकीय आकांक्षा बाळगतात त्यांच्यात असते. युद्ध हे नेहमी हिंसकच असते. युद्ध हे केंवळ जमिनीसाठी लढले जात नाही, तर ते सरकार कोणत्या प्रकारचे असावे ह्यासाठी देखील लढले जाते. ते आर्थिक लाभासाठी किंवा संस्कृतीचे जतन करण्यासाठीसुद्ध लढले जाते.

### ५.४.१ युद्ध आणि नीतीमत्ता :-

सर्व साधारणपणे युद्ध हे हिंसक असते. ह्या हिंसक परिणामामुळे काही नैतिक प्रश्न देखील समोर उभे ठाकतात. दुसऱ्याची हत्या करणे, संपत्तीचा विनाश करणे आणि ह्यासर्वांसाठी बळाचा वापर करणे, हे सर्वसाधारण युद्धाचे परिणाम असून ह्यांच्याकडे पाहिल्यावर ह्या सर्व गोष्टींना काही नैतिक अधिष्ठान आहे का? असा प्रश्न उभा राहतो. जर एखाद्याला मारणे विशेषतः जीवानीशी मारणे हे जर अयोग्य असेल तर ते युद्ध योग्य कसे ठरते. जेव्हा एखादा देश दुसऱ्या देशातील नागरिकांना युद्धात मारतो. याचे समर्थन कसे करता येईल? जरी कधी कधी युद्ध हे शहाणपणाचे घातक असेल व आवश्यक असले तरी ते नैतिकतेला धरुन असू शकते का? युद्धाला तीन पारंपारिक आधारीत तत्त्वे आहेत असे मानले जाते व ती पुढीलप्रमाणे आहेतः

१) न्यायावर आधारित युद्ध.

२) शांतीसाठी आधारीत युद्ध.

३) वास्तवावर आधारीत युद्ध.

काही वेळेस एखाद्या देशाला युद्ध करण्याचा अधिकार असतो, कारण त्या युद्धाचे कारण न्याय असून ती कृती नीतीला धरुन असते. ह्या गोष्टींच्या आधारे जर युद्ध लढले गेले तर अशा युद्धात वाईट गोष्टींचा नायनाट होतो. या सिंद्धातामध्ये एक पक्ष अनीतीच्या व आत्मधाती

मार्गाने चालतो असे गृहीत धरले जाते. दुसरा पक्ष त्याला सुधारु इच्छितो. न्याय युद्धाच्या पुरस्कर्त्यानुसार युद्धाच्या मार्गाने गुन्हा करणाऱ्यास शिक्षा मिळते असे मानतात. परंतु प्रत्येक शिक्षेसाठी नियम ठरलेले असावेत. शिक्षा किती असावी. त्याला मर्यादा हवी. या युद्धाचे परिणाम दोन्ही पक्षांना शांतीचा मार्ग स्वीकारण्यास प्रवृत्त करतात.

न्याय युद्धाची मुळ कल्पना प्लेटो व ॲरिस्टॉटल यांच्या लिखाणात आढळून येते. आणि त्यास सुरुवातीच्या काळातील ख्रिश्चन विचारवंतानी विशेषतः सेंट ऑगस्टाईन (St.Augstine) आणि ॲक्वेनस (Aquinas) व नंतरच्या काळात गोरटॉस (Gorttos) यांनी चालना दिली.

न्याय युद्धाचे परंपरेनुसार काही नियम आखले गेले आहेत. आणि ह्या नियमांवर आधारित काही जागतिक नियम बनविण्यात आले आहेत. त्यास U.Charter व हेग येथील न्यायालयाची मान्यता आहे. जिनिव्हा कनव्हेकशनमध्ये त्याला मान्यता मिळाली आहे.

न्यायिक युद्धाचा विचार प्रमुख तत्त्वे समोर ठेऊन केला गेला असून, ती पुढीलप्रमाणे आहेत.

१) Jus ad Bellum : कोणत्या परिस्थतीमध्ये एखाद्या युद्धाचे समर्थन करता येते.

२) Jus in Bello कोणत्या नियमाच्या आधारे युद्धा लढले जावे.

३) Jus ad Bellum : कोणत्या तत्त्वांचा आधार घेऊन युद्ध समाप्तीनंतर सर्व संबंधीतांना न्याय देऊन शांती प्रस्थापित करावी.

**आपली प्रगती तपासा.**

१) युद्धाची नितिमत्ता स्पष्ट करा.

..........................................................................................................
..........................................................................................................
..........................................................................................................
..........................................................................................................

२) न्याय युद्धाची कारणमिमांसा करुन युद्धाची नीतिमत्ता स्पष्ट करा.

..........................................................................................................
..........................................................................................................
..........................................................................................................
..........................................................................................................

### ५.४.२ शांती प्रियतावाद :-

नैतिकदृष्ट्या युद्धाला व हिंसाचाराला विरोध करणे, कोणालाही जीवे मारणे, कुठल्याही सवयीसाठी मारणे हे संपूर्णता अयोग्य आहे असे शांतीप्रिय लोक मानतात व युद्धाला विरोध करतात. याला आपण संपुर्ण विरोध किंवा मर्यादित विरोध समजू शकतो.

न्यायिक युद्धाच्या एकदम विरोधात जाऊन युद्धाच्या भयामुळे शांती टिकते. याला विरोध करणारा विचार तसेच युद्धामुळे होणारी हानी आणि त्यावर होणारा खर्च हा केव्हाही लाभदायक नसतो. असे त्यांचे मत आहे. त्यामुळेच युद्धाच्या नावाखाली केलेल्या गोष्टी मुळातच चुकीच्या असून युद्ध हे सिद्धांताला धरुन नाही व जीवे मारणे हे कोणत्याही कारणास्तव अयोग्य आहे.

### ५.४.३ शांततेची नीतिमिमांसा :-

ह्या विचारप्रवाहा बरोबर चालणारे लोक युद्ध या नीतिलाच विरोध करतात. युद्धे ही नीतितत्त्वावर आधारलेली नसतात. म्हणूनच हे त्याचा विरोध करतात. युद्ध हे नेहमी नैतिकदृष्ट्या मानवाच्या जाती अस्तित्त्वास धोका निर्माण करणारे आहे. शांतीप्रिय तत्त्वानुसार, युद्ध हे कोणत्याही परिस्थितीत न्याय मानता येणार नाही व हिंसा नीतीला धरुन नाही. शांततेचा पुरस्कार करणे म्हणजे एखादी समस्या शांतीप्रिय मार्गाने सोडविता येते असा होय. समस्या सोडविण्यासाठी शांतीप्रियता, शोध व शिक्षण यांचा उपयोग उत्तमरित्या करता येतो, याचे उदाहरण म्हणजे महात्मा गांधी, मार्टिन ल्युथर किंग किंवा, टॉलस्टॉय, सेल, क्रेकस इत्यादींनी केलेले महत्त्वपूर्ण प्रयत्न होत.

### ५.४.४ शांततावादाचा विरोध :-

बालसरच्या मतानुसार शांतता वादाचा विचार हा उच्चदर्जाची नीती आहे. हा विचार वास्तवापासून दूर नेणारा आहे. जास्त खोलवर गेले की, असे जाणवते की, ज्याप्रकारे शांतीप्रिय जगाची कल्पना केली गेली आहे, त्याप्रमाणे ते सत्यात असू शकत नाही. कमीत कमी जवळच्या भविष्यकाळात तरी ते अशक्य आहे. या जगाचे स्वरुप युरोपियन नाही. तेव्हा शांततावादी युरोपियन लोकांनी हे समजून घ्यावे की युद्धामध्ये नीतिमत्तेचे पालन केले जावे. त्यासाठी युद्धाला सुद्धा नैतिक आधार आहे असे मानावे लागेल.

विरोधकांच्या मतानुसार जर जगामध्ये होणाऱ्या जबरदस्तीला आपण विरोध केला नाही किंवा परिणामकारक विरोध केला नाही तर आपण आक्रमक व हिंसक लोकांना सूट (सवलत) दिली असे होईल. ज्यांना संरक्षण देण्याची जबाबदारी आपली आहे. अशांना उघड्यावर टाकल्यासारखे होईल. जॉन रिरीसच्या मते, शांततावाद हा विचार वास्तव जगताचा वाटत नाही, कारण राजकारण हे निरनिराळ्या विचार आणि क्रियांचे एकत्र स्वरुप आहे. शांततावादाचा संबंध युध्दाच्या तिसऱ्या टप्प्याशी येतो, म्हणजेच युद्धाची समाप्ती, त्यामुळे त्यांच्या अंतर्गत युद्धाची समाप्ती नियंत्रित केली जाईल. याच प्रणालीत युद्धजन्य परिस्थितीचे रुपांतर पूर्वीसारख्या शांततेत पुन्हा निर्माण होते. यामध्ये कोणत्याही आंतरराष्ट्रीय कायद्याचा वापर होत नाही. कब्जा करण्याच्या प्रश्नावर सोडाच, पण मानव अधिकारांचे पालन होतेच असे नाही.

त्यामुळेच शांतीवादानंतर झालेल्या संबंधातील अटी वास्तवावर आधारीत असाव्यात आणि त्याची कलमे जाहीर करावीत किंवा प्रसिद्धीस द्यावीत.

**आपली प्रगती तपासा :**

प्रश्न : शांततावादाचा विरोध नैतिक दृष्टिकोनातून विशद करा.

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

## ५.५ सारांश :-

एका देशातील दोन गटांमध्ये किंवा दोन देशांमधील उघड सशस्त्र संघर्ष म्हणजे युद्ध होय. न्याययुद्ध हे चांगुलपणाने माणूसकीने, दयाळू व शांततेने लढले पाहिजे. शांतता म्हटले की, युद्ध नको, हिंसा नको अत्याचार नको असा अर्थ होतो. शांततेचा अर्थ नैतिकदृष्ट्या चांगला विचार करुन मानव जातीला किंवा मानवाच्या अस्तित्त्वाला युद्धामुळे निर्माण झालेला धोका टाळणे हा होय.

## ५.६ विद्यापिठीय दिर्घोत्तरी प्रश्न :-

१) युध्द म्हणजे काय ते सांगून, युध्द अपरिहार्य आहे का याचे विश्लेषण करा.
२) शांततावाद म्हणजे काय ते सांगून त्याचे सविस्तर स्पष्टीकरण करा.
३) युद्ध व शांततावाद यांचा संबंध सविस्तर विशद करा.

❖❖❖

# ६

# बहुसांस्कृतिकवाद आणि सहिष्णुता

**घटक रचना**

६.० उद्दिष्ट्ये
६.१ प्रस्तावना
६.२ सहिष्णुता व सहिष्णुतेचे महत्त्व
६.३ सॅम्युअल हंटिंग्टन; बहुसांस्कृतिकवाद आणि संस्कृतीमधील संघर्ष
६.४ बहुसांस्कृतिकवाद : भीखू पारेख
६.५ बहुसांस्कृतिकवाद : विल किम्लीका
६.६ सारांश
६.७ विद्यापीठीय दीर्घोत्तरी प्रश्न

## ६.० उद्दिष्ट्ये

१. बहुसांस्कृतिकवादाचा अर्थ समजून घेणे.
२. बहुसांस्कृतिक समाजात सहिष्णुतेचे महत्त्व समजून घेणे.
३. सॅम्युअल हंटिंग्टन या राजकीय विचारवंताचे विचार जाणून घेणे.
४. भीखू पारेख यांचे बहुसंसाकृतिकवादावरील विचार समजून घेणे.
५. विल किमलीका या विचारवंतांचे बहुसांस्कृतिक समाजाविषयी विचार जाणून घेणे.

## ६.१ प्रस्तावना

आज विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे वाहतुकीच्या साधनात मोठ्या प्रमाणावर सुधारणा घडवून आणली, संप्रेषणाच्या साधनातही मोठ्या प्रमाणावर सुधारणा घडून आल्या, गेल्या वीस ते तीस वर्षात जागतिकीकरण मोठ्या प्रमाणावर झाले. विविध सांस्कृतिक गट एकत्र आले. काही जण परदेशात जाऊन कायमस्वरूपी स्थायिक होऊ लागले. या सर्वामुळे समाजाचे स्वरूप बदलत गेले.

जेव्हा एकाच देशात विविध संस्कृतीचे गट एकत्रितपणे शांततेत गुण्यागोविंदाने राहतात तेव्हा त्याला बहुसांस्कृतिक समाज म्हटले जाते. बहुसांस्कृतिक समाजात विविध संस्कृती आढळतात. सांस्कृतिक विभिन्नता हे या समाजाचे वैशिष्ट्य आहे. अर्थातच या समाजातील विभिन्न संस्कृतीचे गट आपली संस्कृती टिकवून ठेवण्यासाठी, स्वतःची वेगळी ओळख ठेवण्यासाठी प्रयत्नशील असतात. विभिन्न सांस्कृतिक गट असलेल्या समाजात वाद किंवा संघर्षही वाढू शकतात. त्यांच्यामधील मतभिन्नता ही संघर्षास कारणीभूत ठरू शकते, ज्या देशात विविध धर्माचे लोक किंवा विविध लोक, विभिन्न वांशिक गट एकत्रितपणे राहतात तिथे सांस्कृतिक संघर्ष, निर्माण होण्याची शक्यता आहे. बहुसांस्कृतिक समाजात सहिष्णुतेचे (Tolerance) खूप महत्त्व आहे. या प्रकरणात आपण विविध विचारवंतांचे बहुसांस्कृतिक समाजाबद्दलचे विचार अभ्यासणार आहोत.

## ६.२ सहिष्णुता व सहिष्णुतेचे महत्त्व

"सॅम्युअल गोल्डवीन यांच्या मतानुसार जीवन जगण्याच्या कलेचा ९०% भाग हा ज्या लोकांशी आपले जमत नाही त्यांच्याशी जुळवून घेण्याचा आले.'' आजच्या आधुनिक समाजात सहिष्णुतेचे महत्त्व वरील विधान अधोरेखित करीत आहे. सहिष्णुता म्हणजे आपल्यापेक्षा भिन्न मते, विचार, दृष्टिकोन असणाऱ्यां व्यक्तींच्या मतांचा, विचारांचा, आदर करणे, प्रत्येकाला विचारस्वातंत्र्य, धर्म स्वातंत्र्य आहे. विविध पंथांचे, विविध धर्माचे, विविध संस्कृतीचे विविध देशाचे लोक जेव्हा एकत्रितपणे एका समाजात किंवा देशात राहताना आढळतात तेव्हा जर त्या ठिकाणी सहिष्णुता असेल तर जातीय दंगली, धार्मिक दंगली किंवा सांप्रदायिक ताणतणाव कमी प्रमाणात आढळतील. 'जगा आणि इतरांनाही शांततेने जगू द्या' या तत्त्वाचे पालन करण्यास सहिष्णुता प्रेरीत करते. समाजातील सर्व लोकांनी शांततेने आणि एकतेच्या भावनेने रहावे, त्यांनी एकमेकांच्या मतांचा आदर करावा, त्यांच्यामध्ये न्यायाची आणि समानतेची भावना निर्माण होण्यासाठी सहिष्णुता अतिशय महत्त्वाची असते. सहिष्णुता असणारे लोक कधीही जातीय, धार्मिक, भाषिक व इतर भेदभाव करणार नाहीत. परस्पर मतांचा, मतातील विभिन्नतेचा, सांस्कृतिक विभिन्नतेचा ते आदर करतात. सहिष्णुता लोकांना शांततेने व ऐक्याच्या भावनेने राहण्यास प्रवृत्त करते व अशा सहिष्णु वातावरणात समाजाचा आर्थिक व सामाजिक विकास मोठ्या प्रमाणावर होऊ शकतो. शांतता आणि जातीय, सलोख्याचे संबंध कोणत्याही देशाच्या विकासासाठी आवश्यक आहेत.

## ६.३ सॅम्युअल हंटिंग्टन - बहुसांस्कृतिकवाद आणि संस्कृतीतील संघर्ष

**सॅम्युअल हंटिंग्टन**

**(१८ एप्रिल १९२७ ते डिसेंबर २००८)**

सॅम्युअल हंटिंग्टन हे अमेरिकेतील राजकीय वैज्ञानिक होते. राज्यशास्त्राच्या विविध क्षेत्रात त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. थेल विद्यापीठातून त्यांनी पदवीचे शिक्षण पूर्ण केले.

शिकागो युनिव्हर्सिटी येथून पदवीत्त्युर शिक्षण पूर्ण केले. व हॉवर्ड विद्यापीठातून पी.एच.डी पदवी प्राप्त केली. तेथे वयाच्या २३ वर्षी शिकवायला सुरुवात केली. त्यांची पुस्तके पुढीलप्रमाणे आहे. The soldier and the state, The Theory : Practice of Civil Military Relations, The political order in changing societies.

फॉरेन अफेअर्स या जनरलमधील त्यांचा लेख 'The clash of civilization' खूपच गाजला. १९९६ साली त्यांनी 'The clash of civilization and the remaking of world order'

हे पुस्तक प्रसिद्ध केले. सॅम्युअल हंटिंग्टनच्या मतानुसार शीतयुद्धाच्या काळात जे काही संघर्ष उद्‌भवणार आहेत ते त्यांनी स्विकारलेले राजकीय आदर्शामुळे किंवा राजकीय प्रणालीमधून नसून जे संघर्ष उद्‌भवतील त्यामागील मूळ कारण हे संस्कृती असणार आहे. शीतयुद्ध हे दोन राजकीय प्रणालीमध्ये होते. भांडवलशाही पाश्चिमात्य समाज आणि साम्यवादी (Communist) यामध्ये हा संघर्ष होता. या दोन राजकीय पद्धतीत मूलतः तात्त्विक भेद होता. भांडवलशाही समाजात स्वातंत्र्य, लोकशाही, लोकांचा सहभाग यांसारख्या मूल्यांना अत्यंतिक महत्त्व दिले जात होते.

हंटिंग्टनने उल्लेख केलेल्या संस्कृती पुढीलप्रमाणे आहेत.

१. वेस्टर्न किंवा पाश्चात्य

२. लॅटिन अमेरिकन

३. इस्लामिक

४. सिनिक

५. हिंदु

६. पारंपारिक

७. जापनीज

८. आफ्रिकन

भविष्यातील संघर्ष हे संस्कृतीतील संघर्ष असणार आहेत. सांस्कृतिक संस्था या तात्कालिन समाजातील महत्त्वाचे घटक आहेत. आर्थिक सहकार्यामुळे सांस्कृतिक घटकांना महत्त्व दिले जात आहे. काही देश सांस्कृतिकदृष्ट्या भिन्न वाटतात. तर काही देश सांस्कृतिकदृष्ट्या जवळचे वाटणाऱ्या देशांना आर्थिक सहकार्य देण्यामागे प्राधान्य दिले जाते. सांस्कृतिक ओळख सांस्कृतिक अभिन्नतेला एक वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. आतापर्यंत पाश्चात्य संस्कृती ही संपूर्ण जगात आपली अधिकारशाही टिकवून होती. परंतु भविष्यकाळात या पाश्चात्याच्या अधिकारशाहीला सांस्कृतिक ऐक्य हे आव्हान बनणार आहे. त्यांना जर आपले वर्चस्व टिकवायचे असेल तर संस्कृतीतील ताण समजून घेणे आवश्यक आहे.

शीतयुद्धाच्या नंतरच्या काळातील जगाच्या राजकारणात अनेक फेरबदल झालेत. यात देशाच्या सीमांचे स्वरुप हे भौगोलिक न राहता त्याला संस्कृतीचे एक वेगळे वलय लाभले. हन्टिंग्टनच्या मतानुसार जगाच्या राजकारणात आपले वर्चस्व ठेवायचे असेल तर त्यांनी काही गोष्टीची खबरदारी घेणे आवश्यक आहे. पाश्चात्य देशांनी स्वतःला लोकशाहीचे समर्थक प्रचारक या भूमिकेतून पाहिले आणि ज्या राष्ट्रात लोकशाही नाही, त्यांना आपला शत्रू मानून तेथे लोकशाही यावी यासाठी प्रयत्न केले. लोकशाहीचे सामान्यीकरण व सार्वत्रिकरण करण्यासाठी त्यांनी अनेक ठिकाणी प्रयत्न केले. दुसऱ्या देशांच्या अंतर्गत राजकारणात हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला. सैन्याच्या बळाचा वापरही त्यासाठी केला गेला. अमेरिकेच्या पुढाकाराने साम्यवादी देशाच्या विरोधात कारवायाही करण्यात आल्या.

हंटिंग्टन सांस्कृतिक संघर्षामागील कारणे शोधून काढण्याचा प्रयत्न करतो. त्यांच्यामते सांस्कृतिक अभिन्नता किंवा सारखेपणामुळे हे देश जोडले जातात. ज्या देशातील लोकांशी साधर्म्य असणारे वातावरण असेल ते देश त्यांना आपले वाटतात. त्यांच्याकडून आपणांस कोणताही धोका नाही असे त्यांना वाटते. तर आपल्या देशातील संस्कृतीशी भिन्न संस्कृती असणारे देश त्यांना धोकादायक वाटतात. त्यांच्याविषयी त्यांच्या मनात काही पूर्वग्रह निर्माण होतात. पूर्वग्रहाचे रूपांतर वैमन्यस्यात होऊ शकते. तर कधी कधी अशा देशांची गणना ते शत्रूपक्षात करतात. हंटिंग्टनच्या मते, या जगात जगातील भविष्यातील संघर्ष हे वैचारिक आदर्श प्रणाली किंवा राजकीय आदर्श तत्त्वानुसार न होता त्यामागील प्रमुख घटक हा सांस्कृतिक असणार आहे.

हंटिंग्टनच्या वरील सिद्धांतांवर काही आक्षेपही घेण्यात आले. टीकाकारांच्या मतानुसार देशातील संस्कृतीचा विचार करताना हंटिंग्टनने देशांतर्गत असणाऱ्या सांस्कृतिक भिन्नतेचा विचार केलेला दिसत नाही. भारताचेच उदा. द्यायचे झाले तर दक्षिण भारतातील संस्कृती व

मध्यपूर्व राज्यातील संस्कृतीमध्ये आपणास बरेच भेद आढळतात. हंटिंग्टनच्या सिद्धांतामध्ये राज्याच्या जागा संस्कृतीने घेतली आहे. संस्कृती ही संघर्षास कारणीभूत ठरते, की ऐक्यास कारणीभूत ठरते, हे काळच ठरवेल.

**आपली प्रगती तपासा**

१) सॅम्युअल हंटिंग्टनच्या मतानुसार भविष्यकाळातील संघर्ष कोणत्या कारणांमुळे निर्माण होतील?

..........................................................................
..........................................................................
..........................................................................
..........................................................................

२) आर्थिक सहकार्यासाठी कोणत्या देशांना प्राधान्य दिले जाते?

..........................................................................
..........................................................................
..........................................................................
..........................................................................

३) भूतकाळातील संघर्ष आणि भविष्यकाळात उद्‌भवणारे संघर्ष यातील प्रमुख फरक कोणता?

..........................................................................
..........................................................................
..........................................................................
..........................................................................

## ६.४ बहुसांस्कृतिकवाद - भीखू पारेख.

भीखू पारेख यांचा जन्म गुजरातमधील अमलसाड या गावी १९३५ साली झाला १९५६ साली मुंबई विद्यापीठातून पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केल्यानंतर १९५९ साली लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मध्ये प्रवेश घेतला आणि तेथूनच १९६६ साली पीएचडी पदवी मिळविली. लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स आणि ग्लॅसगॉव विद्यापीठात ते शिकवीत होते. १९८१-१९८४ मध्ये महाराज सयाजीराव विद्यापीठाचे ते कुलगुरू होते. २००७ मध्ये शासनाने त्यांना पद्मभूषण देऊन सन्मानीत केले. १९९८-२००० साली ते Commission on the future of multi-ethnic britain चे अध्यक्ष होते. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली त्यापैकी काही पुस्तकांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

1. Bentham's Political Thought 1973
2. Colonialism, Tradition and Reform: An Analysis of Gandhi's Political Discourse 1989
3. Gandhi's Political Philosophy
4. Rethinking Multiculturalism; Cultural Diversity and Political Theory

भीखू पारेख यांनी त्यांच्या Rethinking Multiculturatism,,,, या पुस्तकात आपले स्वतःचे राजकीय विचार मांडले. आजच्या तांत्रिक युगात जग हे एक जागतिक खेडे बनले आहे. समाजात वेगवेगळ्या संस्कृतीचे लोक एकत्र राहताना दिसत आहे. जागतिकीकरणामुळे

विविध संस्कृतीचे लोक एकाच शहरात राहताना आढळतात. भिन्न भिन्न संस्कृतीचे लोक एकत्र एकाच शहरात राहत असल्यामुळे काही प्रश्नही निर्माण झाले आहेत. या बहुसांस्कृतिक समाजाच्या काही विशिष्ट समस्याही निर्माण झालेल्या दिसून येत आहेत. या समस्यांच्या योग्य समाधानासाठी बहुसांस्कृतिक समाज आणि बहुसांस्कृतिकवाद यातील फरक समजून घेणे आवश्यक आहे.

भीखू पारेख यांच्या Rethinking Multiculturalism मध्ये साधारणपणे तीन विभाग आढळतात. पहिल्या विभागात त्यांनी सांस्कृतिक विविधतेसंदर्भातील राजकीय विचारांचा आढावा घेतला आहे. दुसऱ्या विभागात विविधतेसंबंधित सिद्धांत मांडले आहेत. तिसऱ्या भागात या सिद्धांताची उपयुक्तता स्पष्ट केली आहे.

सस्कृतीसंबंधित ज्या राजकीय विचारप्रणाली आहेत त्यांचे साधारणपणे दोन प्रकार आढळतात. (मोनीस्ट (Monist) आणि Pluralist प्लूरालीस्ट) पहिल्या प्रकारात साधारणपणे असे मानले जाते की योग्य जीवनशैली एकच आहे. सांकृतिक विचारधारा समान आहेत.

प्लेटो आणि ॲरिस्टॉटल या ग्रीक विचारवंतांच्या मते मानवाची काही विशिष्ट सारतत्त्वे किंवा वैशिष्ट्ये आढळतात. चांगले जीवन म्हणजे या सारतत्त्वाचा शोध घेणे. यासाठी बुद्धिनिष्ठ विवेकप्रणालीची आवश्यकता आहे. सर्वांची विवेकबुद्धी सारखी असतेच असे नाही. म्हणून समाजात आपणास विविध वर्ग आढळतात. उदा. राज्यकर्त्यांचा गट, सैनिकांचा गट वगैरे. भीखू पारेखांच्या मतानुसार चांगले जीवन (good life) किंवा उत्कृष्ट जीवन यांच्या विविध व्याख्या आहेत ते विविधप्रकारचे असू शकते. चांगल्या जीवनाची एकच व्याख्या आहे, असे म्हणणे योग्य नाही. पारेखांच्या मते ग्रीक राजकीय विचारप्रणालीत नीतीमत्ता आणि बुद्धिमत्तेला संस्कृतीपासून वेगळे केले गेले. परंतु कोणत्याही संस्कृतीचा तेथील विचारप्रणालीवरील प्रभाव नाकारता येत नाही.

अक्वायनस, ऑगस्टीन या ख्रिश्चन विचारवंतांच्या मते उत्कृष्ट जीवन म्हणजे श्रद्धेचे जीवन. त्यांच्या मतानुसार प्रत्येक प्रजातीतील सदस्यांची एकच विशिष्ट ओळख असते. नैतिकमूल्येदेखील सर्वांची समान किंवा एकच असतात.

पारेखांच्या मतानुसार या वरील सर्व राजकीय विचारप्रणाल्या चांगले जीवन जगण्याचा एकच मार्ग आहे. हे सिद्ध करू शकत नाही. त्यांनी मानवी जीवनातील संस्कृतीच्या भूमिकेकडे दुर्लक्ष केले आहे. मानवी स्वभावावर संस्कृतीचा मोठा प्रभाव पडतो. मानवी स्वभाव हा चांगल्या जीवनाच्या सामान्य दृष्टिकोनाचा आधार होऊ शकत नाही. पारेखांच्या मतानुसार मानवी इच्छा, क्षमता यासारख्याच (Homogeneous) असतात असे नाही.

सतराव्या शतकातील विको या विचारवंताने राजकीय विचारप्रणालीत संस्कृतीला मध्यवर्ती स्थान दिले. परंतु संस्कृतीतील अंतर्गत भेदांना त्यांनी दुर्लक्षित केले. पारेखांच्या मतानुसार विकोनी स्वतःच्या समाजाची मूल्यसरणींचे सामान्यीकरण (Universalized) करण्याचा प्रयत्न केला. विको, मॉटेस्क्यू, हर्डर या विचारवंतांनी मानवी जीवनाच्या अभ्यासात व्यक्तीमधील भेदांचा विचार केलेला आढळतो परंतु या सर्वांच्या विचारपणालीत पारेखांच्या मते काही दोष आढळतात. पहिला दोष ज्याला ते 'Fallacy of Holism' असे म्हणतात. म्हणजेच संस्कृतीतील आंतरिक विविधतेकडे दुर्लक्ष केले आहे. तसेच या संस्कृती स्वयंपूर्ण (Self-contained) आहे. त्या न बदलणाऱ्या आहेत किंवा त्यांचे जशा त्या आहेत तसेच जतन केले जावे असे मानण्यात त्यांनी चूक केली आहे. तसेच त्यांनी संस्कृतीला केवळ राजकीय आणि आर्थिक घटकांपासून वेगळे केले नाही तर मानवापासून वेगळे करून संस्कृतीला स्वायत्त दर्जा दिला आहे.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील काही विचारवंतांनी संस्कृतीसंदर्भात व्यापक विचार केलेला दिसून येतो. पारेखांनी रॉल्स, कीमलीका आणि रॉस या तीन राजकीय विचारवंतांच्या संस्कृतीसंदर्भातील विचारांचा आढावा घेतला आहे. जॉन रॉल्स यांनी नीतीमत्तेच्या वैविध्यावर

भर दिला आहे. आजच्या समाजात सामाजिक सहकार्याची आवश्यकता आहे, व त्यासाठी नैतिक मूल्ये ही महत्त्वाचे आधारभूत घटक आहेत. रॉल्सच्या मते न्याय हे मूल्य समाजातील प्राथमिक मूल्य आहे, आणि समाजातील स्थैर्यासाठी ते आवश्यक आहे. पारेखांच्या मतानुसार न्यायाशिवाय समाजासाठी इतरही घटकांची आवश्यकता आहे. ज्याकडे रॉल्सने दुर्लक्ष केले आहे.

भिखू पारेख बहुसांस्कृतिकवादाचा सिद्धांत मांडताना मानवाचे स्वरूप मानवी स्वभावाची वैशिष्ट्ये, संस्कृतीचे स्वरुप याविषयी सविस्तर चर्चा करतात. एखाद्या प्रजातीचे सदस्य म्हणून त्या सजीवाची काही वैशिष्ट्ये असतात, व्यक्ती ही मानव ह्या प्रजातीचा सदस्य आहे, प्रत्येक व्यक्तीत मानव म्हणून काही समान वैशिष्ट्ये आढळतात. मानव म्हणून सर्व सदस्यांची काही समान (Common) सार्वत्रिक (Universal) आणि कायमस्वरूपी (Permanent) वैशिष्ट्ये असतात. सर्वामध्ये काही समान शारीरिक आणि मानसिक गुणवैशिष्ट्ये आढळतात. जीवनचक्र (Life Cycle) मध्ये समानता आढळते. काही वैशिष्ट्ये अशी असतात की ती सामाजिक मूल्ये किंवा संस्कृतीवर आधारित नसतात किंवा त्यापासून निगमीत झालेली नसतात. या गुणवैशिष्ट्यांच्या आधारावर मानवी स्वभावाची संपूर्ण संकल्पना मांडणे हे ह्याबाबतीत साशंकता आहे. मानवाच्या सर्व गुणवैशिष्ट्यांचा समावेश करणारी संकल्पना मांडणे सोपे नाही. मानव हा संस्कृतीचा अविभाज्य घटक आहे, प्रत्येक मानवाची वैशिष्ट्ये किंवा त्यांच्या गुणधर्मावर त्या त्या समाजाच्या संस्कृतीचा प्रभाव पडत असतो आणि त्या विशिष्ट संस्कृतीनुसार त्याची गुणवैशिष्ट्ये आकार घेत असतात. मानवी स्वभाव जो घडत असतो (articulated) तो पारेखांच्या मतानुसार तीन वेगवेगळ्या पातळ्यांवर आधारित असतो. या तीनही पातळ्यांच्या संमिश्रणातून मानवी स्वभाव घडत असतो. या तीन पातळ्या पुढीलप्रमाणे आहेत :-

१) मानव ह्या प्रजातीचा सदस्य म्हणून सर्व मानवात काही समान वैशिष्ट्ये आढळतात.

२) सांस्कृतिक समाजाचा एक सदस्य म्हणून त्यांच्यात काही वैशिष्ट्ये आढळतात.

३) चिंतन/विचार करणारी व्यक्ती म्हणून त्यात काही वैशिष्ट्ये आढळतात.

मानवी स्वभावाच्या संकल्पनेत मानवात आढळणाऱ्या सर्वच वैशिष्ट्यांचा समावेश होतोच असे नाही. मानव म्हणून व्यक्तीमध्ये आढळणाऱ्या वैशिष्ट्यांमध्ये वैविध्यता आहे. व्यक्तीची ओळख सार्वत्रिक आणि विशिष्ट (Universal आणि Specific) यामधील परस्परसंबंधाने युक्त असते. सांस्कृतिक विविधता ही मानवी अस्तित्वाचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. मानवी संकल्पनेच्या उपपत्ती संस्कृतीच्या उपपत्तीशी संबंधित आहेत.

संस्कृती संदर्भातील जे पारंपारिक दृष्टिकोन आहे ते इतर संस्कृतीचे परिक्षण कसे करावे किंवा सामान्य/सार्वत्रिक निकष (Universal norms) कसे द्यावे या संदभात योग्य पर्याप्त उत्तर देऊ शकत नाही. कारण त्यांच्या मतानुसार संस्कृती या एकमेकांपासून पूर्णपणे भिन्न आहेत, म्हणून तुलना होऊच शकत नाही. किंवा विविध संस्कृतींनी एकच निकष मानावा किंवा एकच मूल्यसरणी (One set of values) स्वीकारावी, असे नसते. पारेखांच्या मतानुसार सार्वत्रिक मूल्ये (Universal Values) ही विविध संस्कृतीतील परस्पर संवादांनी मिळू शकतात. यामुळे एकच मूल्यसरणीच्या सार्वत्रिकतेला (Universalising of one set of values) प्रतिबंध करता येईल.

पारेखांच्या मते संस्कृती म्हणजे ऐतिहासिकदृष्ट्या अर्थ आणि महत्त्व यांची निर्माण झालेली प्रणाली, जीवनच्या अर्थासंदर्भातील संकल्पना जीवन कशा पद्धतीने जगावे याला आकार देत असतात आणि व्यक्तिगत आणि सामुहिक पातळीवर नियंत्रित करत असतात. हे विविध पातळ्यांवर घडत असते. उदा. भाषा, कला, मूल्य आणि निकष वगैरे.

भिखू पारेखांच्या मते समाज आणि संस्कृती यामधील फरक समजून घेणे आवश्यक आहे. समाज म्हणजे मानवाचा गट आणि त्यांचे परस्पर संबंध, तर संस्कृती म्हणजे या संबंधांना नियंत्रित करणारे नियम, संस्कृती ही काळाच्या ओघात विकसित होत असते. त्यात बदलही

घडून येत असतात. सांस्कृतिक समाज हा त्या समाजातील सदस्यांच्या जीवनाला आकार देत असतो. संस्कृती ही व्यक्तींपासून वेगळी स्वतंत्र अस्तित्वात असूच शकत नाही. आपण संस्कृतीशी विविध तऱ्हेने संबंधित असतो. संस्कृतीचा काही भाग आपण प्रत्यक्ष जीवनात जगत असतो. विविध संस्कृतीतील काही भाग आपण अवलंबत असतो. संस्कृतीतील विविधता ही समाजात असते. कोणत्याही समाजात 'सांस्कृतिक विविधता हा महत्त्वपूर्ण गुणधर्म आहे. पारेख या विविधतेच्या समर्थनार्थ पुढील विधाने मांडतात -

१) जर समाजात सांस्कृतिक विविधता असेल तर व्यक्तीला पर्याय निवडीचे स्वातंत्र्य मिळते, तो त्याला हवी असणारी किंवा त्याला आवडणारी संस्कृती, जीवनशैली निवडू शकतो. स्वतःच्या संस्कृतीला कमी लेखणे असे अपेक्षित नाही, ते अवास्तव आहे, परंतु सांस्कृतिक विविधता असेल तर त्यांच्यापुढे अनेक पर्याय उपलब्ध असतात त्यातून तो एका पर्यायाची निवड करू शकतो.

२) विविधता ही आवश्यक आहे, त्यापासून दूर राहूच शकत नाही. विविधता ही असतेच. एकच एक गोष्ट कंटाळा आणणारी असते, वैविध्यात सौंदर्य असते. विविधतेची आवश्यकता असते.

३) विविधता ही समाजाच्या प्रगतीसाठीही महत्त्वाची आहे, ती इच्छिण्याजोगी (desirable) आहे, कारण जर विविधता असेल तर समाजात आरोग्यसंपन्न स्पर्धा असेल ज्यामुळे प्रगती संभवनीय आहे.

४) कोणतीही संस्कृती ही संपूर्ण मानवी अनुभव आणि जीवनविषयक अनुभव पूर्णपणे सांगू शकत नाही किंवा पूर्ण स्पष्टीकरण देण्यास पर्याप्त नाही. संस्कृतीतील विविधता ही एकमेकांस पूरक ठरते आणि एकमेकांना सुधारू शकते, आपण आपल्या कक्षेच्या/वर्तुळाच्या बाहेर पडून स्वविषयक वस्तुनिष्ठ ज्ञान मिळवू शकतो. आपणास आपल्या संस्कृतीतील विविधतेची देखील जाणीव असायला हवी.

समाज जर एकसंघ/एकजीनसी असेल तर तो कदाचित प्रगती साधू शकणार नाही. तो बंदीस्त (closed) बनेल. बहुसांस्कृतिक समाजात त्या सगळ्या गोष्टी आढळतात ज्या एकसंघ Homogeneous) समाजात असतात. बहुसांस्कृतिक समाजात विविध संस्कृती एकत्रितपणे आढळतात. सांस्कृतिक विविधतेमुळे कधीकधी ताणही निर्माण होतात. या ताणांचे व्यवस्थापन आणि त्यांना योग्य रितीने नियंत्रणात आणणे शिकून घ्यायला हवे. त्यासाठी योग्य पद्धतीने संस्कृतीची तुलना करता यायला हवी, अर्थातच त्यासाठी त्यामधील भेद आधी विचारात घेणे आवश्यक आहे. यासाठी पारेखजी यंत्रणा सुचवतात. त्यात व्यक्तीला आदराने वागवणे या नियमाला मध्यवर्ती महत्त्व दिले आहे. याच नियमाचा वापर समाजातही व्हावा.

**आपली प्रगती तपासा**

१. भीखू पारिखांच्या ग्रंथांची नावे सांगा.

.....................................................................................

.....................................................................................

.....................................................................................

.....................................................................................

२. भीखू पारेखांना पूर्वीच्या राजकीय विचारप्रणालीत कोणते दोष आढळतात असे सांगितले आहे?

.....................................................................................

.....................................................................................

.........................................................................

.........................................................................

३. समाजातील सांस्कृतिक विभिन्नतेच्या संदर्भात पारेख कोणती विधाने मांडतात.

.........................................................................

.........................................................................

.........................................................................

.........................................................................

## ६.५ बहुसांस्कृतिकवाद - विल किम्लीका

**प्रस्तावना** : किम्लीका हे राजकीय तत्त्वज्ञ आहे. त्यांचे १९९५ साली प्रकाशित झालेले 'Multicultural Citizenship: A Liberal Theory of Minority Rights' हे पुस्तक अतिशय गाजले. त्यांचे बहुसांस्कृतिकवादासंदर्भातील विचार त्यात आढळतात. ओटावा विद्यापीठात आणि कार्लटन विद्यापीठात ते तत्त्वज्ञान विषयाचे प्राध्यापक आहेत.

ऑक्सफर्ड विद्यापीठाने त्यांची पुढील तीन पुस्तके प्रकाशित केली आहेत

1. Liberalism, Community and Culture (1989)
2. Contemporary, Political Philosophy (1990)
3. Multicultural Citizenship (1995)

सांस्कृतिक विविधता ही तात्कालीन समाजाचे मध्यवर्ती वैशिष्ट्य बनले आहे. आधुनिक काळात संप्रेषणाच्या साधनांत तसेच वाहतुकीच्या साधनात मोठ्या प्रमाणावर सुधारणा झाली यामुळे विविध प्रकारच्या समाजातील लोकांमधील परस्परसंबंधात वाढ झाली, तसेच मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होऊ लागले, जगाच्या विविध देशात लोक जाऊन राहू लागले. अर्थातच त्यामुळे काही समस्याही वाढल्या. उदा. आंतरवंशीय हिंसाचारांच्या घटनांमध्ये वाढ झाली.

किम्लीका उदारमतवादी (Liberalism) दृष्टिकोन स्वीकारतो. उदारमतवादी दृष्टीकोन व्यक्ती आणि समाजातील संबंधाचा व्यापक दृष्टिकोन स्वीकारतो. बहुसांस्कृतिक नागरीकत्वात गटांच्या हक्कांवर भर दिला जातो. स्वातंत्र्य आणि समानतेसाठी गटांच्या हक्कांचा विचार होणे आवश्यक आहे.

किम्लीकाच्या मतानुसार वांशिक सांस्कृतिक गटांचे दोन प्रकार आहेत.

१) काही देशात विविध देशातील लोक आढळतात असे बहुदेशीय नागरीकांच्या राज्यात (multination state) देशीय अल्पसंख्यांकांचा (National Minorities) गट.

२) विविध वंश असणाऱ्या राज्यातील वांशिक गट (Ethnic Group) काही देशांमध्ये दोन्हीही गट आढळतात. उदा. कॅनडा.

राष्ट्रीय अल्पसंख्यांक (National Minorities) गट या गटातील सदस्यांचा इतिहास, समाज, प्रदेश, भाषा किंवा संस्कृती एकच असते. विविध कारणांमुळे उदा. साम्राज्यशाहीमुळे (Colonization) किंवा आक्रमण केले गेल्यामुळे किंवा देशाच्या विस्तारामुळे हे गट अल्पसंख्यांक ठरतात किंवा कधी कधी स्वतःहून त्यांनी त्या देशात स्थलांतरण केल्यामुळे अल्पसंख्यांक ठरू शकतात. राष्ट्रीय अल्पसंख्यांक गट हे विशिष्ट संस्कृतीशी संबंधित असतात, त्यांना जर स्वतःची संस्कृती टिकवायची असेल तर त्याप्रमाणे त्यांना स्वातंत्र्य देण्यात यावे, त्यांचे वेगळेपण मान्य करण्यात यावे. इतकेच नव्हे तर या गटांना काही विशेष हक्क देण्यात यावेत. उदा. विशेष प्रतिनिधित्वाचा हक्क (Special Representation Rights) हे हक्क तात्पुरते स्वरुपाचे नसावे तर कायमस्वरुपी असावे. राष्ट्रीय अल्पसंख्यांकांचे ते हक्क मूलभूत

आहेत.

बहुवांशिक हक्क (Polyethnic Rights) परदेशात कायमची वस्ती करण्याच्या हेतूने येणारा अगर आलेला गट हा साधारपणे वांशिक गट असतो. ह्या गटाचे काही विशिष्ट हक्क असतात, त्यांना किम्लीका (Polyethnic rights) बहुवांशिक हक्क म्हणतात. कायमस्वरुपी येऊन परदेशात राहणे हा निर्णय स्वेच्छेने घेतलेला असतो. हा गट त्या देशाशी किंवा त्या संस्कृतीशी सामावून घेण्यास इच्छुक असतो. पण त्याला त्याच्याही संस्कृतीतील काही घटक जपायचे असतात, ती संस्कृतीही त्याला टिकवून ठेवायची असते. या वांशिक गटांना जे हक्क द्यायला हवे यात किम्लीका वांशिक भेदभाव नाहीसा करण्याचा हक्क, समान वागणुकीचा, शिक्षणाचा धर्म, स्वातंत्र्याच्या हक्कांचा समावेश करतो.

राष्ट्रीय अल्पसंख्यांकांचे आणि वांशिक गटांचे हक्क संस्कृतीशी निगडीत असतात. ते महत्त्वाचे आहेत. प्रत्येक व्यक्तीसाठी त्याच्या संस्कृतीचे विशेष महत्त्व असते. किम्लीका सामाजिक संस्कृतीची (Social culture) चर्चा करतो, सामाजिक संस्कृतीशी संबंधित असणारे घटक म्हणजे त्या समाजाचा इतिहास, परंपरा, रूढीसंकेत, सामाजिक प्रथा तसेच सामाजिक संस्था. प्रत्येक समाजाच्या रूढी परंपरा वेगळ्या असतात. त्याच्या संस्कृतीशी असलेल्या मूळामुळे (Originl कधीकधी नवीन संस्कृतीशी समायोजन करणे किंवा त्यात मिसळून जाणे त्यांना अवघड जाते. अशावेळेस या विविध गटांना त्यांच्या संस्कृती रक्षणाचे हक्क अल्पसंख्यांक गटांना देण्यात यावे हा संस्कृती संरक्षणाचा हक्क कायमस्वरूपी नसावा. एथनिक गटांना (एथनिक ग्रुपला ) बाह्य संरक्षणाचा हक्क देण्यात (external protection) देण्यात यावा. समूहामधील व्यक्तींना वैयक्तिक हक्कही असावेत. उदारमतवादी समाज (Liberal Societies) समूहाचे हक्क मान्य करतात. उदा अमेरिकेत मूळचे रहिवासी (aboriginal) आणि स्थानिक हवाईन्स (Hawaiins) यांचे हक्क इतर अमेरिकन्सपासून वेगळे आहेत. Self-Governmentचा हक्क नाकारण्यात आला आहे. किम्लीकाला प्रत्येक गटांचे वेगळेपण आणि त्यांच्या विशिष्ट समस्यांची जाणीव आहे. म्हणूनच प्रत्येक गटाला वेगळ्या प्रकारच्या वागणुकीची आवश्यकता आहे. उदा. अमेरिकेतील आफ्रिकन अमेरिकन हा Voluntary immigrant group ही नाही किंवा राष्ट्रीय अल्पसंख्यांकाचा (national minority) गटही नाही. प्रत्येकाच्या वैयक्तीक हक्कांचे संरक्षण होणे आवश्यक आहे. ते त्यांच्या गटांच्या हक्काची मागणी करणारा नाही. रेफ्यूजींचा गट स्वेच्छेने देश आणि संस्कृती सोडून आलेला नसतो, ज्या देशात ते आश्रीत म्हणून आलेले आहेत त्या नवीन देशातील संस्कृती आत्मसात करून घेण्यात किंवा त्यात सामावून जाण्यात त्यांना रस नसतो, त्यापैकी काही जणांची आपल्या मूळ देशी जाण्याची इच्छा असते, तर काही जण स्वेच्छेने त्या नवीन देशात कायमस्वरूपी वास्तव्य करण्यास तयार असतात. काही रेफ्युजींच्या सर्वेक्षणामध्ये असे आढळले कि ते ज्या परिस्थितीत तिथे राहतात, त्यात ते आनंदी, समाधानी नाहीत. समुहांच्या हक्कांच्या संदर्भात कीमलीका पुढील विधानांचा (Argument) आधार घेतो.

**समानतेचे विधान** - अल्पसंख्यांकांचे हक्क समानता वाढवितात आणि खरी समानता ही विविध गटांना विविध प्रकारची वागणूक देण्यात आहे. त्या गटांना त्यांच्या हक्कांपासून उदा. भाषा किंवा विशिष्ट प्रदेशाशी संपर्क वंचित ठेवणे म्हणजे सांस्कृतिकदृष्ट्या त्यांना वंचित ठेवणे, त्यामुळे समाजात ते पूर्णपणे सहभागी होऊ शकत नाही. मूळदेशीय लोकांना मासेमारीचा हक्क न देणे.

**सांस्कृतिक विभिन्नता** - (cultural Diversity-) सांस्कृतिक विभिन्नतेच्या आधारावर अल्पसंख्यांकांच्या विशेष हक्कांची मांडणी केली जाते. किम्लीका या बाबतीत साशंक

(Skeptical) आहेत. त्यांच्या मते राष्ट्रीय अल्पसंख्यांकाच्या हक्कामुळे बहुसंख्याकांच्या सांस्कृतिक विभिन्नतेत खूपच कमी वाढ होईल. किंबहुना विभिन्नतेत घटच होईल. बहुसंख्यांकांसाठी सांस्कृतिक विभिन्नतेतील वाढ ही सकारात्मक विकास (Posotive Development) दर्शविते, ही संस्कृतीच्या अंतर्गत विभिन्नता आहे. ही विभिन्नता सध्या शक्य होत आहे कारण बरेच गट परदेशात जाऊन तेथील संस्कृतीत मिळून मिसळून जाऊन स्थायिक होत आहेत.

**समूहाचे हक्क** - हे राष्ट्रीय अल्पसंख्यांक (national minority) किंवा (वांशिक गटांसाठी (Ethnic groups) असतात असे नसून ते त्या गटातील व्यक्तीच्या हक्कांचे भाग असतात. उदा. शीखांना मोटरसायकल चालवताना हेल्मेटचा वापर न करण्यासाठी परवानगीचा हक्क हा शिखांचा विशेष हक्क आहे.

कॅनडासारख्या बहुसांस्कृतिक समाजात नवीन येणारे गट हे विभिन्नतेचे स्वागत करताना दिसतात, त्यांच्यात सहिष्णु वृत्ती आढळते आणि एक चांगला समाज घडविण्यासाठी ते प्रयत्नशील असतात.

किम्लीका समान सहभागीत्वाची नागरी ओळख (Shared Civic Identity) निर्माण करण्यात आशावादी आहेत, परंतु ज्या देशात बहुदेशीय, बहुवांशिक लोक एकत्र राहतात त्या देशात अशी Shared civic identity निर्माण होणे कठीण आहे, उदा. कॅनडामधील सांस्कृतिक गटांची विभिन्नता.

**बहुसांस्कृतिक नागरीकत्व** - Multicultural Citizenship : बहुसांस्कृतिक नागरीकत्वाचे महत्त्व जगातील विविध देशातील लोक इतर देशात जाऊन विविध कारणांमुळे कायमस्वरूपी स्थायिक होतात. बहुसांस्कृतिक समाजात या स्थलांतरण करणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण वाढेल, त्यांना त्या समाजात नागरिकत्वाचे हक्कही प्राप्त होतील. जागतिकीकरणास चालना मिळेल आणि जागतिकीकरणामुळे या बहुसांस्कृतिक समाजातील विभिन्नतेत वाढच होईल.

किम्लीकांनी सद्य समाजाचे विश्लेषण करून त्यांनी समाजातील वंशीय विविधतेचे परिक्षण केले आहे. या वैविध्यपूर्ण समाजात आधुनिक वाहतुकीच्या आणि संप्रेषणाच्या साधनांनी विविध प्रकारच्या गटातील आंतरसंबंध वाढले आहेत व त्यामुळे मानवी हक्क गटांचे हक्क स्वओळख या सारखे अनेक प्रश्न पुढे आलेले आहेत. सद्य समाजाचा विश्लेषणात्मक अभ्यास करताना विल कीम्लीकाची भूमिका ही सैध्दांतिक आहे, ते मानवाच्या आणि संस्कृतीच्या स्वरूपाची चर्चा करताना दिसतात. या बरोबरीनेच स्वातंत्र्य, इष्ट जीवन, व्यक्ती आणि संस्कृतीतील संबंध आणि समाजाच्या स्वरूपाचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न करतात.

## ६.६ सारांश

आजच्या आधुनिक समाजात विविध जातीचे, धर्माचे, पंथाचे, वंशाचे, देशांचे लोक एकत्रितपणे राहताना आढळतात. प्रत्येक धर्मियांची, देशांची, किंवा वंशाची समाजाची संस्कृती वेगळी असते. सांस्कृतिक विभिन्नता हे आजच्या समाजाचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. बहुसांस्कृतिकतिकतेमुळे संघर्ष, ताणतणावही निर्माण होऊ शकतात. सहिष्णुतेचे वातावरण असेल तर परस्परभिन्न मतांचा आदर केला जाईल, सहिष्णुता इतरांशी चांगले संबंध विकसित करते. सर्व समाज गुण्या-गोविंदाने नांदेल. सहिष्णुतेमुळे समाजात शांतता व एकोपा राहू

शकतो.

सॅम्युअल हंटिंग्टन या राजकीय विचारवंतांच्या मते भविष्यकाळातील संघर्ष हे भौगोलिक कारणांवरून लढले जाणार नाही तर संस्कृती हे त्या संघर्षामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहे. सांस्कृतिकदृष्ट्या अभिन्न असणारे देश एकमेकांना जवळचे वाटतात. त्या देशांना आर्थिक मदत देतानाही प्राधान्य दिले जाते.

भीखू पारेखांनी बहुसांस्कृतिक समाज आणि बहुसांस्कृतिक वाद यांचे विश्लेषण केले आहे. विविध राजकीय विचारप्रणालींची भूमिका स्पष्ट केली आहे. त्यांच्या मतानुसार सांस्कृतिक विभिन्नता आवश्यक आहे.

विल किम्लीका बहुसांस्कृतिक समाजात समूहांचे हक्क काय असावेत यावर भर देतात. विविध समूहाचे हक्क त्याना देण्यात यावेत. काही सस्कृतीच्या गटांना विषेश हक्क देण्यात यावे.

## ६.७ विद्यापीठीय दीर्घोत्तरी प्रश्न

१. सहिष्णुता म्हणजे काय ते सांगून बहुसांस्कृतिक समाजात सहिष्णुतेचे महत्त्व विशद करा.

२. सॅम्युअल हंटिंग्टनचे बहुसांस्कृतिकविषयी विचार स्पष्ट करा.

३. भीखू पारेखांनी घेतलेल्या राजकीय विचारप्रणालींचाआढावा थोडक्यात स्पष्ट करा.

४. भीखू पारेखांनी संस्कृतीच्या संदर्भातील विचारांचे केलेल्या विश्लेषणाचा आढावा घ्या.

५. विल किम्लीकांनी सांगितलेल्या बहुसांस्कृतिक समाजातील हक्कांचे सविस्तर वर्णन करा.

६. विल किम्लीकांचे बहुसांस्कृतिक विचारांचा आढावा घ्या.

❖❖❖

# ७

# कुटुंब आणि विवाह याविषयी तात्त्विक दृष्टिकोन

**घटक रचना**

७.० उद्दिष्ट्ये

७.१ प्रस्तावना

७.२ प्लेटोचा कुटुंब व विवाह याविषयीचा तात्त्विक दृष्टिकोन

७.३ बर्ट्रांड रसेलचा कुटुंब व विवाह याविषयीचा तात्त्विक दृष्टिकोन

७.४ सारांश

७.५ दीर्घोत्तरी प्रश्न

## ७.० उद्दिष्ट्ये

१. कुटुंब आणि विवाह या सामाजिक संस्थांची माहिती करून घेणे.

२. कुटुंब आणि विवाह या सामाजिक संस्थांचे महत्त्व समाजात काय आहे याचा अभ्यास करणे

३. कुटुंब आणि विवाह याविषयी प्लेटोच्या तात्त्विक विचारांचे आकलन करणे.

४. कुटुंब आणि विवाह याविषयी बर्ट्रांड रसेलच्या तात्त्विक विचारांचा शोध घेऊन त्याचा अभ्यास करणे.

## ७.१ प्रस्तावना

सामाजिक तत्त्वज्ञान हा मानवी समाजाचा विवेकशील तात्त्विक अभ्यास होय. मनुष्य समाजात जन्माला येतो आणि संपूर्ण जीवनभर समाजाबरोबर आंतरक्रिया-प्रतिक्रिया करतो. समाज व्यक्तीची भूमी असून व्यक्तिमत्त्व विकास हा त्याचा परिसर आहे. प्रत्येक मानवाचे समग्र जीवन सक्रिय सहकार्याद्वारे एक समूहाचा सभासद म्हणून विविध अंगांनी विकसित होते. आदर्श किंवा उत्तम नागरिक बनने हे प्रत्येक व्यक्तीचे ध्येय असून आपली नैतिक कर्तव्ये चांगल्या तऱ्हेने पार पाडणे आवश्यक आहे. येथे समाज म्हणजे दुसरे काही नसून कुटुंब आणि विवाह या संस्था आहेत. या सामाजिक संस्थांचा तात्त्विक व मूल्यमापनात्मक अभ्यास सामाजिक तत्त्वज्ञानात केला जातो. याशिवाय इतरही सामाजिक संस्थांच्या व राजकीय संस्थांच्या मूल्यांचा (Values) शास्त्रीय व तात्त्विक दृष्टिकोनातून अभ्यास करण्याचा प्रयत्न सामाजिक तत्त्वज्ञानात केला जातो. ही मूल्ये व ध्येये साध्य करण्यासाठी तसेच व्यक्तीची व समाजाची प्रगती होण्यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन सामाजिक तत्त्वज्ञान करते. कुटुंब व विवाह या सामाजिक संस्थांचे कालमानाप्रमाणे त्यांचे स्वरूप सारखे बदलत असते. त्यांचे स्वरूप व आशय बदलतो. या प्रकरणात आपण ग्रीक तत्त्ववेत्ता प्लेटो आणि ब्रिटीश तत्त्वज्ञ बर्ट्रांड रसेल यांचा कुटुंब आणि विवाह विषयक तात्त्विक दृष्टिकोनांचा अभ्यास करणार आहोत.

### ७.१.१ कुटुंबसंस्था

कुटुंबसंस्था ही उच्चतम प्राण्यांमध्ये विशेषतः मानवामध्ये विकसित झाली. कुटुंबसंस्था ही नैसर्गिक संस्था व मूलभूत घटक असलेली सामाजिक संस्था आहे. मानवी समाज अनेक कुटुंबांनी बनलेला आहे. कुटुंब समाजाचा हा एकक (Unit) घटक आहे. कुटुंब हे सामाजिक मान्यता असलेला लोकांचा घटक असून तो नातेसंबंधांने, विवाहाने व कायद्याने एकमेकांशी बांधला गेला आहे. कुटुंब म्हणजे विवाहित पती-पत्नी, त्यांची मुले, पती-पत्नीचे आईवडील, (आजी-आजोबा) या सर्वांचा मिळून तयार झालेला समूह (गट) होय. मॅकआयव्हर आणि पेजच्या मते कुटुंब म्हणजे प्रजोत्पादन आणि संतती संगोपन ही उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी निर्माण झालेल्या व निश्चित स्वरूपाच्या व दीर्घकाळ टिकणाऱ्या संबंधावर आधारलेला समूह होय.

कुटुंबातील व्यक्तींचे परस्परसंबंध हे वात्सल्य, लैंगिक इच्छा, वंशसातत्य, इच्छा, प्रेम, सहानुभूती व आर्थिक परस्परावलंबित्व यांच्यावर आधारेले असतात. विवाहाद्वारे कुटुंबाला स्थिर स्वरूप प्राप्त होते. विवाहाद्वारे परस्परसंबंधावर आधारलेली सामाजिक संस्था म्हणजे कुटुंब होय. कुटुंबातील सभासद आर्थिक तरतुदी करून मुलांच्या संगोपनात व इतर महत्त्वाच्या जबाबदाऱ्यांमध्ये सहभागी होतात. कुटुंबातील सर्व सभासद एकत्र वास्तव्य करतात आणि ते परस्परांमध्ये सहभागी होतात. थोडक्यात प्रजोत्पादन, मुलांचे संगोपन, सामाजिकीकरण आणि सहजप्रवृत्तीमधून कुटुंबाचे अस्तित्त्व आलेले आहे.

### ७.१.२ विवाहसंस्था (Institute of Marriage)

कुटुंबसंस्था ही पवित्र कर्तव्ये, पवित्र भावना व विवाह संस्थेचे अखंडत्त्व मान्य करते. विवाह या सामाजिक संस्थेद्वारे स्त्री-पुरुषांच्या कौटुंबिक जीवनाचा आरंभ होतो. विवाहाद्वारे कुटुंबाला स्थैर्य येते. त्यात पती-पत्नी व त्यांची मुले यांना सामाजिक मान्यता असते. विवाहामुळेच स्त्री-पुरुष यांच्यातील लैंगिक संबंधांना कायदेशीर हक्काचा दर्जा प्राप्त होतो. विवाहाद्वारे पती-पत्नी यांचे परस्परसंबंध त्यांच्या रक्ताच्या नात्याने, त्यांच्या अपत्याचे संगोपन आणि सामाजिक संबंधामुळे नियमित केले जातात. थोडक्यात प्रथा व कायदा मान्य असणाऱ्या संततीबद्दल हक्क व कर्तव्य निर्माण करण्याच्या संबंधांना विवाह असे म्हणतात. विवाह हा कायदेशीर संबंध असून त्यात नियमांचे पालन करून हक्क व कर्तव्ये यांचे पालन केले जाते. विवाहामुळेच पती-पत्नी यांना परस्परांबद्दलचा आदर असतो.

विवाह संस्थेचे दोन प्रमुख उद्दिष्ट्ये आहेत. पहिले स्त्री-पुरुषामधील लैंगिक संबंधांना मान्यता देणे. दुसरे उद्दिष्ट म्हणजे स्त्री-पुरुषांमधील दीर्घकालीन संबंधांचा करार प्रस्थापित होऊन त्यांच्याद्वारे कुटुंब आकाराला येते. विवाहसंस्था ही कुटुंबातूनच उगम पावते. कुटुंबसंस्था व विवाहसंस्था समाजाच्या विकासात महत्त्वाच्या भूमिका पार पाडतात. विवाहसंस्थेला सामाजिक, धार्मिक व कायदेशीर बैठक आहे. विवाह हा विरुद्धलिंगी संबंध असून लैंगिक वासनांची अभिव्यक्ती व त्यावर नियंत्रण करणारी एक सामाजिक संस्था म्हणून मान्यता पावली आहे.

भारतीय साहित्यात विवाह एक आध्यत्मिक करार आहे. विवाह हा पती-पत्नींना किंवा परस्परांना ओळखणारा एक कौटुंबिक संबंध असून त्यात दोन आत्म्यांमधील मिल्ल न आहे. कुटुंबात सर्वांचे एक समान उद्दिष्ट असून ते साध्य करण्यासाठी सर्व प्रयत्न करतात. काही समाजात विवाह एक पवित्र संस्कार मानला जातो. तर काही समाजात तो एक करार मानला

जातो. त्यात प्रजोत्पादन संरक्षण, मुलांचे संगोपन आणि लैंगिक संबंध ठेवण्याची कायदेशीर मान्यता असते. वैवाहिक संबंध पती-पत्नीमध्ये असून हे संबंध परस्परांबद्दल आपुलकी निर्माण करणारी व दोन भिन्न परिपक्व व्यक्तींचे मिल्ल न  असते. त्यातूनच मुलांचे संगोपन व निकोप वातावरण तयार केले जाते.

समाजाच्या गतिमान परिवर्तनामुळे कुटुंब व विवाह या दोन सामाजिक संस्थांमध्येसुद्धा परिवर्तन झालेले आहे. एकत्र कुटुंबाची जागा विभक्त कुटुंबाने घेतली. एक पालकत्त्व कुटुंब आकाराला आले. विरुद्धलिंगी विवाहातही बदल झालेला आहे. विरुद्धलिंगी विवाहाची जागा अलिकडे करार विवाहाने व समलिंगी विवाहाने घेतली आहे. सध्या तात्पुरत्या सहवास्तव्य करणाऱ्या संबंधातून नातेसहसंबंधाने एकत्र राहणे (लिव्ह इन रिलेशनशिप) ही संकल्पना आकार घेत आहे.

## ७.२ प्लेटोचा कुटुंब व विवाहविषयक तात्त्विक दृष्टिकोन

प्लेटो : ज्याने तत्त्वज्ञानाच्या विचाराची समृद्धता व विविधता निर्माण केली असा जगाच्या इतिहासात प्लेटो हा पहिला विचारवंत होता. त्याची तुलना इतर कोणत्याही तत्त्वचिंतकाशी करता येण्यासारखी नाही असे अत्यंत विस्तृत, व्यापक व बहुरंगी तत्त्वज्ञान आहे. प्लेटो एक जन्मतःच विचारवंत होता. त्याने आपल्या पूर्वजांकडून विचारधन घेऊन त्याच्या आधारावर तत्त्वज्ञानाची भव्य इमारत उभी केली. प्लेटोचा जन्म अथेन्समध्ये इ.स.पू. ४२७ मध्ये एका खानदानी राजघराण्यात झाला. तो राज्यकर्त्यांच्या घरात व वातावरणात वाढला. त्याचे मूळ नाव ॲरिस्टोक्लीस होते. परंतु लोकांनी प्लेटो हे त्याचे टोपणनाव ठेवले. अथेन्समधील नागरिकांना चांगल्याप्रकारे शिक्षण जसे मिळाले तेच उत्तमप्रकारचे शिक्षण प्लेटोलाही मिळाले. प्लेटोने तरुणांना शिक्षण देण्यासाठी **'ॲकॅडेमी'** या संस्थेची स्थापना केली. तो सतत लिखाण करण्यात गढलेला होता. त्याने अनेक संवाद लिहिले. त्यापैकी क्रिटो, अपॉलॉजी, फीडो, प्रोटॅगोरस, गॉर्जियाज, क्रेटिलस, युथिडेस, मेनो, टीमीअस, रिपब्लिक व लॉज इ. संवाद प्रसिद्ध आहे. प्लेटोचा रिपब्लिक एक श्रेष्ठ प्रकारचा आदर्श ग्रंथ समजला जातो. रिपब्लिक या ग्रंथामध्ये त्याने आदर्श राज्याचे, ज्या शासनसंस्थेत न्याय पूर्णपणे साकार होईल अशा शासनसंस्थेचे स्वरुप व शिवतत्त्व यांचे वर्णन केले आहे. मानवी आत्म्यात विवेक, उर्जा व क्षुधा ही तीन तत्त्वे असतात. त्याच्या मते संगीत, सैनिक शिक्षण, गणित, तत्त्वज्ञान, विज्ञान यांचे शिक्षण देऊन तयार झालेल्या तत्त्वज्ञ राज्यकर्त्यांच्या हातात राजसत्ता द्यावी. तत्त्वज्ञ हे राज्यकर्ते असले पाहिजे हे प्लेटोचे मत होते.

प्लेटोने आदर्श राज्याची संकल्पना रिपब्लिक आणि लॉज ह्या दोन संवादांमध्ये स्पष्ट केली आहे. त्याने आदर्श राज्याचे आणि समाजाचे तीन वर्ग सांगितले. १) तत्त्वज्ञ राज्यकर्त्यांचा वर्ग २) सैनिकांचा वर्ग ३) कामगारांचा वर्ग हेच ते तीन वर्ग होत. प्रत्येक वर्गाने आपापले काम योग्य तऱ्हेने केले तर राज्यात सुसंवाद (सामंजस्य) निर्माण होते आणि तोच योग्य न्याय होय. प्लेटोने केलेले हे वर्ग जन्मावर नव्हे तर योग्यतेवर अवलंबून आहेत. तत्त्वज्ञ राज्यकर्त्यांच्या देखरेखीखाली इतर वर्ग आपले काम करतील असे प्लेटोचे मत होते. त्याच्या मते **'महिलांचा साम्यवाद'** आणि **'मालमत्तेचा साम्यवाद'** हा आदर्श राज्याचाच एक भाग आहे. आदर्शराज्य तात्त्विक विवेकावर आधारेलेले असून त्याचे ध्येय नागरिकांमध्ये सद्‌गुणांची बीजे रोवणे व त्यांना सुख देणे हे आहे. व्यक्ती स्वयं सुख मिळवू शकत नाही तर राज्याने त्यांच्याकरिता सुख हे स्वर्गातून भूतलावर आणलेले आहे.

प्लेटोने लॉज या संवादात कायदेकानून व नियमांचे महत्त्व पटवून दिले आहे. आदर्श

राज्याचा कारभार कायद्यानुसार विवेकी वा राज्यकर्त्या तत्त्वज्ञांनी चालविला पाहिजे त्याकरिता राज्याला श्रमविभागणीची अत्यावश्यकता आहे असे प्लेटोने स्पष्ट केले. प्लेटो समाजात तीन तत्त्वे अवलंबण्यास सांगतो. ती तीन तत्त्वे म्हणजे विवेक, ऊर्जा व श्रमविभागणी होय. ही तीनही तत्त्वे त्या त्या वर्गाशी संबंधित आहेत. विवेकाचे तत्त्व राज्यकर्ते तत्त्वज्ञ यांच्याशी संबंधित ऊर्जेचे तत्त्व सैनिक वर्गाशी संबंधित तर श्रमविभागणीचे तत्त्व शेतकरी व कामगार वर्गाशी संबंधित आहे.

राज्य (State)




मानवी व्यक्तीचा आत्मा (Individual Soul)




प्लेटोच्या मते राज्याचे वर्ग हे आत्म्याच्या त्रिविभाजनावर आधारलेले आहेत. तसेच तो आत्म्याचे तीन भाग मानतो. एक विवेकी आत्मा, दोन ओजस्वी आत्मा आणि तिसरा क्षुधित आत्मा. हे आत्म्याचे तीनही भाग परस्परांशी संबंधित असून ते पूर्णतः व्यक्तिशी सुसंवादित आहेत. ते समाजाला न्यायाप्रत घेऊन जातात. व्यक्तीला राज्याची असणारी आपापली कार्ये सक्षमतेने व परिणामकारकतेने करण्यासाठी प्रशिक्षण मिळाले पाहिजे. कोणत्याही वर्गाने आपापसात व्यत्यय आणता कामा नये. प्लेटो तीन वर्गातील विषमता स्पष्ट करतो. राज्यकर्त्यांनी आणि सैनिकांनी मालमत्ता, कुटुंब प्रेम यांच्याप्रती व्यक्तिशः मन गुंतविता कामा नये. जर त्यांनी त्यात मन गुंतविले तर राज्याच्या कल्याणाकडे दुर्लक्ष होईल. म्हणून त्यांनी राज्याच्या कल्याणाशिवाय इतर कशातही मन गुंतवू नये असे प्लेटो म्हणतो.

### ७.२.१ महिलांच्या साम्यवादाची पार्श्वभूमी

स्पार्टा, अथेन्स या ग्रीक नगरराज्यांमध्ये सामाजिक, आर्थिक व राजकीयदृष्ट्या एकता जशी होती तशीच आध्यात्मिक व धार्मिक दृष्ट्याही एकता होती. प्लेटोला व्यक्ती आणि राज्य

या संकल्पना मान्य होत्या. राज्याच्या नियमांचे वा आज्ञेचे पालन करण्यासही तो मान्यता देतो. अथेनियनमधील विचारानुसार महिलांना कमी दर्जा दिला जात असे. परंतु प्लेटो मात्र आदर्श राज्यात महिलांना समान दर्जा दिला पाहिजे असे मानतो. प्लेटोच्या मते स्त्री-पुरुष हा लिंगभेद सोडला तर त्यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारचा भेद नाही. काही अल्पसा भेद सोडला तर महिलांची क्षमता ही पुरुषांइतकीच सक्षम असते. जर महिलांना पुरुषांप्रमाणे प्रशिक्षण दिले तर पुरुषांप्रमाणेच ते आपले कार्य यशस्वीपणे करू शकतात. मानसिकदृष्ट्या बुद्धिमत्तेची स्वाभाविक वा नैसर्गिक देणगी स्त्री-पुरुषांमध्ये सारखीच दिसून येते. पालकत्त्वाची इतर सामाजिक कर्तव्ये महिलांना पार पाडता येतील, तसेच सैनिक म्हणून युद्धातही सहभागी होता येईल अशी शिफारसही प्लेटो करतो.

प्लेटोच्या मते अथेन्समधील स्त्रीया आपली निम्म्यापेक्षा अधिक शक्ति आणि बुद्धी मुलांचा जन्म आणि संगोपन यामध्येच खर्ची घालतात. त्याच्या मते एखादी व्यक्ती एखादे काम करण्यास सक्षम असेल तर ते त्याला मिळाले पाहिजे. स्त्रीयांना कोणत्याही कौटुंबिक बंधनात जखडून ठेवू नये. स्त्री-स्वातंत्र्य केवळ त्यांच्या मुक्तिसाठी नसून संपूर्ण राज्याच्या कल्याणासाठी वा उत्कर्षासाठी आहे.

प्लेटोच्या मतानुसार कुटुंब आणि मालमत्ता ह्या परस्परावलंबी घटना आहेत. त्याने महिलांच्या साम्यवादाची धक्कादायक संकल्पना मांडली आहे. महिलांचा साम्यवाद राज्यकर्ते आणि सैनिक या वर्गांना लागू आहे. या दोन्ही वर्गाची कुटुंबाविषयक आसक्ती ही गंभीर व प्रतिस्पर्धा निर्माण करणारी आहे. म्हणूनच प्लेटो पालक आणि सैनिक यांची व्यक्तिगत कुटुंबे रद्द करण्यास सांगतो. पन्नाशी नंतर राज्यकर्त्यांना आणि सैनिकांना विवाह करण्यास व खाजगी मालमत्ता बाळगण्यास परवानगी नाही. जर त्यांचे मन कुटुंब व मालमत्तेत गुंतले तर राज्याच्या कल्याणाकडे दुर्लक्ष होईल. म्हणूनच प्लेटो राज्यकर्त्यांचा वर्ग आणि सैनिकांचा वर्ग असे दोन्ही वर्ग मिळून सुसंवादी कुटुंब मानतो.

प्लेटोप्रणित महिलांचा साम्यवाद पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१) प्लेटोच्या मते कोणतीही स्त्री कोणत्याही पुरुषाशी कायमस्वरूपाची विवाहबद्ध होऊ शकत नाही.

२) सर्व स्त्री-पुरुष राज्यकर्त्यांनी एकत्रित (बराकीत) राहिले पाहिजे.

३) उत्तम स्त्रीया व उत्तम पुरुष यांच्यातील तात्पुरते स्नेहसंबंध (मैत्री) हे राज्याने एकाच वर्षाकरिता ठेवण्याची व्यवस्था केली पाहिजे.

४) पुरुषांचे विवाहाचे वय २५ ते ५५ तर स्त्रीयांचे विवाहाचे वय २० ते ४० वर्षादरम्यान असले पाहिजे.

५) मुलांच्या जन्मानंतर दोन्ही स्त्री-पुरुषांनी विभक्त झाले पाहिजे. आपले वय आणि निकोप आरोग्य यांना साजेसा जोडीदार पाहून विरुद्धलिंगी व्यक्तिबरोबर एकोप्याने राहिले पाहिजे.

६) जन्मानंतर सर्व मुलांनी आपल्या जन्मदात्या आई-वडिलांपासून विभक्त झाले पाहिजे. मुलांना आपले जन्मदाते आई-वडील (पालक) कोण आहेत व मातापित्यांना आपली मुले कोणती आहेत हे समजावयास नको. सर्व मुलांना जन्मानंतर आपण सर्व बांधव आहोत हा विचार शिकवून मनात रुजविला पाहिजे. परिणामी 'परिपूर्ण ऐक्य' हे वास्तवात येईल. पालकवर्गाचे एक मोठे कुटुंब होईल आणि सर्व वयस्कर माणसे ही त्या मुलांना आपली मुले म्हणून संबोधतील.

७) जन्मदात्री, माता म्हणून मुलांचे पालन-पोषण वा संगोपन ती करणार नाही, तर त्याची सर्व जबाबदारी राज्याची असणार आहे.

### ७.२.२. प्लेटोची समीक्षा

प्लेटोचा साम्यवाद हा दोन प्रकारचा आहे. १) मालमत्ता प्रतिबंध व (२) कुटुंब प्रतिबंध. प्लेटोचा साम्यवाद विरक्तिवाद (Asceticism) आहे. पालनकर्ते वा राज्यकर्ते व सैनिक यांनी जास्तीत जास्त लोकांच्या भावनांचा आदर केला पाहिजे. प्लेटोचा साम्यवाद हा उच्चभ्रू आहे कारण तो केवळ निवडक लोकांसाठी आहे. तत्कालीन अथेन्समधील महिलांची स्थिती ही गुलामांपेक्षा अधिक वाईट होती. केवळ जीवंत राहावे वा जगावे म्हणून ते आपले जीवन कंठीत होत्या. बार्कर म्हणतो की, प्लेटोने उत्तमतत्त्वे म्हणून सुरुवात केली पण प्रत्यक्षात त्यांची व्यावहारिक अंमलबजावणी मात्र पूर्णपणे चुकीची होती. यासाठीच प्लेटोने मालमत्तेचा साम्यवाद आणि महिलांचा साम्यवाद यांचा पुरस्कार केला.

### ७.२.३ ॲरिस्टॉटलची प्लेटोप्रणीत महिला साम्यवादावरील समीक्षा

प्लेटोच्या मते राज्याची एकता सर्वश्रेष्ठ आहे. कुटुंब आणि राज्य ही पूर्णपणे भिन्न संकल्पना आहेत. त्याची जैविक संकल्पना ही फारच दूर गेलेली आहे. पती-पत्नींमधील संबंधाची तुलना ही प्राण्यांमधील संबंधांसारखी होऊ शकत नाही. पती-पत्नीमधील संबंधाची मुळे ही भावनिकदृष्ट्या खोलवर रुजलेली असतात. म्हणूनच त्यांच्यातील संबंध हे आयुष्यभराचे असतात. विवाह ही जीवनाची मैत्री आहे. केवळ उत्तम पिढ्या जन्माला घालण्यासाठी स्त्री-पुरुष यांनी एकत्र येणे हे एकमेव उद्दिष्ट नसते. प्लेटोप्रणित महिलांचा साम्यवाद हा समाजाचे ऐक्य साधण्याऐवजी सामाजिक व्यवस्थेत गोंधळ आणि विसंवाद निर्माण करणारा आहे.

मुलांची हेळसांड झाल्यामुळे पत्येकाची जबाबदारी ही कोणाचीच जबाबदारी उरणार नाही. स्त्री-पुरुषांच्या अशा संबंधामुळे जवळच्या नातेवाईकांमध्ये अनैतिकता वाढीस लागेल. राज्याचे विवाहावरील नियंत्रण अकार्यक्षम होईल आणि राज्यातील उत्तम पुरुष आणि उत्तम स्त्रीया`एकत्र आणता येणार नाहीत. महिलांचा हा साम्यवाद पालकवर्गाला दुःखी करील. जेव्हा समष्टिचा एखादा भाग दुःखी असेल तेव्हा समष्टि सुखी होऊ शकत नाही. प्लेटोची राज्य म्हणजे एकता ही संकल्पना चुकीची आहे. ॲरिस्टॉटलच्या मतानुसार राज्याची संकल्पना बहुतत्त्ववादी असल्यामुळे केवळ शिक्षणामुळेच त्याचे ऐक्य साधले जाईल.

प्लेटोप्रणित महिला साम्यवादावर पुढीलप्रमाणे काही आक्षेपही सांगता येतील. आई-मुलांमधील नातेसंबंध हा दीर्घकालीन संबंध आहे. मातेच्या प्रेमाशिवाय व आपुलकीशिवाय मुलांचा व्यक्तिमत्त्व विकास, भावनिक व नैतिक विकास होणे अशक्य आहे. प्लेटो चांगल्या हेतूने कुटुंबसंस्था रद्द करतो. नैतिक संस्काराच्या शाळा आणि आचारविचारांचे प्रशिक्षणही तो रद्द करतो. त्यामुळे मुलांचा त्यांच्याअभावी सर्वांगीण विकास होणे कठिण होऊन बसते. कारण प्रेम, चारित्र्य (शील), दया, करुणा या नैतिक मुल्यांचा पाया हा कुटुंबसंस्थेतच घातला जातो. बारकरच्या मते प्लेटोने राज्याच्या उत्कर्षासाठी वा कल्याणासाठी व्यक्ती हे साधन मानले आहे.

**<u>आपली प्रगती तपासा</u>**

१) राज्य आणि व्यक्तीचा आत्मा यांच्यातील साम्य प्लेटो कसे प्रतिपादन करतो?

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

२) महिलांचा साम्यवाद सांगा.

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

३) प्लेटोच्या कुटुंब आणि विवाहविषयी विचारांच्या विरोधात कोणते आक्षेप घेतलेले आहेत?

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

## ७.३ बर्ट्रांड रसेलचा कुटुंब आणि विवाहविषयक तात्त्विक दृष्टिकोन

### ७.३.१ बर्ट्रांड रसेल

बर्ट्रांड रसेलचा जन्म ब्रिटनमध्ये इ.स. पू. १८७२ मध्ये एका उमराव (उच्चभ्रू) कुटुंबात झाला. तो गणिततज्ञ, तर्कशास्त्रज्ञ, इतिहासतज्ञ, विश्लेषक तत्त्वज्ञ आणि समाज समीक्षक होता. तत्त्वज्ञानात तो विश्लेषक तत्त्वज्ञानाचा जनक म्हणून ओळखला जातो. त्याला उदारमतवादी, समाजवादी व शांततावादी म्हणूनही संबोधले जाते. तो एक युद्धविरोधी कृतीशील विचारवंत होता. हेगेलप्रणीत चिद्वादी तत्त्वज्ञानाचा मार्ग मुक्त करण्यासाठी तो आणि मूर पुढे येऊन त्यांनी विश्लेषक तत्त्वज्ञानाची मूहूर्तमेढ रोवली आणि वास्तववादी विश्लेषक तत्त्वज्ञानाचा पाया घातला.

रसेल हा इ.स.पू. १९०७ मध्ये विम्बल्डन येथे महिलांच्या मतदारसंघातून पार्लमेंटच्या निवडणुकीला उभा राहिला. पण तेथे तो निवडून आला नाही. इ.स.पू. १९२९ मध्ये त्याचा विवाह आणि नीतिमत्ता (मॅरेज अँड मॉरल्स) हा ग्रंथ प्रकाशित झाला. १९४० मध्ये न्यूयॉर्कमधील सिटी कॉलेजात त्याची प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली. पण त्याला या कॉलेजात शिकविण्यासाठी नैतिकदृष्ट्या अपात्र ठरविण्यात आले आणि त्याला ते कॉलेज सोडावे लागले. तरीही १९५० साली त्याला साहित्याचा नोबेल पुरस्कार मिळाला. त्याच्या मानवतावादी आणि विचार अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या विचारामुळे आणि महत्त्वाच्या लिखानामुळे तो परिचित झाला. वयाच्या ९८व्या वर्षी रसेलचे देहावसान झाले.

### ७.३.२ रसेलचे कुटुंब आणि विवाहविषयक तात्त्विक विचार

बर्ट्रांड रसेलने विवाह आणि नीतिमत्ता (मॅरेज अँड मॉरल्स) हा ग्रंथ पारंपारिक नीतिमत्तेत असणाऱ्या संकल्पनेंच्या विरोधात लिहिला आहे. रसेलच्या मते लैंगिक घटनांमध्ये अबौद्धिकता, प्रतिबंधकता व अप्रामाणिकपणा या गोष्टी हानीकारक आहेत. पारंपारिक शिक्षणाचा कल हा संवेग निर्मितीत अडथळा असून समीक्षात्मक चौकशीलाही अनुत्तेजन देणारा आहे. रसेल म्हणतो की, व्हिक्टोरियन कालीन स्त्रीया मानसिकदृष्ट्या बंदिस्त होत्या. हा बंदिस्तपणा अर्धजाणिवेच्या पातळीवर राहात असे. लैंगिकतेसंबंधीच्या प्रश्नांना उत्तरे देणे टाळले जात असे. महिलांमध्ये साधारण असा समज होता की लैंगिकसंबंधात अधिक रस न घेणाऱ्या स्त्रिया ह्या पुरुषांपेक्षा नैतिकदृष्ट्या श्रेष्ठ आहेत. पारंपारिकदृष्ट्या विवाहबाह्य लैंगिकसंबंध ठेवणे हे पाप आहे असे मानले जात. विवाहानंतर लैंगिकसंबंध ठेवणे वाईट नव्हे. केवळ सुखप्राप्तीसाठी स्त्रीयांशी लैंगिक कृतीसंबंधीची जवळीकता करणे हे नैतिक नव्हे.

रसेल मुक्त लैंगिक शिक्षणाचा विचार मांडतो आणि गर्भनिरोधक किंवा कुटुंबनियोजनाच्या साधनांचा मुक्तकंठाने पुरस्कार करतो. लैंगिक शिक्षणाच्या अभावामुळे मुलांचे पालकांबरोबरचे संबंध सुदृढ राहत नाहीत. पालकांच्या वर्तनातील विसंगतीमुळे त्यांची नैतिक आणि बौद्धिक अधिकारांची पायमल्ली होते. विवाहाप्रती आणि विरुद्ध लैंगिकतेप्रती मुलांची अभिवृत्ती वाईट झालेली आहे. विवाहातून होणारे लैंगिक संबंध हे किळसवाणे आहेत. हे संबंध स्त्री-पुरुषाला असमाधान देणारे आहेत. सहजप्रवृत्तीच्या समाधानाच्या अभावी नैतिकता खालावते.

विवाहसंस्था ही एक रूढ परंपरा म्हणून तिचे तीन घटक आहेत व ते परस्परांशी संबंधित आहेत. ते तीन घटक म्हणजे धार्मिक, आर्थिक आणि सहजप्रवृत्ती होत. विवाहाच्या परंपरेला धार्मिकतेचा भरभक्कम पाठिंबा असून त्यामुळेच ती टिकून आहे. आर्थिक घटकांचा दुष्परिणामही विवाहावर होतो. पितृप्रधान समाजात विवाहित महिला व मुले ही मौल्यवान संपत्ती आहे. स्त्रीया व मुले यांच्यामध्ये कर्तव्याची भावना निर्माण करणे या अर्थाने धर्म एक साधन आहे. यादृष्टिने वैवाहिक पतिला आपल्या पत्नीपासून घटस्फोट घेणे सुलभ आहे. पण स्त्रीला पतिपासून घटस्फोट घेणे अशक्य असते.

आधुनिक समाज हा पितृप्रधान कुटुंबसंस्थेवर आधारित आहे. स्त्रीयांच्या सद्‌गुणांमुळेच पितृप्रधान कुटुंबपद्धती टिकून आहे. माणसातला अहमभाव हा मुलांबद्दलच्या वात्सल्यरुपाने अविरत असल्याने पुढे तो अहमभावाच्या रूपाने टिकून राहतो. रसेलच्या मते विवाह हा स्त्रीयांसाठी सर्वसामान्यपणे जगण्याचा आधार असतो आणि तो लैंगिकतेशी अधिकतम जोडलेला असतो. विवाहाचा सहजप्रेरक घटक म्हणजे प्रेम होय. त्याला धर्माने मान्यता दिली आहे. प्रेमाची सहजप्रवृत्ती ही असामान्यरित्या अस्पष्ट आहे. ती दूर होऊ शकते आणि रोमांचकारी प्रेमविवाहाला प्रोत्साहन देते. त्यामुळे जीवनाला आनंद मिळतो. परिणामी जवळीकता, आपुलकी व वास्तविकता हे सामाजिक हेतू त्यामुळे साध्य केले जातात.

रसेल हा मुक्त प्रेमाचा उत्कृष्ट उद्‌गाता आहे. त्याच्या मते अविवाहित स्त्री-पुरुषांमधील लैंगिकता ही अनैतिक नव्हे उलट ते परस्परांवर प्रेम करीत असतील तर ते नैतिक होय. रसेल प्रौढांना व कुमारांना सूचवितो की तुमच्या संवेगावर नियंत्रण ठेवून तुम्हाला आवडेल ते करा. परंतु रसेल पशुप्रमाणे एकत्र राहाण्याचे (Wild living) समर्थन करीत नाही. तो जीवनातील

सुसंगतीचे समर्थन करतो व इतरांना मान्य होईल असे प्रामाणिक मानदंडाची वा निकषांची आवश्यकता सांगतो.

रसेलच्या मते विवाहपूर्व लैंगिकसंबंध ठेवणे हे काही गैर नव्हे. त्याकरिता त्याने विवाहाचे दोन प्रकार सांगितले. एक तात्पुरता विवाह आणि दुसरा सहचार्य विवाह होत. अशाप्रकारच्या अपत्यहीन विवाहात तरुण स्त्री-परुषांनी उत्कट लैंगिक संबंध प्रस्थापित करण्यास हरकत नाही. मात्र त्यासाठी प्रदीर्घ काळाचे बंधन नसावे. रसेल सांगतो की, यामुळे अतिबेचैन अथवा अस्वस्थ होऊन गुपचूप लैंगिक संबंध ठेवण्यापेक्षा सरळ लैंगिक संबंध प्रस्थापित करावेत असे रसेलचे मत आहे.

रसेलच्या मतानुसार दोन मानवी जीवांमध्ये अस्तित्त्वात असलेले उत्तम आणि महत्त्वाचे संबंध ठेवण्यासाठी विवाह हा चांगला मार्ग आहे. परस्परांना जोडणारा व सुखप्राप्ती करून देणारा यापेक्षाही विवाहाचा मार्ग अधिक काही सांगून जातो. विवाहसंस्थेद्वारे प्रजोत्पादन होते, सामाजिक संबंध वृद्धिंगत होतात. पती-पत्नींमधील प्रेमाचे नाते संपुष्टात आल्यावरही वैवाहिक संबंध चालू ठेवण`याला रसेल आक्षेप घेतो. अपत्यहीन पती-पत्नीने घटस्फोट घेणे सहज सोपे आहे, असे रसेल सांगतो. ज्या पालकांना मुले हवी असतील त्यांनी विवाहबद्ध झाले पाहिजे. विवाहबद्ध पती-पत्निने लैंगिक व्यभिचार करू नये. विवाहित जोडप्यांना पूर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे. विवाहातील प्रेम हा घटक विरुन गेल्यास त्यात गैर असे काही नाही. परंतु वैवाहिक जीवनावर व मुलांवर मात्र त्याचा अनिष्ट परिणाम होता कामा नये, असे रसेल स्पष्ट करतो.

एक अगत्यपूर्वक नोंद केली पाहिजे की, रसेल हा कुटुंबसंस्थेच्या विरोधी नव्हता. तो कुटुंबसंस्थेला समाजातील प्राथमिक स्वरुपाचा अत्यंत महत्त्वाचा घटक मानतो. मुलांचे संगोपन करण्यासाठीच कुटुंबाची चौकट अस्तित्वात आली आहे. म्हणूनच पालकांनी आपल्या मुलांबरोबर एकत्र असले पाहिजे, असेही सांगतो. विवाहित जोडप्याच्या संबंधातील प्रेमाचा करार संपुष्टात आला तर पती-पत्नी यापैकी कोणाही एकाला स्वतंत्र वा मुक्त होण्यास परवानगी आहे. वैवाहिक संबंधामध्ये पती-पत्नीने त्याग आणि समर्पणाच्या भावनेतून परस्परांना समाधान व सुख प्राप्त करून देणे क्रमप्राप्त आहे.

बहुआयामी समाजात मात्र वैवाहिक संबंधातील सर्वच जोडपी समाधानी असतीलच असे नाही. विवाहाव्यतिरिक्त कोणीही महिला अथवा पुरुष विवाहबाह्य संबंध ठेवण्याची शक्यता नाही. परस्परांचे सुख आणि समाधान स्वीकारण्याची मानसिकता असेल तर असे विवाह खऱ्या अर्थी यशस्वी होऊन सुख प्राप्ती करतात. अशी आशा करता येते की कोणीही व्यक्ती समाजाने ठरवून दिलेल्या सद्वर्तनाच्या चौकटीबाहेर जाऊन असभ्य वर्तन करू शकत नाही.

कित्येक विवाहितांची काही वर्षे सुखी समाधानाची गेल्यानंतर ते दुःखी दिसतात. त्याची काही कारणे सभ्यता व संस्कृतीशी निगडीत असतात. प्रचलित सामाजिक रुढी परंपरा या दुःखी विवाहीतांमध्ये अडथळे निर्माण करतात. अशी आशा करता येते की कोणीही प्रचलित उत्तम व्यवहारांना विरोध न करता त्यांचा स्वीकार करतात. अधिकतम सभ्य समाजात दुःखी विवाहाचे कारण म्हणजे **'लैंगिक शिक्षणाचा अभाव'** वा **'त्यासंबंधीचे अज्ञान'** हे होय. शेतकरी मुलांना मानवी आणि प्राणी यामधील जीवनाचे (जैविक) घटक परिचित असतात. ती मुले अज्ञानातच सुखी असतात. दक्षपूर्वक शिकलेली मुले प्रत्यक्षपणे लैंगिक ज्ञानापासून अनभिज्ञ

असतात. रसेल म्हणतो की, अज्ञानी राहाणे किंवा एकटेपणाने राहणे हे योग्य नव्हे तर ते वैवाहिक जीवनाला अतिशयक हानिकारक आहे.

रसेल म्हणतो स्त्री-स्वातंत्र्य आणि स्त्रीमुक्ती यांच्या जाणीवेमुळे विविध प्रकारचे विवाहसंस्थेसमोर अडथळे निर्माण झाले आहेत. प्राचीनकाळी पत्नी पतीच्या मर्जीनुसार वागत असे, मात्र पती पत्नीच्या मर्जीप्रमाणे वागत नसे. आधुनिक काळात स्वत्त्वाची भावना वाढीस लागल्यामुळे एका विशिष्ट मर्यादेपर्यंत सामंजस्य करण्याची पती-पत्नींमध्ये तयारी नसते. पारंपारिक पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये मात्र स्वतःचे प्राबल्य सिद्ध करण्यासाठी पुरुष कुठल्याही प्रकारच्या बदलत्या परिस्थितीशी एकरूप होण्यास तयार नसतो.

रसेल वैवाहिक संबंधातील प्रेमाचे महत्त्व पुन्हा दाखवून देतो. प्रेमाला तेव्हाच बहर येऊ शकतो की जेव्हा ते मुक्त आणि उत्स्फूर्त असते.

जेव्हा बहु पती-पत्नी हे त्यांच्याप्रती एक दुसऱ्याला पोलीस माणसासारखे वागवतात तेव्हा त्यांची वैवाहिक जीवने दुःखी होतात.

रसेल हा समलैंगिक कायदा सुधार समाजाला सक्रिय पाठींबा देणारा होता. रसेलच्या हयातीतच दोन पुरुष समलैंगिक कामवर्तनासंबंधीचा बदल कायद्यात होऊन इ.स.पू. १९६७ मध्ये काही अंशी हा कायदा संमत झाला.

**<u>आपली प्रगती तपासा</u>**

१) रसेलच्या मते विवाह म्हणजे काय?

.....................................................................................................................

.....................................................................................................................

.....................................................................................................................

.....................................................................................................................

२) विवाहामधील 'प्रेमाची' भूमिका कोणती?

.....................................................................................................................

.....................................................................................................................

.....................................................................................................................

.....................................................................................................................

३) रसेलच्या मते दुःखी विवाहाची कारणे कोणती?

.....................................................................................................................

.....................................................................................................................

.....................................................................................................................

.....................................................................................................................

४) लैंगिक शिक्षणाचे महत्त्व काय आहे?

.....................................................................................................................

.....................................................................................................................

.....................................................................................................................

.....................................................................................................................

## ७.४ सारांश (Summary)

कुटुंब हा समाजातील एक प्रमुख आणि महत्त्वाचा घटक आहे. कुटुंब आणि विवाह ह्या समाजाच्या मुलभूत रचना आहेत. मानवी प्राण्यांमध्ये विकसित झालेली कुटुंब ही एक नैसर्गिक अशी सामाजिक संस्था आहे. लहान मुलांचे पालन, पोषण, संगोपन व काळजी ही कुटुंबाच्या चौकटीतच शक्य आहे. कुटुंबसंस्थेने पवित्र भावना कर्तव्ये दिली तर विवाहसंस्थेने स्थैर्य व अखंडत्त्व दिले. विवाहाद्वारे स्त्री-पुरुष यांच्यातील कायमस्वरुपाच्या संबंधाला व त्यांच्या अपत्यांना सामाजिक मान्यता मिळते. याशिवाय स्त्री-पुरुषामधील लैंगिक संबंधांना कायदेशीर हक्काचा दर्जा विवाहामुळे प्राप्त होतो.

रिपब्लिक आणि लॉज या संवादात प्लेटोने आदर्श राज्याच्या सिद्धांताचे आणि समाजाच्या त्रिविभाजन वर्गांचे वर्णन केले आहे. त्याचा प्रसिद्ध असलेला महिलांचा साम्यवाद आणि मालमत्तेचा साम्यवाद हा आदर्श राज्याचा एक भाग म्हणून प्रकट झालेला आहे. उत्तम सक्षम असणाऱ्या व्यक्तींनी आपली कर्तव्ये पार पाडली पाहिजे. कुटुंबांच्या बंधनातून महिला मुक्त असल्या पाहिजे व त्या राज्याच्या सेवेत सैनिक म्हणून दाखल झाल्या पाहिजेत. महिलांचा साम्यवाद हा राज्यकर्त्या व सैनिकी वर्गाला लागू पडतो. प्लेटो हा राज्याच्या कल्याणाकरिता व्यक्तीचे सुख कमी दर्जाचे मानतो. राज्याच्या कल्याणाला तो अधिक महत्त्व देतो.

विवाह आणि नितिमत्ता (मॅरेज अँड मॉरल्स) या ग्रंथात बर्ट्रांड रसेलने पारंपारिक लैंगिकतेसंबंधीच्या नीतिमत्तेच्या विचारांची चिकित्सक मीमांसा केली आहे. रसेल हा कुटुंब आणि विवाह या दोन्ही सामाजिक संस्थांना अधिक महत्त्व वा प्राधान्य देतो. तो स्त्री-पुरुषांमधील लैंगिकसंबंधाच्या (Sexueal relation) सहजप्रवृत्तीचे महत्त्व काय आहे यावर अधिक प्रकाशझोत टाकतो. याशिवाय वैवाहिक दुःखाच्या कारणांचे विश्लेषणही करतो. रसेल हा निकोप आणि सुखी लैंगिक संबंधाच्या मार्गांचा शोध घेऊन त्याची परिमाणेही सुचवितो. प्लेटो हा व्यक्तीपेक्षा राज्याच्या कल्याणाला महत्त्व अधिक देतो तर रसेल समाजापेक्षा किंवा राज्यापेक्षा अधिक महत्त्व प्रामुख्याने व्यक्ती व त्याच्या स्वातंत्र्याला देतो.

## ७.५ दीर्घोत्तरी प्रश्न

१) कुटुंब आणि विवाह याविषयी प्लेटोचे विचार सांगा.

२) प्लेटोप्रणित महिलांच्या साम्यवादाचे वर्णन करा.

३) प्लेटोप्रणित महिलांच्या साम्यवादाविरुद्ध कोणते आक्षेप `घेतले गेले आहेत? सविस्तर विवेचन करा.

४) कुटुंब आणि विवाहविषयक रसेलचा तात्त्विक दृष्टिकोन स्पष्ट करा.

५) रसेलने दुःख विवाहाची कारणे कोणती सांगितली ते स्पष्ट करून लैंगिक शिक्षणाचे महत्त्व विशद करा.

६) टीपा लिहा

(अ) कुटुंब व विवाहविषयक प्लेटोचा विचार.

(ब) प्लेटोचा महिला साम्यवादाचा दृष्टिकोन.

(क) रसेलचे विवाहविषयक विचार.

(ड) रसेलप्रणीत लैंगिक शिक्षणाचे महत्त्व.

❖❖❖

# ८

# विवाहाला दिलेली अधुनिक आव्हाने

**घटक रचना**

८.० उद्दिष्ट्ये

८.१ प्रस्तावना

८.२ नातेसंबंधाने एकत्र राहणे (लिव्ह इन रिलेशनशिप)

८.३ समलैंगिक संबंध/विवाह

८.४ सारांश

८.५ दीर्घोत्तरी प्रश्न

## ८.० उद्दिष्ट्ये

१) कुटुंब आणि विवाह या सामाजिक संस्थेच्या स्वरुपात झालेल्या बदलाविषयीचा अभ्यास करणे

२) नातेसंबंधाने एकत्र राहणे (लिव्ह इन रिलेशनशिप) म्हणजे काय हे जाणून घेता येईल.

३) समलिंगी व्यक्तींमधील जिव्हाळ्याचे किंवा सलगीचे असणारे संबंध समजून घेणे.

४) या संबंधातील नैतिक आणि कायदेशीर पवित्र कर्तव्ये व त्यामागील भावना समजावून घेणे

## ८.१ प्रस्तावना

कुटुंब आणि विवाह या सामाजिक संस्था समाजाच्या मूलभूत रचना आहेत. या दोन्ही संस्था सामाजिक समूहांशी संबंधित असणाऱ्या सदस्यांना रुढीपरंपरांना एकत्र बांधून ठेवतात. विवाहाद्वारे प्रस्थापित होणाऱ्या जिव्हाळ्याच्या संबंधावर कुटुंबसंस्था आधारलेली आहे. विवाह म्हणजे असा कायदेशीर संबंध की ज्यात पती-पत्नीने एकमेकांचा आदर ठेवून आपल्या हक्कांचे, कर्तव्यांचे, विशेष अधिकारांचे आणि नैतिक नियमांचे पालन करणे होय. विवाह ही सामाजिक संस्था स्त्री-पुरुषांमधील लैंगिक संबंधाना मान्यता देते. विवाह बंधनामुळे स्त्री-पुरुषांमध्ये दीर्घकालीन करारानुसार कुटुंबसंस्था निर्माण होते. विवाह या सामाजिक संस्थेत पती-पत्नी एकमेकांना सांभाळून शेवटपर्यंत आपुलकीने प्रेमाने एकत्र राहतात. थोडक्यात विवाह म्हणजे पती-पत्नीने कायमचे एकत्र राहण्याविषयीचे दिलेले वचन वा करार होय.

विवाह या सामाजिक संस्थेचे काही गुण दोष आहेत. आजच्या आधुनिक युगात सामाजिक व नैतिक मुल्यांमध्ये अमुलाग्र बदल झाल्यामुळे समाजाच्या विवाह या पारंपारिक चौकटीला चिथावणी व आव्हाने दिली जात आहेत. आत्मविकासाच्या आवश्यकतेमुळे स्त्री-पुरुषांमध्ये जाणीव व जागृती झालेली आहेत. लैंगिकप्रेरणेच्या इच्छापूर्तीची जाणीव झालेली आहे. कायमस्वरुपी एकत्र बांधून ठेवलेल्या विवाह कराराच्या संकल्पनेची जागा ही तात्पुरत्या संबंधाने एकत्र राहण्याने, निवडलेल्या साथीदारासह किंवा जोडीदारासमवेत एकत्र राहणे इ. गोष्टींनी घेतली आहे. विवाह न करता एकत्रितपणे सहजीवन करून राहण्याची जागा आज घेतली गेली आहे, यालाच नातसंबंधाने एकत्र राहणे (लिव्ह इन रिलेशनशिप) असे म्हटले जाते. लिव्ह इन

रिलेशनशिपमध्ये काही मानसशास्त्रीय घटक महत्त्वाची भूमिका बजावतात. स्वत्त्वाच्या जाणीवेमुळे जैविक संबंधाचे आव्हानही पुढे आले आहे. ते आव्हान म्हणजे समलिंगी संबंधाचे वा समलैंगिक विवाहाचे होय. विवाह हा केवळ दीर्घकाळ असणारा विरुद्धलिंगी व्यक्तींमधीलच संबंधच नव्हे तर समलिंगी संबंधही कमी अधिक संख्येने आढळून येत आहेत. त्यांचे समाजातील अस्तित्त्व नजरेआड करुन किंवा दुर्लक्षित करून चालणार नाही.

## ८.२ नाते/सहसंबंधाने एकत्र राहणे (लिव्ह इन रिलेशनशिप)

नाते सहसंबंधाने एकत्र राहणे म्हणजे अविवाहित प्रौढ व्यक्तीने आपल्या जोडीदारासमवेत कौटुंबिक जिव्हाळ्याच्या नाते सहसंबंधाने दीर्घकाळ एकत्र राहणे होय. विवाह न करता एकत्रपणे राहण्याचा निर्णय काही प्रौढ स्त्री-पुरुष घेतात. या नाते सहसंबंधाचा उद्देश काय याचा विचार करणे आवश्यक आहे. विवाह न करता अशाप्रकारच्या सहसंबंधाला समाजाकडून मान्यता मिळते, तर काही समाजात अशा नातेसहसंबंधाने एकत्र राहण्याला पाप (Living in sin) समजले जाते. नैतिकतेच्या दृष्टिने असे सहसंबंध समाजाला मान्य नसतात. काही आधुनिक उदारमतवाद्यांच्या मतानुसार पारंपारिक विवाहांपेक्षा अशापकारचे नातेसहसंबंध योग्य होत. नातेसहसंबंधाने एकत्र राहिल्याने अविवाहित प्रौढ व्यक्ती ह्या आपल्या दैनंदिन जीवनात सहभागी होऊन ऐहिक जीवनाची कार्ये करतात. अशा प्रकारची अविवाहित जोडपी दीर्घकाळ सहसंबंधाने एकत्र राहून ते विवाहसदृश्य राहिल्याचे दिसतात. जेव्हा दोन अविवाहित प्रौढ व्यक्ती अनेक वर्षे एकत्र राहतात तेव्हा त्यांचे संबंध परस्परावलंबी होतात. आपल्या परस्परांच्या सामान्य जीवनाविषयी एकमेकांना योगदान देऊन सहकार्य करतात.

मध्ययुगीन काळातील समाजात स्त्री-पुरुषांमधील विवाहबाह्य लैंगिकसंबंध हे निषेधार्ह, घृणास्पद व अतिभयंकर मानले जात असत. परंतु आधुनिक समाजात सहसंबंधाने एकत्र राहणे (लिव्ह इन रिलेशनशिप) ही एक संकल्पना विवाहसंस्थेला पर्याय म्हणून पुढे येऊ लागली आहे. किंबहुना असे म्हणता येईल की भावनिकदृष्ट्या व लैंगिक संमतीच्या संबंधाने फार काळ किंवा कायमस्वरूपी एकत्रित राहणाऱ्या दोन अविवाहित व्यक्तींमधील 'लिव्ह इन रिलेशनशिप' म्हणजेच नातेसहसंबंधाने एकत्र राहणे ही एक विवाहसंस्थेला पर्यायी व्यवस्था बनवू पहात आहे.

### ८.२.१सहचार्य विवाह (Companionate Marriage)

न्यायमूर्ती बेंजमिन बी. लिंडसे यांनी १९२७ मध्ये एक क्रांतीकारी प्रस्ताव सुचविला. त्यांनी तरुण मुलांमुलींकरिता सहचार्य विवाह (Companion Marriage) या संस्थेचा एक नवीन प्रस्ताव मांडला. तरुणांच्या लैंगिक (कामवर्तन) संबंधातील काही निश्चयात्मक गोष्टी उपयोजितदृष्ट्या लागू करण्याचा प्रयत्न होता. त्यांनी असे दर्शविले की अनेक तरुणांना विवाहापासून प्रतिबंधित केले जाते. या संबंधी अनेक कारणे आहेत. जसे पैशांचा अभाव, प्रेमळ पत्नीचा अभाव, मूलांचा सांभाळ इ. न्यायमूर्ती लिंडसे यांनी स्पष्ट केले की, या तरुणांना सर्वसामान्यांच्या विवाहापेक्षा वेगळ्या परंतु नवीन विवाहसंस्थेमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी एक पर्यायी उपाय सुचविला तो म्हणजे त्यांना अशा विवाहसंस्थेत प्रवेश मिळू शकेल. त्यासाठी न्यायमूर्ती लिंडसे यांनी तात्पुरत्या पण सहचार्य विवाहाचा पर्याय हा तरुणांना विशेषतः विद्यापीठीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सुचविला. त्यांनी या विवाहाच्या प्रस्तावाची खालीलप्रमाणे वैशिष्ट्ये मांडली.

१) मूल होऊ न देण्यामागील हेतू की जो जन्मदरावरील नियंत्रणास सहाय्यक होतो.

२) परस्परांच्या संमतीने मूल, गर्भ व घटस्फोट या गोष्टी नकोत म्हणून ते शक्य आहे.

३) पतीने पत्नीला घटस्फोट दिलेल्या घटनेत पोटगी देण्यास लागू नये.

४) जर अशी पर्यायी विवाहसंस्था कायद्याने अस्तित्त्वात आली तर तौलनिकदृष्ट्या कायमस्वरूपाच्या जोडीदाराबरोबर चांगले लैंगिक संबंध प्रस्थापित करण्यात तरुण-तरुणीं या सहभागी होतील.

एकूणच न्यायमूर्ती लिंडसे यांच्या मतानुसार आर्थिक कारणे जरी विवाहाला विलंब करणारी असली तरी ती फार काळ टिकणार नाही. त्यांच्या मते सहचार्य विवाह (Companionate Marriage) हा प्रकार मान्य व्हावा. जर एखाद्या जोडप्याला मूल असेल तर हा विवाहप्रकार अंतिम टप्प्यात येऊ शकणार नाही. न्यायमूर्ती लिंडसे यांच्या मते अविवाहित तरुणांपेक्षा विवाहित तरुण विद्यार्थी चांगले काम करू शकतात, याचे काही पुरावे ते देतात. अर्थात न्यायमूर्ती लिंडसे यांनी सुचविलेला हा प्रस्ताव आक्रोश करणारा व घृणास्पद असूनही तो अमेरिकेत येऊन धडकला.

अर्थात बरट्रॅंड रसेलने न्यायमूती लिंडसे यांच्या वैवाहिक प्रस्तावाला पाठिंबा दिला. रसेलच्या मते जी मुले लैंगिक संबंधात सहभागी होत नाहीत याचे कारण या गोष्टी पूर्णतः खाजगी असतात. लैंगिक सक्षमतेच्या कोणत्याही पूर्वज्ञानाशिवाय असे संबंध दीर्घकाळ ठेवणे हे हास्यास्पद व मूर्खपणाचे आहे. रसेलच्या मते लैंगिकतेकरिता लैंगिक घटकात सहभागी होणाऱ्या जोडीदारांकरिता आणि कौटुंबिक पालनपोषणाच्या हेतूने हे लोक एकत्र येतात. न्यायमूर्ती लिंडसे यांचा प्रस्ताव असे स्पष्ट करतो की नातेसहसंबंधाने एकत्रित राहण्याचा हा मूलभूत आणि गंभीर विचार करण्यास प्रवृत्त करणारा फार पूर्वीचा म्हणजेच इ.स.पू. १९२७ मध्ये सुचविलेला विचार आहे.

### ८.२.२ भारतीय दृष्टिकोन

पारंपारिक भारतीय समाजात, विवाह म्हणजे दोन व्यक्तिंच्या आत्म्याचे दीर्घकाळ जोडणारे समाजनिर्मित बंधन आहे. पारंपारिक भारतीय समाजाने विवाहित जोडप्यांना एकत्र राहण्याची मान्यता दिली आहे. याउलट अविवाहित जोडप्याने एकत्र राहाणे हे नीतिबाह्य आहे. विवाह हा एक पवित्र संस्कार आहे. भारतात पती-पत्नी या नात्याने ते एकत्र राहतात. विवाहाच्या वेळी पतीने पत्नीच्या गळ्यात मंगळसूत्र घालण्याची समाज मान्यता आहे. या विवाह बंधनामुळे व्यक्ती एकमेकांशी कायमस्वरूपी जोडल्या जातात. त्यांच्यात मतभेद असले तरी एकमेकांना सांभाळून शेवटपर्यंत एकत्र राहताना दिसतात. आज विवाह एक करार आहे असे मानण्याची प्रवृत्ती वाढत आहे.

आधुनिक युगात विवाहाच्या स्वरूपात बदल झालेला दिसून येत आहे. आपल्या देशात एक नवीन सामाजिक घटना समोर येऊ पाहत आहे. ती म्हणजे नातेसंबंधाने एकत्र राहणे, विवाहापूर्वी एकत्र किंवा सहवास्तव्य (cohabitation) करून राहणे होय. कुटुंब आणि विवाह या संकल्पना व्यापक असून त्या सद्यकालीन परिस्थितीशी संबंधित आहे. भारतीय समाजातही बदल झालेले असून ह्या बदलांचे परिणाम संसदेने ओळखून स्थानिक हिंसा कायदा - २००५ मध्ये करून स्त्रीयांच्या संरक्षणाचा कायदा अंमलात आणला.

जी जोडपी पती-पत्नी या नात्याने एकत्र राहून आपली सक्षमता दाखवितात (जी जोडपी नातेसंबंधाने एकत्र राहतात) त्यांचे संबंध हे विवाहात परिणत होतात. म्हणजे त्यांचे संबंध हा एकप्रकारे विवाहच होय. परंतु नातेसंबंधाने एकत्र राहण्याचा पर्याय हा विवाह म्हणून मान्य होत नाही. तो विवाहापूर्वीचा एकत्रित राहण्याचा कालखंड होय. भारतात विवाहबंधनामुळे व्यक्ती ह्या परस्परांशी कायमची जोडली जातात व परस्परांना शेवटपर्यंत सांभाळून एकत्र राहतात. भारतात विवाह हा एक करार आहे अशी मानण्याची वृत्ती आहे. विवाह हा जिव्हाळ्याचे किंवा आपुलकीचे संबंध जोडण्याचा प्रारंभीचा टप्पा आहे तर शेवटपर्यंत एकत्र राहाणे हा या प्रवासातील अंतिम टप्पा आहे.

आजची नवीन पिढी नातेसंबंधाने एकत्र राहण्यासाठी जोडीदाराची निवड अनेक कारणांनी करते. आर्थिक कारणांमुळे त्यांना हा दर्जा राखायचा असतो. ज्या व्यक्तीचा विवाह इतर व्यक्तीशी झालेला असेल तर त्यांना कायद्याने दुसरा विवाह करता येत नाही. एखाद्या सहवास्तव्य करणाऱ्यांना विवाह ही अनावश्यक बाब आहे असे वाटते. आज नातेसंबंधाने एकत्र राहाण्याची संख्या वाढत आहे. अर्थात विवाहाच्या दृष्टीने केला जाणारा तो एक प्रयत्न असतो.

### ८.२.३ नातेसंबंधाने एकत्र राहण्याचे धोके

नातेसंबंधाने एकत्र राहणे ही दोघांनाही स्वातंत्र्य व समता देऊ करीत असली तरी त्यांचे काही धोके आहेत व ते निराशाजनक आहेत. एकूण समाजाचा मूलभूत घटक म्हणजे कुटुंब होय. तर कुटुंब दृढ करण्यास विवाह आवश्यक बाब आहे. परंतु नातेसंबंधाने एकत्र राहणे ही समाजातील प्रशंसनीय बाब नव्हे. कारण या संबंधात करार अंतर्भूत नसतो. नातेसंबंधांनी एकत्र राहणारी जोडपी सहवास्तव्य करून एका जागेत राहात असली तरी त्यांचे संबंध हे पूर्णतः सक्षम नसतात. त्यांची तडजोड करण्याची मागणी असते. समायोजन करण्याची गरज असते. परंतु या नातेसंबंधाने एकत्र राहण्याच्या जीवनशैलीमुळे त्यांना समायोजन करणेही कठीण जाते.

### ८.२.४ राज्याने दिलेली मान्यता

नातेसंबंधाने एकत्र राहणे आकर्षक वाटले तरी सामाजिक अनुकूलता आणि कायद्याच्या मर्यादा पाहून असे संबंध निवडीकरिता नैराश्य वा औदासिन्य येते. त्यामध्ये चुकीची बाब कोणती आहे? अशा जोडीदाराला कायद्याचे संरक्षण देता येईल का? नातेसंबंधाने एकत्र राहून विवाह न करता त्या जोडप्यापासून जन्माला येणाऱ्या मुलांना कायद्याने मान्यता देता येईल काय? असे प्रश्न निर्माण होतात.

भारतात नातेसंबंधाने एकत्र राहिलेल्या स्त्रियांना २००५मधील स्थानिक किंवा कायद्यानुसार संरक्षण देण्यात आले आहे. पुढे हे नातेसंबंध तुटले तरी त्या स्त्रियांना संरक्षण दिले गेले आहे. मार्कण्डेय काटजू आणि टी.एस. ठाकूर या न्यायधिशांच्या खंडपीठाने पाठपुरावा करून काढलेल्या आदेशात म्हटले की, स्त्री जरी विवाहबद्ध झाली नसली तरी तिने खालील गोष्टींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१) अविवाहित जोडप्याने परस्परांशी पती-पत्नी म्हणून रक्तसंबंधाने एकत्र राहिले पाहिजे.

२) विवाहास योग्य ते कायदेशीर वय असले पाहिजे.

३) जर ते अविवाहित असतील तर कायदेशीररित्या विवाह करण्यास पात्र असले पाहिजे.

४) त्यांचे सहवास्तव्य दीर्घकाळ असले पाहिजे, याशिवाय पती-पत्नी म्हणून रक्ताच्या नात्याने दीर्घकालीन एकत्रित राहणे महत्त्वाचे आहे.

एकूणच वरील अटींची त्यांनी पूर्तता केलेली असली पाहिजे.

काही देशांमध्ये विशेषतः मध्य पौर्वात्य देशांमध्ये, बांगला देश, इंडोनेशिया या देशांमध्ये नातेसंबंधाने एकत्र राहिल्यास त्यास शिक्षेची तरतूद केली आहे. तर काही देशांनी त्यास मान्यता दिली आहे. अमेरिका, युरोप, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, न्युझिलंड, हंगेरी, जपान, फिलिपाईन्स या देशांमध्ये नातेसंबंधाने एकत्र राहाणाऱ्या (लिव्ह इन रिलेशनशिप्) जोडप्यांना कायद्याने मान्यता दिलेली आहे. नेपाळच्या सर्वोच्च न्यायालयानेही त्यास मान्यता दिली असून अशा विवाहांना कायद्याचे रक्षण आणि आर्थिक फायदे देण्याचे मान्य केले आहे. अनेक राज्यांनी व नगरपरिषदांनी अविवाहित जोडप्यांना मग ते विरुद्धलिंगी असोत वा समलिंगी असोत त्यांना नातेसंबंधाने एकत्र राहाण्याचा कायदा पास करून मान्यता दिली. अशाप्रकारचे संबंधही संख्येने वाढत आहे. त्यांनी आपल्या जोडीदाराची निवड केल्यानंतर त्याची नोंद करून जरी ते वेगळे राहत असले तरी त्यांच्यातील या संबंधविषयक समस्येवर उपाय दिला आहे.

### ८.२.५ समस्येवर उपाय

मालमत्ता, मालकी, सामाजिक बांधिलकीची जबाबदारी, आरोग्याचे फायदे आणि आपत्ति इ. बाबत कायदेशीर हक्कांविषयीचे प्रश्न उपस्थित होतात. जेव्हा नातेसंबंधाने एकत्र वास्तव्य करणारी जोडपी काही कारणास्तव विभक्त होतात तेव्हा काही समस्या निर्माण होतात. मालमत्तेची विभागणी झाल्यास, आर्थिक तंटे वा इतर कारणावरून वाद झाल्यास ही समस्या गंभीर बनते अशावेळेस कायदेशीर सल्लागार तज्ज्ञ सल्ला देतात की नातेसंबंधाने एकत्र राहणाऱ्या जोडप्यांनी लिखित करारात त्या जोडप्याने आपल्या मालमत्तेचे व त्याची देखभाल करण्याच्या खर्चाची विभागणी कशी करावी, बँकेतील अकाऊंटस् एकत्र (संयुक्त असावेत कि वेगवेगळी असावीत हे स्पष्ट असले पाहिजे. नातेसंबंधाने एकत्र राहणाऱ्या जोडीदारापैकी एकाचा मृत्यु झाल्यावर त्या मालमत्तेची विभागणी कशी करावी ह्याचा तपशील करारात स्पष्ट केलेला असला पाहिजे, जर लिखित करार केला नसेल तर कायदेशीर अडचणींना तोंड द्यावे लागते. याशिवाय त्यांच्या कायदेशीर वारसांचे व मुलांचे संगोपन करण्यासाठी या अविवाहित पालकांनी त्यांचे संगोपन वा पालनपोषण आणि भेटी याविषयीचे कायदेशीर हक्क कोणाकडे असावेत, याचे सर्व कायदेशीर मार्गाने लिखित स्वरुपात करून ठेवल्यास भविष्यात अशाप्रकारच्या अडचणी येणार नाहीत.

**<u>आपली प्रगती तपासा</u>**

१) सहचार्य विवाह (Companionate Marriage) म्हणजे काय?

.....................................................................................................................

.....................................................................................................................

.....................................................................................................................

.....................................................................................................................

२) नातेसंबंधाने एकत्रित राहाणे (लिव्ह इन रिलेशनशिप) म्हणजे काय?

.....................................................................................................................

.....................................................................................................................

.....................................................................................................................

.....................................................................................................................

३) नातेसंबंधाने एकत्रित राहण्याची कारणे कोणती आहेत?

.....................................................................................................................

.....................................................................................................................

.....................................................................................................................

.....................................................................................................................

४) नातेसंबंधाने एकत्रित राहण्याकरिता जोडीदाराची निवड धोक्याची का आहे?

.....................................................................................................................

.....................................................................................................................

.....................................................................................................................

.....................................................................................................................

५) नातेसंबंधाने एकत्रित राहण्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्येवर कोणते उपाय आहेत?

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

## ८.३ समलिंगी संबंध/विवाह (Same Sex Relation / Marriage)

कुटुंब व विवाह या पारंपारिक सामाजिक संस्थांना दुसरे महत्त्वाचे आव्हान आहे ते म्हणजे समलिंगी संबंधांचे किंवा समलिंगी विवाहांचे आहे. (Same Sex Marriage) मानवी समाजात स्त्री-पुरुष यांच्यातील संबंध हे विरुद्धलिंगी संबंध आहे. समलिंगी संबंध दोन पुरुषांमधील किंवा दोन स्त्रियांमधील असतो. दोन पुरुषांमधील किंवा दोन स्त्रीयांमधील लैंगिक संबंध हा समलिंगी संबंध आहे. त्यास इंग्रजीत Homosexual असे म्हणतात. Homosexual हा इंग्रजी शब्द ग्रीक भाषेतील Homos या शब्दापासून आलेला आहे. त्याचा अर्थ सम किंवा समान असा आहे. दोन स्त्रीयांमधील किंवा दोन पुरुषांमधील लैंगिक कृती वा कामवर्तन हे समलैंगिकता होय. समलिंगी वर्तन हे मानवेतर प्राण्यांमध्येही दिसून येते, हे पुराव्याने सिद्ध झाले आहे.

समलिंगी व विरुद्धलिंगी ह्या दोन्ही संकल्पना रिचर्ड वॉन क्रॉफ्ट-एबिंग यांनी त्यांच्या सायकोपॅथिया सेक्स्युलिस या ग्रंथात प्रथम उपयोगात आणल्या. समलिंगी लोकांकरिता त्यांनी दोन शब्द उपयोगात आणले. समलिंगी स्त्रीयांकरिता Lesbian तर समलिंगी पुरुषांकरिता Gay असे शब्द प्रचारात आणले. ज्या स्त्रीला पुरुषांपेक्षा स्त्रीचा सहवास अधिक प्रिय वाटतो ती Lesbian होय. या दोन स्त्रीयांमध्ये समलैंगिक कामवर्तन होत असते. याउलट ज्या पुरुषाला स्त्रीपेक्षा पुरुषाचा सहवास अधिक वा प्रिय वाटतो तो Gay होय. या दोन पुरुषांमध्ये समलैंगिक कामवर्तन होत असते. तसेच ज्या व्यक्ति स्त्री वा पुरुष अशा दोघांकडेही लैंगिकदृष्ट्या आकर्षिली जातात त्यांना उभयलिंगी कामवर्तन (Bisexuality) असे म्हणतात. वरील तिन्ही शब्दांचा एकत्रित संक्षिप्त रुप म्हणजे LGB होय. Lesbian, Gay, Bisexual व Transgender People म्हणून उपयोगात आणला गेला आहे. समलैंगिक वर्तनाचे वेगवेगळे दृष्टिकोन मांडले गेले आहेत. त्यांचा पुढीलप्रमाणे विचार करू.

### ८.३.१ शरीरशास्त्रीय दृष्टिकोन (Physiological Approach)

मानवी वर्तन हे गुंतागुंतीचे असून व्यक्तीच्या गरजा हा मानवी जैविक स्वभावातून निर्माण होतात. उदा. अन्न आणि पाणी ह्या जैविक गरजा आवश्यक आहेत. ह्या गरजांची परिपूर्ती जीवन जगण्यासाठी आवश्यक आहे. लैंगिक प्रेरणा ही शारीरिक प्रेरणा आहे. व्यक्तीचे लैंगिक वर्तन हे प्रेम, प्रशंसा व आत्मपूर्ती या गरजांमधून अभिव्यक्त होते.

जीवशास्त्रीयदृष्ट्या लैंगिक वर्तन हे शरीरातील लैंगिक ग्रंथीतून स्त्रावणाऱ्या रासायनिक अंतःस्त्रावी ग्रंथींकडून नियंत्रित होते. मानवी लैंगिकता ही भावना, अभिवृत्ती आणि भाव निर्माण करणारी गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. स्त्रीपुरुषांमधील लैंगिक संबंध हा प्रजोत्पादन करणारा व समाजसातत्यता राखणारा आहे.

लैंगिक कामवर्तनाचे तीन प्रमुख प्रकार आहेत ते पुढीलप्रमाणे :

१) **विरुद्धलिंगी कामवर्तन** : विरुद्ध लिंगी कामवर्तन म्हणजे स्त्री आणि पुरुष यांच्यातील लैंगिक संबंध होय. यास इंग्रजीत Heterosexuality म्हणतात.

२) **समलिंगी कामवर्तन** : दोन पुरुष वा दोन स्त्रीयांमधील लैंगिक संबंध होय. यास इंग्रजीत Homosexuality असे म्हणतात.

३) **उभयलिंगी कामवर्तन** : ज्या व्यक्ती स्त्री व पुरुष या दोहोंकडेही लैंगिकदृष्ट्या आकर्षिली जातात व दोहोंमध्ये लैंगिक संबंध येतात त्यास उभयलिंगी कामवर्तन म्हणतात. इंग्रजीत यास Bisexuality असे म्हणतात.

### ८.३.२ मनोविश्लेषणात्मक दृष्टिकोन

डॉ. सिग्मंड फ्रॉईड हे मनोविश्लेषण या विचारसरणीचे जनक आहेत. फ्रॉईडच्या मते मानवी व्यक्तिमत्त्वावर लैंगिक प्रेरणेचा फार मोठा प्रभाव दिसून येतो. आपला समाज, धर्म, सद्सद्विवेकबुद्धी ह्यांचे लैंगिक वर्तनावर नियमन येते. लैंगिक प्रेरणा (लैंगिक वासना) ह्या संघर्षाचे आणि नैतिक पेचप्रसंगाचे उगमस्थान आहे. फ्रॉईडने मनोलैंगिक विकासाच्या उपपत्तीत लैंगिक वासनांचे (**लिबिडो**) वर्णन केले आहे. लैंगिक वासना ही व्यक्ति विकासाची प्रेरक शक्ती होय. यालाच फ्रॉईड मानसिक ऊर्जा असे म्हणतो. या लैंगिक वासना मानसिक उर्जेवर नियंत्रण ठेवते. लैंगिक वासना **(लिबिडो)** ही मूलभूत जन्मजात प्रेरणा असून तिला **'सुखतत्त्व'** असे म्हटले जाते.

**फ्रॉईडने मनोलैंगिक विकासाच्या पुढील अवस्था सांगितल्या.**

१) **मुखावस्था** : या अवस्थेत बालकांमध्ये मुखाद्वारे स्तनपान करण्याच्या, खाण्याच्या व चोखण्याचा क्रिया करून सुखप्राप्ती मिळविण्याकडे केंद्रित होतात. जर या अवस्थेत सुखप्राप्ती झाली नाही तर ते असुरक्षिततेमुळे वा चिंतेने अतिखाणे, नखे कुरतडणे, धुम्रपान करणे व आक्रमक वृत्तीची होतात.

२) **गुदावस्था** : या अवस्थेत मलमूत्र विसर्जन या क्रियेवरील नियंत्रणामुळे बालकांमध्ये सुखानुभव मिळविला जातो. जर हा सुखानुभव मिळविता आला नाही तर मुलांमध्ये अनिवार आत्मनियंत्रण व दुराग्रह वृत्ती आढळून येते.

३) **शैश्नावस्था** : या अवस्थेत मुलांचे लक्ष लैंगिक इंद्रियांवर केंद्रित होऊन सुखानुभव प्राप्त केला जातो. लैंगिक क्रियांमध्ये परस्परांवर प्रेम व लैंगिक भेदाची जाणीव होते. ही प्रेमभावना विरुद्धलिंगी आईवडिलांसोबत अधिक प्रकर्षाने वाटू लागते. मुलाला मातेबद्दल वाटणाऱ्या या गूढ वा अबोध लैंगिक आकर्षणाला पितृभाव गंड (Oedipus Complex) असे म्हणतात तर मुलीला पित्याबद्दल वाटणाऱ्या या गूढ लैंगिक आकर्षणाला मातृगंड (Electra Complex) म्हणतात. मुलाला आपले वडील तर मुलीला आपली आई ही आपल्या प्रेमातील स्पर्धक वाटू लागतात. समलैंगिक संबंधाचे मूळ हे मनोलैंगिक विकासाच्या या लिंगवर्ती अवस्थेत दिसून येते.

४) **सुप्तावस्था** : या अवस्थेत मुलांमुलीमध्ये लैंगिक परिपक्वता येऊ लागते. मुलांच्या लैंगिक वासनांचे आणि विचारांचे दमन होत असते. या अवस्थेत मुलींमध्ये समलिंगी मैत्री, समवयस्कांचे व खेळाडू वृत्तीचे समूह तयार होतात.

५) **जननावस्था** : या अवस्थेत मुले मुली वयात आल्यावर लैंगिक जीवनाची सुरुवात होते. यात भिन्नलिंगी वा विषमलिंगी आकर्षण विकसित होते. या काळात मुलेमुली निकोप व स्वाभाविक लैंगिक सुखाचा अनुभव घेऊ शकतात.

### ८.३.३ सामाजिक व धार्मिक दृष्टिकोन

समलिंगी संबंधाविषयीची समाजाची अभिवृत्ती स्थल कालानुसार वेगवेगळी पहावयास मिळते. काही समाजात समलिंगी संबंध निसर्गाविरुद्ध गुन्हा आहे म्हणून त्याचा निषेध करतात तर काही समाजात समलैंगिक क्रिया ह्या अनैसर्गिक म्हणून वाईट, अशुभ क्रिया म्हणून त्याकडे पाहतात. काही धर्मांनी मानवी दृष्टिकोनातून पुरुषांपुरुषामधील समलिंगी संबंधाला मान्यता दिली. समलिंगी संबंधाविषयी वर वर दिसणाऱ्या या दोन विरुद्ध स्थिती आहेत. सामाजिक विधायक रचनावाद्यांच्या दृष्टिकोनातून पाहता सामाजिक समूहाची गुणवैशिष्ट्ये याच्या परिणामातून असतात. व्यक्तीचा 'स्व' हा समाजबांधील आहे. व्यक्तिच्या व्यक्तिमत्त्व विकासाची जडणघडण करण्यात समाजच प्रमुख भूमिका पार पाडतो. म्हणूनच दोन स्त्रियांमधील समलैंगिक कामवर्तन किंवा दोन पुरुषांमधील समलैंगिक काम वर्तन हे सामाजिक आंतरक्रिया-प्रक्रियामधूनच आली आहे. मूलतत्त्ववाद्यांच्या दृष्टिकोनातून काही जैविक गुणवैशिष्ट्ये ही व्यक्तीच्या स्वभावातच असतात तर काही गुणवैशिष्ट्ये संपादित असतात. दोन स्त्रीयांमधील समलैंगिक कामवर्तन वा दोन पुरुषांमधील समलैंगिक कामवर्तन ही वैयक्तिक मूलगुण दर्शवितात. त्यात सांस्कृतिकदृष्ट्या किंवा सामाजिकदृष्ट्या बदल घडवून आणता येत नाही.

### ८.३.४ चिकित्सक दृष्टिकोन (Clinical Approach)

पूर्वीच्या काळी समलिंगी कामवर्तन एक विकार म्हणून त्याकडे पाहिले जात होते. मानसिक विकृतीच्या पुस्तिकेत समलैंगिकता ही एक मानसिक विकृती म्हणून त्याचा अंतर्भाव केला गेला. नंतरच्या संशोधनाच्या अभ्यासावरून असे आढळून आले की समलैंगिकता ही एक विकृती म्हणून अनुभव व वैज्ञानिक यांच्या आधारावर फोल ठरली. परिणामी समलैंगिकतेला विकृतीच्या यादीतून वगळण्यात आले. वैज्ञानिक वा वैद्यकीयदृष्ट्या लैंगिक संबंधाची निवड करता येत नसून ती जैविक आणि पर्यावरण यांच्या प्रक्रियेतील गुंतागुंत आहे. मानवी लैंगिक वर्तनातील नैसर्गिक बदलांचे समलैंगिकता हे एक उदाहरण आहे. त्याचे मानसिकदृष्ट्या विघातक असे परिणामही होत नाहीत.

संशोधनावरून असे आढळून आले की समलिंगी व्यक्तींमधील लैंगिक आकर्षण, भावभावना व वर्तन हा मानवी लैंगिकतेत झालेला विधायक बदल आहे. LSBT व्यक्ती निकोप मानसिक आरोग्य ठेवण्यात आणि सामाजिक समायोजन करण्यात सक्षम आहेत. समलिंगी आणि उभयलिंगी व्यक्तिविरुद्ध पूर्वग्रह, भेदाभेदवृत्ती असणे ही मानसिकदृष्ट्या विघातक प्रवृत्ती असून त्यांचा विशेष परिणाम हा लहानमुलांवर होतो. समाजातील भेदाभेदवृत्तीमुळे समलैंगिक व्यक्ती कुटुंब, मित्र वा इतरांकडून नाकारले जातात. समलैंगिक व्यक्तीची उपेक्षा झाल्यास समाजात असे चित्र दिसते. LSBT या व्यक्ति निकोप आरोग्य राखून उपयुक्त जीवन जगू शकतात. ते विविध सामाजिक संस्थेत चांगले कार्य करू शकतात आणि आंतरवैयक्तिक संबंधही चांगले ठेवू शकतात.

### ८.३.५ समकालीन वा सांप्रतचा दृष्टिकोन

आज समलैंगिकतेचा उपयोग लैंगिक आकर्षण, लैंगिक कृती, लैंगिक संबंध वा कामवर्तन या संदर्भात केला जातो. समलैंगिकता एक अद्भुतरम्य लैंगिक आकर्षण किंवा दोन समलिंगी स्त्री-पुरुषांमधील लैंगिक क्रिया होय. समलैंगिक संबंध आपुलकी, अद्भुतरम्य आकर्षण यांच्याशी संबंधित आहे. परंतु हे संबंध मानसिक विकृती दर्शवित नाही. LGBT या व्यक्ती चांगले कौटुंबिक संबंध निर्माण करतात. विरुद्धलिंगी संबंधित व्यक्तींप्रमाणे आपले जीवन सुखी व

समाधानी ठेवू शकतात.

१९ व्या शतकात समलिंगीसंबंध असणाऱ्या लोकांप्रती मान्यता व कायदेशीर हक्क मिळण्यासाठी जागतिक चळवळ उभी राहिली. या कायदेशीर हक्कात विवाहाचा हक्क, नागरी संघटनेचा हक्क, रोजगाराचा हक्क, लष्करी सेवा करण्याचा हक्क, आरोग्याचा हक्क यांचा अंतर्भाव करण्यात आला. समलैंगिकता व्यक्तीची होणारी छळवणूक कायद्याने रद्द करण्यात आली.

### ८.३.६ कायदेशीर मान्यता

समलिंगी विवाहाला शासकीय पातळीवर मान्यता देणारे नेदरलँड हे पहिले राष्ट्र होय. त्यानंतर अर्जेंटिना, बेल्जियम, कॅनडा, डेन्मार्क, आइसलँड, नॉर्वे, पोर्तुगाल, दक्षिण आफ्रिका व अमेरिकेतील काही राज्ये या सर्वांनी समलैंगिक विवाहाला मान्यता दिली. अलिकडे नेपाळमधील सुप्रीम कोर्टाने लिव्ह इन रिलेशनशिपला मान्यता दिली आहे. परंतु भारताने समलैंगिक विवाहाला मान्यता दिली नाही. इ.स.पू. २००९ पर्यंत समलिंगी कामवर्तनाला गुन्हेगारी समजले जात होते. परंतु दिल्ली उच्चन्यायालायने प्रौढांमधील मान्य असलेल्या समलिंगी संबंधाला गुन्हेगारी संबोधले नाही परंतु मध्य पौर्वात्य राष्ट्रात समलिंगी संबंधाला शिक्षेची तरतूद केलेली आहे.

**<u>आपली प्रगती तपासा</u>**

१) समलिंगी संबंध/विवाह म्हणजे काय?

....................................................................................................

....................................................................................................

....................................................................................................

....................................................................................................

२) समलिंगी संबंधाचे विविध दृष्टीकोन सांगा.

....................................................................................................

....................................................................................................

....................................................................................................

....................................................................................................

३) फ्रॉईडच्या मनोलैंगिक विकासाच्या अवस्था कोणत्या?

....................................................................................................

....................................................................................................

....................................................................................................

....................................................................................................

४) समलिंगी संबंधाला / विवाहाला कोणत्या राष्ट्रांनी मान्यता दिली आहे?

....................................................................................................

....................................................................................................

....................................................................................................

....................................................................................................

## ८.४ सारांश (Summery)

आधुनिक समाज विविध प्रकारच्या आव्हानांना सामोरा जात आहे. समाजातील सभासदांना त्यांच्या स्वातंत्र्याची वैयक्तिक विकासाची आणि जैविक संबंध निश्चित करण्याची जाणीव झालेली आहे. यातूनच नातेसंबंधाने एकत्र राहाणे (लिव्ह इन रिलेशनशिप) आणि समलिंगी संबंध यांचा उगम झाला.

यावरून असे दिसते की समाजाची पारंपारिक रचना नष्ट होत चालली आहे. कुटुंब आणि विवाह या सामाजिक संस्थांना फारसे मूल्यही राहिले नाही. जेव्हा मुलाबाळांच्या संगोपनाचा वा पालनपोषणाचा प्रश्न निर्माण होतो तेव्हा नातेसंबंधाने सहवास्तव्य करणाऱ्या जोडप्यांनी विवाहबद्ध होणे हे केव्हाही चांगले होय. आज LGBT यांना आधाराची गरज, सामाजिक मान्यतेची गरज आणि कायद्याची मान्यता लागते. यावरून समाजात विवाहबद्ध होण्याची प्रवृत्ती आहे. विवाहामुळे कुटुंबसंस्थेला स्थिरता लाभते.

विवाह हा एक अंतिम करार आहे. विवाहात दोन विरुद्धलिंगी व्यक्ती प्रतिज्ञा घेऊन एकत्र येतात. ते एकमेकांचे अखंड साक्षीदार असतात. दैवी आशिर्वाद व आशावाद अंगी बाळगतात. अशाप्रकारे कुटुंब आणि विवाह या संकल्पनांचे विस्तृत विवेचनाबरोबरच त्यांचा आधुनिक वास्तवतेशी समन्वय वा मिल्लाफ करता येईल.

## ८.५ दीर्घोत्तरी प्रश्न

१) आधुनिक समाजाला नातेसंबंधाने एकत्र राहणे (लिव्ह इन रिलेशनशिप) हे कशाप्रकारे आव्हान आहे ते स्पष्ट करा.

२) आजच्या समाजाला समलिंगी संबंधाचे एक आव्हान कसे आहे याचे विवेचन करा.

३) टिपा लिहा :

   (अ) नातेसंबंधाने एकत्र राहणे

   (ब) समलैंगिक संबंध

   (क) फ्रॉईडच्या मनोलैंगिक विकासाच्या अवस्था

   (ड) सहचार्य विवाह

   (इ) नातेसंबंधाने एकत्र राहण्याचे धोके

   (फ) समलिंगी संबंधाविषयीचा चिकित्सक व सांप्रतचा दृष्टिकोन

   (ग) नातेसंबंधाने एकत्र राहणे या संबंधविषयक समस्येवर उपाय.

❖❖❖

# १

# राजकीय तत्त्वज्ञान - प्रस्तावना

# Political Philosophy - Introduction

**घटक रचना**

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ राजकीय तत्त्वज्ञान म्हणजे काय?

१.३ आजच्या काळात राजकीय तत्त्वज्ञानाचे महत्त्व

१.४ सामाजिक कराराची पारंपारिक दृष्टीकोनांतून महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये

१.५ सारांश

१.६ विद्यापीठीय दिर्घोत्तरी प्रश्न

## १.० उद्दिष्ट्ये

(१) राजकीय तत्त्वज्ञान म्हणजे काय? हे समजावून घेता येईल

(२) आजच्या काळात राजकीय तत्त्वज्ञानाचे महत्त्व जाणून घेता येईल

(३) सामाजिक कराराची वैशिष्ट जाणून घेता येतील

## १.१ प्रस्तावना:-

परिपूर्ण सर्व दृष्टिकोनांतून विकसित मानवी जीवनासाठी प्रत्येक मानवास तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र व राज्यशास्त्र या पाचही विषयांचे सखोल ज्ञान अवगत असणे, खुपच गरजेचे आहे. सर्वांगीण विकसित मानवी जीवनांसाठी या पाचही विषयाचा अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. यापैकी आपण राज्यशास्त्राची तात्त्विक दृष्टीकोनातून विचार करणार आहोत. मूलतः मानव हा सामाजिक प्राणी आहे तो एकटा राहु शकत नाही. त्याला दुसऱ्याची गरज भासतेच, म्हणून कुटुंब, समाज यांची निर्मिती होते. मानव जसा एकटा राहू शकत नाही तसेच निरनिराळ्या प्रकारच्या विकारामुळे तो एकत्र राहत असतांना संघर्षही होतात समाजामध्ये निरनिराळया प्रकारचे कलह निर्मिण होतात. या समस्येतून मुक्त होण्यासाठी राज्यशासनाची आवश्यकता भासते म्हणून मानवांसाठी राजकीय तत्त्वज्ञानाची आवश्यकता आहे. राज्यव्यवस्था मानवी प्रवृतीचे नियंत्रण करण्याकरीता जरुर आहे. मनुष्य जमावने राहतो आणि मानवी प्रवृतीचे नियत्रंण करण्यासाठी काही विशिष्ट व्यक्तीची निवड करण्यात येते, याचेच नाव शासनव्यवस्था होय.

## ९.२ राजकीय तत्त्वज्ञान म्हणजे काय?

मानव समाजात इतर संस्था उदयास आलेल्या आहेत त्या संस्था प्रमाणेच राज्य ही संस्था उदयास आली आहे. राज्य ही प्राचीन संस्था आहे. ती मानवाच्या गरजेतून निर्माण झाली आहे. राज्य संस्थेच्या उदयाने हेतू संबंधी तिचे आस्तित्त्व चालू राहण्यासाठी आणि भविष्यकाळात तिचे स्वरूप कसे असावे या संबंधी विविध मुद्दे, विचार निरनिराळया विचारवंतानी व्यक्त केले आहेत. राज्य संस्थेच्या अस्तित्त्वावर, उद्दीष्टांवर आणि कार्य पध्दतीवर तात्त्विक वैचारीक आणि व्यावहारिक दृष्टिकोनांतून वादविवादही झालेले आहेत. विचारवंताच्या या वैचारीक संघर्षातून राजकीय तत्त्वज्ञानचा उदय झालेला आहे.

प्राचीन काळापासून आजपर्यंत विविध विचारवंतानी आपले राजकीय सिध्दांतावर अधिष्ठीत राजकीय तत्त्वज्ञान मांडले आहे. राज्य कसे असावे? या संदर्भात दोन सिध्दांत सांगितले आहेत. या सिध्दांतानुसार राज्य कसे असावे या विषयी नैतिक दृष्टिकोनांतून विवेचन केले आहे. उदा.शोषणरहीत, वर्गविहिन, सत्याग्रही समाज, अहिंसावादी समाज निर्माण व्हावा ही नैतिक तत्त्वे, डोळयासमोर ठेवून राज्याचे ध्येय व कार्यपध्दती कशी असावी हे सांगणारे महात्मा गांधी यांचे विचार या प्रकारात मोडतात दूसरा वास्तववादी सिध्दांत होय. हा दुसरा सिध्दांत वास्तववादी अशा नैतिक तत्त्वावर आधारलेले असतात. यात सर्वसामान्यपणे बहुसंख्य लोकांना काय हवे आहे, हे अनुभव आधारे गृहीत धरून त्यावर विचारवंतानी आपले विचार मांडलेले दिसतात. उदा. कार्यक्षम शासनयंत्रणा प्रत्येकास हवी हे गृहित धरूनच मॅकीव्हेलीनी आपले सिध्दांत मांडले. शांतता व सुरक्षितता हे ध्येय गृहित धरुन त्यांनी आपले विचार मांडले. राजकीय तत्त्वज्ञानात या दोन्हीचा समावेश होतो. नैतिक सिद्धांत हे ध्येयवादी लोकांनी काय करावे हे सांगणारे आहेत. तर वास्तविक काय करावे हे सिद्धांत विशिष्ट राजकीय उद्दिष्टासाठी काय करावे हे दर्शवितात.

राजकीय तत्त्वज्ञान म्हणजे नैतिक व राजकीय तत्त्वज्ञानांतील विवेकी विचारांचा आणि त्यात अंतर्भूत असणाऱ्या प्रश्नांचा अभ्यास होय. राजकीय तत्त्वज्ञान म्हणजे राज्यासंबंधी संघटित राजकीय मते, माहिती, अंदाज, नितीवचने, सिद्धांत सर्वसामान्य विधाने यांची विवेकवादी विचारातून सुसंगत रीतीने मांडलेले ज्ञान होय.

राजकीय तत्त्वज्ञान ही एक तत्त्वज्ञानाची शाखा आहे. राजकीय तत्त्वज्ञानांत राज्यसंस्था, राजकीय यंत्रणा, शासनसंस्था, राजकारण, राजनिती, राजकीय सिद्धांत इत्यादी विषयांची चर्चा केली जाते. याशिवाय संपत्ती, न्यायव्यवस्था, राज्यसंस्था, धर्मसंस्था, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संबंध, सार्वजनिक प्रशासन व्यक्तीचे मूलभूत हक्क व कर्तव्ये आणि इतर राज्यशास्त्रात वापरल्या जाणाऱ्या संकल्पना मागील तात्त्विक बैठक व राजकीय सिद्धांताची तात्त्विक चिकित्सा ही राजकीय तत्त्वज्ञानात केली जाते.

राजकीय तत्त्वज्ञान ही एक तत्त्वज्ञानाची शाखा आहे. राजकीय तत्त्वज्ञानाच्या इतिहासाची चर्चा ही प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन काळात झालेली आहे. प्राचीन काळात राजकीय तत्त्वज्ञानाचा उगम ग्रीक देशांत झाला. ग्रीक देशांतील सोफिस्टांनी "मनुष्य हा सर्व वस्तूंचा मापदंड आहे." (Man is the measure of all things) असा विचार प्रोटॅगोरस याने केलेला आहे. प्रोटॅगोरस या विचारवंताने मनुष्यकेंद्री विचार मांडले. त्यानंतर प्लेटो या तत्त्ववेत्याने राजकीय तत्त्वज्ञानांवर **'रिपब्लिक'** नावाचा पहिला ग्रंथ लिहिला. ॲरिस्टॉटलने Politics या ग्रंथात राजनिती आणि राजकीय तत्त्वज्ञान मांडले. भारतामध्ये प्राचीनकाळी मनुस्मृती, महाभारतातील शांतीपर्व, कौटिल्याचे अर्थशास्त्र हे राजकीय तत्त्वज्ञानाच्या बाबतीतील महत्त्वाचे ग्रंथ आहेत. मध्ययुगीन काळात अनेक राजकीय सिध्दांत राजकीय तत्त्वज्ञांनी विविध

ग्रंथातून मांडले. थॉमस, हॉब्ज, लेविथॅन, जॉन लॉक, (Two treatise of Goverment) व रुसो (Social contract) हे राजकीय तत्त्वज्ञान विशद करणारे आहेत. आधुनिक काळात मिल्ल, कार्ल मार्क्स, टि.एच्.ग्रीन, जॉन रॉल्स्, इत्यादी तत्त्वज्ञांनी राजकीय सिद्धांत मांडले. रॉल्सचा **'न्यायाचा सिद्धांत'** (Theory of Justice) हा आधुनिक काळातील राजकीय तत्त्वज्ञानांचा एक आधारभूत ग्रंथ ही मानला जातो.

राजकीय तत्त्वज्ञान म्हणजे राज्यसत्तेशी संबंधीत अशी विविध राजकीय मते, राजकीय सिद्धांत व राजकीय माहिती यांचे विवेकातून सुसंगत रीतीने केले जाणारे ज्ञान होय. विविध प्रकारच्या राजकीय विचारवंतानी मांडलेले विचार व सिद्धांत, राजकीय कल्पना यांची चिकित्सक दृष्टिकोनांतून माहिती गोळा करणे, हा राजकीय तत्त्वज्ञानाचा हेतू होय. ॲरिस्टॉटलने 'पॉलिटिक्स' या ग्रंथात राजेशाही, उमरावशाही, लोकशाही, राज्यघटना इत्यादी विषयांचा सखोल विचार केलेला आहे. ॲरिस्टॉटलच्या मते, व्यक्तिच्या राज्यापेक्षा कायद्याचे राज्य अधिक चांगले होय. मॅकीव्हेलीच्या मते, राज्यातील लोकांना शांतता व सुरक्षितता हवी असते. म्हणून राज्याचे श्रेष्ठत्त्व मान्य करावे लागते. मॅकीव्हेली हा लोकशाहीचा पुरस्कार्ता होता. बेन्थॅम व मिल्ल यांनी उपयुक्ततावादी दृष्टिकोनांतून राज्यसंस्थेचे समर्थन केले. मिल्लने स्वातंत्र्य (On Liberty) असा निबंध लिहून राज्यसंस्था ही व्यक्तीसाठी आहे. व्यक्ती राज्यासाठी नाही, असे समर्थन राज्य संस्थेविषयी केले.

राजकीय तत्त्वज्ञानात विविध राजकीय विचार प्रणाल्यांचा चिकित्सक अभ्यास केला जातो. त्या राजकीय विचारप्रणाल्या म्हणजे लोकशाही, समाजवाद, मार्क्सवाद (साम्यवाद) भांडवलशाही, दंडुकेशाही (फॅसिझम), नाझीवाद, सर्वकषसत्तावाद, लोकशाही समाजवाद, सर्वोदय इत्यादी राजकीय विचारप्रणालीचा चिकित्सक व समीक्षणात्मक दृष्टिकोनांतून अभ्यास केला जातो. या राजकीय विचार प्रणालींची ध्येय ही आदर्शवत दृष्टिने त्या त्या विचारवंतानी मांडलेली आहेत. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मानवता, शांततामय सहजीवन, आर्थिक समता या तत्त्वांचा समावेश राजकीय तत्त्वज्ञानांत केला गेला. निरनिराळ्या राज्यांचे प्रादेशिक, भाषिक व सांस्कृतिक वैशिष्टे कायम राखून या **"जगाचे एक संघराज्य"** निर्माण करणे. संघराज्य सरकारचे नैतिक दृष्टिकोनांतून समर्थन करणारे राजकीय तत्त्वज्ञान निर्माण होणे आवश्यक आहे. असा विचार अलिकडच्या काळात राजकीय तत्त्वज्ञानात केला जात आहे.

**<u>आपली प्रगती तपासा</u>**

१) राजकीय तत्त्वज्ञान म्हणजे काय ?

.......................................................................

.......................................................................

.......................................................................

.......................................................................

## ९.३ आजच्या काळात राजकीय तत्त्वज्ञानाचे महत्त्व :-

मानवाचा स्वभावच त्याच्यासारख्या इतर व्यक्तींच्या सहवासात राहण्याचा व त्यात आनंद अनुभवण्याचा आहे. मानव हा स्वभावतःच समाजप्रिय व समाजभिमुख असतो. त्याला एकलेपण शारिरिक व मानसिक दृष्ट्या अशक्य व असह्य वाटते. मानव हा प्रामुख्याने कुटूंबातच राहत असतो. व्यक्ती जात्याच परावलंबी असते. माता पित्याच्या संगोपनाशिवाय व्यक्ती जगू व वाढू शकत नाही. शरीराची जोपासना, संरक्षण, पोषण, संवर्धन व मनाची घडण यासाठी व्यक्ती मातापिता, भांवडे, कुटूंबातील इतर व्यक्ती, समवयस्क, सहाध्यायी व समाजातील इतर विविध

प्रकारच्या व्यक्ती यावर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीने अवलंबून असते. कुटूंब व समाज यांकडून व्यक्तीला संरक्षण मिळून तिची आवश्यकता व योग्य वाढ होण्यास मदत व प्रोत्साहन मिळत असते. अनेक कुटूंबे जेव्हा एकत्र राहू लागतात. व परस्परांच्या शारिरिक, भौतिक व मानसिक गरजा भागवू लागतात. तेव्हा त्यापासून गाव किंवा खेडे तयार होते. अनेक खेडी एकत्र झाल्याने जनपद तयार होते व या रीतीने मनुष्यवस्तीचा परिघ जसा वाढत जातो. व अधिकाधिक लोकसंख्या मोठ्या भूप्रदेशात विस्तारुन जेव्हा परस्परावलांबनाचे व परस्पर सहकार्यांचे व्यवस्थित जीवन जगू लागते. तेव्हा जमात, समाज व शेवटी शासनसंस्था तयार होते. महत्त्वाची गोष्ट म्हणजे केवळ समाजातच मानवी व्यक्ती चांगले, सुखी व संतुष्ट जीवन जगु शकते सुव्यवस्थित, सुनियंत्रित व शिस्तबद्ध सामाजिक जीवनाची घडण करणे, समाजात शांतता सुव्यवस्था टिकवणे व व्यक्तीस सुरक्षित जीवन जगण्यास लागणारी आवश्यक परिस्थिती उपलब्ध करुन देणे हे शासनसंस्थेचे किंवा राज्याचे मुख्य कार्य असते असे नव्हे. शासनसंस्था ही मानवाच्या संपूर्ण जमातीस व सामाजिक जीवनास व्यापून राहते. मानवास केवळ सुरक्षित व समृद्ध भौतिक जीवन पुरविणे एवढेच शासनसंस्थेचे कार्य नसते. त्यापुढे जाऊन मानवी व्यक्तीस किंवा नागरिकांस पूर्णपणे सुखी व संतूष्ट जीवन जगण्यास योग्य व पोषक अशा सामाजिक जीवनाचा लाभ करुन देणे हे शासनसंस्थेचे मूळ व प्रमुख उद्दिष्ट असते. शासनसंस्थेशिवाय व्यक्तीस सुरक्षित व सुखी जीवन जगणे अशक्य असते; म्हणून शासनसंस्था ही इतकी मूलभूत असते की तिला स्वतःचे नैसर्गिक किंवा स्वाभाविक असे अस्तित्त्व असते. व्यक्ती अपरिहार्यपणे तिचा घटक असल्याने मनुष्य निसर्गतःच 'राजकीय प्राणीही असतो' असे ॲरिस्टॉटलचे सुप्रसिद्ध वचन लक्षात घेण्यासारखे आहे. तो म्हणतो – "जो समाजात राहण्यास असमर्थ आहे किंवा जो स्वयंपूर्ण असल्याने त्याला समाजाची गरज नसते तो मनुष्य पशू तरी असला पाहिजे नाही तर ईश्वर तरी असला पाहिजे" अशा प्रकारे सुदृढ किंवा निकोप, निरोगी समाजासाठी शासनसंस्था किंवा राजकीय संस्था यांची जबाबदारी खूप खूप महत्त्वाची आहे.

परंतू राजकीय संस्था किंवा शासनसंस्थेने स्वतःच्या स्वार्थासाठी वरील प्रकारची जबाबदारी पार पाडली नाही. तर अनेक प्रकारच्या समस्या समाजात निर्माण होतात, आणि आज सद्यपरिस्थितीमध्ये अनेक प्रकारच्या सर्व क्षेत्रांमध्ये समस्या आहेत. सामान्य जनतेचे भयानक आर्थिक दारिद्र्य, जातीभेद, वंशभेद, प्रांतभेद, बलात्कार, खूण, मारामारी, अस्पृश्यता, हुंडाबळी इत्यादी अनेक प्रकारच्या समस्येने आज आपला समाज संकटग्रस्त आहे. म्हणून सध्याच्या युगाचे वर्णन **'संकटग्रस्त युग'** (Age of crises) असे केले जात आहे. याचे मूळ कारण शोधण्याचा प्रयत्न केल्यास आजची शासनसंस्था किंवा राजकीय संस्था स्वतःच्या स्वार्थासाठी भ्रष्ट झालेली आहे. ती राजकीय संस्था किंवा शासनसंस्थेची मूळ जबाबदारी पार न पाडता उलट जनतेस लूटत आहे. सद्य परिस्थितील राजकीय संस्था किंवा शासनसंस्थेतील व्यक्ती तत्त्वज्ञानरहित आहेत. अशा परिस्थितीमध्ये प्लेटोची **'तत्त्वज्ञ राजा'** (राजर्षी) (Philosopher King) ह्या संकल्पनेचे खूप महत्त्व असल्याचे जाणवते. राज्यकर्ता ज्ञानी व कर्तव्यनिष्ठ हवा कोणत्याही प्रकारचे उदा. लोकशाही, राजेशाही इत्यादी असले तरी राजकीय संस्था किंवा शासनसंस्थेतील जबाबदार व्यक्ती तत्त्वज्ञ, म्हणजेच सुशिक्षित, संस्कारी, चारित्र्यवान असणे खूप गरजेचे आहे. या गुणांनी युक्त असणारी व्यक्ती निरक्षर असली तरीही चालेल. केवळ साक्षर असेल आणि वरील गुणांचा अभाव असेल तर ती व्यक्ती साक्षर असूनही अशिक्षित गणली जाते.

सध्याच्या परस्थितीचा विचार केल्यास राजकीय संस्थेची किंवा शासन संस्थेची मूळ भूमिका, खरी जबाबदारी या संस्थेमध्ये असणाऱ्या जबाबदारी व्यक्तीकडून पार पाडले जात नाही. याचे मूळ कारण त्यांच्या जीवनांमध्ये कृतिशील तत्त्वज्ञानाचा (Active philosophy) अभाव होय. राजकीय तत्त्वज्ञानाचा उपयोग ते प्रत्यक्ष व्यवहारामध्ये करीत नाहीत. म्हणून सध्याच्या संकटग्रस्त युगामध्ये (In the age of crises) राजकीय तत्त्वज्ञानाची आत्यांतिक आवश्यकता आहे. कारण प्लेटोच्या **'तत्त्वज्ञान राजा'** (Philosopher King) या संकल्पनेनुसार राजकीय संस्था किंवा शासन संस्थेमधील जबाबदार व्यक्ती असतील तरच आजच्या सर्व समस्या सुटू शकतात, आणि तेव्हाच वर उल्लेखलेला राजकीय संस्था किंवा शासनसंस्थेचा मूळ उद्देश 'जनतेचे खऱ्या अर्थाने कल्याण' हा जो हेतू (उद्देश) आहे, तो पूर्ण होऊ शकतो. तेव्हाच 'समाज कल्याणकारी राज्य (The welfare state) ला' अर्थ आहे. यासाठीच सद्यपरिस्थितीत राजकीय तत्त्वज्ञानाची आत्यांतिक आवश्यकता आहे.

**<u>आपली प्रगती तपासा</u>**

१) राजकीय संस्था किंवा शासन संस्था याची समाजाला का गरज आहे? ते स्पष्ट करा व आजच्या काळातील राजकीय तत्त्वज्ञानाचे महत्त्व विशद करा.

.......................................................................
.......................................................................
.......................................................................
.......................................................................

## ९.४ सामाजिक कराराची पारंपारिक दृष्टिकोनांतून महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये :-

घटना नियंत्रित समाज अस्तित्त्वात येण्यासाठी समाजातील व्यक्तींनी अपापसात ऐक्य घडवून आणण्यासाठी केलेल्या करारास सामाजिक करार (Social contract) असे म्हटले जाते. **'समाजिक करार'** च्या संदर्भात टॉमस्, हॉब्ज, लॉक आणि रुसो यांचे विचार महत्त्वाचे आहेत.

**(१) टॉमस हॉब्ज :-**

टॉमस हॉब्जच्या मते, आपले हक्क अबाधित राहण्यासाठी दोन अटी आवश्यक आहेत. पहिली अट म्हणजे प्रत्येकाने दुसऱ्याचे हक्क मान्य करण्याचा करार केला पाहिजे. तर दुसरी अट म्हणजे हा करार सुरक्षित राहण्यासाठी सामर्थ्यशाली एकात्मसत्ता निर्माण केली पाहिजे. त्यासाठी कायदे करुन त्याचे पालन करावे. हॉब्जच्या मतानुसार नीतीमत्तेची निर्मिती करणारा सामाजिक करार (Social contract) केला पाहिजे. तो करार मोडता कामा नये. समाजात राहावयाचे म्हणजे सामाजिक जीवनात माणसाने पाळावयाचे योग्य - अयोग्य, चांगले - वाईट, इष्ट - अनिष्ट या विषयीचे सर्व आर्देश सत्ताधीश शासनानेच ठरवावयाचे असतात. शासनाच्या सार्वभौमत्त्वापुढे व्यक्तीला स्वतःचे स्वातंत्र्य वेगळे असे अधिकार, हक्क व नीती ही संभवत नाही. अन्याय, कृतघ्नता, असमानता यांना कायदेशीर बनविता येत नाही. युद्ध जीवनाचे रक्षण करील व शांतता जीवनाचा नाश करील असे कधीही घडू शकणार नाही. समाज व मानवता यांना टिकवून धरण्यात सामाजिक करार उपयोगी पडतो.

हॉब्ज म्हणतो की, माणसाच्या प्रत्येक कृतीचा हेतू हा स्वहित (आत्महित), आत्मरक्षण व आत्मपोषण असल्यामूळे दुसऱ्या कशाचीही इच्छा माणसाला होत नाही हे योग्यच आहे. येथे

बुद्धिपेक्षा निसर्गच माणसाला ध्येयासंबंधी योग्य मार्गदर्शन करु शकतो. बुद्धी ही माणसाला आपले ध्येय साध्य करण्यासाठी आवश्यक त्या साधनांचा विचार करावयाला लावते. या ध्येय साधण्याच्या बुद्धीतून तो नैतिक नियमांचे पालन करतो. जर या नैतिक नियमांचे पालन कोणी करत नसेल तर राज्याने किंवा सर्वाभौम सत्ता असलेल्या शासनाने ते नियम पाळण्यास व्यक्तीला भाग पाडले पाहिजे.

थोडक्यात मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. ही ॲरिस्टॉटलची कल्पना हॉब्जने चुकीची ठरवून मनुष्य हा स्वभावतः समाजोन्मुख नसून तो एकाकी, स्वार्थी, दुष्ट असून, कोणाचा कुणावर भरवसा किंवा विश्वास नसल्यामुळे प्रत्येक व्यक्ती आत्मरक्षणासाठी, भीतीपोटी व शांततेचा मार्ग काढण्यासाठी तो बुद्धीने नियमबद्ध समाजाची मागणी करतो. समाजात राहण्यासाठी करार करतो. त्याचा हा सामाजिक करार भीती व स्वार्थावर आधारलेला आहे. अर्थात हा करार सुरक्षित राहण्यासाठी सामर्थ्यशाली एकात्मसत्ता आवश्यक आहे. त्यासाठी सार्वभौम शासनाची आवश्यकता हॉब्ज मान्य करतो. त्यांनी लोक कल्याण करावे. हॉब्जने राज्याला व तिच्या सार्वभौमसत्तेला महत्त्व देऊन त्याची त्यामागची भूमिका ही व्यक्तीच्या हिताची होती. हॉब्जच्या विचारात माणसाचे स्वहित हे त्याच्या सामाजिक हितात गुंतले आहे हे त्याच्या विचारसरणीवरुन दिसून येते.

(२) **जॉन लॉक :-**

लॉकच्या मते, जेव्हा अनेक व्यक्ती समाजात एकत्र येतात आणि निसर्गाने त्यांना प्राप्त झालेली कार्यकारी शक्ती जेव्हा प्रत्येक व्यक्ती स्वच्छेने किंवा अनिच्छेने सोडून देऊन ती संबंध समाजाच्या स्वाधीन करते आणि जेव्हा संघटित संस्था अस्तित्त्वात येते तेव्हा नागरी समाज किंवा शासनसंस्था अस्तित्त्वात येते. अशा रीतीने समाज व शासन संस्था ही **‘सामाजिक करार’** म्हणून अस्तित्त्वात आली असा लॉकचा दृष्टिकोन आहे.

लॉकच्या मते सामाजिक कराराची भूमिका सर्व सत्ताधिश व निरकुंश सत्ता उपभोगणाऱ्या राजाच्या कल्पनेशी विसंगत आहे. कारण त्याच्या मते, कायदे करण्याचा ‘वैधानिक अधिकार’(Legislative power) व केलेल्या कायद्याची अंमलबजावणी करणाचा अधिकार (Executive Power) या दोन्ही गोष्टी एकाच राजाच्या हाती केंद्रीत झाल्या तर निःपक्षपातीपणे विचार करुन कलहांचा निकाल लावणाऱ्या न्यायाधिशास त्या कायद्यांच्या अनुरोधाने निर्माण झालेले कलह मिटवण्यास काही वावच राहणार नाही. सर्वकष सत्ताधीशाच्या कारकिर्दीत सर्व सत्ता एका व्यक्तीच्या हाती एकवटल्याने ती कर्तुमकर्तुम होण्यास पात्र बनेल व सर्व व्यक्ती तिच्या आधीन होऊन त्यांना त्या एका सत्ताधीशाची (राजाची) गुलामी पत्कारावी लागेल व लोक तिच्या हातातील केवळ बाहुली बनतील. पण लॉकच्या मते व्यक्तींची आपसात ऐक्य निर्माण करुन सर्वांचे जीवीत स्वातंत्र्य व मालमत्ता सुरक्षित राहण्यासाठी जर एक संघटित समाज व शासनसंस्था निर्माण केलेली असेल तर त्यांचे हे हक्क संघटित समाजाने व शासनसंस्थेने अबाधित ठेवावयास पाहिजेत. बहुसंख्य लोकांच्या इच्छेनुसार त्या समाजाचे व्यवहार व नियंत्रण चालावयास पाहिजे. त्यासाठी प्रत्येक वैयक्तिक नागरिकानेही बहुसंख्येच्या इच्छेस व निर्णयास प्रमाण मानून त्यांचा अधिकार कर्तव्य भावनेने मान्य करावयास पाहिजे आणि अशी स्वतःच्या वागण्यावर नैतिक बंधने जर सर्व व्यक्तीनी स्वीकारली नाहीत तर आणि समाजपूर्व नैसर्गिक अवस्थेप्रमाणेच जर प्रत्येक व्यक्ती इतरांच्या हिताची, सुरक्षिततेची पर्वा न करता स्वैराचाराने वागत राहिली तर त्या केलेल्या तथाकथित सामाजिक कराराला काहीच अर्थ

राहणार नाही. म्हणून आपले जीवीत, स्वातंत्र्य व मालमत्ता यांची सुरक्षितता सांभाळण्याचा प्रत्येक व्यक्तीस नैसर्गिक हक्क असतो असे लॉक म्हणतो. जीवित, स्वातंत्र्य व मालमत्ता यांचे मानवाला असणारे हक्क त्याला मूळातच प्राप्त झालेले आहेत. ते त्याला कोणी दिलेले नाहीत व म्हणून ते कोणालाही हिरावून घेता येणार नाहीत; उलट त्यांना सुरक्षित व अबाधित ठेवण्याची समाजावर व शासनसंस्थेवर जबाबदारी असते. अशी लॉकची भूमिका आहे. याउलट हॉब्जच्या मते, मानवाने सर्व सत्ता राजाच्या स्वाधीन केल्यानंतर व्यक्तींना कोणतेच स्वातंत्र्य व हक्क उरत नाहीत व ते संपूर्णपणे राजाच्या मर्जीवर व कृपेवर अवलंबून राहतात. अशा प्रकारे लॉकचे विचार हॉब्जपेक्षा वेगळे असल्याचे दिसून येते.

**(३) रुसो :-**

रुसो आपल्या 'Social contract' या ग्रंथाच्या प्रारंभी म्हणतो, "मानव जन्मतःच मुक्त व स्वातंत्र असतो आणि तो सर्वत्र बंधनात असतो. प्रत्येक जण स्वतःला इतरांचा स्वामी समजतो आणि तरीही इतरांपेक्षा अधिक दास्यात राहातो." हा बदल कसा घडून आला हे रुसोला समजत नाही, पण हा योग्य कसा होऊ शकतो या विषयी मात्र तो आपले मत सांगतो.

ज्या अवस्थेत माणसे अनिर्बंध स्वातंत्र्य उपभोगत होती अशी एक समाजपूर्व अवस्था रुसोने गृहित धरली होती. पण ज्या अवस्थेत मानवाला अनिर्बंध स्वातंत्र्य उपभोगता येत नाही. ती सामाजिक व्यवस्था त्याने सदोष समजावयाला व नाकारायला पाहिजे. म्हणजे सामूहिक व सामाजिक जीवन त्याने कोणत्याही परिस्थितीत त्याज्य समजता कामा नये. परंतू रुसो सामाजिक जीवन संपूर्णपणे त्याज्य समजत नाही. उलट तो 'सामाजिक जीवनाला इतर सर्व हक्कांचा पवित्र हक्क' समजतो. असे मानण्यास तो कोणते समर्थन व युक्तीवाद देतो. ते लक्षात घ्यावयास हवे.

सामूहिक जीवनात प्रत्येक व्यक्तीला अनिर्बंध स्वातंत्र्य उपभोगणे अशक्य झाल्याने त्याला आपल्या जीवनाचे परिरक्षण करण्यासाठी इतर व्यक्तींशी तडजोड करणे मान्य करावे लागते. त्याला वाटेल तेवढे स्वातंत्र्य उपभोगता येणे व वाटेल त्या वस्तूचा मोह धरणे व्यवहारात अशक्य बनते. त्यामुळे स्वातंत्र्य पूर्णपणे गमावण्यापेक्षा आपल्या स्वातंत्र्यावर स्वेच्छेने काही प्रमाणात मर्यादा घालणे अत्यावश्यक ठरते व त्याचे जे मूळ नैसर्गिक स्वातंत्र्य होते. ते काही अंशी कमी करुन नागरी स्वातंत्र्याचा स्वीकार करणे भाग पडते.

मानवाला समाजपूर्व अवस्थेत उपभोगायला मिळणारे स्वातंत्र्य जास्तीत जास्त प्रमाणात टिकवून ठेवण्यास त्याला मदत करणारी समाज व्यवस्था रुसोला पाहिजे होती. ज्या समाजात घटक व्यक्तींचे स्वातंत्र्य व मालमत्ता यांचे संरक्षण व समर्थन केले जाईल, आणि ज्यात प्रत्येक व्यक्ती इतर व्यक्तींशी सहकार्य करताना स्वतःचे स्वातंत्र्यही अबाधित राखून केवळ स्वतःस निष्ठावंत राहून स्वतःस आज्ञाधारक राहील. असा समाज उभा करणे इष्ट वाटत होते. यासाठी व्यक्तींनी एकत्र येऊन एक प्रकारचा सामाजिक करार (Social contract) तयार केला असे रुसो चे म्हणणे आहे. सामाजिक कराराचे स्वरुप स्पष्ट करताना रुसो म्हणतो की, यात प्रत्येक व्यक्तीने स्वतःस व स्वतःच्या कुवतीस व सामर्थ्यास संपूर्ण समाजाच्या सामान्य (सर्वजण) संकल्पाच्या (General Will) सर्वश्रेष्ठ मार्गदर्शनाखाली ठेवायचे असते. आणि आपल्या सामूहिक स्वरुपात या समाजाचा प्रत्येक घटक आपणास संपूर्ण समाजाचा अविभाज्य घटक म्हणून उपलब्ध होत असतो. अशा समाज व्यवस्थेच्या रचनेने जिला 'शासनसंस्था' (State) म्हणतात. अशी नैतिक व सामूहिक संघटना तयार होते. ती जेव्हा निष्क्रीय असते. तेव्हा

सार्वभौम (Sovereign) असते, आणि जेव्हा क्रियाशील असते, तेव्हा आपल्या सारखी तिची इतरांवर सत्ता व अधिकार प्रस्थापित होते. अशा समाज व्यवस्थेत जर कोणीही घटक व्यक्तींना हक्क उरले तर व्यक्तींचे हक्क व समाजाचे व्यक्तीवरील अधिकार यांच्यात मतभेद, विरोध व संघर्ष उत्पन्न होण्याची शक्यता राहणार व असा संघर्ष निर्माण झाला तर त्यांच्यातील वाद व तंटे कोणी सोडवायचे हा प्रश्न राहील,कारण सर्वच घटक व्यक्ती समान असल्यामुळे कोणी श्रेष्ठ कोणी कनिष्ठ, कोणी मोठा, कोणी छोटा असा भेदच उरणार नाही. सर्वच समान पातळीवर राहणार असल्याने प्रत्येक घटक व्यक्तीस योग्य व अयोग्य हे ठरविण्याचा हक्क राहील आणि त्यामुळे समाज व्यवस्था व सामूहिक जीवन तयार होऊनही त्यांच्या घटक व्यक्ती पूर्वीसारखेच त्यांचे समाज पूर्व स्वातंत्र्य उपभोगत राहू शकतील असे रुसोला वाटते आणि समाज व्यवस्था अनिवार्यपणे एकतर अकार्यशील तरी होईल नाहीतर निरकुंश सत्ताधारी तरी बनेल. अशा प्रकारे सामाजिक करार याविषयी रुसोचे मत आहे.

**<u>आपली प्रगती तपासा.</u>**

(१) सामाजिक कराराविषयी टॉमस् हॉब्ज, लॉक व रुसोचे विचार स्पष्ट करा.

.........................................................................
.........................................................................
.........................................................................
.........................................................................

## ९.५ सारांश :-

मानव हा सामाजिक व राजकीय प्राणी आहे. तो एकटा राहू शकत नाही, म्हणून अनेक मानव एकत्र येवून राहतात. व समाजाची निर्मिती होते. परंतू मानव एकत्र येवून राहत असताना त्याच्या मध्ये सुसंवाद, सामंजस्य निर्माण होवून सुव्यवस्था निर्माण होण्यासाठी राजकीय संस्था किंवा शासनसंस्था याची आवश्यकता आहे. केवळ समाजामध्ये सुव्यवस्था निर्माण होण्यासाठी राजकीय संस्था किंवा शासनसंस्था याची आवश्यकता आहे. केवळ समाजामध्ये सुव्यवस्था निर्माण होण्यासाठी राजकीय संस्था किंवा शासनसंस्था याची गरज नसून मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी ही राजकीय संस्था किंवा शासनसंस्थेची आवश्यकता आहे. राजकीय तत्त्वज्ञान म्हणजे नैतिक व राजकीय तत्त्वज्ञानातील विवेकी विचारांचा आणि त्यात अंर्तभूत असणाऱ्या प्रश्नांचा अभ्यास होय. तसेच राजकीय तत्त्वज्ञान म्हणजे राज्यासंबंधी संघटित राजकीय मते, माहिती अंदाज, नितिवचने, सिध्दांत, सर्वसामान्य विधाने यांची विवेकवादी विचारातून सूसंगत रीतीने मांडलेले ज्ञान होय परंतू राजकीय संस्था किंवा शासन संस्थेमध्ये जबाबदार असणाऱ्या व्यक्ती जर प्लेटोच्या **'तत्त्वज्ञ राजा'** (Philosopher king)या संकल्पनेप्रमाणे नसतील तर ते त्यांच्या स्वार्थी वृत्तीमुळे स्वतःची जबाबदारी पार पाडत नाहीत त्यामुळे अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होतात आणि सध्याच्या परस्थितीमध्ये सर्वक्षेत्रांमध्ये अनेक प्रकारच्या समस्या आहेत म्हणून आजच्या युगाचे वर्णन संकटग्रस्त युग (Age of Crises)असे केले जाते म्हणून सद्यपरस्थितीमध्ये राजकीय तत्त्वज्ञानाची आत्यंतिक आवश्यकता आहे.

घटना नियंत्रित समाज अस्तित्त्वात येण्यासाठी समाजातील व्यक्तींनी आपापसात ऐक्य

घडवून आणण्यासाठी केलेल्या करारास सामाजिक करार (Social contract) असे म्हटले जाते. सामाजिक कराराच्या संदर्भात टॉमस् हॉब्ज,जॉन लॉक आणि रूसो यांचे विचार महत्त्वाचे आहेत.

## ९.६ विद्यापीठीय दिर्घोत्तरी प्रश्न

१) राजकीय तत्त्वज्ञान म्हणजे काय हे सांगून त्याचे स्वरूप सविस्तर स्पष्ट करा

२) आजच्या काळात राजकीय तत्त्वज्ञानाचे महत्त्व सविस्तर विशद करा.

३) सामाजिक करार म्हणजे काय ते सांगून हॉब्ज, लॉक व रूसो यांचे सामाजिक करारासंदर्भातील विचार स्पष्ट करा.

४) टिपा लिहा.

अ) राजकीय तत्त्वज्ञान

ब) आजच्या काळातील राजकीय तत्त्वज्ञानाचे महत्त्व

क) हॉब्जचे सामाजिक कराराविषयी विचार

ड) लॉकचे सामाजिक कराराविषयी विचार

इ) रूसोचे सामाजिक कराराविषयी विचार

❖❖❖

# १०

# राजकीय विचारप्रणाली :- मार्क्सवाद

# (Political Ideology)

## (अ) मार्क्सवाद किंवा साम्यवाद

**घटकरचना** :- (Unit Structure) :-

१०.० उद्दिष्ट्ये
१०.१ प्रस्तावना
१०.२ मार्क्सवादाचे वा साम्यवादाचे मुख्य मुद्दे
१०.३ कार्ल मार्क्सचा व्दंव्दात्मक भौतिकवाद किंवा विरोधविकासवाद
१०.४ ऐतिहासिक भौतिकवाद (Historical Materialism)
१०.५ अतिरिक्त मुल्याचा सिध्दांत (Theory of surplus value)
१०.६ वर्ग संघर्षाचा सिध्दांत (Theory of class-war)
१०.७ कामगार वर्गाची हुकूमशाही (Dictatorship of proletariat)
१०.८ वर्गविहिन व राज्य विहिन समाज (Classless and stateless society)
१०.९ सारांश
१०.१० विद्यापीठीय दिर्घोत्तरी प्रश्न.

## १०.० - उद्दिष्ट्ये

१) एक राजकीय विचारप्रणाली म्हणून साम्यवाद किंवा मार्क्सवाद विचारसरणीच्या संदर्भात व्दंव्दात्मक भौतिकवाद ही संकल्पना काय आहे ते समजून घेणे.

२) कार्ल मार्क्सच्या साम्यवादी विचारसरणीची भूमिका कशावर आधारलेली आहे ते समजून घेणे.

३) मार्क्सवाद एक राजकीय विचारप्रणाली म्हणून त्याचे योगदान काय आहे ते समजेल.

४) कार्ल मार्क्सची साम्यवादी विचारसरणी अभ्यासता येईल.

## १०.१ प्रस्तावना

**कार्ल मार्क्स** (१८१८-१८८३) :- शास्त्रीय समाजवाद या संकल्पनेचा जनक असलेल्या कार्ल मार्क्सने समाजवादाविषयीचा जो एक दृष्टिकोन १९ व्या शतकात मांडला, ती एक राजकीय विचारसरणी म्हणून मार्क्सवाद या नावाने ओळखली जाते. कार्ल मार्क्सचा जन्म इ. स. १८१८ मध्ये जर्मनीतील दग्वीबीज येथे झाला. बार्लिन विद्यापिठातून एपीक्युरसच्या भौतिकवादी सिद्धांतावर व तत्त्वज्ञानावर प्रबंध सादर करुन त्याने पी.एच.डी. संपादित केली. बार्लिन विद्यापिठात तत्त्वज्ञानाचा अभ्यास कार्ल मार्क्सने केला. तेव्हा हेगेल बर्लिन विद्यापिठात

प्राध्यापक होता. हेगेलच्या व्दंव्दवादी सिध्दांताचा प्रभाव मार्क्सवर पडला. हा व्दंव्दात्मक सिद्धांत कार्ल मार्क्सने मार्क्सवादी वा साम्यवादी विचार मांडताना आधार घेतला. परंतु मार्क्सच्या व हेगेलच्या विचारात फरक होता. मार्क्स हा भौतिकवादी (जडवादी) विचारवंत होता. तर हेगेल हा आध्यात्मवादी विचारवंत होता. कार्ल मार्क्सचे शिक्षण झाल्यानंतर त्याने रिनीश टाईम्समध्ये लेख लिहायला सुरुवात केली. पुढे तो एक वृत्तपत्रकार व संपादक म्हणून ओळखला जावू लागला. वृत्तपत्रामध्ये तो क्रांतीकारी व जहाल विचार मांडत असे. परिणामी पर्शियन शासनाने त्याच्या वृत्तपत्रावर बंदी आणून तो फ्रान्समध्ये गेला. फ्रान्सच्या क्रांतीमध्ये त्याचे योगदान होते. पॅरिसमध्ये असताना फ्रेंच समाजवादी विचारवंताशी त्याची ओळख झाली. त्यांच्या समाजवादी विचारांनी तो प्रभावीतही झाला. त्याने समाजवादी विचारात शास्त्रीयता (Scientific Socialism) आणून मार्क्सवादी विचारप्रणाली मांडली. पुढे त्याला फ्रान्समधूनही निघून जावे लागले तेव्हा तो लंडनमध्ये गेला. तेथील कामगारांमध्ये त्याने आपले जीवन घालविले. साहजिकच कामगारांचे शोषण कसे होते. याचे निरिक्षण व अनुभव मार्क्सने घेतल्यावर त्याचा साम्यवादी विचार विकसीत झाला. एंगल्स व कार्ल मार्क्स या दोघांनी मिळून अनेक ग्रंथ प्रसिद्ध केले. जर्मनीमध्ये झालेल्या क्रांतीत त्याच्यावर देशद्रोहाच्या आरोपावरुन खटला भरण्यात आला. त्याला जर्मनीतून हद्दपार करण्यात आले. १८८३ मध्ये लॉन येथे कार्ल मार्क्सचा मृत्यू झाला.

**कार्ल मार्क्सचे ग्रंथ :-**

१) होली फॅमिल्ल ी (१८४५)
२) दि कम्युनिस्ट मॅनिफेस्टो (१८४८)
३) दि फिलॉसॉफी ऑफ पॉवर्टी (१८५७)
४) हेल्थ प्राइज ॲन्ड प्रोकॉट (१८६५)
५) दास कॅपीटल (Das Capital- १८६७)
६) दि क्रिटिक ऑफ पॉलिटिकल इकोनॉमी (१८६९)
७) दि सिव्हील वॉर इन फ्रान्स (१८७१)

वरील ग्रंथापैकी दि कम्युनिस्ट मॅनिफेस्टो आणि दास कॅपीटल हे दोन ग्रंथ त्यावेळी कामगारांसाठी ‘बायबल’ झाले होते आणि जगातील सर्व भाषांमध्ये या ग्रंथाची भाषांतरे करण्यात आली. कारण या दोन्ही ग्रंथात त्याने साम्यवादी विचार मांडलेले होते. त्याने इतिहासाचे दाखले देत असे दाखवून दिले की, साम्यवादी क्रांती अटळ असून भांडवलशाहीचा नाश अटळ आहे. श्रमिक वा कामगार भांडवलशाहीचा अंत घडवून आणतील. भांडवलदार व कामगार यांच्यातील क्रांतीनंतर वर्गविहिन (Classless) समाजाची स्थापना होईल. अशा वर्गविरहित, शोषणविरहित समाजरचनेची अवस्था म्हणजे साम्यवादी अवस्था होय असे कार्ल मार्क्सचे मत आहे. मार्क्सच्या विचारावर जर्मन तत्त्वज्ञ हेगेल तसेच सेंट सायमन व चार्ल्स फेरियल या फ्रेंच तत्त्वज्ञांचा प्रभाव पडला. त्याचप्रमाणे ॲडमस्मिथ व रिकार्डो यांच्या विचाराने तो प्रभावित झाला होता.

## १०.२ मार्क्सवादाचे (Marxism) वा साम्यवादाचे मुख्य मुद्दे :-

कार्ल मार्क्सची साम्यवादी विचारसरणी पुढील प्रमुख मुद्दयांवर आधारलेली आहे.

१) व्दंव्दात्मक भौतिकवाद (Dialectical Materialism)
२) ऐतिहासिक भौतिकवाद (Historical Materialism)
३) अतिरिक्त मुल्याचा सिद्धांत (Theory of surplus value)

४) वर्ग संघर्षाचा सिद्धांत (Theory of class struggle)
५) कामगार वर्गाची हुकूमशाही (Dictatorship of proletariat)
६) वर्गविहिन व राज्यविहिन समाज (साम्यवादी अवस्था) (Classless and stateless society)

## १०.३ कार्ल मार्क्सचा व्दंव्दात्मक भौतिकवाद किंवा विरोधविकासवाद (Dialectical Materialism)

कार्ल मार्क्स हा १९ व्या शतकातील एक प्रभावशाली सामाजिक व राजकीय विचारवंत आणि तत्त्वज्ञ होता. त्याचे साम्यवादी तत्त्वज्ञान विचारवंताना आणि बहुजनांना प्रेरणादायी ठरले. मार्क्सच्या मते, व्दंव्दवादाप्रमाणे होणारा बदल हा उत्क्रांतीतून होत नाही तर क्रांतीतून होतो. व्दंव्दवादी सिध्दांताप्रमाणे साम्यवादाचा विकास कसा झाला ते मार्क्सने स्पष्ट केले आहे. कार्ल मार्क्सच्या साम्यवादी तत्त्वज्ञानाचा आधार व्दंव्दात्मक भौतिकवाद आहे. मार्क्स बर्लिन विद्यापिठात शिकायला होता. तेव्हा हेगेलच्या व्दंव्दात्मक सिद्धांताचा प्रभाव मार्क्सवर होता. त्यांने व्दंव्दवादाला भौतिक व आर्थिक अर्थ देऊन त्याचा उपयोग साम्यवादी विचारप्रणाली मांडण्यासाठी केला. हेगेलने राज्याचा उदय कसा झाला हे स्पष्ट करण्यासाठी द्वंद्वात्मक सिंध्दात मांडला. **"वाद X प्रतिवाद = संवाद (समन्वय)"** व्दंव्दात्मक सिद्धांताचे वा विरोधविकासवादाचे हे तत्त्व होय. कार्ल मार्क्सने साम्यवादाचा उदय व विकास कसा होणार आहे हे स्पष्ट करण्यासाठी व्दंव्दवादी सिद्धांताचा आधार घेतला. या जगामध्ये होणारे बदल हे आर्थिक कारणामुळे होतात. जगामध्ये फक्त भौतिकवाद (जडवाद) आहे. आतापर्यंतच्या सामाजिक व्यवस्थेत आपणास वर्ग संघर्ष आढळतो. मालक आणि गुलाम, सामंत आणि शेतमजूर यात सातत्याने वर्ग संघर्ष आढळतो. कार्ल मार्क्सच्या मते, इतिहास हा भौतिकवादी धोरणाचा एक भाग म्हणजे वर्गसंघर्ष आहे. प्रथमपासून समाजात दोन परस्पर विरोधी वर्ग आहेत. हा प्रत्येक वर्ग स्वतःचे हित जपण्याचा प्रयत्न करत असतो. त्यातून संघर्ष होतो. या संघर्षाचे कारण आर्थिक आहे. दोन वर्गातील संघर्षाचे प्रमुख कारण म्हणजे एका वर्गाकडे संपत्तीची मालकी असून तो सधन असतो. तर दुसऱ्या साधनसंपत्तीचा अभाव असतो. परिणामी मार्क्स म्हणतो की, भांडवलशाही समाजव्यवस्थेत वर्गसंघर्ष व श्रमिकांचे शोषण होते. त्यासाठी क्रांतीची आवश्यकता तो सांगतो. त्याच्यामते, अशी एक समाजव्यवस्था निर्माण व्हावी. म्हणजे श्रमिकांची हुकूमशाही प्रस्थापित होऊन समाजातील वर्गभेद नष्ट होऊन भांडवलशाहीचा निपात होऊन की ज्यात श्रमिकांचे शोषण होणार नाही, कोणतेही वर्ग त्यात राहणार नाही अशी वर्गविहिन समाजाची स्थापना होईल. या विचारपद्धतीला कार्ल मार्क्स साम्यवाद (Communism) असे म्हणतो. म्हणूनच मार्क्स हा साम्यवादी विचाराचा जनक म्हणून प्रसिद्ध आहे. त्याने 'साम्यवादी' समाजव्यवस्थेचा पुरस्कार केला.

कार्ल मार्क्सने धर्म, ईश्वर व नैतिकता त्याज्य ठरविली. त्याच्या मते **'धर्म ही अफूची गोळी आहे'.** अफूची गोळी घेतल्यावर जशी गुंगी येते तसाच प्रकार श्रध्दाळू व भाविक धार्मिकांच्या बाबतीत सत्य आहे. आपल्या विपत्तीचे विस्मरण व्हावे. यासाठी लोक धर्मरुपी अफूचे सेवन करतात. धर्म हा समाजाची पिळवणूक वा शोषण करण्याचे साधन आहे. अशा धर्माला वा धर्मसंस्थेला मार्क्सने विरोध करुन त्याने ईश्वराचे अस्तित्त्वही नाकारले. कारण धर्मातील ईश्वर ही कल्पना माणसानेच निर्माण केलेली असून स्वर्ग-पाप-पुण्य या कल्पना विलासाचाच भाग आहेत. या जगात वास्तविक काय आहे तर ते आर्थिक कारण हे होय.

कार्ल मार्क्स म्हणतो की मानव जातीचा संपूर्ण इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास आहे.

कोणत्याही काळाचा अभ्यास केला तर हेच दिसून येते की, पूर्वी गुलाम व मालक असे दोन वर्ग होते. त्यानंतर जमिनदार व शेतकरी (श्रमिक) असे दोन वर्ग अस्तित्त्वात आले. त्यानंतर भांडवलदार व कामगार असे दोन वर्ग अस्तित्त्वात आले. यामध्ये एक वर्ग शोषित व दुसरा वर्ग शोषक हे आपल्या इतिहासात सतत दिसून येतात. या दोन वर्गात सतत संघर्ष घडून येतो. असा व्दंव्दवादी सिद्धांत मांडून मार्क्सने कम्यूनिस्ट मॅनिफेस्टो या ग्रंथात कामगारांना आव्हान केले की, 'सर्व कामगारांनी एकत्र यावे. कामगारांच्या श्रमाचे शोषण करणाऱ्या भांडवलशाहीचा क्रांतीकरुन नाश करावा. प्रसंगी रक्तक्रांती घडून आणावी लागेल. तरच खऱ्या अर्थाने साम्यवादी समाजव्यवस्था म्हणजे वर्गविहिन व्यवस्था अस्तित्त्वात येईल असे मार्क्सचे मत आहे. अर्थात कार्ल मार्क्सने हेगेलच्या व्दंव्दात्मक भौतिकवादाला वास्तवतेचे स्वरुप दिले.

**आपली प्रगती तपासा** :-

१. व्दंव्दात्मक भौतिकवाद म्हणजे काय?

..................................................................................

..................................................................................

..................................................................................

..................................................................................

## १०.४ ऐतिहासिक भौतिकवाद (Historical Materialism)

कार्ल मार्क्सने **'दास कॅपीटल'** या ग्रंथात ऐतिहासिक भौतिकवादाचे विवरण केले आहे. त्याने व्दंव्दात्मक सिद्धांताचे तत्त्व इतिहासाला लावून मानवी इतिहासाचे विवेचन केले यालाच कार्ल मार्क्स ऐतिहासिक भौतिकवाद किंवा शास्त्रीय समाजवाद असे म्हणतो.

कार्ल मार्क्स याने मानवी इतिहासाची वास्तववादी मिमांसा केली. हेगेलच्या विरोध विकासवादाचा स्वीकार करुन त्याचा आध्यात्मवाद व ईश्वरवाद नाकारला. त्याच्या मते, समाजात जे परिवर्तन घडुन येते ते मानवी विचारामध्ये नसून आर्थिक संबंधांत आहे. वस्तूंचे उत्पादन करीत असतांना समाजातील व्यक्तींचे परस्पर संबंध निश्चित होतात. उत्पादनाची साधने, उत्पादनाच्या पद्धती यातूनच समाजातील संबंध ठरतात. पुढील काळात जुन्या व नव्या उत्पादन व्यवस्थेत संघर्ष होतो व नवीन उत्पादन पद्धती निर्माण होते. या दोन्हीच्या संघर्षातून विकासाची नवीन अवस्था उदयास येते. उत्पादन व्यवस्थेतील बदलांबरोबर समाजातील लोकांचे परस्परसंबंध बदलतात. हे स्पष्ट करण्यासाठी मार्क्सने मानवी इतिहासाचे विवेचन करणारा ऐतिहासिक भौतिकवाद मांडला. या ऐतिहासिक भौतिकवादी विवेचनात इतिहासानूसार पुढील अवस्था दिसून येतात.

१) - प्राचीन साम्यवाद

२) - गुलामगिरी

३) - सरंजामशाही

४) - भांडवलशाही

५) - समाजवाद

६) - साम्यवाद

१) **प्राचीन साम्यवाद** :- या काळात उत्पादनाची खाजगी मालकी निर्माण झालेली नव्हती. त्यामुळे मानवी इतिहासाच्या या प्राचीन अवस्थेत मालकी वर्ग व मालकी नसलेला वर्ग

असे वर्ग नव्हते. वर्ग संघर्ष नव्हता. या प्राचीन काळातील अवस्थेला मार्क्सने प्राचीन साम्यवाद असे म्हटले आहे.

२) **गुलामगिरी** :- पुढील काळात खाजगी मालमत्तेची वा संपत्तीची संकल्पना निर्माण झाली. खाजगी संपत्तीच्या उदयाने या अवस्थेत दोन वर्ग निर्माण झाले ते म्हणजे मालकी असलेला वर्ग व मालकी नसलेला वर्ग व मालकी नसलेला वर्ग म्हणजेच गुलाम होय. गुलाम हे आपल्या उपजिविकेसाठी मालक वर्गावर अवलंबून होते.

३) **सरंजामशाही** :- या पुढील काळात उत्पादन पद्धती, उत्पादन साधने व विनिमयावर निर्माण झालेल्या या परस्पर संबंधातून मालक वर्ग गुलामांचे शोषण करु लागला. मालक व गुलाम या दोन वर्गाचा संघर्ष सुरु झाला. यांच्या संघर्षातून उदयाला आलेली ही नवीन अवस्था म्हणजे सरंजामशाही वा सामंतशाही होय. या अवस्थेत शेतजमिनीची मालकी काही कुटूंबाच्या हातात गेली त्यांना जमिनदार म्हणतात. हे जमिनदार जमिनीत श्रम न करता जमिनीचा थोडा थोडा भाग श्रमिकांना खंडाने देत. नैसर्गिक संकटाने शेतीचे नुकसान झाले. तरी खंड द्यावाच लागे. परिणामी श्रमिकांचे वा कष्टकऱ्यांचे शोषण होऊ लागले. जमिनदार व कष्टकरी वा कुळ यांच्यात संघर्ष होऊ लागला. जमिनदारांनी नविन उत्पादनपद्धती आणली व भांडवलशाही अवस्थेचा उदय झाला.

४) **भांडवलशाही** (Capitalism) :- सरंजाम उत्पादन व्यवस्थेतून नविन उत्पादन व्यवस्थेचा उदय झाला. यांत्रिकीकरण, उद्योगधंदे यात वाद होवून उत्पादन साधनांची मालकी असलेला भांडवलदार वर्ग निर्माण झाला. या भांडवलशाहीत श्रमावर उपजिविका करणारा कामगार वर्ग निर्माण झाला. या भांडवलदाराकडे उत्पादन साधनांची मालकी असल्यामुळे तो कामगार वर्गाकडून अधिकाधिक श्रम करुन घेत असे. परंतू उत्पादनाचा अत्यंत कमी मोबदला श्रमिकांना म्हणजे कामगारांना देत असे. कामगारांच्या श्रमाच्या मुल्यांपेक्षा वस्तूचे मूल्य अधिक ठेवून भांडवलदार अतिरिक्त मूल्य घेऊन कामगार वर्गाचे शोषण करु लागला. त्यामुळे या अवस्थेत भांडवलदारवर्ग आणि कामगार वर्ग यांच्यात संघर्ष सुरु झाला. यातूनच पुढे एक नविन व्यवस्था निर्माण झाली ती अवस्था समाजवाद म्हणून कार्ल मार्क्सने सांगितली.

५) **समाजवाद** (Socialism) :- मार्क्सने मानवी इतिहासातील अवस्थांचे वर्णन करुन प्रत्येक अवस्थेत दोन वर्ग असतात. त्यांच्या संघर्षातून शोषण करणारा वर्ग विजयी होतो. त्या पुढील अवस्थेत कामगार या शोषित वर्गाच्या विजयाची अपेक्षा करुन मार्क्सने मानवी इतिहासाची पुढील अवस्था समाजवाद अशी असावी. याचे मार्गदर्शन करतो. या अवस्थेत उत्पादन साधनांवरील खाजगी मालकी नष्ट करुन समाजाची सामुहिक मालकी प्रस्थापित करण्यासाठी भांडवलशाहीचा वा भांडवलदार वर्गाची उत्पादन साधनावरील मालकी नष्ट करण्यासाठी तो कामगारवर्गाला क्रांतीचा मार्ग सांगतो. त्यासाठी जगातील कामगारांनो एक व्हा ! असा मंत्र देतो. भांडवलदार वर्गाविरुद्ध बंड करुन उत्पादन साधने स्वतःच्या ताब्यात घेऊन कामगारांची हुकूमशाही निर्माण करावी असे सूचवितो. कामगारांची हुकूमशाही ही भांडवलदार वर्गासाठी असते, तर ती कामगारांसाठी लोकशाही असेल. कामगारांची हुकूमशाही ही साम्यवादी समाजव्यवस्था निर्माण होईपर्यंत संक्रमण काळापूरती असेल. पुर्नरचनेच्यासाठी हा संक्रमणकाळ आवश्यक आहे. तेव्हा राज्य अस्तित्त्वात राहील. परंतू ते श्रमिकांच्या हितासाठी असेल. या अवस्थेच्या काळात समाजातील वर्गभेद नष्ट होतील. भांडवलशाही समूह नष्ट केली जाईल. संक्रमणकाळानंतर वर्गविहित (Classless) समाजाची स्थापना होईल. या अवस्थेत सामुहिक उत्पादनाची स्थापना होईल. या अवस्थेत उत्पादनाची मालकी सामुहिक असेल

या अवस्थेतून अंतिम अवस्था निर्माण होईल ती म्हणजे साम्यवादी अवस्था होय.

६) **साम्यवादी अवस्था** :- या अवस्थेत वर्गविरहित शोषणरहित, राज्यविरहित (Staless Society) अशा समाजरचनेची अपेक्षा कार्ल मार्क्स करतो. कामगारांच्या हुकूमशाहीच्या काळात भांडवलदार वर्ग नष्ट होईल. उत्पादनाची साधने समाजाच्या मालकीची झालेली असतील. प्रत्येकाला आपल्या शक्तीप्रमाणे काम व गरजेपुरतेच दाम मिळेल. उत्पादन साधनावर कोणाचीही खाजगी मालकी नसल्याने कोणतेही वर्ग नसेल. वर्गच नसतील तर वर्ग संघर्ष होणार नाही. शोषणाचे साधन म्हणून असलेली राज्यसंस्थेची गरज असणार नाही. परिणामी राज्य विरुन जाईल. असे वर्ग विरहिन (Classless) शोषण विरहित व राज्य विरहित जी समाजरचना तयार होईल ती अवस्था म्हणजे साम्यवादी अवस्था होय. कार्ल मार्क्सच्या मते, मानवी इतिहासाची ही शेवटची व सर्वोच्च अवस्था होय.

**मूल्यमापन** :- कार्ल मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादावर अनेक प्रकारे टीका झाली. त्याने केवळ मानवी विकासाच्या प्रत्येक परिवर्तनाला आर्थिक घटक जबाबदार धरले आहेत. असे गृहित धरणे चुकीचे आहे. या आर्थिक घटकांशिवाय धर्म, संस्कृती, राष्ट्रप्रेम, राष्ट्रभावना, राजकीय सत्ता या घटकांचा समाज परिवर्तनात मोठे योगदान असूनही मार्क्सने त्याकडे दुर्लक्ष केलेले आहे.

**कार्ल मार्क्सने सामाजिक** परिवर्तनाला केवळ उत्पादन व्यवस्थेवर आधारलेल्या आर्थिक समाजरचनेत होणाऱ्या बदलांनाच तेवढे महत्त्व दिले आहे. धार्मिक, नैतिक व सामाजिक संबंधाकडे त्यांने दुर्लक्ष केलेले आहे. धार्मिक, सामाजिक चळवळीच्या परिवर्तनाची दखल मार्क्सने घेतली नाही.

**मार्क्सने धर्म** संस्थेला विरोध केला असला तरी जगात समाजाचा धर्माचा प्रभाव आहे. त्याने धार्मिक व नैतिक शिकवणीकडे दुर्लक्ष केले आहे. त्याने समाजवादी व साम्यवादी समाजरचनेचे पाहिलेले स्वप्न हे स्वप्नच ठरले आहे. साम्यवादी समाजरचनेत राज्य विरुन जाईल ही मार्क्सची कल्पना कल्पनाविलास ठरली. मार्क्सचे स्वप्न वास्तवात आलेच नाही. असे म्हणता येईल. याशिवाय साम्यवादी समाजरचनेत क्षमतेप्रमाणे काम व गरजेप्रमाणे दाम या तत्त्वाचा पुरस्कार करणाऱ्या मार्क्सने मानवी स्वभावाचा व प्रवृत्तीचा विचार केला नाही. कार्ल मार्क्सची **"साम्यवादी समाजरचना"** हे एक आदर्श स्वप्नच ठरले.

**<u>आपली प्रगती तपासा.</u>**

१) ऐतिहासिक भौतिकवाद म्हणजे काय?

.........................................................................
.........................................................................
.........................................................................
.........................................................................

२) ऐतिहासिक भौतिकवादी विवेचनातील अवस्था कोणत्या?

.........................................................................
.........................................................................
.........................................................................
.........................................................................

## १०.५ अतिरिक्त मुल्याचा सिद्धांत (Theory of surplus - value)

कार्ल मार्क्सने 'दास कॅपीटल' या ग्रंथात भांडवलदार वर्ग हा भांडवलशाहीत कामगार वर्गाचे शोषण कसे करतात हे स्पष्ट करण्यासाठी अतिरिक्त मुल्याचा सिद्धांत मांडला आहे. अतिरिक्त मुल्य म्हणजे उत्पादित वस्तूची मिळणारी किंमत व कामगाराला ती वस्तू उत्पादित करण्यासाठी मिळणारे वेतन यांच्यातील तफावत होय. कामगारांच्या श्रमातूनच वस्तूंचे उत्पादन होते. म्हणजे 'श्रम' हा उत्पादक घटक आहे. परंतू त्यांच्या श्रमातूनच जी वस्तू निर्माण होते ती वस्तू बाजारात विकून जो नफा (अतिरिक्त मूल्य) मिळतो तो नफा भांडवलदारांना मिळतो. कामगारांना मात्र त्यांच्या श्रमाचा अतिशय कमी मोबदला दिला जातो. अर्थात भांडवलदारांना जो नफा मिळतो तो कामगारांच्या श्रमातून उत्पादित केलेल्या वस्तूंच्या किंमतीद्वारे बाजारात मिळतो. त्या नफ्याचा फायदा कामगारांना दिला जात नाही. परिणामी भांडवलशाहीत भांडवलदार हे कामगार वर्गाकडून जास्तीत जास्त श्रम करुन घेतात व कामगारांना वेतन कमी देतात आणि संपूर्ण अतिरिक्त मूल्याचा लाभ ते स्वतः घेऊन एकप्रकारे कामगार वर्गाचे शोषण करतात. कामगारांना स्वतःचे श्रम विकावे लागतात. कारण उदरनिर्वाहाचे दुसरे कोणतेही साधन त्यांच्याकडे नसते. सर्व उत्पादनाच्या साधनावर त्यांची मालकी असते. परिणामी समाजात भांडवलदार व कामगार असे दोन वर्ग होतात. एक शोषण करणारा वर्ग व दुसरा शोषित वर्ग. अतिरिक्त मूल्य भांडवलदाराच्या हाती जाते. त्यामूळे भांडवलदार अधिकाधिक श्रीमंत होत गेले तर कामगार अधिकाधिक गरिब होत गेले. परिणामी भांडवलदाराच्या अशा लोभी वृत्तीमूळे भांडवलदार व कामगार यांच्यात संघर्ष अटळ झाला. या संघर्षामुळे एक दिवस क्रांती होऊन कामगार वर्ग भांडवलदारांचा नाईनाट करतील. कार्ल मार्क्सवर रिकार्डो या अर्थशास्त्रज्ञाचा प्रभाव पडला होता. त्यातूनच त्याने हा सिद्धांत मांडला आहे.

**मुल्यमापन** :- अर्थात कार्ल मार्क्सने श्रमिकांच्या श्रमावर बाजारातील वस्तूची किंमत अवलंबून नसते. तर ती मागणी पुरवठा यावरही अवलंबून असते. वस्तूच्या उत्पादनासाठी श्रम या घटकाची आवश्यकता असली तरी भांडवल, यंत्रसामुग्री, जबाबदारी नियोजन या घटकांकडे मार्क्सने दुर्लक्ष केलेले आहे. प्रत्येकवेळी भांडवलदार कामगारांचे शोषण करतो हे सदा सर्व काळ मान्य करता येत नाही. भांडवलदारांना अनेक घटकांवर खर्च करावा लागतो. त्यांचा वस्तूच्या मूल्यवृद्धीत समावेश असतो याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. अर्थात शोषण होणाऱ्या कामगार वर्गाकडे मार्क्सने वेधलेले लक्ष दुर्लक्षित करता येणार नाही हे कार्ल मार्क्सचे महत्त्वाचे योगदान आहे.

**<u>आपली प्रगती तपासा</u>**

१) अतिरिक्त मूल्य सिद्धांत म्हणजे काय ?

..............................................................................
..............................................................................
..............................................................................
..............................................................................

## १०.६ वर्गसंघर्षाचा सिद्धांत (Class struggle)

कार्ल मार्क्सने हेगेलच्या व्दंव्दात्मक सिद्धांताच्या आधारे ऐतिहासिक भौतिकवाद मांडला. मानवी समाजाच्या विविध अवस्थेते दोन वर्ग असून त्यांच्यात शोषक आणि शोषित असे संबंध असून ते परस्परविरोधी आहेत. त्यातील संघर्ष अटळ आहे. म्हणून मार्क्सने मानवी समाजाचा इतिहास हा वर्ग संघर्षाचा इतिहास आहे, असे म्हटले. या दोन वर्गाच्या वर्गसंघर्षात प्रत्येक अवस्थेत संघर्ष झालेला आहे.

भांडवलशाही व्यवस्थेत भांडवलदार व कामगार असे दोन वर्ग असून भांडवलदार वर्ग अतिरिक्त मूल्य घेऊन कामगारांचे शोषण करतो. या दोन वर्गातील संघर्षातून कामगारांचा म्हणजे शोषितांचा विजय झालेला आहे. हे मानवी इतिहासाच्या प्रत्येक अवस्थेत दिसून येते. त्यासाठी कार्ल मार्क्स जगातील सर्व कामगारांनी संघटित होऊन भांडवलदार वर्गाविरुद्ध क्रांती करण्याची आवश्यकता आहे. असे सांगतो. या लढ्यात कामगार वर्ग विजयी होईल व कामगारांची हुकूमशाही प्रस्थापित होईल. भांडवलदार वर्गाचा नायनाट होईपर्यंत कामगारांची हुकूमशाही असेल. नंतर वर्गविहिन समाजाची स्थापना होईल. अशा पद्धतीलाच मार्क्स समाजवादी समाजरचना किंवा साम्यवादी समाजरचना असे म्हणतो. या साम्यवादी समाजरचनेत वर्ग संघर्ष संपुष्टात येईल. हेच वर्गसंघर्षाचे उद्दिष्ट होय. या समाजरचनेत शोषण नसलेला समाज अस्तित्त्वात येईल. या वर्गविहिन समाजात (Classless Society) राज्याची आवश्यकता राहणार नाही. कोणीही शोषित राहणार नाही. संपत्तीवर संपूर्ण समाजाची सामूहिक मालकी राहील. प्रत्येक व्यक्ती तिच्या क्षमतेप्रमाणे कार्य करेल आणि गरजेनुसार त्या संपत्तीचा उपभोग घेईल.

या वर्गसंघर्षात जोपर्यंत समाजात वैचारिक क्रांती घडून येत नाही, तो पर्यंत लोकांकडून कोणतीही कृती होत नाही हे मार्क्सने वैचारिक व मानसिक दृष्टिने लोकांना तयार करण्याचे काम केले. संघर्ष व जागृकता या दोन गोष्टी क्रांती मध्ये होणे आवश्यक असते. म्हणूनच मार्क्सने संघटित होण्याचे आवाहन करुन कामगारांमध्ये वैचारिक बदल घडविणाचा व वर्गसंघर्षाचा मार्ग ठेवला.

**मुल्यमापन** :- मार्क्सने समाजरचनेत दोनच वर्ग मानून इतर वर्गाकडे दुर्लक्ष केले आहे. या दोन्ही वर्गानमध्ये केवळ संघर्षाची आवश्यकता असतेच असे नाही. त्यांच्यात सहकार्याचे संबंध असू शकतात. या बाबींकडे त्याने दुर्लक्ष केलेले आहे.

**<u>आपली प्रगती तपासा</u>**

१) कार्ल मार्क्स 'मानवी समाजाचा इतिहास हा वर्ग संघर्षाचा इतिहास आहे' असे का म्हणतो?

..........................................................................
..........................................................................
..........................................................................
..........................................................................

## १०.७ कामगार वर्गाची हुकूमशाही व कामगार क्रांती.

कार्ल मार्क्सने मानवी समाजाच्या विकासाच्या प्रत्येक अवस्थेत परस्परविरोधी हितसंबंध असलेले दोन वर्ग व त्यातील संघर्ष याचे विवेचन ऐतिहासिक भौतिकवादाच्या माध्यमातून केले हे आपण पाहिले. त्याच्या मते भांडवलदार वर्ग कामगार वर्गाचे शोषण करतो. कारण भांडवलदाराच्या हातात उत्पादन साधनांची मालकी आहे. याशिवाय राजकीय सत्तेवरही त्यांचे वर्चस्व आहे. म्हणून राज्य ही संस्था शोषण करणारी आहे. भांडवलदार वर्गाच्या हिताचे रक्षण करणे हे राज्याचे उद्दिष्ट आहे. राज्य हे एका वर्गाने दुसऱ्या वर्गाचे शोषण करणारे यंत्र आहे. कार्ल मार्क्सच्या मते राज्य हा वर्ग संघर्षाची उत्पत्ती आहे. राज्य हे उत्पादनाच्या भौतिक साधनांच्या मालकांनी उभे केलेले बुजगावने आहे. ज्या काळात राज्य नव्हते, कोणत्याही प्रकारचे वर्गभेद नव्हते. ते वर्गभेदांना जन्म देते. जो भांडवलदार वर्ग आपली साधन संपत्तीवर मालकी प्रस्थापित करतो तो वर्ग स्वतःच्या फायद्यासाठी व स्वतःच्या साधनसंपत्तीच्या रक्षणासाठी

राज्यची निर्मिती करतो. त्यांना ही व्यवस्था टिकवून ठेवायची आहे. म्हणून या भांडवलदार वर्गाची मालकी नष्ट करण्यासाठी जगातील कामगारांना संघटीत करण्याचे मार्क्सने आवाहन केले. भांडवलशाही विरूध्द क्रांती किंवा उठाव करण्यास प्रवृत्त करतो.

कामगार वर्गाने संघटितपणे भांडवलदार वर्गाविरूध्द क्रांती केल्यानंतर भांडवलदार वर्ग नामशेष करण्यासाठी उत्पादन साधनांच्या मालकीबरोबरच कामगार वर्ग राजकीय सत्तेवर आपले वर्चस्व निर्माण करील आणि भांडवलशाहीच्या ठिकाणी कामगारांची हुकूमशाही प्रस्थापित केली जाईल. कामगारांची ही हुकूमशाही भांडवलदार वर्गासाठी हुकुमशाही असेल तर कामगारांसाठी ती लोकशाही असेल. कामगारांची हुकूमशाही कायम स्वरूपाची नसून ती समाजवादी समाजरचना निर्माण होईपर्यंतच असेल. म्हणजेच कामगार क्रांती ते समाजवादी समाजरचना या संक्रमणकाळापुरती कामगार हुकूमशाही असेल. अशा काळात समाजवादी समाजरचनेकडे वाटचाल करण्याच्या काळात स्थिरता आणण्यासाठी राज्यात कामगारांची सत्ता असेल हीच कामगार हुकूमशाही होय. या संक्रमणकाळात उत्पादनाची सर्व साधने समाजाच्या मालकीची करणे. कामगारांची सत्ता स्थिर करणे. कामगार हुकूमशाहीत विरोध करणाऱ्या गटाचा विरोध मोडून काढणे. भांडवलदार वर्ग समूळ नष्ट करून त्यावर्गाचे उच्चाटन करणे. अशा समाजवादी समाजरचनेत वर्गविरहीत, राज्यविरहीत समाजाची निर्मिती करणे.

कामगार क्रांतीच्या माध्यमातुन कामगार हुकूमशाही प्रस्थापित करणे. व कामगार हुकूमशाहीच्या माध्यमातून साम्यवादी समाजरचनेच्या निर्मितीचा मार्ग सांगितला या संक्रमण काळात कामगार हुकूमशाहीला इतरही अनेक कार्य करावी लागणार आहोत ती पुढीलप्रमाणेः-

१) सामुहिक वा सार्वजनिक हितासाठी जमिनीवरील मालकी हक्क नष्ट करणे.
२) आर्थिक विषमता नष्ट करणे व पुन्हा विषमता निर्माण होणार नाही याची काळजी घेणे.
३) मालमत्तेचा वारसा हक्क नष्ट करणे.
४) बंडखोरांची मालमत्ता जप्त करणे.
५) दळणवळण, वाहतुक इ. मध्ये वाढ करणे
६) नापीक जमिनीची मशागत व सुधारणा करणे.
७) सार्वजनिक शाळांकडुन मुलांना मोफत शिक्षण देणे.
८) बालमजूर बंद करणे.

वरील प्रकारची सर्व कार्य हे कामगार हूकूमशाहीला करावी लागतील या प्रकारच्या समाजवादी समाजरचनेत वर्ग संघर्ष नसेल. शोषणचे साधन असलेल्या राज्याची गरज भासणार नाही.त्यामूळे राज्य आपोआप विरून जाईल. अशा वर्गविरहीत, राज्यविरहीत, शोषणविरहीत साम्यवादी समाजाची निर्मिती होईल असे कार्ल मार्क्सचे मत आहे.

**मुल्यमापन** :- कार्ल मार्क्सने कामगार हुकूमशाहीच्या माध्यमातून साम्यवादी समाज निर्मितीचा मार्ग सांगितला असला तरी राशियात कामगार क्रांती होऊनही साम्यवादी समाजव्यवस्था निर्माण झाली नाही. प्रत्येक व्यक्तीला आपल्या पात्रतेप्रमाणे व कामाप्रमाणे प्रत्येक गोष्ट मिळेल असे सूत्र झाले तरी चीन व रशिया यामध्ये क्रांती झाल्यानंतर कामगार वर्गाची हुकूमशाही प्रस्थापित झाली. सर्व व्यवस्थेचे केंद्रीकरण करण्यात आले. परंतु कामगार वर्गाच्या हुकूमशाहीच्या नावाखाली साम्यवादी पक्षाची हुकूमशाही असे तेथील पक्षामध्ये दिसुन येते. एकूणच रशियात कामगार वर्गाची क्रांती होऊनही तेथे साम्यवादी समाजव्यवस्था निर्माण झाली नाही. किंवा चीनमध्ये ती दिसत नाही. अर्थात कार्ल मार्क्सचा हा आदर्शवाद स्वप्नवत वा कल्पनाविकासच दिसून येतो. कामगार वर्गाच्या हुकूमशाही ऐवजी साम्यवादी पक्षाची हुकूमशाहीच तेथील पक्षामध्ये दिसून येते. मार्क्सचा विचार दुर्लक्षित झाला हे दुदैव होय.

**आपली प्रगती तपासा**:-

१. कामगार हुकूमशाहीला कोणती कार्ये करावी लागणार!

..............................................................................................................
..............................................................................................................
..............................................................................................................
..............................................................................................................

## १०.८ वर्गविहिन आणि राज्यविहिन व्यवस्था : साम्यवादी व्यवस्था

कार्ल माक्सने कामगारवर्गाची हुकूमशाही ही साम्यवादी व्यवस्था आहे असे गृहीत धरून या व्यवस्थेत वर्गभेद नष्ट होतील यावर भर दिला आहे. भांडवलदार वर्ग नष्ट झाला की समाजातील श्रीमंत व गरीब ही वर्गव्यवस्था नष्ट होईल वर्गविहिन व्यवस्था प्रस्थापित झाल्यानंतर भांडवलदार वर्गाचे सरंक्षण करणारी राज्यव्यवस्था नष्ट होईल व साम्यवादाची स्थापना होईल. साम्यवाद म्हणजे क्रांतीच्या मार्गाने वर्गविहीन आणि राज्यविहीन व्यवस्था असणारी विचारसरणी होय. अशाप्रकारे मार्क्सने व्दंव्दवादी सिध्दांताप्रमाणे साम्यवादी समाजाचा विकास होईल असे म्हटले.

मार्क्सच्या मते राज्य ही शोषण करणारी संस्था आहे किंवा शोषणाचे ते एक साधन आहे. राज्य ही जनकल्याण्यासाठी निर्माण झाले हा पारंपारिक द्दष्टिकोन मार्क्सने नाकारला त्याच्या मते राज्य हे समाजातील भांडवलदार वा श्रीमंत वर्गाने गरीबांचे वा कामगारांचे शोषण करण्यासाठी निर्माण केलेले एक साधन आहे राज्य भांडवलदारांचे वर्चस्व असलेली एक यंत्रणा आहे.ते श्रीमंताच्या हिताचे रक्षण करते म्हणून राज्य हे वर्ग संघर्षाची उत्पत्ती आहे.अशा राज्यसंस्थेला मार्क्सने नाकारले. भांडवलदार वर्ग नष्ट झाला म्हणजे क्रांतीनंतर राज्याची आवश्यकता उरणार नाही. राज्याचा विलय होईल. राज्यविहीन व्यवस्था प्राप्त झाल्यानंतर जी साम्यवादी व्यवस्था निर्माण होईल तिचे स्वरूप व वैशिष्टये पुढीलप्रमाणे राहतील.

१) सर्व प्रकारच्या शोषणापासून समाजाची, लोकांची मुक्ती करणे व त्यासाठी वर्गभेद नष्ट करणे.
२) या साम्यवादी व्यवस्थेत प्रत्येकाला काम करायलाच लागेल प्रत्येकाने आपल्या क्षमतेप्रमाणे व पात्रतेप्रमाणे आपली कर्तव्ये पार पाडणे व पात्रता आणि कामाप्रमाणे मोबदला मिळेल.
३) समाजातील आळशी वा कामचुकार वर्गाचा नायनाट करता येईल.
४) समाजात अमुलाग्र बदल घडवून आणता येईल सर्व वर्गाचे उत्पादन, विघटन, राजकीय व आर्थिक सत्ता या गोष्टींचे केंद्रीकरण करण्यात येईल. प्रत्येक व्यक्तीच्या विकासाची खात्री देता येईल. साम्यवादी व्यवस्थेच्या अंतर्गत खरी लोकशाही प्रस्थापित होईल की जिथे प्रत्येक व्यक्तीला समान दर्जाची संधी देता येईल अशी कार्ल मार्क्सची विचारसरणी आहे.

कार्ल मार्क्सचे एकूणच मांडलेले तत्त्वज्ञान हे कामगार वर्गाच्या शोषणमुक्तीचा मार्ग आहे. यात शंका नाही ते शोषितांच्या शोषणमुक्तीचे तत्त्वज्ञान आहे. कामगारांना शोषणाच्या दुष्ट चक्रातुन मुक्त करण्यासाठी कार्ल मार्क्सचे तत्त्वज्ञान हे प्रेरणादायी व एक राजकीय विचारप्रणाली म्हणून त्याचा अभ्यास करणे उपयुक्त ठरेल यात शंका नाही.

**आपली प्रगती तपासा**:-

१) साम्यवादी व्यवस्थेची वौशिट्चे कोणती?

..............................................................................................................

.....................................................................................
.....................................................................................
.....................................................................................

## १०.९ सारांशः-

हेगेल या तत्त्ववेत्याने व्दंव्दात्मक पध्दतीची मांडणी करून राज्याला अंतिम व सर्वोच्च मानले त्याने राष्ट्रवादाचा पुरस्कार केला. परंतु कार्ल मार्क्सने हेगेलचा अध्यात्मवाद नाकारून भौतिकवादाचा (जडवादाचा) पुरस्कार केला. त्याच्या तत्त्वज्ञानाचा आधार व्दंव्दात्मक भौतिकवाद आहे. तो आर्थिक कारणांना महत्त्व देऊन ऐतिहासिक भौतिकवादाच्या सिध्दांताच्या माध्यमातून मानवी समाजाच्या प्रत्येक अवस्थेत परस्परविरोधी हितसंबंध असलेले दोन वर्ग व त्यांच्यातील वर्गसंघर्षाचे विवेचन करतो. मार्क्सवादामध्ये अतिरिक्त मुल्यांचा सिध्दांत, वर्गसंघर्षाचा सिध्दांत, कामगाराची हुकूमशाही, वर्गविहिन व राज्यविहीन अशा साम्यवादी समाजरचनेचे विचार मांडतो. श्रमिकांच्या वा कामगार वर्गाच्या क्रांतीमुळे उत्पादनाच्या साधनावर  वर्चस्व प्रस्थापित होईल. कामगार वर्गाची हुकुमशाही निर्माण होईल कार्ल मार्क्स या अवस्थेला संक्रमणाचा काळ समजतो. नंतर भांडवलशाही नष्ट होऊन वर्गविहीन समाज अस्तित्त्वात येतो. मार्क्सने राज्यसंस्थेला नाकारले कारण राज्य हे भांडवलदार वर्गाच्या हातातील शोषणाचे साधन मनतो. तो राज्यसंस्थेला विरोध करतो. साम्यवादी समाजरचनेनंतर राज्याची गरज नसल्याने राज्य विरून जाईल. या अवस्थेत राज्यविहीन (Staleless society) समाजरचना अस्तित्त्वात येईल ही मानवी इतिहासाची तो अंतिम अवस्था मानतो. शोषण विरहीत व समानतेच्या तत्त्वावर आधारलेली साम्यवादी समाजरचना निर्माण करणे हे कार्ल मार्क्सच्या विचाराची प्रेरणा व ध्येय आहे. या समाजव्यवस्थेला मार्क्स **‘साम्यवाद’** असे म्हणतो.

## १०.१० विद्यापिठीय दिर्घोत्तरी प्रश्न

१) कार्ल मार्क्सच्या व्दंव्दात्मक भौतिकवादाचे व ऐतिहासिक भौतिकवादाचे सविस्तर विवेचन करा.

२) ‘मानवी समाजाचा इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास आहे’ हे कार्ल मार्क्सचे विधान स्पष्ट करा.

३) कार्ल मार्क्सच्या अतिरिक्त मूल्य सिध्दांताचे विवेचन करून त्याचे मुल्यमापन करा.

४) एक राजकीय विचार प्रणाली म्हणून मार्क्सवादाचे चिकित्सक विवेचन करा.

५) व्दंव्दात्मक भौतिकवाद म्हणजे काय? कार्ल मार्क्सने सांगितलेल्या भांडवलशाही समाजव्यवस्थेतील सामाजिक वर्गाचे वर्णन करा.

६) साम्यवादाविषयी कार्ल मार्क्सच्या विचाराची सविस्तर चर्चा करा.

७) कामगारांची हुकूमशाही व वर्गविहीन व्यवस्था या विषयीचे कार्ल मार्क्सचे विचार सांगा व त्याचे मूल्यमापन करा.

८) टीपा लिहाः-

(अ) व्दंव्दात्मक भौतिकवाद

(ब) साम्यवादाची वैशिष्ट्ये

(क) अतिरिक्त मूल्य सिध्दांत

(ड) वर्ग संघर्षाचा सिध्दांत

(इ) कामगार वर्गाची हुकूमशाही

(फ) वर्गाविहीन व राज्यविहीन समाज व्यवस्था

❖❖❖

# ११

# राजकीय विचारप्रणाल्या

## (Political Idealogies)

ब) अराज्यवाद (Anarchism)

क) लोकशाही (Democracy)

**घटकरचना** (Unit Structure)

११.० उद्दिष्ट्ये

११.१ प्रस्तावना

११.२ अराज्यवाद

११.३ रॉबर्ट पॉल वुल्फचा अराज्यवाद सिद्धांत

११.४ अराज्यवादाचे मूल्यमापन

११.५ लोकशाहीची प्रस्तावना

११.६ लोकशाहीचा अर्थ व लोकशाहीची व्याख्या

११.७ लोकशाहीचे पैलू

११.८ लोकशाहीचे प्रकार

११.९ लोकशाहीचे आदर्श (Ideals)

११.१० लोकशाहीचे गुण (फायदे) व दोष (तोटे)

११.११ सारांश

११.१२ विद्यापीठीय दिर्घोत्तरी प्रश्न

## ११.० उद्दिष्ट्ये

१. अराज्यवाद संकल्पनेची भूमिका एक राजकीय विचारप्रणाली म्हणून समजून घेणे आवश्यक आहे.

२. रॉबर्ट पॉल वुल्फची अराज्यवादी विचारसरणी अभ्यासता येईल.

३. लोकशाहीची संकल्पना एक राजकीय विचारप्रणाली आणि एक शासन पद्धती म्हणून समजून घेणे

४. लोकशाही या राजकीय विचारप्रणालीच्या मूलभूत तत्त्वांचा वा आदर्शांचा अभ्यास करता येईल, त्यामुळे लोकशाहीची मूल्ये आणि तात्त्विक भूमिका समजेल.

३. एकूणच लोकशाहीचे तात्त्विक स्वरूप समजून घेता येईल.

## ११.१ प्रस्तावना

राजकीय तत्त्वज्ञानामध्ये एक महत्त्वाचा प्रश्न मांडला जातो. तो प्रश्न म्हणजे राज्यसरकार किंवा शासन कोणत्या अधिकाराखाली लोकांकडून नियमपालनाची अपेक्षा ठेवते. व्यक्तीने शासनाचे नियम का पाळावे? शासनसंस्थेचे किंवा राज्याचे समर्थन का करावे? यासंबंधीची उत्तरे पुढीलप्रमाणे दिली जातात.

अराज्यवाद या विचारप्रणालीत व्यक्तीस्वातंत्र्य महत्त्वाचे असून त्याचे शासनसंस्थेने उल्लंघन करता कामा नये. या विचारसरणीनुसार कोणत्याही प्रकारे शासनव्यवस्थेची आवश्यकता नाही. अराज्यवादी सिद्धांत कोणत्याही प्रकारच्या शक्तीवर आधारित असलेल्या शासनाच्या विरोधी आहे.राज्य ही दोषपूर्ण संस्था आहे. त्याची आवश्यकता नाही. अराज्यवाद (Anarchism) या शब्दाची उत्पत्ती ग्रीक शब्द 'अनारकीया' या शब्दापासून झाली असून त्याचा अर्थ शासनाचा अभाव (Without Rule) असा होतो. राज्यसंस्था वा अधिकार नसलेली (No rule of Any Authority) अशी राजकीय विचारप्रणाली होय. रॉबर्ट पॉल वुल्फ या तत्त्वज्ञानाच्या प्राध्यापकाने Indefence of Anarchism या लेखातून राजकीय तत्त्वज्ञान म्हणजे राज्याचे तत्त्वज्ञान होय असा विचार मांडला त्याच्या मते काही विशिष्ट लोकांवर आपल्या अधिकाराचा वापर करणारा गट लोकशाहीत असतो.परंतु वुल्फ राज्याचे अधिकार नाकारताना नैतिक जबाबदारीची संकल्पना, स्वायत्ततेची संकल्पना, अधिकार आणि स्वायत्तता यातील संघर्ष यांचा आधार घेतो. राज्य हे असमर्थनशील आहे. त्याने स्वायत्ततेला महत्त्व दिले.

लोकशाही ही एक राजकीय विचारप्रणाली असून ती शासनसंस्थेचा एक चांगला प्रकार आहे. लोकशाही फक्त शासन प्रकारच नाही तर ती एक जीवनपद्धती सुद्धा आहे. यादृष्टीने लोकशाही म्हणजे काय? तिचे प्रकार कोणते? लोकशाहीचे फायदे व तोटे काय आहेत? लोकशाहीचे आदर्श कोणते? या दृष्टीने लोकशाहीचा अर्थ, व्याख्या तिचे प्रकार, लोकशाहीची मूलभूत तत्त्वे, भारतीय लोकशाहीचे स्वरूप इत्यादिंचा अभ्यास करणे लोकशाहीच्या दृष्टीने आवश्यक आहे.

## ११.२ अराज्यवाद (Anarchism):

स्थूलमानाने राज्यसंस्था विरहित स्वयंस्फूर्तपणे आणि परस्पर सहकार्याने सामाजिक व्यवहार चालविण्यासंबंधी जे विचार आणि तत्त्वे मानली जातात त्यास अराज्यवाद (Anarchism) असे म्हणता येईल. 'अराज्यवाद' यास इंग्रजीत (Anarchism) असे म्हणतात. (Anarchism) या शब्दाची उत्पत्ती ग्रीक शब्द 'अनारकीया' या शब्दापासून झालेली असून त्याचा अर्थ शासनाचा अभाव असा होतो. अराज्य याचा अर्थ व्यक्तीव्यक्तीत, राज्याराज्यात, राष्ट्राराष्ट्रात जे व्यवहार करायचे ते स्वयंस्फूर्त व सहकार्यावर आधारलेले असले पाहिजेत. अशा समाजव्यवस्थेत राज्यसंस्थेची गरज असू नये. थोडक्यात अराज्यवादाचे उद्दिष्ट हे सर्व मानवी संबंधांच्या क्षेत्रात न्याय प्रस्थापित करणे हे होय.

अराज्य याचा अर्थ शासनाचा व राज्यसंस्थेचा अभाव एवढाच नसून अराजकता वा अंदाधुंदी असाही नव्हे. अराज्यवादी सिद्धांत कोणत्याही प्रकारच्या शक्तीवर आधारित असलेल्या शासनाच्या विरुद्ध आहे. राज्यसंस्था वा शासनसंस्था ही दोषपूर्ण संस्था आहे. कारण सामाजिक व नैतिक दुःखे ही राज्यसंस्थेकडून नाहीशी होऊ शकत नाहीत. शोषण व दडपशाही यांच्या मूळाशी राज्यसंस्था असते. म्हणूनच अराज्यवादाचे अनेक पुरस्कर्ते असून त्यांचे विचार एकमेकांपासून वेगवेगळे असले तरी अराज्यवादाची तत्त्वे व मूल्ये याबाबतीत सर्वसमावेशक विचारही त्यात दिसून येतात. भारतात म.गांधी हे तात्त्विक अराज्यवादी होते. पाश्चात्य ग्रीक

तत्त्वज्ञानात झेनो हा ग्रीक तत्त्वज्ञ अराज्यवादी होता. त्याने राज्यविरहित समाज व स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. अराज्यवादी सिद्धांताचा प्रचार करणारा पहिला विचारवंत म्हणून विल्यम गॉडविन यांचा उल्लेख करावा लागतो. मॅक्स स्टर्नर हा अराज्यवादी होता. म.गांधींच्या मते अहिंसक समाज हा राज्यहीन असेल. या समाजात राज्यसंस्था अखेर विलयाला जाईल असे ते मानीत. कार्ल मार्क्सच्या साम्यवादी विचारात वर्गविहीन समाजाची रचना हा सुद्धा एक अराज्यवादी विचाराप्रत नेणारा स्वप्नवत आदर्श आहे. अराज्यवादात समाज व व्यक्ती अशी निर्माण होते की, तेथे राज्याची गरज लागत नाही. शेवटी राज्यसंस्था विलयाला जाईल. कार्पेक्रिट याने साम्यवादी धर्तीवर आधारीत अराज्यवाद प्रतिपादन केला. त्याच्या मते केवळ राज्यसंस्थाच नव्हे तर खाजगी मालमत्तेची खाजगी मालकी ही सुद्धा नष्ट केली पाहिजे.

विल्यम गॉडविनच्या मते शासनव्यवस्थेतून जुलमी सत्ताधिश व संचित संपत्तीमुळे समाजात भीषण स्वरूपाची विषमता निर्माण होते. परिणामी सत्ता, संपत्ती व पैसा या गोष्टींमुळे ते इतर लोकांच्या श्रमाचे शोषण करतात. म्हणूनच गॉडविनने सर्व प्रकारची संपत्ती नाकारली. जो दुसऱ्यांचे शोषण करून मालमत्तेचा संचय करतो ती मालमत्ता त्याने निषेधार्ह मानली. सत्ता व संपत्ती नष्ट करण्यासाठी त्याने क्रांतीचा पुरस्कार केला. त्याने त्याकरिता समाजातील लोकांमध्ये जागृती, जाणीव वाढावी असा विचार मांडला. मॅक्स स्टर्नर याने राज्याची समाजाला गरज नाही. सर्व अर्थव्यवहार स्वतंत्र व सहकारी भावनेने केले जावेत अशी विचारसरणी प्रतिपादित करणारा मॅक्स स्टर्नर हा अराज्यवदाचा पुरस्कर्ता होता.

रॉबर्ट पॉल वुल्फ हा अराज्यवादी राजकीय विचारप्रणालीचा पुरस्कार करणारा तत्त्वज्ञानाचा प्राध्यापक होता. त्याने Indefence of Anarchism हा प्रसिद्ध लेख लिहून अराज्यवादी विचारप्रणालीची आधुनिक अंगाने मांडणी केली. राज्य हे असमर्थनशील कसे आहे अधिकार व स्वायत्तता या संबंधीचे विचार मांडले. वरील अराज्यवाद्याचे मते राज्य ही अनावश्यक संस्था आहे.

अराज्यवादाच्या पुढील काही व्याख्या महत्त्वाच्या आहेत.

१) **डिकीन्स** : अराजकता म्हणजे व्यवस्थेचा अभाव नव्हे तर शक्तीचा अभाव असून त्यात स्वातंत्र्य, सहकार्य व प्रेम ही मूल्ये असणारा समाज होय.

२) **हॅक्स्ले** : अराजकता म्हणजे समाजाची अशी व्यवस्था की, ज्यात प्रत्येक व्यक्ती आपली शासक राहील.

३) **कोकर** : अराज्यकतेचा सिद्धांत म्हणजे कोणत्याही स्वरूपात राष्ट्रीय सत्ता अनावश्यक आहे. आधुनिक अराज्यवादात राज्याचा सैद्धांतिक दृष्टिकोन तर आहेच पण वैयक्तिक संपत्ती (खाजगी मालमत्ता) आणि धार्मिक संस्था याविषयीचा नकारात्मक गोष्टींचाही समावेश आहे.

अराज्यवादी हे राज्यविरहित समाजाचा आदर्श समोर ठेवतात. शासनविरहित वा राज्यविरहित समाजाच्या निर्मितीसाठी क्रांतीपासून ते मानवतावादी आवाहनापर्यंत अनेक परस्परपूरक मार्गही प्रतिपादन करतात. हा नवसमाज क्रांतीकारक कृतीतून निर्माण होऊन तोच राज्यसंस्था नष्ट करू शकतो. नवी समाजरचना अस्तित्त्वात आणण्यासाठी व्यवहारात शास्त्रीय मार्ग स्वीकारावे लागतील. न्यायबुद्धि व बुद्धिप्रामाण्याचे मार्ग त्याकरिता अनुसरावे लागतील. अशी ही अराज्यवादी राजकीय विचारसरणी आहे.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न : अराज्यवाद म्हणजे काय ते स्पष्ट करा.

.......................................................................
.......................................................................
.......................................................................
.......................................................................

## ११.३ रॉबर्ट पॉल वुल्फचा अराज्यवाद सिद्धांतः

रॉबर्ट पॉल वुल्फ (जन्म-१९३३) हा आधुनिक अमेरिकन राजकीय तत्त्वज्ञ आहे. रॉबर्ट पॉल वुल्फ हा कोलंबिया विद्यापीठात तत्त्वज्ञानाचा प्राध्यापक होता. नंतर मॅशशूटस् विद्यापीठात राजकीय तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून ते कार्यरत झाले. त्यांनी अनेक ग्रंथ व लेख लिहिले आहेत. त्यापैकी Indefence of Anarchism हा त्यांचा लेख प्रसिद्ध आहे. वुल्फने आपल्या Indefence of Anarchism या लेखाची सुरुवात करताना 'राजकारण' (पॉलिटिक्स) म्हणजे काय? हे स्पष्ट केले. त्यांच्या मते राजकारण म्हणजे राज्यांच्या शक्ती वा बलाचा वापर करणे किंवा त्या बळावर विशिष्ट प्रभाव टाकणे होय. राजकीय तत्त्वज्ञानाची व्याख्या करताना ते म्हणतात की राजकीय तत्त्वज्ञान म्हणजे राज्याचे तत्त्वज्ञान होय. वुल्फच्या मते राज्य म्हणजे एखाद्या विशिष्ट क्षेत्रात आपल्या अधिकाराचा वापर करणाऱ्या लोकांचा गट किंवा काही विशिष्ट लोकांवर आपल्या अधिकाराचा वापर करणारा गट हा लोकशाही व्यवस्थेत अधिकार गाजवणारा एक गट असतो. परंतु एकाधिकारशाहीमध्ये किंवा हुकूमशाहीमध्ये एकाच व्यक्तीचे सर्व अधिकार असतात. वुल्फ राज्याचे अधिकार नाकारताना नैतिक जबाबदारीची संकल्पना, स्वायत्ततेची संकल्पना, अधिकार आणि स्वायत्तता यातील संघर्षांचा आधार घेतो.

### ११.३.१ अधिकार संकल्पना :

साधारणपणे अधिकार म्हणजे एखाद्याला आदेश देण्याचा हक्क त्याचबरोबर त्याचे पालन केले जाण्याचा हक्क असा अर्थ केला जातो. वुल्फ अधिकार (Authority), शक्ती (power) वा बल यांमधील फरक स्पष्ट करतो. शक्ती वा बल म्हणजे धमकीचा जबरदस्तीचा वापर करणे तर अधिकारात दिलेल्या आज्ञेचे पालन समोरच्या व्यक्तीने करायला हवेच, अशी अपेक्षा असते. शक्तीमध्ये कोणत्यातरी बाह्य बलाचा वापर केलेला आढळतो. उदा. एखाद्या अपहरणकर्त्याने मुलांचे अपहरण करुन त्याच्या पालकांकडून दोन लाखाची मागणी केली आणि पालकांनी ते पैसे दिले तर त्या अपहरणकर्त्याने बलाचा किंवा शक्तिचा वापर केला असे म्हणता येईल पण पैसे मागणे हा त्याचा अधिकार आहे असे म्हणता येणार नाही.

अधिकाराच्या संकल्पनेत दिलेल्या आज्ञेचे पालन केले जावे अशी अपेक्षा असते. असे राज्यकर्ते मानतात. त्यांच्याकडे आज्ञा देण्याचा अधिकार आहे. आणि त्या आज्ञा लोकांनी पाळल्या पाहिजेत. कारण त्या आज्ञा त्यांनी दिलेल्या आहेत. परंतु अशाप्रकारे आज्ञा देण्याचा अधिकार आहे असे मानले तर ते पूर्णपणे चुकीचे आहे. त्यांच्या मतानुसार, आतापर्यंतच्या मानवी इतिहासात कोणतेही असे राज्य नाही की, त्यांनी दिलेल्या आज्ञेचे पालन करण्याचा अधिकार इतरांना आहे. वुल्फ म्हणतो, जी व्यक्ती आज्ञा देते ती केवळ माझ्या कर्तव्याची जाणीव करून देण्यात नियुक्त ठरते. त्यांची जी भूमिका आहे ती कोणीही दुसरा म्हणजे व्यक्तीचा मित्र किंवा त्यांची सद्सद्विवेकबुद्धीही करते. रॉबर्ट पॉल वुल्फ अधिकारांमध्ये फरक सांगतो. त्याच्या मते अधिकार (Authority) दोन प्रकारचे असतात.

१) Defacto de Jure Authority : वुल्फच्या मते नियम अस्तित्त्वात असल्यामुळे व्यक्ती कायदेशीर अधिकाराचे अस्तित्त्व मानते. त्याच्या आधारावरून त्याच्याकडे कायदेशीर अधिकाराची संकल्पना आहे असा निकष काढतो.

२) Supreme Authority : सर्वोच्च अधिकार - राज्यात वा व्यक्तींच्या गटात की ज्याला सर्वोच्च अधिकाराचे हक्क बहाल केलेले असतात. आदर्श नियमांचे पालन करण्याची आज्ञा देते. या आदेशांचे पालन करण्यासाठी त्याला कायदेशीर अधिकार (Legitimate) असतात.

## ११.३.२ स्वायत्ततेची संकल्पना ( The concept of Authority )

व्यक्तीला संकल्पनाचे स्वातंत्र्य असते हे नीतिशास्त्रातील एका महत्त्वाचे गृहीतक मानले जाते. जर व्यक्ती कृती करण्यास स्वतंत्र असेल तर व्यक्तीला नैतिक जबाबदार ठरवता येते. कांट या जर्मन तत्त्ववेत्त्याच्या मतानुसार स्वातंत्र्य म्हणजे, आपण कसे वागू शकतो याची निवड करण्यास समर्थ असतो. परंतु वुल्फच्या मतानुसार केवळ निवड करू शकणे हे नैतिक जबाबदारीस पुरेसे नाही तर विचार प्रणालीचा वापर करणे. आपण काय करावयास हवे याची जाणीव असणे, याचा विचार करणे आवश्यक आहे.

प्रत्येक व्यक्ती ज्याला संकल्पनाचे स्वातंत्र्य आहे आणि जो विचार करू शकतो.तशा कृतींसाठी जबाबादारी स्विकारणे हे त्याचे कर्तव्य ठरते. जबाबदार व्यक्ती हे जाणत असते की आपण नैतिकतेने बांधले गेलो आहोत. नैतिकतेचे बंधन आपल्यावर आहे. अर्थातच तो हे ही जाणतो की हे नैतिकतेचे बंधन कुठल्या बाह्य घटकांनी किंवा व्यक्तीने लादलेले नसते तर आपण आपणावर लादून घेतलेले असते.तो दुसऱ्यांनी दिलेला सल्ला ऐकून घेईल पण नेमके काय करायला हवे हे तो स्वतः ठरवितो. तो नैतिक निर्णय घेतो. तो स्वतः स्वतःसाठी कायदा करतो म्हणजे तो स्वायत्त असतो.

कांटच्या मतानुसार, नैतिक स्वायत्तता म्हणजे स्वातंत्र्य आणि जबाबदारीचे मिश्रण. स्वतः बनलेल्या कायद्याचे पालन करणे, स्वायत्त व्यक्ती ही कधीच इतरांच्या मर्जीनुसार वागत नसते. इतरांनी काही सांगितलेले ती व्यक्ती ऐकेलही परंतु दुसऱ्यांनी सांगितले म्हणून नाही तर स्वतःला पटले तरच ती ऐकेल.

जबाबदारी स्वीकारणे म्हणजे आपण काय करावयास हवे याबाबतीत अंतिम निर्णय घेणे. प्रत्येक व्यक्ती तिच्या कृतीसाठी जबाबदार असते. स्वायत्त व्यक्ती ही नेहमी स्वतःच्या मर्जीप्रमाणे वागते. जरी कधी इतरांची आज्ञा मानत असली तरी ती आज्ञा स्वीकारत असताना त्याने पूर्ण विचार केलेला असतो. त्या परिस्थितीत ती आज्ञा मानणे त्याला योग्य वाटते. अर्थातच दुसऱ्या व्यक्तीने दिलेली आज्ञा मानत असताना त्या व्यक्तीचा आपल्यावर अधिकार आहे असे मानत नाही.

आपणास असे आढळते की, राजकारणात व रोजच्या जीवनात माणूस त्याची स्वायत्तता गमावत असतो. त्याचीही कारणे असतात. परंपरेचा पगडा, नोकरशाहीचा पगडा असतो. त्याच्यावर राज्य करणारे तथाकथित राजकारण्यांमुळे त्याला तसे करावे लागते.

साधारणपणे मानवी इतिहासात आदेशाचे पालन करणाऱ्यास आवाहन देणारी व्यक्ती दुर्मिळतेने सापडते. प्लेटोच्या मते, राज्यकर्ते ज्ञानात, शहाणपणात श्रेष्ठ असतात म्हणून लोकांनी त्यांच्या आदेशाचे पालन करावे.

## ११.३.३ अधिकार आणि स्वायत्तता यातील संघर्ष :

अधिकार गाजवण्याचा आणि इतरांवर राज्य करण्याचा हक्क हे कोणत्याही राज्याचे वैशिष्ट्यपूर्ण लक्षण आहे. तर स्वतःवर राज्य करून घेण्यास नकार देणे आणि स्वायत्तता प्राप्त

करणे हे मानवाचे प्राथमिक कर्तव्य आहे.

जोपर्यंत मानवाला स्वतःच स्वतःचे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य त्याच्याकडे असते तोपर्यंत कोणीही व्यक्तीने किंवा राज्याने त्याच्यावर अधिकार गाजवण्यास तो विरोधच करतो. याचाच अर्थ राज्याचे कायदेपालन करणे हे त्याचे कर्तव्य आहे. (कारण ते कायदे आहेत हेच तो मानत नाही.) अराज्यवादी विशिष्ट काळापुरता कायद्याची आवश्यकता मान्य करील राज्य ही कल्पना पूर्णपणे नाहीशी करण्याबाबत तो साशंक असेल. परंतु तो कधीही हे मान्य करणार नाही की राज्याने दिलेल्या आज्ञा या त्याला मान्य असतात. अर्थात सर्वच अधिकारशाही ही बेकायदेशीर असते. वुल्फच्या मतानुसार जर सर्वच माणसांचे सर्वोच्च स्वायत्तता प्राप्त करणे हे जर कर्तव्य असेल तर कोणत्याही राज्यातील लोकांना त्यांचे आदेश पालन करण्याचे नैतिक कर्तव्य असणार नाही.

अराज्यवादींनी स्वायत्ततेला महत्त्व दिले. याशिवाय प्रत्येकाचे एक कर्तव्य ठरते की, त्याला जे योग्य वाटते ते त्याच्या विचारानुसार त्याने वागावे राज्य हे लोकांवर आपला अधिकार गाजवतात, त्या अधिकारांचे पालन लोकांनी करावे अशी अपेक्षा बाळगतात. लोकांनी न पटणाऱ्या आदेशांचे त्यांनी पालन करावे ते त्यांचे कर्तव्य आहे असे ते मानतात. राज्याच्या आदेशाचे पालन करून नैतिक स्वायत्तता मिळविणे हे श्रेष्ठ आहे. कोणत्याही राज्यांच्या लोकांवर नैतिक अधिकार नाही म्हणून राज्य हे असमर्थनशील आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) वुल्फ यांची अधिकार आणि स्वायत्ततेची संकल्पना स्पष्ट करा.

..................................................................................
..................................................................................
..................................................................................
..................................................................................

## ११.४ अराज्यवादाचे मूल्यमापन :

राज्यविरहित समाज हा एक आदर्श अराज्यवाद्यांच्या समोर होता. त्यांची भूमिका अतिरेकी स्वरूपाची वाटते कारण समाजासाठी राज्यसंस्था वा शासनसंस्था नको असे जरी काही टीकाकार म्हणत असले तरी समाजासाठी व तिच्या रक्षणासाठी प्रामुख्याने राज्यसंस्थेची आवश्यकता आहे. अराज्यवाद्यांच्या हिंसात्मक धोरणावर टीकाकार आक्षेप घेतात. हिंसेतून हिंसा उत्पन्न होते. हिंसात्मक समाज निर्माण होऊन तो नाहिसा करणे व त्यातून शांततावादी समाजव्यवस्था निर्माण होईल हे योग्य वाटत नाही. याउलट हिंसात्मक धोरणामुळे समाजातील विकृती नष्ट होईल व राज्यरहित समाजव्यवस्थेचे वातावरण होईल हा अराज्यवाद्यांचा आशावाद भोळसट आहे.

अनेक अराज्यवादी विचारांच्या चळवळी या निष्प्रभ झालेल्या आहेत. त्यांच्या अराज्यवादी विचाराला वैयक्तिक दहशतवादाचे रूप आलेले पहावयास मिळते.अर्थात अराज्यवाद्यांचे विचार समाजात प्रसूत न झाल्यामुळे त्यांच्या विचारांचा पराभव झालेला आहे. सामाजिक विषमता व त्यातून निर्माण होणारे अनेक प्रश्न जरी अराज्यवाद्यांचे विचार जहाल वाटत असले तरी ते आधुनिक काळात आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील दोषांमुळे असह्य आहेत. अर्थात अराज्यवाद्यांची मते काही विशिष्ट मर्यादेपर्यंत मान्य झाली तरी सामाजिक, आर्थिक, नैतिक दोष राज्यसंस्थेकडून दूर होतील ही अपेक्षा करणे चूक आहे. सामाजिक, आर्थिक व नैतिक समस्या वा अडचणी या राज्यसंस्थेकडून नाहिशा होऊ शकणार नाहीत कारण राज्यसंस्थेच्या मूळाशी शोषण व दडपशाही असते. माणसामाणसातील संबंध हा क्रमाक्रमाने खालपासून ते वरपर्यंत सर्वोच्च अशा आंतरराष्ट्रीय सहकार्यापर्यंत संघटित होऊन नवीन समाजव्यवस्था प्रस्थापित

होईल ही अराज्यवाद्यांची कल्पना साकार होईल हा विचार स्वप्नवत राहिलेला आहे.

## क ) लोकशाही (Democracy)

### ११.५ प्रस्तावना :

लोकशाही एक राजकीय विचारप्रणाली म्हणून शासनाचा एक चांगला प्रकार आहे. लोकशाही केवळ शासनप्रकारच नाही तर ती एक जीवनपद्धती आहे. ही शासनपद्धती जनतेच्या संमतीवर आधारलेली आहे. लोकशाहीत आचार, विचार, उच्चार व संघटनेचे स्वातंत्र्य आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय ही लोकशाहीची प्रधान तत्त्वे आहेत. लोकशाहीचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष व अप्रत्यक्ष लोकशाहीचे संसदीय व अध्यक्षीय उप प्रकार असून भारतात संसदीय लोकशाही आहे तर अमेरिकेत अध्यक्षीय लोकशाही आहे. लोकशाहीत राज्यघटना, राजकीय पक्ष, जनतेचा सहभाग असतो.आज लोकशाहीला अनेक धोके व आव्हाने निर्माण झालेली असून लोकशाहीचे फायदे व तोटे आहेत. किंबहुना काही त्रूटी व आक्षेपही लोकशाहीवर घेतले गेले आहेत. त्यादृष्टीने लोकशाहीचा अर्थ, लोकशाहीचे प्रकार, लोकशाहीचे आदर्श (Ideals) इत्यादींचा अभ्यास आवश्यक आहे.

### ११.६ लोकशाहीचा अर्थ व व्याख्या

लोकशाही एक जुनी संकल्पना आहे. लोकशाहीला इंग्रजीत Democracy असे म्हणतात. लोकशाही ही संकल्पना ग्रीक देशामधील असून यात Demos म्हणजे लोक आणि Kratos म्हणजे राज्य यावरून 'लोकांचे राज्य' म्हणजे डेमॉक्रसी असा ग्रीक शब्द तयार झाला. लोकशाहीची सर्व वैशिष्ट्ये प्रकट करणारी व्याख्या करणे कठीण आहे. परंतु लोकशाही या संज्ञेचा अर्थ आणि तिचे स्वरूप समजून घेण्यासाठी काही महत्त्वाच्या व्याख्या अभ्यासणे आवश्यक आहे.

**अब्राहम लिंकन** : ''लोकांचे, लोकांकडून व लोकांसाठी चालविलेले राज्य म्हणजे लोकशाही होय.''

**जे.एस. मिल्ल** : ''लोकशाही म्हणजे असा शासनाचा प्रकार जेथे सरकार बहुमताच्या हातात असते. प्रत्यक्ष सरकारी कारभार समाजाने निवडून दिलेल्या प्रतिनिधींद्वारे चालविला जातो.'' हे प्रतिनिधी ठराविक कालावधीनंतर होणाऱ्या निवडणुकांद्वारे निवडले जातात.

**ऑक्सफर्ड शब्दकोशात** लोकशाहीचा दिलेला अर्थ हा उद्‌बोधक आहे. ''लोकशाही म्हणजे अशी शासनयंत्रणा जी लोकांनी निवडलेले प्रतिनिधी चालवतात.''

या सर्व व्याख्यांपेक्षा 'लोकांचे सार्वभौमत्त्व' हे लोकशाहीत महत्त्वाचे असते.

### ११.७ लोकशाहीचे पैलू :

लोकशाहीचे अनेक प्रकार आहेत तसेच तिचे अनेक वैशिष्ट्ये आहेत. संसदीय लोकशाही, अध्यक्षीय लोकशाही पक्षरहित लोकशाही, औद्योगिक लोकशाही, समाजवादी लोकशाही, लोकांची लोकशाही इत्यादी प्रत्येक देशातील लोकशाहीचे स्वरूप भिन्न असून संस्थात्मक रचना वेगळी असू शकते. आजच्या लोकशाहीला राजकीय, आर्थिक, सामाजिक नैतिक व धार्मिक

पैलू प्राप्त झाले असून त्याचा अभ्यास करावा लागतो.

**राजकीय पैलू** : लोकशाहीच्या या पैलूत राजकीय सत्तेत सर्वांचा वाटा असतो. इतरांच्या मताचा आदर, विरोधी पक्षांची टीका सहन करण्याची सहनशीलता, टीकाटिप्पणी महत्त्वाचे असतात. याशिवाय नागरिकांना मूलभूत हक्क घटनेने दिलेले असतात.

आपल्या राज्यघटनेने अल्पसंख्यांक समाजाला शैक्षणिक व सांस्कृतिक हक्क दिले आहेत.

**सामाजिक पैलू** : केवळ राजकीय लोकशाही असून चालत नाही तर त्याच्याबरोबर सामाजिक लोकशाहीची आवश्यकता असते. या पैलूत व्यक्तिची प्रतिष्ठा महत्त्वाची मानली जाते. व्यक्तिला सर्व क्षेत्रात मान मिळाला पाहिजे. तिच्या आवडीनिवडीप्रमाणे कोणत्याही संघटनेचे सभासद होता आले पाहिजे. जात, धर्म, वंश यावर आधारित कोणत्याही व्यक्तिवर अन्याय होता कामा नये.

**आर्थिक पैलू** : लोकशाहीत आर्थिक पैलू एक महत्त्वाचे अंग आहे. या पैलूत गरीब आणि श्रीमंत यातील दरी कमी व्हावी असे अपेक्षित असते. यात भूकेपासून मुक्तता, रोजगाराच्या संधी, आर्थिक विकास अपेक्षित असतो. कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वेतन, सार्वजनिक आरोग्य सेवा, महिलांना बाळंतपणाची रजा इ. गोष्टींचा अंतर्भाव या पैलूत येतो.

### आपली प्रगती तपासा

१) लोकशाहीची व्याख्या द्या.

.................................................................................................................

.................................................................................................................

.................................................................................................................

.................................................................................................................

२) लोकशाहीचे विविध पैलू सांगा.

.................................................................................................................

.................................................................................................................

.................................................................................................................

.................................................................................................................

## ११.८ लोकशाहीचे प्रकार - प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष लोकशाही :

अब्राहम लिंकनने लोकशाही ही एक आधुनिक काळातील एक राजकीय विचारप्रणाली म्हणून संकल्पनात्मक दृष्टीने विचार मांडला. त्याच्या मते ''लोकांचे, लोकांकडून व लोकांसाठी चालविलेले शासन म्हणजे लोकशाही होय.'' वरील व्याख्येतील तीन पैलूंपैकी लोकांकडून (By the People) हा घटक महत्त्वाचा आहे. लोक स्वतःच राज्यकर्ते असतात. या स्पष्टिकरणाविषयीच्या अनेक समस्या आहेत. प्राथमिकतया राज्यकर्ते आणि शासनकर्ते यामध्ये भेद नाही. दुसरे म्हणजे लोक स्वतःच राज्यकर्ते असतील तर तेथे राजकीय पक्ष असणार नाहीत. तिसरा मुद्दा म्हणजे शासन आणि नागरी समाज (Civil Society) यातही भेद नव्हे. निर्णायक मुद्यानुसार कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ आणि न्यायमंडळ यांच्या कार्यामध्ये विभक्तपणा नाही. कारण त्यांचे लोकप्रशासनावर नियंत्रण असते.

लोकशाहीचा अन्वयार्थ हा अभिजात (Classical) दृष्टीने घेतला तर त्याचा अर्थ प्रत्यक्ष लोकशाही होय. प्राचीन ग्रीसदेशात छोटी नगरराज्ये होती. त्या नगरराज्यात प्रत्यक्ष

लोकशाही अस्तित्त्वात होती. प्रत्यक्ष लोकशाहीत व्यक्तिशः सर्व लोक राजकीय धोरणे, शासनासंबंधीचे निर्णयात सहभागी होतात. नगरराज्यात राजकीय अधिकार असणाऱ्यांची संख्या लहान असल्यामुळे त्यांना प्रत्यक्ष निवडणुकीचा हक्क असतो किंवा हे लोक शासनकर्त्यांना पदच्युतही करतात. प्रत्यक्ष लोकशाहीत ही गोष्ट चांगली असली तरी काही समस्या निर्माण होतात. आधुनिक काळात प्रत्यक्ष लोकशाही व्यवहार्य नाही कारण लोकसंख्या अधिक वाढल्यामुळे लोक राजकीय समस्येविषयी अनभिज्ञ असतात. ते त्यांच्याविषयी स्वतः जागृत किंवा शिक्षित नसतात. लोकशाही प्रक्रियेतील हा एक अडथळा म्हणावा लागेल. प्रत्यक्ष लोकशाहीच्या ह्या समस्या आहेत. म्हणूनच आपण उदारमतवादी (Liberal) लोकशाहीला मान्यता देतो. ही लोकशाही अप्रत्यक्ष लोकशाही म्हणून संबोधली जाते. या लोकशाहीत स्वाभाविकतः लोकांना प्रतिनिधित्त्व असते. लोक प्रतिनिधींमार्फत शासनकर्त्यांना निवडून देतात. हे प्रतिनिधी धोरणे ठरविणारी असतात, व प्रतिनिधी लोकांना जबाबदार असतात. म्हणून ही अप्रत्यक्ष लोकशाही आहे. अप्रत्यक्ष लोकशाही ही दोन प्रकारची असून **संसदीय लोकशाही** ही भारतात आहे तर **अध्यक्षीय लोकशाही** अमेरिकेत आहे. अप्रत्यक्ष लोकशाहीत लोकप्रतिनिधी बहुमताच्या जोरावर सत्ता काबीज करून, बहुमताच्या जोरावर अल्पसंख्याकांवर दादागिरी न करता लोकशाही शासन व्यवस्थेत त्यांना खास अधिकार दिलेले असतात.

**आपली प्रगती तपासा**

१. लोकशाहीचे प्रकार स्पष्ट करा.

.......................................................................................................................

.......................................................................................................................

.......................................................................................................................

.......................................................................................................................

## ११.९ लोकशाहीचे आदर्श

लोकशाहीचे अनेक आदर्श आहेत काही आदर्श म्हणून १) जनतेचा सहभाग, २) समता ३) जबाबदारी ४) सत्तेचे विभाजन ५) नागरी स्वातंत्र्य ६) बंधुभाव ७) न्याय इ. आदर्श आहेत. लोकशाहीची स्वातंत्र्य, समता, बंधुभाव व न्याय ही मूल्ये म्हणूनही ओळखली जातात. वरील दिलेल्या आदर्शांची व्याप्ती व विस्तार विविध प्रकारचा असून लोकशाहीप्रणीत राज्यांमध्ये ती भिन्न भिन्न प्रकारची असतात. हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. लोकशाहीमध्ये लोक एक तर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या निर्णयप्रक्रियेत सहभागी होतात. या प्रक्रियेत कोण अंतर्भूत असतात?. कोण निर्णय घेतात आणि निर्णय काय होतात? हे सर्व लोकशाही मार्गाने होत असतात याचे समर्थन दोन प्रकारांनी करता येते.

**१) साधनात्मक समर्थन**

**२) साध्यात्मक समर्थन**

**१) साधनात्मक समर्थन** - हे लोकशाही निर्मितीच्या अंतिम निष्पत्तीवर लक्ष केंद्रित करते. ते योग्य कायद्यांविषयी आणि धोरणांविषयी बोलतात कि ज्याचे सकारात्मक परिणाम व्यक्तिच्या चारित्र्यावर पडतात. कायदे व धोरणे निर्णयाप्रत आणण्याकरिता अनेक लोक एकत्र बसून किंवा चर्चेद्वारे आणि लोकांच्या प्रतिक्रिया मागावून त्याद्वारे निर्णय घेतले जातात. त्याचा सकारात्मक परिणाम चारित्र्यावर होतो. व्यक्तिनिरपेक्ष ध्येय, सामुहिकता किंवा ऐक्यता आणि देशभक्ती यांना उत्तेजन देणे, पुष्कळ वेळा अनेकांच्या मनात एकत्र काम करताना काही समस्या या

परिस्थितीजन्य कारणामुळे तयार होतात. त्याचा परिणाम लोकशाहीच्या निष्पत्तीवर होऊन ती अधिक गुंतागुंतीची होते. सर्व लोकप्रतिनिधी हे राज्याकरिता किंवा देशाकरिता बौध्दिकदृष्ट्या वैचारिक तयारीचे आणि योग्य निर्णय घेणारे असतीलच असे नाही.

२) **साध्यात्मक समर्थन** - हे लोकशाहीमधील अंतिम निर्णय साध्य होण्यावर लक्ष केंद्रित करते. या प्रक्रियेत काही मूल्य अंतर्भूत होतात. जसे राजकीय स्वातंत्र्य, आत्म-वास्तविकीकरण, समता, सामुहिक ऐक्य इ. राजकीय स्वातंत्र्य म्हणजे स्वयंशासित स्वातंत्र्य होय. त्याचा अर्थ कोणावरही सत्ता गाजविणे किंवा निर्दयपणे हुकूमत चालविणे नव्हे. राजकीय सहभागाद्वारे मानवी मूल्य म्हणून आत्मवास्तविकीकरण (Self-realisation) संपादित करावयाचे असते. हेच लोकशाहीत महत्त्वाचे असते. या मूळ संकल्पनेवरच ॲरिस्टॉटलने प्रामुख्याने भर दिला आहे. विचार व निर्णयप्रक्रिया वा साधकबाधक गोष्टींची चर्चा हे मानवाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. लोकशाहीत सर्व लोकांना राजकीय कल्याण साध्य करण्यासाठी व सहभागी होण्याची समान संधी दिलेली आहे.

**आपली प्रगती तपासा**

१) लोकशाहीचे आदर्श कोणते आहेत?

२) लोकशाहीबद्दल केले जाणाऱ्या दोन प्रकारच्या समर्थनाचे वर्णन करा.

..................................................................................................................

..................................................................................................................

..................................................................................................................

..................................................................................................................

## ११.१० लोकशाहीचे गुण (फायदे) व दोष (तोटे)

लोकशाही एक राजकीय विचारप्रणाली आहे. ती समतेच्या तत्त्वाची शाश्वती देते. प्रत्येकाला समतेचा हक्क दिलेला आहे.मतदानाचा अधिकार दिलेला आहे. आज या लोकशाही शासनव्यवस्थेविषयी कौतुक होत असले तरी तिचे काही गुण (फायदे) व काही दोष (तोटे) आहेत.

### ११.१०.१ लोकशाहीचे गुण :

१) **समानता** : लोकशाहीत सर्वांना संधीची समानता, कायदयाचे समान रक्षण, धर्म, जात, पंथ, वंश यावर आधारित भेदभाव केलेला नसतो. कोणावरही अन्याय होणार नाही याची खात्री दिलेली असते.

२) **स्वातंत्र्य** - लोकशाहीत प्रत्येकाला विचार, अविष्कार, उच्चार स्वातंत्र्य दिलेले असते. त्याचप्रमाणे धार्मिक स्वातंत्र्य, नोकरी वा व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य, देशात कोठेही जाण्याचे व स्थायिक होण्याचे स्वातंत्र्य दिलेले असते.

३) **स्थैर्य :** लोकशाहीत बहुमत असलेल्या पक्षाकडे सत्ता असते. बहुमतातील राजकीय पक्षाकडे सत्ता आल्यास त्यांना स्थैर्य प्राप्त होते. कारण शासनाच्या मागे बहुसंख्य समाज असतो.

४) **संवेदनशील सरकार** : लोकशाहीत सरकार मतदारांना जबाबदार असतेच. त्याचप्रमाणे समाजात वेळोवेळी होणाऱ्या बदलांबद्दल सरकारला संवेदनशील असावे लागते.

५) **सर्वांची प्रगती :** आज जगात सर्व लोकशाही देशात कल्याणकारी शासन ही संकल्पना मान्य झालेली आहे. याचा व्यावहारिक अर्थ म्हणजे शासन सर्वांची प्रगती साधण्यास वचनबद्ध आहे.

६) **जागतिक शांतता :** लोकशाहीत शांततापूर्ण सहजीवन खूप महत्त्वाचे आहे. लोकशाही राष्ट्रे ही जागतिक शांततेसाठी प्रयत्नशील असतात.

**११.१०.२ लोकशाहीचे दोष (तोटे) :**

१) **मूठभरांच्या हातात सत्ता :** लोकशाहीत बहुसंख्यांक असलेल्या पक्षाची सत्ता असते. एखाद्या राजकीय पक्षाचा अभ्यास केला तर साऱ्या पक्षाची सत्ता ही ज्येष्ठ नेत्याच्या हातात एकवटलेली दिसून येते. अर्थात ही परिस्थिती लोकशाहीत धोक्याची आहे. कारण राजकीय नेते स्वतःला हव्या त्या गोष्टी करू पाहतात.

२) **अज्ञानी वर्गाची सत्ता :** लोकशाहीत अज्ञानी लोक निवडणुकीला उभे राहून तेथील जनता त्याला आपला प्रतिनिधी म्हणून निवडून देतात. अशा नेत्याला शासकीय कारभारातील गुंतागुंत समजत नाही. राजकारणात बेताचा रस असतो. स्वतःहून त्यांची बौद्धिक कुवत विकसित झालेली नसते.

३) **अकार्यक्षमता :** लोकशाहीत निवडून येणारे शासनकर्ते कर्तबगार व त्त्वरित निर्णय घेणारे असतीलच असे नाही. वादविवाद चर्चा इ. महत्त्वाच्या गोष्टीद्वारे निर्णय घेण्यास विलंब लागतो. साधे निर्णय घेण्याला वेळ जातो. परिणामी अकार्यक्षमता वाढते.

४) **भ्रष्टाचार :** राजकारणी नेत्याच्या हातात सत्ता गेल्यावर तो जनतेची दिशाभूल व पिळवणूक करतो. तसेच प्रशासकीय यंत्रणेत कमीअधिक प्रमाणात भ्रष्टाचार आढळतो. लोकशाहीत निवडणुका लढविणे खर्चिक झाले आहे. परिणामी प्रत्येक राजकीय पक्षाला भ्रष्ट मार्गाचा वापर करावा लागतो. कारण निवडणुका वरचेवर घ्याव्या लागतात व त्या अधिक खर्चिक झाल्या आहेत. हिटलरने तर लोकशाहीला मूर्ख, भ्रष्टाचारी व मुग्यांच्या पावलाने चालणारी शासनपद्धती होय असे म्हटले आहे.

५) **समतेचे अव्यवहार्य तत्त्व** : लोकशाहीत समतेचे तत्त्व बुद्धिला न पटणारे व अव्यवहार्य आहे. त्यामुळे समतेच्या तत्त्वाची पातळी खालावत चालली दिसते. प्रचाराच्यावेळी जनतेच्या मनात असुरक्षितता निर्माण करतात. लोकांचा पाठिंबा मिळविण्यासाठी नैतिक विचारांना व मूल्यांना बाजूला ठेवले जाते.

६) **पक्षशिस्तीचा बडगा :** स्वतंत्र विचारशक्ती ही पक्षशिस्तीच्या बडग्यामुळे मागे पडते. अशा परिस्थितीत लोकशाही ही केवळ तांत्रिक स्वरुपाची असते. असे टीकाकारांचे म्हणणे आहे. लोकशाहीत धनिकच निवडणुका लढवतात व निवडून आल्यावर आपल्या वर्गाला सोयीचे असे कायदे करतात. शासन चालविण्याचे काम तांत्रिक स्वरुपाचे व किचकट असते. लोकप्रतिनिधी हे हस्तक्षेप करतात व शासकीय कामकाज धीम्यागतीने होते.

वर उल्लेख केलेले लोकशाहीचे गुण-दोष (फायदे-तोटे) यांची चर्चा केली.

लोकशाहीत काही दोष वा तोटे असल्यास लोकशाही फेकून द्या व त्याऐवजी हुकूमशाही, लष्करशाही वा अन्य राजकीय विचारप्रणाली आणा असा त्याचा अर्थ नव्हे. लोकशाहीतील दोष वा तोटे कमी करत जाणे हे आपले उद्दिष्ट असावे.

**आपली प्रगती तपासा**

१) लोकशाहीचे गुण दोष सांगा.

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

## ११.११ सारांश

राजकीय विचारप्रणालींमध्ये अराज्यवाद आणि लोकशाही ह्या महत्त्वाच्या विचारप्रणाल्या होत. अराज्यवाद म्हणजे स्वातंत्र्य, परस्परांविषयी प्रेम व सहकार्य हे अंतर्भूत असून प्रत्येक व्यक्ती आपली शासक राहते. अराज्य याचा अर्थ व्यक्तीव्यक्तीत, राज्याराज्यात, राष्ट्राराष्ट्रात जे व्यवहार करावायचे ते स्वयंस्फूर्त व सहकार्यावर आधारलेले असले पाहिजे, अशा समाजव्यवस्थेत राज्यसंस्थेची गरज असू नये. सर्व मानवी संबंधीच्या क्षेत्रात न्याय प्रस्थापित करणे होय. रॉबर्ट वुल्फ यांनी अराज्यवादी विचारसरणीची मांडणी करून ते राज्याचे अधिकार नाकारताना नैतिक जबाबदारीची संकल्पना, स्वायत्ततेची संकल्पना अधिकार आणि स्वायत्तता यामधील संघर्षाचा आधार घेतात. राज्य हे असमर्थनशील असून त्याने स्वायत्ततेला महत्त्व दिले. रॉबर्ट वुल्फ अधिकार, शक्ती किंवा बल यातील फरक स्पष्ट करतात. बलात धमकीचा वापर तर अधिकारात आज्ञेचे पालन करावयाचे असते. आज्ञा देणारा हा फक्त आपल्या कर्तव्याची जाणीव करून देतो. वुल्फच्या मते व्यक्तीला संकल्पनेचे स्वातंत्र्य असते. जर व्यक्ती कृती करण्यास स्वतंत्र असेल तर व्यक्तीला नैतिक जबाबदार ठरविता येते. कारण ती नैतिकतेचे बंधन आपल्यावर आहे परंतु ते कोणीही आपल्यावर लादलेले नाही. अराज्यवादात राज्यविरहित समाज हा एक आदर्श आहे. त्यांची ही भूमिका अतिरेकी स्वरूपाची असून व्यक्तिव्यक्तित, राज्याराज्यात, राष्ट्राराष्ट्रात सहकार्य प्रेम व स्वातंत्र्य यावर आधारलेले असतील ही त्यांची कल्पना साकार होईल हा विचार स्वप्नवत राहिलेला आहे.

लोकशाही एक राजकीय विचारप्रणाली असून तो शासनाचा एक चांगला प्रकार आहे. लोकशाही फक्त शासनप्रकारच नाही तर लोकशाही ही एक जीवनपद्धती आहे. लोकशाहीचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष लोकशाही असे दोन प्रकार असून अप्रत्यक्ष लोकशाहीचे संसदीय व अध्यक्षीय असे प्रकार पडतात. भारतात संसदीय लोकशाही तर अमेरिकेत अध्यक्षीय लोकशाही आहे. लोकशाहीत अशी शासनयंत्रणा आहे की जी लोकांनी निवडलेले प्रतिनिधी चालवतात. लोकशाहीत **'लोकांचे सार्वभौमत्त्व'** महत्त्वाचे असते. लोकशाहीचे राजकीय, सामाजिक व आर्थिक नैतिक, धार्मिक असे महत्त्वाचे पैलू आहेत. लोकशाहीचे अनेक आदर्श (Ideals) असून त्यातले काही जनतेचा सहभाग, समता, स्वातंत्र्य, जबाबदारी, सत्तेचे विभाजन, न्याय इ.

आदर्श आहेत. लोकशाहीमध्ये सर्व लोकांना विकासाची समान संधी दिलेली आहे. लोकशाही शासनाचा चांगला प्रकार असला तरी तिचे काही गुण दोष आहेत. त्यापैकी लोकशाहीचे दोष (तोटे) कमी करणे हे आपले उद्दिष्ट असले पाहिजे.

## ११.१२ विद्यापीठीय दिर्घोत्तरी प्रश्न

१) अराज्यवाद म्हणजे काय ते सांगून रॉबर्ट पॉल वुल्फचा अराज्यवादी सिद्धांत स्पष्ट करा.

२) लोकशाहीचा अर्थ सांगून लोकशाहीचे प्रकार स्पष्ट करा.

३) लोकशाही म्हणजे काय? लोकशाहीचे आदर्श (Ideals) कोणते आहेत ते सांगून लोकशाहीविषयी केल्या जाणाऱ्या समर्थनाचे वर्णन करा.

४) लोकशाहीचे स्वरूप सांगून तिचे गुणदोष स्पष्ट करा.

५) टीपा लिहा

१) अराज्यवाद

२) स्वायत्ततेची संकल्पना - रॉबर्ट पॉल वुल्फ

३) प्रत्यक्ष लोकशाही व अप्रत्यक्ष लोकशाही

४) लोकशाहीचे आदर्श (Ideals)

५) लोकशाहीचे समर्थन

❖❖❖

# १२

# न्याय

## (Justice)

### जॉन रॉल्स व डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

**घटक रचना**


१२.०० उद्दिष्ट्ये

१२.०१ प्रस्तावना

१२.०२ जॉन रॉल्सची न्यायाची संकल्पना

१२.०३ डॉ. आंबेडकरांचे सामाजिक न्यायाचे तत्त्व

१२.०४ सारांश

१२.०५ विद्यापिठीय दिर्घोतरी प्रश्न


## १२.०० उद्दिष्ट्ये :-

१. न्यायाच्या संकल्पनेचा अभ्यास करता येईल.

२. जॉन रॉल्सची न्यायाची संकल्पना समजून घेता येईल.

३. डॉ. आंबेडकरांचे सामाजिक न्यायाचे तत्त्व अभ्यासता येईल.

## १२.०१ प्रस्तावना :-

न्याय ह्या शब्दाचा अर्थ शब्दशः अर्थ 'जोडणे, बसवणे, एकत्र बांधणे' असा होतो. परंतु त्याचा लाक्षणिक अर्थ मनुष्य जातीला समाजात योग्य जागी जोडणाऱ्या वा बसणाऱ्या सामाईक परंपरा असा होतो, म्हणजेच लोकांना बंधनकारक असणाऱ्या नियमांचा संच असा अर्थ आहे. हे नियम रूढीतून आलेले असोत किंवा विधीमंडळाने तयार केलेले असोत त्या नियमांना न्यायालये मान्यता देतात. अर्नेस्ट बार्कर यांच्या मतानुसार ''न्याय हा मुल्यांचा मेळ घालणारा वा समन्वय साधणारा असतो. तो त्या मूल्यांची व एकात्म समन्वीन पूर्णकृतीच असते.''

कोणत्याही समाजातील न्यायसंकल्पना ही जनसमुदायांच्या निकषांवर अवलंबून असते. हे सर्व निकष नैतिक सद्‌सदविवेकात अभिप्रेत असतात. आणि त्यातूनच कार्यान्वीत होतात. जेव्हा कायदा समाजाच्या सर्वसाधारण सदसदविवेकाच्या अपेक्षा पूर्ण करतो त्याचवेळी त्याच्या वैधतेला औचित्याची व मूल्यात्मकतेची जोड मिळते.

परंपरेने सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विषमतेवर आधारित समाजामध्ये आज सामाजिक न्यायाच्या संकल्पनेची ओढ आहे. समाजात ज्या वस्तूंची आणि सेवांची निर्मिती होते त्यांचे वितरण संपूर्ण समाजात योग्यप्रकारे झाले पाहिजे. सर्वांच्या अन्न, वस्त्र, निवारा इत्यादी मुलभूत गरजा शमल्या पाहिजेत आणि त्या गरजा भागविण्याचा प्रत्येकाला अधिकार असला

पाहिजे. त्याखेरीज ज्या वस्तू व सेवा निर्माण होतील त्यांचे समतेच्या, न्यायाच्या व रास्ततेच्या तत्त्वावर वाटप देखील झाले पाहिजे, हीच सामाजिक न्यायाची मुख्य सूत्रे आहेत.

न्याय ही संकल्पना अशा नैतिक नियमांचा संच आहे की, ज्यात मानवी कल्याणाच्या तत्त्वावर भर दिला आहे. ही जीवनातील मार्गदर्शक तत्त्वे होत. न्याय हे तत्त्व अत्यंत महत्त्वाचे असून ते म्हणजे प्रत्येकाला त्याचे जे देणे लागते ते देणे 'चांगल्यास चांगले' आणि 'वाईटास वाईट' हा ही अर्थ ह्या संकल्पनेत अभिप्रेत आहे. म्हणजेच योग्य कामास उत्तेजन व अयोग्य कामास दंड असाही 'न्याय' संकल्पनेचा अर्थ लावता येईल. न्याय ही संकल्पना समानतेवर अधिष्ठीत आहे. न्याय म्हणजे दुसऱ्याच्या कार्यात हस्तक्षेप न करणे व प्रत्येकाने आपले नेमून दिलेले काम चोख बजावणे. त्यामुळेच न्याय ही संकल्पना सामाजिक आहे. उलटपक्षी तो सामाजिक आदर्श आहे. व्यक्तींनी परस्परांशी जबाबदारीने कसे वागावे हे सांगणारा तो एक आदर्श आहे. यात स्वातंत्र्य आणि समता या गोष्टी अंतर्भुत आहेत. प्लेटो म्हणतो न्याय हा एक सद्‌गुण आहे.

प्लेटोचे 'समाज म्हणजे व्यक्तीचेच अविष्करण' हे सूत्र पकडून ॲरिस्टॉटल, सेन्ट ऑगस्टीन, सेन्ट थॉमस ॲक्वायनस, जॉन लॉक, रूसो, जेरेमी बेंथॅम, जे. एस. मिल्ल इत्यादी विचारवंतानी समाज रचना व त्यात अनुस्थुत असलेल्या नीती तत्त्वांवर किंवा न्याय तत्त्वांवर विविध प्रकारे चिंतन करून आपापल्या विचार प्रणाल्या मांडल्या आहेत. या सर्वांच्या पार्श्वभूमिवर अगदी अलिकडील काळात म्हणजेच विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जॉन रॉल्सने त्याची न्याय विषयक विचार प्रणाली मांडली.

## १२.२ जॉन रॉल्सची न्यायाची संकल्पना :-

न्याय विषयक मीमांसेची आपली पहिली मांडणी जॉन रॉल्सने १९५८ मध्ये 'Justice as fairness' या निबंधाद्वारे केली. १९७२ मध्ये त्यांनी 'A theory of Justice' हा ग्रंथ प्रसिद्ध केला. हा ग्रंथ सामाजिक न्याय या संकल्पनेवर भाष्य करतो. न्याय संकल्पनेद्वारे लोकशाहीतील समाजरचना आदर्श कशी होऊ शकते ह्याचे उत्तम विवरण या ग्रंथात केले आहे.

अंतः प्रज्ञावाद आणि उपयुक्ततावाद या सर्वांशी स्पर्धाकरून स्पर्धेत टिकून राहील अशी प्रणाली तयार करणे या उद्देशाने प्रेरित होऊन जॉन रॉल्सने त्याच्या प्रणालीची आखणी केली आहे. हे करण्यासाठी त्यांनी कांटच्या नीतिविषयक मीमांसेचा आधार घेतला आहे.

### १२.२.१ जॉन रॉल्सची दोन न्याय तत्त्वे :-

सामाजिक न्यायाची दोन तत्त्वे समाजाच्या मुलभुत रचनेत लागू करणे व त्याचा सहकारनिर्मितीसाठी उभारल्या जाणाऱ्या व्यवस्थेत किंवा त्यांच्या कार्यात अंतर्भाव करणे. रॉल्सची दोन न्याय तत्त्वे पुढीलप्रमाणे आहेत.

**तत्त्व पहिले :-**

सामाजिक व्यवहारात भागीदार होणाऱ्या किंवा त्यामुळे प्रभावित होणाऱ्या व्यक्तीला त्या संदर्भात जास्तीत जास्त स्वातंत्र्य असण्याचा हक्क असणे आणि तेवढाच मोकळीक असण्याचा हक्क इतर सर्वांनाही असणे. असा हक्क किंवा अधिकार निर्वेध असेल व एकाचा असा हक्क दुसऱ्या कोणच्याही अशा हक्कास कसलीही बाधा आणू शकणार नाही. म्हणजेच एकाचे स्वातंत्र्य

दुसऱ्याच्या स्वातंत्र्याशी पूर्णपणे सुसंगत असेल.

**तत्त्व दुसरे :-**

एखाद्या व्यवहारात जर काही सामाजिक वा आर्थिक विषमता असेल तर त्याचे समर्थन नियमन वा व्यवस्थापन हे अशा पद्धतीने केले गेले पाहिजे की ज्यायोगे,

अ. दोन्ही प्रकारच्या विषमता इतर सर्वांना सोयीच्या व हितावह व्हावयास हव्यात, आणि

ब. या सर्व विषमता अधिकारपदे व योग्यता स्थाने यांच्याशी निगडीत हव्यात. तसेच ही सर्व पदे व स्थाने अशी असतील की ती सर्वांना खुली असतील. जर तसे नसेल तर उद्भवणारी विषमता ही तत्त्वशून्य, तत्त्वहीन म्हणजेच स्वैर आणि मनमानीकृत अशी असेल.

पहिले तत्त्व समानता आणि स्वातंत्र्य या विषयीचे प्रतिपादन करतो, तर दुसरे तत्त्व विषमता असल्यास (आणि ती असणारच) ती विषमता न्याय स्वरूपात स्वीकारायची असेल तर तिचे स्वरूप कसे असावे याविषयी प्रतिपादन करते. स्वातंत्र्य व समता यांवर भाष्य करणारे पहिले तत्त्व प्रधान तत्त्व असून आणि दुसरे तत्त्व त्यापेक्षा थोडेसे कमी महत्त्वाचे वा गौण असे आहे. असे जॉन रॉल्स सांगतो. परंतु एकंदरित समाजरचनेची दृश्यमान होणारी ही दोन अंगे समानता आणि विषमता या दोन तत्त्वात विभागली गेली आहेत. पहिले तत्त्व नागरिकांच्या समान स्वातंत्र्याच्या हक्कांचे संरक्षण करते, तर दुसरे तत्त्व कोणत्या स्वरूपाच्या विषमता समाजात मान्य करता येतील याची कारण मिमांसा करते. या दोन तत्त्वांचा अभ्यास करताना असे लक्षात येते की, 'न्याय' या संकल्पनेत पुढील तीन महत्त्वाच्या संकल्पनेचा अंतर्भाव होतो.

१. स्वातंत्र्य

२. समानता

३. स्वःहितासाठी आणि सामाजिक हितासाठी केलेल्या सेवेचा मोबदला (विषमता)

स्वातंत्र्य हा प्रत्येकाचा अधिकार असून प्रत्येकाला स्वातंत्र्याची समान संधी देखील आहे. परंतु काही कारणास्तव जर एखाद्याचे स्वातंत्र्य हिरावून घेतले जात असेल तर त्याने त्यासाठी योग्य समर्थन करणे आवश्यक आहे. आणि असे का केले याचे त्यास स्पष्टीकरण देखील देता यायला हवे. जर तशाच प्रकारची परिस्थिती उद्भवल्यास तशीच वागणूक प्रत्येकास मिळणे गरजेचे आहे. प्रत्यक्षात कृती या नियमांनुसार केल्या जाव्यात असे अपेक्षित आहे. कोणत्याही कायदेप्रणालित असे गृहीत धरले जाते की त्यात सहभागी असणाऱ्या व्यक्तींना स्वातंत्र्याच्या समानसंधी उपलब्ध असतील, माझे कृतिस्वातंत्र्य हे दुसऱ्याच्या कृतिस्वातंत्र्याच्या आड येणार नाही हे पहाणे म्हणजेच न्याय पद्धतीने वागणे होय. व्यवहारातील ऋजुता, सरळपणा याचा समावेश अशा वागण्यात असतो. ऋजूतेने व सरळपणाने वागण्यात जो न्याय सामाविष्ट असतो तोच न्याय जॉन रॉल्सला देखील अभिप्रेत आहे. अशी ऋजूता, समानता व स्वातंत्र्य ज्यातून अविष्कृत होते ती न्यायच असते. हाच आशय पहिल्या तत्त्वात अंतर्भुत आहे. दुसऱ्या तत्त्वानुसार कोणत्या प्रकारच्या असमानतेला मान्यता दिली जाते ते स्पष्ट केले आहे. असमानता म्हणजे कायदे किंवा जबाबदाऱ्यामधील उद्भवणारी दरी होय.

**उदा.** प्रत्येकाची आर्थिक परिस्थिती समान असतेच असे नाही. तसेच प्रत्येकाला मिळणारा सामाजिक दर्जा ही सारखाच असतो असे नाही. प्रत्येकांच्या जबाबदाऱ्यांमध्येही समानता असतेच असे नाही. प्रत्येकाला मिळणारा समान दर्जा हाही सारखाच असतो असे

देखील नाही. प्रत्येकजण सरकारात समान कर भरतो असेही नाही. समाजात जसजसा प्रत्येक व्यक्तीचा दर्जा असतो तसेच त्याला मिळणारे अधिकारही वेगवेगळे असतात. कोणत्याही देशात त्या देशातील सर्वोच्च पदावर काम करणाऱ्या व्यक्तींना म्हणजेच राष्ट्रपती, पंतप्रधान राज्यपाल यांना काही विशिष्ट अधिकार आणि विशिष्ट कर्तव्य आखून दिलेली असतात व त्याबाबतीत कोणी आक्षेप घेत नाही. अशाप्रकारच्या भेदांना असमानता असे मानले जात नाही.

समाजात फायद्यांची जी वितरण प्रणाली विकसित केलेली आहे त्यात प्रत्येकाला समान संधी असावी असे अपेक्षित आहे. म्हणूनच सत्ता आणि संपत्तीचे वितरण समानतेने होणे गरजेचे आहे आणि तसे झाले नाही तर त्यावर आक्षेप घेता येतो. म्हणजेच सत्ता मिळविणे आणि संपत्ती मिळविणे यावर प्रत्येकाचा समान अधिकार आहे. अर्थातच असमानता ही तेव्हाच मान्य केली जाते. त्या असमानतेमुळे त्यात सहभागी असणाऱ्या व्यक्तीचा फायदाच होईल.

रॉल्सच्या मतानुसार असमानतेला मान्यता देण्याचा नियम प्रत्यक्ष व्यवहारात देखील लागू होतो. अर्थातच तो एक महत्त्वाचा मुद्दा मांडतो की, या असमानतेमुळे सर्व समाजातील घटकांचे हित साधले जाते. रॉल्स पुढील उदाहरणातून एक महत्त्वाचा मुद्दा मांडतो. तो असा की, समाजात काही विशिष्ट पदावर काम करणाऱ्या व्यक्तीना वेगळी खास वागणूक दिली जाते आणि त्यांना जे फायदे सोयी सुविधा व वागणूक मिळते ती इतरांना मिळत नाही. जरी ही खास वागणूक त्या पदांना मिळत असली तरी त्या पदांवर जाण्याची संधी सर्वांना समान उपलब्ध आहे. किंबहूना त्या पदावर चांगल्या हुशार व्यक्तींना आकर्षित करण्यासाठी हे विशेष फायदे त्यांना दिले जातात. म्हणूनच अशा पदांसाठी घेतली जाणारी स्पर्धा किंवा त्यासाठीची निवड प्रक्रिया ही प्रामाणिकपणाने न्याय मार्गाने होणे गरजेचे आहे. त्यातील स्पर्धकांची निवड ही संपूर्णता त्यांच्या पात्रतेनुसार, बुद्धीमतेनुसार आणि ज्ञान कौशल्यानुसार होणे आवश्यक आहे.

रॉल्स अशा समाजाची कल्पना करतो की, ज्यात विशिष्ट कार्यप्रणाली अस्तित्त्वात आहे. आणि सर्व व्यक्ती या स्वतःच प्रणालीत भाग घेण्यास उत्सुक आहेत. कारण या व्यवस्थेशी प्रामाणिक राहणे हे त्यांच्या फायद्याचे आहे. अर्थातच त्या व्यक्ती एकमेकांत गुंतलेल्या आहेत असे नाही जसे कुटुंबातील नाते संबंध वेगवेगळ्या प्रकारचे असतात. कुटुंबातील प्रत्येकजण एकमेकांच्या हिताचा विचार करत असतो व परस्परांविषयी प्रेम आदर असतो आणि ते एकमेकांप्रती असलेल्या कर्तव्याचे पालन देखील करत असतात. तसेच एकमेकांमध्ये रस घेत असतात. अशा कुटुंबरचनेवर आधारीत समाजाची कल्पना जॉन रॉल्स करतो की, त्या समाजातील व्यक्ती परस्परांमध्ये नाही तर काही विशिष्ट कारणांसाठी ते एकत्र येतात. तेव्हा ते एकमेकांना समजून घेतात. रॉल्सच्या मतानुसार, या व्यक्ती विचारशील असून त्यांना स्वतःचे हित कशात आहे. हे माहिती आहे. इतकेच नव्हे तर आपल्या विचारपद्धतीचा समाजावर परिणाम होतो हे ते जाणून आहेत. त्यामुळेच अशांना आपली व इतरांची परिस्थिती यात फरक समजू शकतो. म्हणूनच जॉन रॉल्स न्यायाच्या संकल्पनेत बुद्धीने वागण्याला महत्त्व देतो.

जॉन रॉल्सने लिहिलेल्या **'थिअरी ऑफ जस्टीस'** या पुस्तकावर बरीच चर्चा झाली आहे. त्याच्या मतानुसार न्याय ही नीतिमधील मध्यवर्ती संकल्पना असून त्यानें जुन्या राजकीय तत्त्वज्ञानातील सामाजिक करारांच्या संकल्पनेचे साह्य घेतले आहे. अगदी सुरुवातीच्या काळात संस्था निर्माण करताना माणसे ही करार करतात. आणि या करारांच्या आधारावर संस्थांचे समर्थन केले जाई. रॉल्सच्या मतानुसार या कराराचा उद्देश हा अधिकाधिक लोकांना जास्तीत जास्त सुख लाभावे हा नसून फायद्याचे योग्य प्रकारे वितरण व्हावे हा आहे. म्हणूनच करार

करताना त्यात व्यक्तीगत फायद्याचा विचार केलेला नसतो.

अज्ञानाच्या एका पडद्यामागे राहून माणसे विचार विनीमय करताना अशा परिस्थितीत अत्यंत समंजसपणे व विचाराने निवड करतात. यात फायद्याचे वितरण करताना असे बघितले जाते की, जी व्यक्ती हलाखीच्या परिस्थितीत किंवा वाईट परिस्थितीत आहेत त्यांना तिचा अधिक फायदा व्हावा. त्याचप्रमाणे सुस्थितीतील व्यक्तींना तेव्हाच जास्त फायदा मिळावा जेव्हा त्यांना मिळणाऱ्या फायद्याने वाईट परिस्थितीतील व्यक्तींचे अधिक कल्याण होईल.

उदाहरणार्थ एखाद्या उद्योजकाला तेव्हाच जास्तीत जास्त सोयी सुविधा मिळाव्यात की, ज्यामुळे अनेक व्यक्तींना रोजगार उपलब्ध होऊ शकेल. पुढील उदाहरणाच्या आधारे रॉल्स अधिक सुस्पष्टपणे आपले म्हणणे मांडतो, जर अधिक सुस्थितीतील माणूस शिकून शल्यविशारद झाला तर गरीब माणसांवर शस्त्रक्रिया करून तो त्यांचे प्राण वाचवू शकेल. अर्थातच रॉल्स म्हणतो. समाजात सर्वांनाच समानतेची वागणूक दिली जात नाही आणि ही गोष्ट तो स्विकारतो देखील म्हणूनच काहींना मिळणारी विशिष्ट वागणूक हे तो स्विकारतो देखील आणि त्याचे समर्थन देखील करतो.

न्याय संकल्पनेत जॉन रॉल्स नितिच्या तत्त्वाला अतिशय महत्त्व देतो. आपण कोणतीही गोष्ट करताना हे लक्षात ठेवायला हवे की, जी गोष्ट कोणीही करावी असे जर आपल्याला वाटत असेल तर तेवढीच आपणही करणे गरजेचे आहे. प्रस्तुत ठिकाणी या तत्त्वाचा विशेष संदर्भ हव्या असणाऱ्या गोष्टी समाजात कशा असाव्यात यांच्याशी आहे. या समाजात काही अधिक मुलभूत अधिकाराने प्रत्येक व्यक्तीस जगण्यासाठी आणि आपल्या हित प्राप्तीसाठी सारखाच अधिकार आहे. आपल्या निवडीसाठी विचार करण्याचे तत्त्व हे सारखेच आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१) जॉन रॉल्सच्या न्यायाची संकल्पना विशद करा.

...........................................................................................................

...........................................................................................................

...........................................................................................................

...........................................................................................................

## १२.३ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक न्यायाचे तत्त्व :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार असून त्यांनी स्वातंत्र्य, समता न्याय आणि बंधुता या मुल्यांना भारतीय राज्य घटनेत महत्त्वाचे स्थान दिले आहे ते घटना समितीतील मसुदा समितीचे अध्यक्ष होते. या तत्त्वांना अनुसरूनच भारतातील सर्व कायदे व नियम तयार करण्यात आले आहेत.

सामाजिक न्यायाचे तत्त्व स्पष्ट करताना आंबेडकर म्हणतात, ब्रिटीशांचे राज्य भारतावर आल्यापासून भारतीय समाज रचनेत अनेक प्रवाह आले. त्यामुळे पाश्चात्य संस्कृती आणि भारतीय मूल्ये यांत संघर्ष होऊ लागला. समता, स्वातंत्र्य, बंधुता, आर्थिक, सामाजिक, राजकीय, हक्क, स्त्री-पुरूष समानता, समाजातील सर्व व्यक्तींना विकासाची, शिक्षणाची, सरकारी सेवेत दाखल होण्याची संधी ही नवीन मूल्ये एका बाजूला पडली तर जन्मतःच

उच्चनीचता, श्रेष्ठ-कनिष्ठपणा, जातीप्रधान समाजरचना, शिक्षणापासून वंचीत असा समाजाचा मोठा वर्ग, वंश परंपरागत करावे लागणारे व्यवसाय, व्यक्ती विकासासाठी आवश्यक असलेली संधी न मिळणे आर्थिक विषमता, स्त्रीयांकडे पाहण्याचा अनुदार व दुषीत दृष्टीकोन या मूल्यांचे आचरण करणारा भारतीय समाज दुसऱ्या बाजूला निर्माण झाला.

डॉ. आंबेडकरांनी सर्वप्रथम लोकशाहीत स्वातंत्र्य, समता न्याय या तत्त्वांना स्थान देण्याचा प्रयत्न केला. कारण ह्या जोगे त्यांना सामाजिक न्याय प्रस्थपित करावयांचा होता. सामाजिक न्यास प्रस्थापित करण्याचे उद्दीष्ट राज्यघटनेत नमुद करण्यात आले आणि ही उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी मध्यवर्ती सरकार आणि घटक राज्यांची सरकारे यांनी कायदे करावेत असे आंबेडकरांनी घटनेत लिहीलेले आहे. कारण या उद्दिष्टांद्वारेच अस्पृश्यतेचा कलंक दुर करण्यात आला व सर्वांना समान संधीची हमी देण्यात आली. भारतीय समाजरचनेत जन्मतःच जातीव्यवस्थेमुळे विषमतेची मुळे खोलवर रूजली गेली आहेत. जन्मजात श्रेष्ठ-कनिष्ठपणा दूर करण्यात येऊन कायद्यापुढे सर्व समान आहेत असे सांगितले. वंश, ज्ञान, धर्म, संपत्ती मानमरातब, पदव्या यामुळे निर्माण होणारी विषमता नष्ट करून सर्वांना समान मूलभूत हक्क राज्य घटनेने बहाल केले. राज्यघटनेमुळे सर्वांना कायद्याचे संरक्षणही समान देण्यात आले. परंतु या मार्गानेदेखील सामाजिक न्याय पूर्णतः प्रस्थापित होऊ शकत नाही असे आंबेडकरांना वाटले, कारण हजारो वर्षे शिक्षण संस्कार, समान संधी, हक्क इत्यादी गोष्टीपासून वंचीत असणारा वर्ग समाजात फार मोठ्या प्रमाणात अस्तित्वात आहे. त्यात अस्पृश्य असे विविध प्रकारचे लोक येतात आणि हा दुरावा भरून काढण्यासाठी सरकारी नोकरी शिक्षण क्षेत्रात तसेच कायदेमंडळात या वर्गाला प्रतिनिधीत्त्व देऊन समान संधीच्या तत्त्वाचा अंगीकार व्हावा असे त्यांना वाटत होते.

सामाजिक पातळीवरील न्याय हा वितरणवादी न्याय असतो. तो सामाजातील लोकांना खालील पद्धतीने देता येतो.

१. समाजातील दुबळ्या घटकांना विशेष सवलती देणे.
२. अल्पसंख्यांकांना विशेष सवलत देणे.
३. शिक्षणसंस्था तसेच सरकारी नोकऱ्यांमध्ये आजवर उपेक्षित राहिलेल्यांना विशेष सवलती देणे.
४. स्त्रीयांना विशेष सवलत व संरक्षण देणे.
५. स्त्रीयांवर होणारे अत्याचार, हुंड्यासारख्या प्रथा, बहुपत्नित्व या सारख्या सामाजिक अन्यायाला प्रतिबंध करणारे कायदे तयार करणे.
६. अर्थव्यवस्थेत साधन संपत्तीचे समान वाटप करणे व त्याद्वारे, विषमता, दारिद्र्य, शोषण यांना प्रतिबंध घालणे.
७. उद्योगधंद्याचे व्यवहार मुक्त असावेत.

## १२.०४ सारांश :-

न्याय एक मुल्य आहे आणि हे मुल्य समानतेला आधार देते या मुल्याचा विचार अनेक तत्त्ववेत्यांनी केला आहे. पाश्चिमात्य विचारवंत जॉन रॉल्स यांनी न्यायाची संकल्पना मांडली आहे. प्रत्यक्ष व्यवहारात असमानता असते. त्यामुळे न्याय, स्वातंत्र्य समानता व मोबदला यात अंतर्भुत होतो. स्वातंत्र्य हा प्रत्येकाचा अधिकार आहे. प्रत्येकाला स्वातंत्र्याची समान संधी देखील असते. रॉल्स म्हणतो असमानतेमुळे सर्व समाजातील घटकांचे हित साधले जाते. त्यामुळे ज्या पदाला समाजात चांगली वागणूक मिळते. त्या पदाला सर्वांना जाण्याची संधी आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधूता या मूल्यांना महत्त्व देतात. कारण समाजात सामाजिक न्याय प्रस्थापित व्हावा हाच उद्देश होता. त्यामुळेच, त्यांनी हे न्याय तत्त्व राज्यघटनेत देखील नमुद केले आहे. राज्यघटनेमुळे मिळणारे कायद्याचे संरक्षण देखील सर्वांना समान देण्यात आले आहे.

## १२.०५ विद्यापिठीय स्तरावरील दिर्घोत्तरी प्रश्न :-

१. जॉन रॉल्स यांची न्यायाची संकल्पना सविस्तर स्पष्ट करा.

२. न्याय म्हणजे काय ते सांगून डॉ. आंबेडकरांचे सामाजिक न्यायाचे तत्त्व स्पष्ट करा.

३. टिपा लिहा :

अ. न्याय जॉन रॉल्सचे तत्त्व

ब. सामाजिक न्यायाचे तत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

क. न्याय म्हणजे समानता (निःपक्षपातीपणा) : जॉन रॉल्स

❖❖❖

# १३

# स्वातंत्र्य (Liberty)

## (अ) स्वातंत्र्य : जे. एस मिल्लची स्वातंत्र्याविषयीची संकल्पना (राज्याच्या अधिकारविषयक मर्यादा)

**घटक रचना**

१३.० उद्दिष्ट्ये
१३.१ प्रस्तावना
१३.२ स्वातंत्र्याची संकल्पना
१३.३ जॉन स्टुअर्ट मिल्ल-ओळख
१३.४ मिल्लचे स्वातंत्र्या संबंधीचे विचार
१३.५ स्वातंत्र्याचे प्रकार/वर्गीकरण
  १३.५.१ विचार स्वातंत्र्य
  १३.५.२ आचार स्वातंत्र्य
१३.६ मिल्लच्या स्वातंत्र्यासंबंधीच्या विचारांवरील टिका
१३.७ सारांश
१३.८ दिर्घोत्तरी प्रश्न

## १३.० उद्दिष्ट्ये

१) स्वातंत्र्य या मूल्याचा अभ्यास करता येईल
२) स्वातंत्र्याची व्याख्या समजुन घेता येईल
३) स्वातंत्र्याच्या विविध संकल्पनांचा अभ्यास करता येईल
४) मिल्लची स्वातंत्र्याविषयीची संकल्पना स्पष्ट होईल

## १३.१ प्रस्तावना-

स्वातंत्र्याच्या संकल्पनेविषयी अनेक भारतीय आणि पाश्चिमात्य विचारवंतांनी आपले विचार मांडले आहेत. ईश्वराचे अस्तित्त्व, आत्म्याचे अमरत्त्व आणि संकल्पाचे स्वातंत्र्य ही नैतीकतेची तीन गृहीतके मानली जातात व्यक्ती जर कृती करण्यास स्वतंत्र असेल तरच आपणांस नैतिकदृष्टया त्याला त्या कृतीविषयी जबाबदार ठरविता येईल व्यक्ती जर कृती करण्यास स्वतंत्र नसेल तर नैतिकतेला अर्थच उरणार नाही. हे स्वातंत्र्य हे विचारांचे, निर्णय घेण्याचे किंवा कोणती कृती निवडावी व प्रत्यक्षात कोणती कृती आचरणात आणावी याविषयी देखील असू शकते.

आजच्या आधुनिक काळात 'स्वातंत्र्य' हे एक मानवी मुलभुत हक्क मानले जाते, प्रत्येकाला त्याचे विचार मांडण्याचा, धर्मपालनाचे, कृती करण्याचे, व्यवसाय निवडण्याचे किंवा जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य आहे असे मानले जाते. विविध राजकीय प्रणालीमध्ये मानवी हक्कांच्या संकल्पनेला विशेषतः स्वातंत्र्याच्या संकल्पनेला महत्त्वाचे स्थान दिलेले दिसून येते. सामाजिकतेच्या संदर्भात मानवाला कृती करण्याचे स्वातंत्र्य असणे हा मुलभुत मानवी हक्क

मानण्यात आला आहे. समाजाचा घटक या नात्याने मानव म्हणून प्रत्येकाला काही हक्क जन्मतः प्राप्त झालेले असतात त्यात स्वातंत्र्याच्या हक्काचाही समावेश केला जातो, घटनेव्दारे जरी या हक्काला मान्यता देण्यात आली तरी प्रत्यक्षात आपण कृती करण्यास स्वतंत्र आहोत का? या विषयाची विविध मते आणि विचार आपणांस आढळतात स्वातंत्र्य या संकल्पनेवर अनेक तत्त्वज्ञांनी राजकीय विचारवंतांनी सखोल चर्चा केली आहे. स्वातंत्र्य या संकल्पनेचा अर्थ आणि स्वातंत्र्याचे प्रकार याचा सविस्तर अभ्यास करणे आवश्यक ठरते.

## १३.२ स्वातंत्र्याची संकल्पना -

स्वातंत्र्य या संकल्पनेचा अर्थ स्पष्ट करताना प्रा. गोखले 'स्वातंत्र्य नैतिक व अभिरौचिकीय' (संदर्भ- परामर्श खंड ४ : अंक ४ फेब्रूवारी १९८३) या लेखात लिहीतात कि ''स्वातंत्र्य'' हे 'स्वतंत्र' या विशेषणापासून बनलेले भाववाचक नाम होय. स्वातंत्र म्हणजे स्वतःचे असलेला यामुळे स्वतंत्र्याचा अर्थ स्पष्ट करावयाचा तर या **'स्व'** चे रूप निश्चित करुन त्याचे विशिष्ट तत्र निश्चित करायचे असा करता येइल.'' अर्थातच विविध विचारवंतांनी 'स्व' विषयक विविध विचार मांडले आहेत. त्यानुसार स्वातंत्र्याच्या व्याख्यांमध्येही आपणांस विविधता आढळते. कांटच्या मतानुसार शुद्ध व्यावहारिक बुद्धीच्या तंत्राने वागता येणे म्हणजेच नैतिक स्वातंत्र्य. स्वातंत्र्याची अभिव्यक्ती कृती करण्यातून व्यक्त होत असते. मनुष्य स्वतंत्र आहे. याचा एक अर्थ असा करता येतो की, या माणसाने अमुक एका वेळी जी कृती केली त्याहून अन्य कृती करणे त्याला शक्य होते, ती करण्यास तो स्वतंत्र होता. प्रत्यक्षात जी कृती त्याने केली त्याहून दुसरी कृती करता येणे शक्य नव्हते असे मानले तर त्याने अमुक गोष्ट करावयास हवी होती. ती करणे त्याचे कर्तव्य होते असे म्हणण्यात अर्थ उरत नाही. आधुनिक काळातील स्वातंत्र्याची संकल्पना हक्काच्या संकल्पनेशी निगडीत आहे. सतराव्या आणि अठराव्या शतकातील विचारवंतांनीही स्वातंत्र्य, समता इत्यादी ची सांगड घातली आहे. बऱ्याच देशातील क्रांतीची मुलभूत प्रेरणा व आधारस्तंभ स्वातंत्र्य आणि समता आहे व स्वातंत्र्याच्या मुल्यांनी अनेकांना क्रांतीची प्रेरणा मिळाली आहे. फ्रांसीस हचसन (Frunus Hutcheson) या विचारवंतांच्या मतानुसार सर्व मानव समान आहेत आणि नैसर्गिक नियमानुसार (Natural Law) प्रत्येकाला काही मुलभुत हक्क प्राप्त झालेले आहेत. जॉन लॉकच्या मतानुसार समाज अस्तित्त्वात येण्यापूर्वी प्रत्येकाला निसर्ग नियमानुसार स्वातंत्र्य मिळालेले होते. लॉकच्या निसर्ग नियमानुसार कोणाही व्यक्तीने इतरांच्या जीवनात, आरोग्यात, स्वातंत्र्यात आणि वस्तूंमध्ये हस्तक्षेप करू नये. ज्या व्यक्ती या निसर्ग नियमांचे पालन करतात केवळ अशाच व्यक्तींच्या संरक्षणासाठी शासनाची आवश्यकता आहे. शासनाच्या सत्तेवर नियंत्रणाची आवश्यकता आहे. व्यक्तीच्या स्वातंत्र्याचे संरक्षण आणि सुरक्षीततेतूनच शासनाचे नियंत्रण योग्य रितीने होईल. लॉकच्या मतानुसार निसर्गाच्या अवस्थेत (In the state of nature) स्वातंत्र्य म्हणजे कोणत्याही पृथ्वीवरील कोणत्याही श्रेष्ठ शक्तींपासून मुक्तता, सर रॉबर्ट फीलमर (Sir Robert Filmer) ने केलेली स्वातंत्र्याची व्याख्या लॉकला मान्य नाही. फीलमर च्या मते ''स्वातंत्र्य म्हणजे ज्याला जे आवडते ते करणे, जसे आवडते तसे राहणे आणि कोणत्याही नियमाने बांधून घेणे नव्हे'' लॉकच्या मतानुसार स्वातंत्र्य म्हणजे निसर्ग नियमांचे (Law of Nature) पालन करणे. समाजात जे नियम सर्वांसाठी मान्य झालेले आहेत. त्यांचे पालन करणे आवश्यक आहे. लॉकने सामाजिक कराराची (Social Contract) संकल्पना मांडली. त्यानुसार समाजात राहणाऱ्या व्यक्तीमध्ये एक प्रकारचा करार झालेला आहे.

थॉमस जेफरसनच्या मते स्वातंत्र्य हे लोकशाहीचे पायाभुत मूल्य आहे तो व्यक्तीच्या

नैसर्गिक हक्कावर भर देतो, त्याच्या मतानुसार या हक्कावर कोणीही बाह्य शक्ती किंवा शासन मर्यादा घालू शकत नाही.

राजकीय तत्त्वज्ञानातील एक मुल्य म्हणून स्वातंत्र्याला महत्त्व दिले जाते. त्यानुसार व्यक्तीला त्याच्या इच्छेप्रमाणे वागण्याचे / कृती करण्याचा हक्क असणे राजकीय किंवा सामाजिक स्वातंत्र्य आणि अधिभौतिक (Metaphysical) स्वातंत्र्य या दोहोंमध्ये फरक आहे. अधिभौतिक स्वातंत्र्य हे निसर्गातील व्यक्तींचे स्थान किंवा निसर्गातील व्यवहारात व्यक्तीच्या स्वातंत्र्याची चर्चा केली जाते. उदा. व्यक्तीच्या कृती हया नियतीव्दारे बध्द आहेत कि तो कृती करण्यास पुर्णपणे स्वतंत्र आहे या सारख्या प्रश्नाची चर्चा अधिभौतिक स्वातंत्र (Metaphysical Freedom) मध्ये केली जाते. तर राजकीय किंवा सामाजिक स्वातंत्र्यात व्यक्तीचा इतरांशी असलेला संबंध किंवा शासन आणि व्यक्ती यांचा संबंध या अनुषंगाने चर्चा केली जाते.

स्वातंत्र्य संकल्पनेच्या विविध छटा आहेत. उदा. लेखक, कवी, चित्रकार किंवा मूर्तीकार यांना आपल्या विचारांच्या अभिव्यक्तीसाठी, त्यांच्यातील सर्जनशीलतेसाठी स्वातंत्र्याची आवश्यकता असते.

त्यांना हवे ते स्वातंत्र्य मिळाले नाही तर उत्कृष्ट कलेच्या निर्मितीत अडचणी येतील अर्थातच फक्त कलाकारांनाच नव्हे तर सर्वच व्यक्तींना स्वातंत्र्याची नितांत गरज असते. स्वातंत्र्याला मूल्य(Value) म्हटले आहे.

स्वातंत्र्याची व्याख्या करताना, सर्वसाधारणपणे सांगीतले जाते कि स्वातंत्र्य म्हणजे कोणत्याही जोर जबरदस्तीचा अभाव किंवा कोणत्याही बाहय शक्तींपासून, त्यांच्या जबरदस्तीपासून मुक्तता जेव्हा एखादया व्यक्तीस त्यांच्या हक्कापासून वंचित केले जाते तेव्हा स्वातंत्र्याचा उपभोग तो घेऊ शकत नाही. पशू पक्ष्यांनाही स्वातंत्र्य हवेहवेसे असते. पिंजऱ्यातील पोपटाला कोणीही स्वतंत्र म्हणूच शकणार नाही, कोणत्याही निर्बंधाशिवाय कृती करणे म्हणजे स्वातंत्र्य होय. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी देखील लढा द्यावा लागला. मध्ययुगीन काळात पश्चिमात्य जगात चर्चचे/धर्मसत्तेने अनेक बंधने व्यक्ती वर घातली होती स्वातंत्र्य आणि समता हे एकमेकांशी निगडीत आहे. स्वातंत्र्याच्या उपभोगासाठी किंवा योग्य अभिव्यक्तीसाठी सामाजिक आणि राजकीय परिस्थीती अनुकूल असणे आवश्यक आहे. जे.एस.मिल्लच्या स्वातंत्र्याच्या संकल्पनेचा आपण अभ्यास करणार आहोत.

**स्वातंत्र्य- एक मूल्य (Liberty as a Value) :** स्वातंत्र्य हे मूल्य मानले जाते, नैतीक संकल्पनेच्या दृष्टीकोनातून स्वातंत्र्याला मूल्य मानले जाते. जे मूलभूत आणि प्राथमिक आहे. व्यक्ती स्वातंत्र्याला निर्बंध घालणारे घटक कमीत कमी असावे, व्यक्तीचे स्वातंत्र्य हे इतर व्यक्तींच्या स्वातंत्र्याला बाधा आणणरे नसावे. १२१५ मध्ये पहिल्यांदा मॅग्नाकार्टाव्दारे स्वातंत्र्य मुल्याला घटनेत स्थान दिले. १७८९ च्या फ्रेंच क्रांतीने स्वातंत्र्याच्या मुल्याचे महत्त्व जाणले आणि स्वातंत्र्य मुल्य क्रांतीचे आधारस्तंभ ठरले.

व्यक्तीच्या स्वातंत्र्यास अनूकूल वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी ही शासनाची असते. आधुनिक लोकशाहीत स्वातंत्र्य, समता या मुल्यांचे वैशिष्टयपुर्ण स्थान आहे. कायद्याचे महत्त्वाचे उद्दीष्ट आहे कि समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या स्वातंत्र्याचे रक्षण होईल तसेच व्यक्तीच्या हक्कांचे रक्षण होईल. देशाच्या घटनेमध्ये स्वातंत्र्य या मुल्याला महत्त्वपूर्ण स्थान आहे. जॉन स्टूअर्ट मिल्लने आपल्या प्रसिध्द 'On Liberty'या पुस्तकात स्वातंत्र्य या संकल्पनेची सविस्तर चर्चा केली आहे. पुढच्या विभागात आपण जॉन स्टूअर्ट मिल्ल यांच्याविषयी जाणून घेऊ या.

## १३.३ जॉन स्टूअर्ट मिल्ल - ओळख

मिल्लचे वर्णन व्यक्ती स्वातंत्र्यवादी, उपयुक्ततावादी आणि प्रतिनिधिक लोकशाही व्यवस्थेचा पूरस्कर्ता व एक विचारवंत या शब्दात करणे उचित होईल. उपयुक्ततावादी विचारवंत बेंथॅम याचा मित्र जेम्स मिल्ल यांचा जॉन स्टुअर्ट मिल्ल हा मूलगा होता. त्याचा जन्म लंडनमध्ये २० मे १८०६ मध्ये झाला आणि तो ८ मे १८७३ ला मरण पावला. त्यांच्या वडीलांकडून त्याला उपयुक्ततावादाचे आदर्श शिक्षण दिले गेले. तो उपयुक्तवादाचा समर्थक बनला. तो बालपणापासूनच तल्लख बुध्दीचा असल्यामुळे वयाच्या तिसऱ्या वर्षीच ग्रीक भाषा शिकण्यास प्रारंभ केला. वयाच्या आठव्या वर्षी त्याने लॅटीन भाषा अवगत केली. त्याची बौध्दीक झेप खुपच मोठी होती. वयाच्या बाराव्या वर्षी त्याने महान तत्त्वचिंतक प्लेटो, ॲरिस्टॉटल, होमर, डेव्हीड रीकार्डे यांचा अभ्यास केला.

मिल्लवर जेरेमी बेंथॅम यांच्या विचारांचा खूपच प्रभाव पडला. बेंथॅम प्रमाणेच तोही मान्य करतो कि आपल्या वर्तणूकीचे उद्दीष्ट हे **‘अधिकाधिक लोकांच्या अधिकाधिक सूखासाठी प्रयत्न करणे हेच असावे.’** वयाच्या सतराव्या वर्षी त्याने Utilitarian Society नावाच्या गटाची स्थापना केली तो वृत्तपत्रे तसेच जनरलसाठी लिहीत असे स्त्रियांना ही मतदानाचा हक्क असावा, स्त्री-पुरूष समानता यांचे त्याकाळी मिल्ल ने जोरदार समर्थन केले होते.

मिल्लने अनेक विषयासंबंधी ग्रंथ लिहिले आहे. त्याने तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र, तर्कशास्त्र, राज्यशास्त्र या विषयांवर अनेक ग्रंथ लिहीले आहे, त्यापैकी काही ग्रंथांची नावे पूढील प्रमाणे आहेत.

1. A System of Logic (1843)
2. Principles of Political Economy (1848)
3. On Liberty (1859)
4. Three Essays on Religion-1874
5. Considerations on Representative Government 1861.
6. Utilitarianism (1861)

**आपली प्रगती तपासा**

१. स्वातंत्र्याची संकल्पना स्पष्ट करा.

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

२. स्वातंत्र्याची व्याख्या करा.

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

३. मिल्ल विषयी माहीती द्या.

.....................................................................................................................

.....................................................................................................................

.....................................................................................................................

.....................................................................................................................

४. राजकीय,सामाजिक स्वातंत्र्य आणि अधिभौतिक स्वातंत्र्य यातील फरक स्पष्ट करा.

.....................................................................................................................

.....................................................................................................................

.....................................................................................................................

.....................................................................................................................

## १३.४ मिल्लचे स्वातंत्र्यासंबंधीचे विचार

मिल्लचा **'ऑन लिबर्टि'** हा इंग्रजी मधील एक उत्कृष्ट ग्रंथ मानला जातो. वेपरने त्या संबंधी पुढील अभिप्राय व्यक्त केला आहे. 'एवढा विचार व अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्याचे रक्षण करणारा चांगला ग्रंथ या पुर्वी लिहीला गेला नव्हता'. मिल्लची स्वातंत्र्याची संकल्पना उपयुक्ततावादाशी संबंधीत आहे. स्वातंत्र्य हा महत्त्वाचा अंतीम मार्ग असून व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासासाठी त्याची आवश्यकता असते. स्वातंत्र्याचे रक्षण करणे किंवा त्याची हमी प्राप्त करून देणे हे केवळ व्यक्तीच्या सूखात भर घालणे नसून सामाजिक कल्याणासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरते. असा निष्कर्ष काढला आहे. इंग्लंडमधील संसद त्यावेळी उपयूक्तता वादाच्या नावावर अनेक कायदेशीर बंधने व्यक्तीस्वातंत्र्यावर लादण्याचा प्रयत्न करत होती. त्यांचा व्यक्तीस्वातंत्र्यात हस्तक्षेप होऊ लागला. राज्य असेच आपले अधिकार वाढवित गेले तर शासनसंस्थेची हूकुमशाही निर्माण होईल.व्यक्तीस्वातंत्र्याचा ऱ्हास होईल असे मिल्लला वाटते. मिल्लने यासाठी व्यक्तीस्वातंत्र्यावर प्रतिबंध घालणाऱ्या कायदयास विरोध दर्शविला आहे.

मनुष्याला आपला विकास घडवून आणण्यामध्ये समाजाकडून व राज्याकडून अडचणी निर्माण होऊ शकतात या अडथळयांना दूर करणारी व व्यक्ती विकासाचा मार्ग मोकळा करणारी शक्ती स्वातंत्र्याची असते. अर्थात स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचर नव्हे व्यक्तीला आपल्या इच्छेनूसार कार्य करण्याचा अधिकार म्हणजे स्वातंत्र्य असते तरी त्यावर मर्यादा आवश्यक आहे. परंतू मर्यादा देखिल मर्यादीत असाव्यात असे मिल्ल म्हणतो राज्य व समाज यांच्यापेक्षा व्यक्तीला स्वतःचे हित अधिक चांगले समजते म्हणून तिला आपल्या सर्वांगिण प्रगतीसाठी कार्य करण्याची व विचाराची स्वातंत्र्यता असावी राज्य किंवा समाजाने व्यक्तीवर तो पर्यंत नियंत्रण लादू नये की जोपर्यंत त्यांच्या वर्तनाचा दुसऱ्या कोणावर परिणाम होणार नसतो.

समाजाच्या जुन्या परंपरा व श्रध्दांना धोका पोहचेल असे कार्य समाज सहन करित नसल्याने प्रगती खिळ बसते. येशू खिस्त, सॉक्रेटिस सारख्यांनी समाजापूढे नवीन मुल्ये ठेवली परंतु समाजाने त्यांचे जिवनच हिरावून घेतले त्यांचे विचार पटल्यामुळे समाज आज त्यांची पुजा करतो. गौरव करतो, म्हणून मानवी प्रगतीसाठी स्वातंत्र्य आवश्यक आहे. जे. एस. मिल्लने प्रत्येक व्यक्तीच्या जिवनातील दृष्टीकोन मान्य केले.

१) **वैयक्तीक दृष्टीकोनः-** की जो स्वतःच्या जिवनापूरता मर्यादीत असतो.

२) **सामाजिक दृष्टीकानेः-** प्रत्येक व्यक्ती समाजाचा एक भाग असल्याने समाजाशी संबंधीत असतो.

त्यामूळे प्रत्येक व्यक्तीला दोन प्रकारची कार्ये करावी लागतात. त्या कार्याला स्वतः संबंधी कार्ये व परसंबंधी कार्ये असे म्हटले जाते. सामाजिक विकास हा प्रत्येकाच्या विकासावर आधारीत असल्याने प्रत्येकाला आपल्या विकासासाठी विचार करण्याचे व ते अभिव्यक्त करण्याचे असावे असे मिल्लचे मत आहे. या आधारावर मिल्ल स्वातंत्र्याचे दोन भागात वर्गीकरण करतो.

## १३.५ स्वातंत्र्याचे प्रकार / वर्गीकरण

१) **विचार स्वातंत्र्य**

२) **आचार / कार्यासंबंधी स्वातंत्र्य**

या दोन प्रकारात मिल्ल स्वातंत्र्याचे वर्गीकरण करतो. विचार स्वातंत्र्य हे पुर्णतः बंधनमुक्त असावे असे म्हणतो. आचार स्वातंत्र्यावर काही निश्चित मर्यादा तो स्वीकारतो त्या दोन्हीही स्वातंत्र्याचे समर्थन खालील प्रमाणे करता येईल.

### १३.३.१ विचार स्वातंत्र्यः-

मिल्ल हा विचार व भावना स्वातंत्र्य यावर समाज किंवा राज्य यांच्या कोणत्याही बंधनाला मान्य करीत नाही. कारण मानव समाजाच्या प्रगतीकरीता विचार स्वातंत्र्य आवश्यक असते. ते नाकारणे म्हणजे मानवी समाजाची प्रगती अवरूध्द होते असे मानतो.

विचार स्वातंत्र्याशिवाय सत्यता शोधता येणार नाही. त्याचे असे मत होते की, प्रत्येक व्यक्तीचे मत हे सत्य असत्य किंवा अर्धसत्य अशा तीन प्रकारचे असू शकते. सत्य विचारापासून जर मानव समाज वंचित राहीला तर त्याची प्रगती होणार नाही. समाज नितियुक्त व योग्य मार्गी व्हावा यासाठी व्यक्तीच्या वैचारीक स्वातंत्र्याला मुक्त ठेवणे आवश्यक आहे. ती व्यक्ती शहाणी असो अथवा मुर्ख असो तीचे विचार सत्य असो वा असत्य असो. तिचे विचारावर राज्य व समाज दोघांनाही बंधने घालण्याचा अधिकार नाही. असे त्याचे स्पष्ट मत होते.

मिल्लच्या शब्दात जरी एका व्यक्तीला वगळून अखिल मानव जातिचे मत एकाच प्रकारचे असले तरीही मानव जातीला ते न्याय संगत होणार नाही. ते विरोधी मत बाळगणाऱ्या एका व्यक्तीवरच बंधने टाकतील किंवा शक्तीसंपन्न असल्यामुळे तो एक व्यक्ती मानव जातींच्या मत स्वातंत्र्यावर घाला घालेल किंवा हल्ला चढवेल अशा प्रकारे व्यक्तीगत स्वातंत्र्यावर घाला घालणे / हल्ला करणे म्हणजे मानव जातीच्या वर्तमान व भावी पिढ्यांना सत्याच्या एका अंशापासून वंचीत ठेवणे होय.

**<u>आपली प्रगती तपासा</u>**

१ मिल्लचे स्वातंत्र्याविषयक विचार स्पष्ट करा.

२ मिल्लचे विचार स्वातंत्र्याची संकल्पना स्पष्ट करा.

.......................................................................

.......................................................................

.......................................................................

.......................................................................

### १३.३.२ आचार स्वातंत्र्य / कार्यासंबंधी स्वातंत्र्यः-

विचार जो पर्यंत कृतीतून उतरत नाही तोपर्यंत त्याला काहीच अर्थ नसतो विचारांबरोबर त्या प्रमाणे कार्य करण्यातच समाजाची प्रगती शक्य असते. त्यामुळे विचार व कृती स्वातंत्र्य हे परस्परांना पुरक आहेत. केवळ दुसऱ्याच्या आज्ञाचे पालन केल्यामुळे माणूस गुलाम बनतो या कारणामुळे मिल्लने स्वातंत्र्याचा पूरस्कार केला.

मिल्लने विचारांचे संपुर्ण स्वातंत्र्य असावे असे ठाम विचार मांडले परंतु आचार स्वातंत्राविषयी संपुर्ण स्वातंत्र्याचे तो समर्थन करित नाही. त्याने अनिच्छेने काही अटिंसह राज्यांकडून व्यक्तीच्या कार्यावर प्रतिबंध घालण्यास मान्यता दिली आहे. मिल्लने व्यक्तीच्या कार्याचे दोन भाग सांगितले आहेत.

१) व्यक्तीगत कार्ये/स्वसंबंधी कार्ये
२) सामाजिक कार्ये/परसंबंधीत कार्ये

**१ व्यक्तीगत कार्य:-**

व्यक्तीच्या ज्या कार्याचा परीणाम तिच्या स्वतःपुरता मर्यादित असतो. दूसऱ्यावर त्याचा बरावाईट प्रभाव पडत नाही. त्या कार्याला स्वयंबंधी कार्य म्हणतात.

उदा. खाणे पिणे, कपडे वापरणे, शिक्षण घेणे या प्रकारचे संपूर्ण कार्य या प्रकारात येते.

व्यक्तीगत कार्यासाठी व्यक्तींना संपुर्ण स्वातंत्र्य असावयास पाहीजे.

**२ सामाजिक कार्य:-**

व्यक्तीच्या ज्या कार्याचा प्रभाव इतरांवर पडतो त्या कार्याला परसंबंधी कार्य म्हणतात. आपणास स्वातंत्र्य असावे असे प्रत्येकाला वाटते. दूसऱ्याच्या स्वातंत्र्यात हस्तक्षेप न केल्यानेच आपण स्वातंत्रात राहू शकतो म्हणून समाजातील इतर व्यक्तींचे स्वातंत्र्य नष्ट होईल किंवा त्यास बाधा येईल असे कार्य व्यक्तीकडून होता कामा नये. समाजात कायदा व सुव्यवस्थेला बाधा पोहचेल अराजक किंवा अशांतता निर्माण होईल असे कार्य करण्याचा अधिकार व्यक्तीला असू शकत नाही अशा कार्यावर राज्याला पूर्ण नियंत्रण ठेवण्याचा मिल्लने पुर्ण अधिकार मान्य केलेला आहे. राज्याला व्यक्तीच्या कार्यात हस्तक्षेप करण्याचा अधिकार आत्म रक्षणामुळे मिळू शकतो.

**मिल्लची स्वातेत्र्याची संकल्पना तीन महत्त्वपूर्ण तत्त्वांवर आधारीत आहे.**

१) मिल्लने व्यक्तीच्या भावना व इच्छांना महत्त्व देऊन व्यक्तीगत कार्यात स्वातंत्र्याचे समर्थन केले.
२) उस्फुर्तता व व्यक्तीमत्त्व या दोन गोष्टी व्यक्ती विकास व समाज कल्याणाचे आवश्यक घटक मानले
३) सामाजिक परंपरेच्या जुलमांना विरोधः-
मिल्लच्या स्वातंत्र्याच्या संकल्पनेचा आशय चांगला असला तरी प्रत्यक्ष उपयोगात आणतांना त्यात अनेक व्यावहारीक अडचणी निर्माण झालेल्या दिसून येतात.

## १३.६ मिल्लच्या स्वातंत्र्यासंबंधी विचारांवरील टिका:-

**१) स्वातंत्र्याची नकारात्मक कल्पना:-**

बंधनाचा अभाव म्हणजे स्वातंत्र्य असे मानून ते प्रत्येकाच्या मर्जीवर सोपवावे असे मिल्लचे मत होते. आधुनिक काळातील गुंतागुंतीच्या समाजात हा दृष्टीकोन नकारात्मक व अपुर्ण आहे.

२) **अधिकाराकडे दूर्लक्षः-**

अधिकाराशिवाय स्वातंत्र्य म्हणजे कार्याविना वाचाळता ठरेल. मिल्ल स्वातंत्र्याचे महत्त्व अतिशय प्रभाविपणे वर्णन करतो. परंतू स्वातंत्र्याच्या रचनांचे प्रभावी मार्ग सांगत नाही किंवा उपाय सूचवित नाही.

४) **कार्य स्वातंत्र्याची विभागणी अनावश्यक व असंभवः-**

मिल्लने स्वातंत्र्याची स्वसंबंधी व परसंबंधी कार्यात विभागणी केली. ती अनावश्यक व असंभवनिय आहे. व्यक्तीच्या प्रत्येक कार्याचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिणाम समाजावर होत असतो. उदा. मदयपान करणे हे वैयक्तिक कार्य आहे. परंतू मद्पान केल्यामूळे व्यक्तीला गुंगी व नशा आल्यामुळे ती अनैतिक गोष्ट ठरते. जसे चोरी, मारामारी यासारख कार्य करते व त्याचा समाजावर वाईट परिणाम होतो.

५) **राज्याचा हस्तक्षेप वाढेलः-**

मिल्ल याने परसंबंधी कार्याच्या संदर्भात राज्याला हस्तक्षेप करण्याचा अधिकार दिला आहे. व्यक्तीच्या परसंबंधी कार्याचा समाजावर किंवा दूसऱ्या व्यक्तींवर दूष्परिणाम होणार असेल तर अशा वेळी राज्याने समाजाच्या भल्यासाठी कार्यावर निर्बंध घालणे योग्य वाटते. परंतू या तत्त्वांचा आधार घेऊन धूरंधर (धूर्त) राज्यकर्ते आपले अधिकार वाढवून व्यक्ती जिवनात हस्तक्षेप करतात.

६) **विचार विसंगतीः-**

मिल्ल व्यक्ती स्वातंत्र्याचा प्रभावी पूरस्कर्ता आहे. परंतू असंस्कृत व अज्ञानी लोकांना तो स्वातंत्र्य नाकारतो. उपयुक्ततावादी व व्यक्ती स्वातंत्र्यवादी मिल्ल अनेक बाबतीत पूर्वगामी विचार मांडतो आणि सामान्यांना (कष्टकऱ्यांना) स्वातंत्र्यापासून वंचीत ठरतो हे आश्चर्यकारक वाटते ही त्याच्या विचारातील विसंगती आहे.

७) **लहरीपणा व्यक्तीमत्त्वाचा दुर्गुण**:- मिल्ल हा विचार स्वातंत्र्याच्या संबंधी सर्व व्यक्तींना पुर्ण स्वातंत्र्य असावे असे सागंतो. त्याने असे तार्कीक विवेचन केले आहे, की दहा लहरी व्यक्तीमध्ये एखादी अलौकीक, प्रतिभासंपन्न व्यक्ती निघून समाजाला क्रांतीकारक मौलिक विचार देऊ शकते. परंतु त्याचा तर्क योग्य वाटत नाही. कारण लहरीपणा व्यक्तीचा मनोविकार व दुर्गुण असू शकतो.

मिल्लच्या स्वातंत्र्यासंबंधीच्या सिध्दांतात अनेक दोष आहेत कोणत्याही विचारवंतांच्या विचारात काही त्रुटी राहतातच. मिल्लही याला अपवाद नाही आज देशातिल राज्यघटनेत स्वातंत्र्याचा जो समावेश करण्यात आला त्याचे श्रेय मिल्लला द्यावयास पाहिजे मिल्लचे स्वातंत्र्यासंबंधीचे विचार राज्यशासनाला मिळालेली देणगी आहे, हे अमान्य करता येणार नाही.

मिल्ल स्वातंत्र्य आणि अधिकार या दोघातील संघर्षावर भर देतो. सूरूवातीच्या काळात शोषण करणारे सत्ताधीश आणि प्रजा यांच्यामध्ये संघर्ष होता.त्याकाळी स्वातंत्र्य म्हणजे या शासनकर्त्यांच्या सत्तेवर मर्यादा घालणे मिल्लच्या मतानुसार प्राचीन ग्रीक, इंग्लंड आणि रोममध्ये स्वातंत्र्य म्हणजे राजकीय शासनकर्त्यांच्या अत्याचारापासून संरक्षण Liberty means "Protection against the tyranny of political rulers" प्रजा आणि शासनकर्ते यांमध्ये संघर्षात्मक नातेसंबंध होता. सत्ता किंवा

शासनावर मर्यादा घालण्यासाठी राजकीय हक्क व्यक्तीना मिळवणे आवश्यक होते, या राजकीय हक्काव्दारे सत्ताधाऱ्यांवर काही मर्यादा घालता येतील व त्याव्दारे व्यक्तीच्या स्वातंत्र्याचे सरंक्षण होईल. तसेच शासनाच्या काही कृतींवर घटनेव्दारे समाजाला किंवा प्रतिनीधीना नियंत्रण ठेवता येईल अशी व्यवस्था जर निर्माण झाली तर त्याद्वारे देखील सत्तेवर मर्यादा घालून व्यक्ती स्वातंत्र्याचे संरक्षण करता येईल.

## १३.७ सारांशः-

मिल्ल स्वातंत्र्याच्या संकल्पनेत प्रगतीवर भर देतो व्यक्तीच्या सर्वांगीण प्रगतीसाठी स्वातंत्र्य आवश्यक आहे. जर त्याला विचारांचे तसेच कृतीचे स्वातंत्र्य नसेल तर तो प्रगती करू शकणार नाही. व्यक्तीची प्रगती आणि समाजाची प्रगती झाली तरच समाजाची प्रगती एकमेकांशी निगडीत आहे, जर व्यक्तींची प्रगती झाली तरच समाजाची प्रगती शक्य आहे. मिल्ल स्वातंत्र्याची संकल्पना उपयुक्ततावादाच्या दृष्टीकोनातून मांडतो. स्वातंत्र्याचा समाजावर आणि सर्व व्यक्तींवर होणाऱ्या परिणामांवर मिल्ल भर देतो. व्यक्तीगत स्वातंत्र्यासाठी सत्तेवर / शासनावर मर्यादा असणे आवश्यक आहे. शासनाद्वारे असे बलशाली राज्य निर्माण व्हावे की जीथे व्यक्ती आपलेच स्वतःचे निर्णय स्वतःच घेऊ शकतील. लोकांच्या जीवनामध्ये आणि कार्यामध्ये शासनाचा हस्तक्षेप नसावा. जगातल्या नागरी स्वातंत्र्याच्या चळवळींना मिल्लच्या स्वातंत्र्याविषयक विचारांमुळे प्रेरणा मिळाली.

## १३.८ दिर्घोत्तरी प्रश्न.

१. स्वातंत्र्य म्हणजे काय ते सांगून मिल्लची स्वातंत्र्या विषयीची संकल्पना स्पष्ट करा.

२. मिल्लने स्वतंत्र्याचे वर्गीकरण कसे केले आहे ते स्पष्ट करा.

३. मिल्लच्या मते कोणत्या दोन प्रकारची कार्ये असतात ते सविस्तर स्पष्ट करून स्वातंत्र्याची संकल्पना स्पष्ट करा.

४. स्वातंत्र्यासाठी सत्तेवर नियंत्रण किंवा मर्यादा या संदर्भातील मिल्लचे विचार स्पष्ट करा.

❖❖❖

# १४

# स्वातंत्र्य (Liberty)

## (ब) स्वातंत्र्य - रोनाल्ड डॉरकीन आणि इसीह बर्लीन

**घटक रचना**

१४.० उद्दिष्टये

१४.१ प्रस्तावना

१४.२ रोनाल्ड डॉरकीन यांची स्वातंत्र्याविषयीची संकल्पना

१४.३ इसिह बर्लीन

१४.४ इसिह बर्लीनची स्वातंत्र्याची संकल्पना

१४.४.१ स्वातंत्र्याची नकारात्मक संकल्पना (अभावात्मक स्वातंत्र्य)

१४.४.२ स्वातंत्र्याची सकारात्मक संकल्पना (भावात्मक स्वातंत्र्य)

१४.५ सारांश

१४.६ विद्यापीठीय दिर्घोत्तरी प्रश्न

### १४.० उद्दिष्टये -

१) 'स्वातंत्र्य' विषयी विविध विचारवंतांचे विचार स्पष्ट होतील.

२) रोनाल्ड डॉरकीन यांचे स्वातंत्र्याचा हक्क आहे का हा विचार समजून घेता येईल.

३) इसिह बर्लिन यांची स्वातंत्र्याची संकल्पना समजून घेता येईल.

४) स्वातंत्र्याची सकारात्मक आणि नकारात्मक संकल्पना समजेल.

### १४.१ प्रस्तावना -

स्वातंत्र्य हे प्रत्येकाला हवे हवेसे वाटते, पशु, पक्षी, प्राणी यांना देखील स्वातंत्र्य हवे असते. बंधनात राहायला कोणालाच आवडत नाही. या पूर्वीच्या पाठात आपण स्वातंत्र्य आणि हक्क यांचा संबंध पाहिला आहे. स्वातंत्र्य हा व्यक्तीचा मुलभूत मानवी हक्क मानाला जातो. तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र इ. अनेक शाखांत स्वातंत्र्य या संकल्पनेची चर्चा केलेली आढळून येते या पाठात आपण रोनाल्ड डॉरकीन यांचे स्वातंत्र्या संदर्भातील विचार पाहणार आहोत. प्रत्येक व्यक्तीला जगण्याचा हक्क आहे, समतेचा हक्क आहे तसे त्यास स्वातंत्र्याचा हक्क आहे का? या प्रश्नाची सविस्तर चर्चा डॉरकीन सारख्या विचार वंताने केली आहे. स्वातंत्र्य या संकल्पनेच्या विविध छटा आहेत.साधारणपणे जोरजबरदस्तीचा अभाव म्हणजे स्वातंत्र्य अशी व्याख्या केली जाते. इसीह बर्लीनने स्वातंत्र्याची नकारात्मक आणि सकारात्मक संकल्पना स्पष्ट केली आहे.

## १४.२ रोनाल्ड डॉर्कीन यांची स्वातंत्र्या विषयीची संकल्पना

रोनाल्ड डॉर्कीन अमेरीकन कायदे विधीतत्त्वज्ञ आहेत. त्यांचा जन्म वॉरसेस्टर मॅशशूटस येथे झाला हॉरवर्ड लॉ स्कूल मधून त्यांनी आपले पदवीचे शिक्षण पूर्ण केले. अमेरीका आणि इंग्लडमधील अनेक विदयापिठात त्यांनी महत्त्वाची पदे भूषविली. ते ऑक्सफर्ड विद्यापीठात प्रोफेसर ज्यूरीस प्रुडन्स या पदावर कार्यरत होते. विधी तत्त्वज्ञानात आणि राजकीय तत्त्वज्ञानात त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.डॉर्कीनच्या करीअरच्या सूरूवातीच्या काळात ज्या सामाजिक सुधारणा व चळवळी झाल्या. उदा- नागरी हक्क मानवी हक्क स्त्री-पूरूष समानता, पर्यावरण, व्हिएत्तनाम युध्द इ.त्यामुळे स्वातंत्र्याच्या संकल्पनेचे पुन्हा परिक्षण करण्याची गरज भासू लागली.डॉर्कीन अशा स्वातंत्र्याचा पूरस्कार करतो, की ज्यात समानतेचा हक्क सर्वोच्च राजकीय तत्त्व असेल.

डॉर्कीनचे राजकीय तत्त्वज्ञान त्यांच्या विधी विचारांशी सुसंगत आहे. त्याच्या मतानूसार जोपर्यंत राजकीय सत्ता नागरिकांना समान लेखत नाही तो पर्यंत त्यांच्यावर कोणतेच अधिकार नाही त्यांनी प्रत्येकाला समान दर्जा दयायला हवा प्रत्येक व्यक्तीने त्याच्यासाठी चांगले कार्य काय आहे हे त्यानेच ठरविण्याचे स्वातंत्र्य व्यक्तीला हवे.

स्वातंत्र्य हे प्रत्येकाला हवे-हवेसे वाटते परंतू डॉर्कीन प्रश्न उपस्थित करतो की, आपणास स्वातंत्र्याचा अधिकार आहे का? यावर उत्तर देताना तो म्हणतो की, स्वातंत्र्याचा अधिकार हा केवळ राजकीय अधिकार किंवा (हक्क) नाही. स्वातंत्र्याचा अधिकार मर्यादित असायला हवा.

समतेचा अधिकार आणि स्वातंत्र्याचा अधिकार यात संघर्ष किंवा तणाव आहे असे वाटते. डॉर्कीनच्या मते त्यांच्यात कोणताही संघर्ष नाही. समानता ही नागरी आणि राजकीय स्वातंत्र्याचा आधार आहे. स्वातंत्र्य नाही असे तो मानत नाही. ज्या प्रमाणे समानतेचा हक्क आहे.त्याप्रमाणे स्वातंत्र्याचा हक्क आहे का? या बाबत साशंकता आहे. सर्वांनाच समानतेचा अधिकार आहे असे मानले जाते. समाजात समानता असावी कोणीही व्यक्ती असो कोणत्याही थरातील असो श्रीमंत किंवा गरीब,शिक्षीत किंवा अशिक्षीत कोणत्याही जाती धर्म वंशाची असो प्रत्येकाला समानतेचा अधिकार आहे. प्रत्येकालाच समानतेची वागणूक मिळावी असे अपेक्षीत असते. समतेचा अधिकार आणि स्वातंत्र्याचा अधिकार यामध्ये तडजोड केली जाते. सर्वांना समान दर्जाची वागणूक मिळावी असे अपेक्षीत असते आणि तो त्याचा अधिकार आहे. कायदे बनवितांना विशेषतः सामाजिक कायदयांच्या संदर्भात स्वातंत्र्याचा अधिकार आणि समतेच्या अधिकारात तडजोड झालेली प्रकर्षाने जाणवते. कायदा बनविताना व्यक्तीच्या कृती करण्यावर मर्यादा घातली जाते. उदा- वाहतुकीच्या नियंत्रणाचे कायदे बनविताना व्यक्तीला वेगाने वाहन चालविण्याचे जे स्वातंत्र्य आहे त्याला मर्यादा घातली जाते.

डॉर्कीन महत्त्वाचा प्रश्न उपस्थित करतात ज्या पध्दतीने पारंपारीक स्वातंत्र्याची व्याख्या केली जाते त्याअर्थी स्वातंत्र्याचा अधिकार आहे का? पारंपारीक स्वातंत्र्याची व्याख्या डॉर्कीनने पूढीलप्रमाणे केली आहे. **‘स्वातंत्र्य म्हणजे कोणत्याही व्यक्तीला जे करावेसे वाटते त्याला तसे करू देण्यासाठी राजकीय दडपणाचा अभाव असणे होय’** त्याच्या शब्दातच I Have in mind traditional definition of Liberty as the absense of constrain placed by Government Upon what a man might do it as he wants’.

या व्याख्येच्या संदर्भात वरील उदाहरण पाहीले तर असे दिसून येते की जर एखादया तरूणाला वेगाने मोटार सायकल चालवण्याची आवड आहे. तो रहदारीच्या रस्त्याने अतिशय

वेगाने मोटर सायकल चालवू लागला तर त्याला वाहतूक पोलिस तसे करण्यावर मर्यादा घालतील म्हणजे त्याला तसे करण्याचे स्वातंत्र्य नाही त्यावर शासनाचे नियंत्रण आहे. त्या तरूणाच्या स्वातंत्र्याबरोबर इतर व्यक्तीच्या जीवीताचे सरंक्षण करणे ही महत्त्वाचे आहे. म्हणून त्याच्या स्वातंत्र्यावर मर्यादा घातली जाते.

डॉर्कीन स्वातंत्र्याची व्याख्या समानतेच्या संदर्भात करतो. स्वातंत्र्याचा अधिकार उपभोगण्यासाठी काही इतर संसाधनांची आवश्यकता असते. उदा- एखादयाला मतदानाचा हक्क आहे असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा हे स्वातंत्र्य उपभोगण्यासाठी त्याला अन्न, आरोग्य तो अधिकार बजावण्याचे ज्ञान वैगरे गोष्टींची गरज असते. या संसाधनांवर केवळ माझाच अधिकार आहे असे म्हणणे रास्त नाही. स्वातंत्र्य याचा अर्थ माझ्या बरोबरीने इतरही व्यक्तींचा संसाधनातील समान हिस्सा आहे त्याची जाणीव असणे आवश्यक आहे.

इसिह बर्लीनने जी स्वातंत्र्याची व्याख्या सांगितली आहे त्यावर डॉर्कीन टिका करतो. बर्लीन स्वातंत्र्यावरील त्याच्या प्रसिध्द निबंधात पूढील विचार मांडतो. स्वातंत्र्य म्हणजे कोणत्याही कृती करताना किंवा पर्यायांची निवड करताना अडथळयांचा अभाव असणे होय. माणसाने ज्या रस्त्यावरून चालण्याचा निर्णय घेतला आहे त्या रस्त्यावर अडथळयांचा अभाव असणे ही व्याख्या डॉर्कीनला मान्य नाही मानवाच्या बऱ्याचशा कृतीवर बंधने आणली जातात. व्यक्तीला जे हवे ते करण्याचे स्वातंत्र्य असतेच असे नाही. त्याला वाटेल ते बोलण्यापासून परावृत्त केले जाते किंवा त्याच्या त्या बोलण्यावर बंधने आणली जातात. इतरांना मारहाण करण्यावर किंवा त्यांचा खून करण्यावर बंधने घातली जातात. त्याच्या स्वातंत्र्यावर जी बंधने घातली जातात. याचे कारण म्हणजे दूसऱ्यांच्या जिविताचे सरंक्षण करणे हे पण तितकेच महत्त्वाचे आहे ही स्वातंत्र्यावरील बंधने आपण स्वीकारतो.

अधिकार ही संकल्पना डॉर्कीनच्या मते तत्त्वज्ञानात आणि राजकारणात वेगवेगळया अर्थाने वापरली जाते. त्याच्या मतानूसार लोकांना समानतेचा अधिकार आहे असे आपण जर मानले तर त्याचा अर्थ समानतेवर त्याचा हक्क आहे ती त्यांना मिळायलाच हवी स्वातंत्र्याच्या संदर्भात आपणास असे म्हणता येईल का? ज्याला जे हवे ते करण्याचे स्वातंत्र त्याला मिळायलाच हवे का? स्वातंत्र्याच्या अधिकाराच्या संदर्भात आपणास असे आढळते की बरेचदा जे कायदे केले जातात, या कायदयामुळे आपल्या स्वातंत्र्यावर मर्यादा घातली जाते. त्या कायदयामुळे सामाजिक कल्याण साधले जाते. म्हणून स्वातंत्र्यावर बंधने आली तरी कायदयाचे समर्थन केले जाते. प्रत्येक बंधन घालणारी कृती ही अधिकाराचे उल्लंघन करीत असते, स्वातंत्र्याचा अधिकार नाहीच असे डॉर्कीनला वाटते. **स्वातंत्राच्या हक्का विषयीचा हक्क नसणे असे मत ते व्यक्त करतात का?** या बाबत साशंकता व्यक्त करतात. डॉर्कीन 'Taking Rights seriously'या आपल्या पुस्तकात व्यक्तीला स्वातंत्र्याचा हक्क नाही असे मत मांडतात. डॉर्कीन 'संसाधनाची समानता' (Equality of Resources) ही उपपत्ती मांडतात. या उपपत्तीत दोन मुद्दे प्रामुख्याने आढळतात. १) मानवाने जे आयुष्य त्याच्यासाठी निवडले आहे त्यास तोच जबाबदार आहे. २) समाजातिल संसाधनांचे वितरण हे व्यक्तीच्या बुध्दिमत्तेवर किंवा क्षमतांवर अवलंबून नसावे किंवा व्यक्तीच्या बुध्दीमतेच्या, क्षमतांचा परिणाम संसाधनांच्या वितरणावर होऊ नये. समाजात प्रत्येक व्यक्तीला समान दर्जा असावा, हया समतेच्या मूल्यांवर डॉर्कीन भर देतात.

डॉर्कीनच्या मते 'समता' आणि 'स्वातंत्र्य' या मूल्यांमध्ये कोणताही संघर्ष नाही. एखादया व्यक्तीला दूसऱ्याचा खून करण्यापासून परावृत्त केले तर त्याचा अर्थ असा होत नाही कि त्याच्या (खून करणाऱ्या व्यक्तीच्या) स्वातंत्र्याला बाधा आणली, चुकीचे कृत्य करण्यापासून परावृत्त करणे म्हणजे त्याचे स्वातंत्र्य हिरावून घेतले असा त्याचा अर्थ होत नाही. जो पर्यंत आपल्या एखादया कृतीमूळे इतरांना बाधा येत नसेल, म्हणजेच इतरांचे नुकसान होत नसेल तर ते स्वातंत्र्य

आहे. इतरांच्या हक्कावर आपल्या स्वातंत्र्यामुळे अडथळा येऊ नये व्यक्तीला स्वातंत्र्य उपभोगण्यासाठी काही घटकांची आवश्यकता असते समाजात स्वातंत्र्याचा उपभोग घेण्यासाठीची अनुकूल परीस्थीती म्हणजे व्यक्तीच्या प्राथमिक गरजांची पुर्ती किंवा योग्य कायदेप्रणाली वगैरे असणे आवश्यक आहे.

**आपली प्रगती तपासा**

१ रोनाल्ड डॉर्कीन यांची स्वातंत्र्याविषयीची संकल्पना स्पष्ट करा.

.....................................................................
.....................................................................
.....................................................................
.....................................................................

## १४.३ इसीह बर्लीन- (१९०९-९७)

इसीह बर्लीन हा ब्रिटीश तत्त्वज्ञ होता. त्याचा जन्म १९०९ साली रीगा (आताची लॅटव्हीआ ची राजधानी) येथे झाला. त्याचे वडिल मेन्डेल बर्लीन लाकडाचे मोठे व्यापारी होते. १९१५ साली रशीयामधील अन्ड्रेपोल येथे, नंतर १९१७ साली पेट्रोग्राड येथे त्यांच्या कुटूंबीयांनी स्थलांतरण केले. १९१७ सालच्या रशीयन क्रांतीचे ते साक्षीदार होते. १९२० साली सर्व कुटुंबीय ब्रिटनला गेले आणि लंडनच्या जवळपासच ते राहीले. इसीह बर्लीनचे महाविद्यालयीन शिक्षण ऑक्सफर्डच्या ख्रिस्ती कॉलेजमध्ये झाले, तेथे त्यांनी राज्यशास्त्र, तत्त्वज्ञान आणि अर्थशास्त्राचा अभ्यास केला. १९३२ साली New College येथे प्राध्यापक म्हणून त्यांची नेमणूक झाली.दुसऱ्या महायुध्दाच्या काळात त्यांनी न्युयॉर्क शहर आणि वॉशींग्टन DC येथे ब्रिटीश एम्बसीमध्येही कार्य केले होते. अमेरिकेतल्या विद्यापीठामध्येही त्यांच्या नियमीत भेटी असायच्या.

१९७४ ते १९७८ या कालावधीत ते ब्रिटीश ॲकडमीचे अध्यक्ष होते. त्यांना त्यांच्या नागरी स्वातंत्र्याच्या कार्यासाठी अनेक पूरस्कार प्राप्त झाले होते. १९९७ साली त्यांचा मृत्यू झाला.

## १४.४ इसिह बर्लीनची स्वातंत्र्याची संकल्पना

इसीह बर्लीनचा १९५८ साली 'Two concepts of Liberty' हा लेख प्रसिध्द झाला. या लेखाने राजकीय तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात जबरदस्त प्रभाव पाडला तसेच बरेच दिवस हा लेख चर्चेत होता. राजकीय स्वातंत्र्याच्या सैद्धांतिक चर्चेमध्ये बर्लीनच्या स्वातंत्र्याच्या संकल्पनेने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

१९५८ साली बर्लीनने 'Two conepts of Liberty' वर व्याख्यान दिले होते. नंतर 'Four Essays on Liberty' या नावाने ते १९६९ साली प्रकाशीत झाले. स्वातंत्र्याच्या दोन संकल्पना- सकारात्मक संकल्पना(Positive Liberty)आणि नकारात्मक संकल्पना (Negative Liberty)बर्लीन मांडतो, या दोहोतील फरक स्पष्ट करतो. सकारात्मक संकल्पना ही स्वायत्ततेशी (Autonomy)निगडीत आहे, तर नकारात्मक संकल्पना ही दूसऱ्यांनी केलेल्या जोरजबरदस्तीच्या अभावाशी निगडीत आहे. १९६९ मध्ये त्यांनी या दोन्ही संकल्पना पून्हा नव्याने मांडल्या. बर्लीन नकारात्मक स्वातंत्र्याची व्याख्या करताना सांगतो कि स्वातंत्र्य म्हणजे (इच्छांना मारल्यामूळे निर्माण झालेल्या) केवळ अभाव नव्हे, तर कृती करण्यास येणाऱ्या अडथळयाचा अभाव म्हणजे स्वातंत्र्य या नकारात्मक संकल्पनेमध्ये कृतीच्या संधीवर तो भर

देतो, चार्ल्स टेलर यालाच ‘Opportunity concep’ म्हणतो. सकारात्मक संकल्पना म्हणजे उद्दिष्ट पूर्तीसाठी समाजाची असणारी क्षमता.

### १४.४.१. स्वातंत्र्याची नकारात्मक संकल्पना (अभावात्मक स्वातंत्र्य)

साधारणपणे जेव्हा इतर कोणीही एखादया व्यक्तीच्या कृतीत हस्तक्षेप करत नाही, म्हणजे ती व्यक्ती स्वतंत्र आहे असे मानले जाते. राजकीय स्वातंत्र्य म्हणजे ती व्यक्ती जेव्हा आपल्या कोणत्याही क्षेत्रात हस्तक्षेपाविना कार्य करते जर एखादया व्यक्तीला जे करावयाचे आहे त्यापासून त्याला रोखले जात असले तर ती व्यक्ती स्वतंत्र नाही, आणि जर मर्यादेपेक्षा जास्त प्रमाणात रोखले जात असेल तर त्याला जबरदस्ती म्हणावी लागते किंवा ती गुलामगिरी झाली. बर्लीन जबरदस्तीची संकल्पना स्पष्ट करताना शारिरीक क्षमतेपेक्षा मर्यादे बाहेर जाऊन आपण काही गोष्टी करू शकत नाही. त्याला जबरदस्ती म्हणता येणार नाही. उदा- जर एखादी व्यक्ती आंधळी असेल तर ती वाचन करू शकत नाही. जबरदस्ती याचा अर्थ व्यक्ती हेतूपूर्वक दुसऱ्या व्यक्तीच्या कार्यात हस्तक्षेप करतो. त्यामुळे तो वेगळयाच पध्दतीने वागतो. त्याला हवे ते उद्दीष्ट कोणी साधू शकत नसेल तर त्याला राजकीय स्वातंत्र्याचा अभाव असे म्हणणे योग्य नाही.

बऱ्याचशा राजकीय तत्त्वज्ञांचे हेच विचार आहेत. अर्थातच या स्वातंत्र्याच्या कृतीचे क्षेत्र किती विस्तृत आहे याबाबतीत मतभेद आहेत विचारवंतानी असे गृहीत धरले की, व्यक्तीच्या कृतीचे क्षेत्र हे कायद्याव्दारे मर्यादित असते. काहीजण विशेषतः Liberiarian’s असतात. उदा-लॉक,मिल्ल आणि इतर काही विचारवंतांच्या मते निदान प्रत्येकाच्या व्यक्तीगत स्वातंत्र्याचे असे काही मर्यादीत क्षेत्र असते की ज्याचे उल्लंघन होवूच शकत नाही. आणि त्याचे उल्लघंन झाले तर व्यक्तीला स्वतःच्या क्षमतांचा विकास करता येणार नाही. परिणामी आपली उद्दिष्ट्ये साध्य करता येणार नाही.

### १४.४.२. स्वातंत्र्याची सकारात्मक संकल्पना(भावात्मक स्वातंत्र्य)

प्रत्येक व्यक्तीला असे वाटत असते की तोच तिच्या जीवनांचा शिल्पकार असावा साधारणपणे व्यक्तीची अशी इच्छा असते की तोच तिच्या आयुष्याचा मालक असावा त्याला त्याच्या मर्जीप्रमाणे निर्णय घेता यायला हवे याच विचारावर बर्लीनची सकारात्मक संकल्पना आधारित आहे. प्रत्येक व्यक्तीकडे असणऱ्या बुध्दिमुळे विचार शक्तीमुळे तो इतर जगापासून वेगळा आहे असे मानतो. प्रत्येक व्यक्ती विचार करू शकते. इच्छा करू शकते आणि स्वतःच्या निर्णयाची जबाबदारी देखील घेवू शकते. स्वतःच्या मर्जीचे मालक असण्याचे स्वातंत्र्य आणि ज्याला जे हवे ते त्याला करू देण्याचे स्वातंत्र्य या दोन महत्त्वाच्या संकल्पना आहे. त्याला हवे ते करण्यापासून इतरांनी प्रतिबंध करू नये. इतरांच्या जबरदस्ती पासूनचे स्वातंत्र्य म्हणजे स्वातंत्राची नकारात्मक संकल्पना होय.

बर्लीन प्रश्न उपस्थित करतो मी इतरांचा गुलाम नाही, असे जेव्हा म्हटले जाते, तेव्हा तो म्हणतो मनुष्य हा निसर्गाचा गुलाम आहे का? किंवा त्याच्या भावनांचा किंवा वासनांचा गुलाम आहे का? म्हणूनच तो पुर्णपणे स्वतंत्र आहे का? स्वतःचे स्वरूप तो जाणू शकतो का? त्याचे स्वःस्वरूप आणि तो प्रत्यक्षात जे आहे त्यात मोठी तफावत असू शकते हे स्वरूप जाणण्यासाठी पुर्ण स्वातंत्र्याची आवश्यकता असते.

बर्लीनची स्वातंत्र्याची नकारात्मक संकल्पना स्वातंत्र्याचे क्षेत्र नेमके काय आहे. याचे स्पष्टीकरण करते. कोणत्या अशा क्षेत्रात व्यक्ती इतरांच्या व्यत्ययाशिवाय कार्य करू शकते या

प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न करते स्वातंत्र्य म्हणजे इतरांच्या व्यत्ययाशिवाय कार्य करणे, कृती करण्याच्या स्वातंत्र्यावर जी बंधने घातली जातात ती दूसऱ्या कोणा व्यक्ती किंवा अनेक व्यक्तींव्दारे घातली जातात. स्वातंत्र्याच्या सकारात्मक आणि नकारात्मक संकल्पना या परस्परविरोधी आहेत असे मत मांडतो. सकारात्मक संकल्पना म्हणजे व्यक्तीला स्वातंत्र्यपणे स्वतःची उद्दीष्टये गाठण्याचे स्वातंत्र्य, प्रत्येकाला स्वतःच्या जीवनाचे मालक आपणच असावे अशी एक इच्छा असते स्वातंत्र्याची नकारात्मक संकल्पना म्हणजे स्वतःच्या इच्छांवर इतरांकडून जी बंधने (constraints) लादण्यात येतात त्याचा अभाव असणे म्हणजेच स्वातंत्र्य होय. म्हणजे इतरांच्या हस्तक्षेपापासून (interference) असणारे स्वातंत्र्य नकारात्मक स्वातंत्र्याची संकल्पना म्हणजे अडथळे, बंधने यांचा अभाव असणे. सकारात्मक स्वातंत्र्याची संकल्पना म्हणजे कृती करणे आणि अशा पध्दतीने कृती करणे कि ज्याव्दारे स्वतःच्या आयुष्यावर नियंत्रण मिळविता येईल, तसेच व्यक्तीची ध्येये किंवा उद्दिष्ट्ये गाठता येतील. स्वातंत्र्याची नकारात्मक संकल्पना व्यक्तीशी म्हणजेच कर्त्याशी संबंधीत आहे. तर सकारात्मक संकल्पना ही व्यक्ती एक गटाचा सदस्य या दृष्टिने पाहते.

आजच्या आधूनिक युगात स्वातंत्र्याच्या संकल्पनेचे परीक्षण करण्याची गरज आहे. जगातील सर्वच देशात दहशतवादाची समस्या भेडसावत आहे. संशयीत दहशतवाद्याला घटनेव्दारे नागरीकांचे हक्क मिळाले आहेत कारण तो देशाचा नागरीक आहे. परंतू जर त्याच्या कृत्यामुळे इतरांना धोका पोहोचणार असेल तर त्याच्या स्वातंत्र्यावर मर्यादा घालणे किंवा बंधने घालणे आवश्यक आहे.

**<u>आपली प्रगती तपासा</u>**

१. इसिह बर्लीनची यांची स्वातंत्र्याची संकल्पना स्पष्ट करा.

.....................................................................................................................

.....................................................................................................................

.....................................................................................................................

.....................................................................................................................

## १४.५ सारांश

स्वातंत्र्य हे प्रत्येकाला हवे हवेसे वाटते परंतू डॉरकीन म्हणतो की, आपणास स्वातंत्र्याचा अधिकार आहे काय? तर त्याचे उत्तर स्वातंत्र्याचा अधिकार हा केवळ राजकीय अधिकार नाही स्वतंत्र्याचा अधिकार मर्यादित असायला हवा. डॉरकीन स्वातंत्र्याची व्याख्या समानतेच्या संदर्भात करतो. स्वातंत्र्याचा अधिकार उपभोगण्यासाठी काही इतर संसाधनाची आवश्यकता असते. स्वातंत्र्य याचा अर्थ माझ्या बरोबरीने इतरही व्यक्तींचा संसाधनातील समान हिस्सा आहे त्याची जाणीव असणे.

बर्लीन स्वातंत्र्याची संकल्पना दोन रितीने मांडतो. सकारात्मक स्वातंत्र्याची संकल्पना आणि नकारात्मक स्वातंत्र्याची संकल्पना एखादी व्यक्ती कार्य करीत असेल तर तिला रोखले गेले तर ती जबरदस्ती होते. पण आपल्या शारिरीक क्षमतेपेक्षा मर्यादेबाहेर जाऊन आपण काही गोष्टी करू शकत नाही, त्याला जबरदस्ती म्हणता येत नाही.

व्यक्तीला कृती करण्यास कोणत्याही अडथळयांचा,बंधनांचा, मर्यादांचा अभाव असणे म्हणजे स्वातंत्र्य ही स्वातंत्र्याची नकारात्मक संकल्पना तर सकारात्मक संकल्पनेत प्रत्येक

व्यक्ती विचार करू शकते, इच्छा करू शकते स्वतःच्या मर्जीचे मालक असल्याचे स्वातंत्र्य आणि ज्याला जे हवे ते त्याला करू देण्याचे स्वातंत्र्य आहे. या दोन महत्त्वाच्या संकल्पना आहेत.

## १४.६ विद्यापीठीय दिर्घोत्तरी प्रश्न

१. स्वातंत्र्याचा हक्क विषयीचा हक्क नसणे असे रोनाल्ड डॉरकीनची संकल्पना स्पष्ट करा.

२. स्वातंत्र्याचा हक्क विषयीचा हक्क नसणे असे रोनाल्ड डॉरकीन यांनी केलेल्या विधानाच्या संदर्भात स्वातंत्र्याची संकल्पना मांडून तुमचे विचार स्पष्ट करा.

३. स्वातंत्र्य म्हणजे काय ते सांगून बर्लीन यांची स्वातंत्र्याची भावात्मक व अभावात्मतक संकल्पना स्पष्ट करा.

४. बर्लीनने सांगितलेल्या दोन स्वातंत्र्याच्या संकल्पना स्पष्ट करून त्यामध्ये काही संबंध आहे का? याविषयी तुमचे विचार मांडा.

५. टीपा लिहा.

    १. स्वातंत्र्याची सकारात्मक संकल्पना (भावात्मक स्वातंत्र्य).

    २. अभावात्मक स्वातंत्र्य-बर्लीन.

    ३. समतेचा हक्क आणि स्वातंत्र्याचा हक्क-डॉरकीन.

❖❖❖

# १५

# सविनय कायदेभंग

## (Civil Disobedience)

**घटक रचना**

१५.० उद्दिष्ट्ये

१५.१ प्रस्तावना

१५.२ अहिंसक सविनय कायदेभंगाचे समर्थन : मार्टिन ल्यथूर किंग.

१५.३ कायद्याचे निरपेक्ष पालन : प्लेटोच्या क्रिटोमधील संभाषण

१५.४ सविनय कायदेभंगाविषयी महात्मा गांधींचा दृष्टिकोन

१५.५ सारांश

१५.६ विद्यापीठीय दीर्घोत्तरी प्रश्न

## १५.० उद्दिष्ट्ये

- सविनय कायदेभंगाचा अर्थ समजावून घेता येईल.
- सविनय कायदेभंग हे रक्तपाताशिवाय एक प्रभावी शस्त्र म्हणून संपूर्ण जगभर कसे वापरले जाऊ शकते. हे माहीत करून घेता घेईल.
- डॉ. मार्टिन ल्युथर किंगकडून अमेरिकेतील नागरी हक्क संरक्षित करण्यासाठी सविनय कायदेभंगाचा एक साधन म्हणून उपयोग समजून घेता येईल.
- कायद्याचे निरपेक्ष पालन व उपयोजन या संदर्भात प्लेटोचा दृष्टिकोन अभ्यासता येईल.
- सविनय कायदेभंगाविषयी महात्मा गांधीजींच्या दृष्टिकोनाचे आकलन करून घेता येईल.

## १५.१ प्रस्तावना

सुमारे १५० वर्षांपूर्वी डेव्हिड थोरो यांनी त्यांच्या आधुनिक पाश्चात्य राजकीय उपपत्ती (Theory) मध्ये सविनय कायदेभंग या कल्पनेचा समावेश केला. तेव्हापासून सविनय कायदेभंग हे लोकशाहीच्या तंत्रामध्ये नागरिक सहमत नसल्याचे दर्शिविण्यासाठी एक महत्त्वाचे साधन म्हणून वापरले जाऊ लागले.

विश्वामध्ये अनेक प्रभावी राष्ट्रांनी कमजोर राष्ट्रांवर आक्रमण केले व त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले तसेच प्रत्येक राष्ट्रात वांशिक वर्णभेद अगोदरच होता. यासाठी अनेक तत्त्वचिंतकांनी लढा दिला. हा लढा हिंसात्मक व अहिंसात्मक अशा दोन्ही प्रकारचा होता. अहिंसात्मक लढा हा असहकार, उपोषण, सत्याग्रह , सविनय कायदेभंग या तंत्राच्या माध्यातून होता. डॉ. मार्टिन ल्यूथर किंग, महात्मा गांधी इत्यादींनी सविनय कायदेभंग या तंत्राच्या साहाय्याने लढा दिला.

सविनय याचा अर्थ विनयाने म्हणजेच अहिंसा, सत्य, सहनशिलता याचा वापर करणे व

अन्यायकारक कायद्याचे पालन न करणे. राजकीय क्षेत्रात अन्यायी, जुलमी सरकार विरुद्ध परकीय सत्तेविरुद्ध सत्याग्रहातील सविनय कायदेभंग या तंत्राचा उपयोग करणे व अनैतिक तसेच चुकीचे कायद्याचे पालन न करणे. अन्यायी व जुलमी राजवट व सत्ता यांच्याविरुद्ध लढण्यासाठी, संघर्ष करण्यासाठी या विचारवंतांनी नवीन, प्रभावी पद्धत विकसित केली.

## १५.२ अहिंसक सविनय कायदेभंगाचे समर्थनः मार्टिन ल्यूथर किंग

डॉ.मार्टिन ल्यूथर किंग (१५ जानेवारी १९२९ ते ४ एप्रिल १९६५) हे अमेरिकेतील निग्रोंचे नेते होते. अमेरिकेत वर्ण, वंशभेदाच्या विरुद्ध आंदोलन उभे करून निग्रोना न्याय, समानता यांच्या हक्कासाठी अमेरिकेत सत्याग्रहाने लढा उभा केला. डॉ. मार्टिन ल्यूथर किंग यांचा जन्म एका धार्मिक कुटुंबात झाला. त्यांचे वडील धर्मगुरु होते. भोवतालच्या अन्यायाविरुद्ध समाजमन तयार करण्यात किंगचे वडील प्रयत्नशील असत. वडिलांचाच प्रभाव मार्टिन किंगवर पडला. पुढे महाविद्यालयाच्या उंबरठ्यावर असताना त्यांच्या वाचनात अनेक क्रांतिकारक वैचारिक ग्रंथ आले. हेन्री, थोरो, रस्किन आणि टॉलस्टॉय यांच्या ग्रंथानी त्यांच्या आंतरयामी हृदयात वादळे निर्माण झाली. भोवतालच्या समाजातील दुष्टप्रवृत्ती नष्ट करण्यासाठी त्यांना जाणीव झाली. याचवेळी भारतातील एक अहिंसक परंतु प्रबल व्यक्ती म्हणून म. गांधींच्या नावाची चर्चा सर्व जगभर होऊ लागली. गांधीजींच्या सत्याग्रही तत्त्वज्ञानाचा प्रभाव डॉ. मार्टीन ल्यूथर किंगवर पडला. महात्मा गांधींनी अवलंबिलेल्या पद्धतीचा अमेरिकेतील निग्रोचा लढा उभा करायचा असे त्यांचे मत महात्मा गांधीजींच्या विचारांशी जुळले गेले. भारतातील जाती व्यवस्थेमुळे निर्माण झालेले प्रश्न हे अमेरिकेतील गुलामगिरीएवढेच भयानक स्वरूपाचे होते. एक वर्ग दुसऱ्या वर्गाचे शोषण करून त्याचे जगणे नष्ट करून टाकतो. माणसेच माणसाचे पंख छाटून टाकतात हे दुःख महात्मा गांधीजींचे होते. तसेच निग्रोंना गुलामगिरीने वागवून त्यांची पिळवणूक करणाऱ्या गोऱ्याचीही वागणूक दुःखदायक होती. हे दुःख मार्टिन ल्यूथरचे होते.

डॉ. मार्टिन ल्यूथर किंगने ''बर्मिंगहॅम'' येथे वांशिक वर्णभेदावर १९६३ मध्ये सत्याग्रह केला. महात्मा गांधीजींच्या कार्याची स्फूर्ती घेऊन सत्याग्रहाची तंत्रे अवलंबिली. त्यांनी आपल्या सत्याग्रहात शालेय विद्यार्थी सामील करून घेतले. डॉ. किंग यांनी अमेरिकेतील स्वातंत्र्य चळवळीच्या इतर नेत्याबरोबर चर्चा केली आणि वॉशिंग्टन येथे दोन लाख नागरिकांना समतेची वागणूक मिळाली पाहिजे. त्यावेळी मार्टिन ल्यूथर किंग यांनी केलेले भाषण उल्लेखनीय आहे. ते म्हणतात : स्वातंत्र्य कोणीही आपणहून देत नाही. दडपलेल्या जनतेला ताठ मानेने उभे राहून ते स्वातंत्र्य मागावे लागते. १९६४ मध्ये अमेरिकेच्या कायदेमंडळाने समान नागरी हक्काचा कायदा संमत केला. सार्वजनिक ठिकाणी वाहनातून वर्णभेद रद्द करण्याचे तसेच सरकारच्या सरकारी सवलती व नोकऱ्यामध्ये जागा देण्याची मागणी मांडली. गोऱ्यांबरोबर काळ्या म्हणजे इतर लोकांनाही हक्क मिळाला.

डॉ. मार्टिन ल्यूथर किंग म्हणतात की, 'काळे लोक स्वातंत्र्य आणि न्याय मिळाल्यावाचून गप्प बसणार नाहीत. असा डॉ. किंग यांचा आत्मविश्वास पूर्ण झालेला होता. त्यांनी अमेरिकेत महात्मा गांधीजींच्या असहकार चळवळीच्या तंत्रातून नागरी हक्कांच्या चळवळीला एक वेगळी प्रेरणा त्यांना मिळाली. त्यावेळेस किंगच्या घरांवर गोऱ्यांनी बॉम्बने हल्ले केले. कौटुंबिक सुरक्षितता धोक्यात येऊनही किंग यांनी माघार घेतली नाही. यावरून त्यांनी काळ्या व गोऱ्यांच्या वसाहती ज्या वेगळ्या होत्या त्यांच्या विरुद्ध प्रचार करून वर्णभेद नष्ट करण्याचा प्रयत्न केला.

डॉ. किंग यांच्या मतानुसार, कोणत्याही अहिंसक पद्धतीमध्ये प्रामुख्याने चार घटक किंवा

पायऱ्या असतात, त्या पुढीलप्रमाणे :-

(१) वस्तुस्थितीची माहिती गोळा करणे, खरोखरच अन्याय झाला आहे की नाही या संदर्भात सर्व प्रकारची माहिती गोळा करणे.

(२) शासन किंवा अधिकारी वर्ग यांच्याशी त्या संदर्भात चर्चा करणे.

(३) डॉ. मार्टिन ल्यूथर किंगनी जी सूचिता सांगितली आहे, त्याचा अर्थ असा घेता येईल की, कायदेभंग करण्यामागे कोणताही स्वार्थी हेतु नसावा. तर त्यातून समाजाचे हित साधले जावे. समाजाच्या कायद्याला त्यात महत्त्व दिले जावे.

(४) प्रत्यक्ष कायदेभंग करताना पत्यक्ष कृतीच अपेक्षित आहे. धरणे, निदर्शने, उपोषण या सारख्या कृतींद्वारे शासनाचे लक्ष वेधले जाते.

जेव्हा कायदा हा अन्यायकारक असतो, समाजातील विषमता वाढीस लावतो तेव्हा अशा कायद्याचे पालन करण्यापेक्षा तो कायदा मोडणे योग्यच ठरतो. डॉ. मार्टिन ल्यूथर किंग प्रत्यक्षात बर्मिंग हॅम येथील वस्तुस्थिति सांगतात की, तेथे वांशिक भेदामुळे सातत्याने निग्रो जमातीवर अन्यायच झाला आहे. निग्रोंना अन्यायकारकच वागणूक मिळाली. त्यांच्या घरावर व चर्चवर बॉम्ब टाकण्यात आले म्हणून ज्या कायद्याने त्यांना असमानतेची वागणूक मिळत आहे, त्यांच्यावर अन्याय होत आहे. अशा कायद्याचे पालन न करणे नैतिकदृष्ट्याही योग्य ठरते. म्हणून डॉ. मार्टिन ल्यूथर किंग हे कायद्याचे न्याय व अन्यायकारक कायदा असे दोन प्रकार करतात.

न्याय व अन्यायकारक कायदा यातील फरक स्पष्ट करताना डॉ. मार्टिन ल्यूथर किंग सांगतात की, अन्यायकारक कायदा किंवा नियम असा की, जो बहुसंख्यांकांच्या गटाने अल्पसंख्याक गटावर लादलेला असतो व अल्पसंख्यांकांनी त्याचे पालन करणे बंधनकारक असते. परंतु बहुसंख्यांच्या गटावर असे बंधन नसते. अशा फरकाला कायदेशीर मान्यता मिळालेली नसते. याउलट न्यायकारक जो बहुसंख्याकांनी बनविलेला नियम अल्पसंख्यांकावर बंधनकारकच असतो. परंतु त्या नियमांचे पालन करण्याची त्यांची ही तयारी असते. अशा समानतेला कायदेशीर मान्यता असते. अल्पसंख्यांकावर लादलेला कायदा हा अन्यायकारक बनतो जेव्हा तो कायदा बनविण्यामध्ये त्याला कोणताही अधिकार नसतो किंवा कोणतेही स्थान नसते. उदा. निग्रोना मतदानाचा हक्क देण्यात आला नव्हता. त्यामुळे शासन कारभारात ते भाग घेऊ शकत नव्हते.

महात्मा गांधींनी व डॉ. मार्टिन ल्यूथर किंग यांनी सविनय कायदेभंगात अहिंसात्मक मार्गाचा अवलंब केला आहे. कायदा हा अनैतिक असल्याने त्याला विरोध केला जात आहे. त्यांनी साधन सूचितेला महत्त्व दिले आहे. दोघांनीही प्रेमाची ताकद ओळखली होती. डॉ. मार्टिन ल्यूथर किंग म्हणतात, ''अंधार अंधाराला दूर करू शकत नाही तर प्रकाश अंधाराला दूर करू शकतो. त्याचप्रमाणे द्वेष दोषाला नाहीसे करू शकत नाही. तर प्रेमच ते करू शकते.''

१९६७ मध्ये न्यूयॉर्कला भरलेल्या शांतता सभेत व्हिएतनाम युद्धाला विरोध दर्शविण्यासाठी सर्व वर्णियांचे संयुक्त आंदोलन डॉ. किंग यांनी उभारले. तसेच अमेरिकेतील समान नागरी हक्काच्या स्वातंत्र्याच्या चळवळीचा पाया घातला. अहिंसात्मक प्रतिकार आंदोलनाचा पुरस्कर्ते म्हणून डॉ. मार्टिन ल्यूथर किंग यांचे कार्याचा अभ्यास करीत असताना महात्मा गांधीजींची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. महात्मा गांधीजींच्या सत्याग्रह तत्त्वज्ञानाचा डॉ. मार्टिन ल्यूथर किंग यांनी अभ्यास करून त्यातून

स्फूर्ति घेतली आणि वांशिक वर्ण भेदाबरोबरचे आंदोलन, अहिंसा, सत्य आणि अहिंसात्मक प्रतिकारशक्ती या मार्गाने व सत्याग्रह तंत्राने सुरु केले. त्यांनी काळ्या लोकांना मानव अधिकार मिळवून दिले. त्यांच्यात जागृती निर्माण केली.

डॉ. मार्टिन ल्यूथर किंग यांना नोबेल पारितोषिक मिळाले. त्यांच्या कार्यामुळे त्यांना हा बहुमान मिळाला आहे. लोकशाही म्हणजे, लोकांच्या करिता त्यांनी चालवलेले राज्य. सदाचार, न्याय प्रस्थापित करण्यासाठी आयुष्यभर कार्य केले. सर्व अमेरिकन लोकांना आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि वांशिक समता मिळणारच अशा आत्मविश्वासाने महात्मा गांधीजींची स्फूर्ती घेऊन सत्याग्रही चळवळी केल्या आणि त्यात ते यशस्वी झाले. ४ एप्रिल १९६८ मध्ये ते 'टेनेटी' राज्यात स्वच्छता कामगारांच्या संपाला पाठिंबा देण्यासाठी गेले होते. तेथे एका हॉटेलच्या बाल्कनीत डॉ. मार्टिन ल्यूथर किंग उभे असताना अमेरिकेतील द. भागातील गोऱ्या वंशाच्या नागरिकाने जेमून अर्ल रे या व्यक्तीने डॉ. किंग यांच्यावर गोळ्या झाडल्या. त्यातच त्यांचा अंत झाला. किंगच्या या मारेकऱ्याला ९९ वर्षे कैदेची शिक्षा झाली. अगदी तसेच गांधीजींचा मारेकरी नथूराम गोडसे यानेही गोळ्या झाडून सायंकाळी प्रार्थनेला जात असताना त्यांचा खून केला. दोन्ही महान समाज सुधारकांचा अंत गोळ्यांनी झाला आहे.

**आपली प्रगती तपासा**

१) डॉ. मार्टिन ल्यूथर किंग यांच्यावर कोणाच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव पडला होता?

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

२) डॉ. मार्टिन ल्यूथर किंग यांच्या सविनय कायदेभंगाच्या तंत्राचे विश्लेषण करा.

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

## १५.३ कायद्याचे निरपेक्ष पालन : प्लेटोच्या क्रिटोमधील संभाषण

प्लेटोचा जीवनकाल ४२८ इ.स.पू. ते ३४७ इ.स.पू. असा आहे. ते एका संपत्तीवान आणि राजकीयदृष्ट्या सक्षम असलेल्या एका अथेनियन कुटुंबातील होते. प्लेटो हे सॉक्रेटिसची संभाषणे ऐकण्यामध्ये गोडी असणाऱ्या तरुणांपैकी एक होते. सॉक्रेटिस हे प्लेटोसाठी आदर्श खरे तत्त्वज्ञ बनले. प्लेटोने त्यांच्या वयाच्या चाळीसाव्या वर्षी अकॅडमीची स्थापना केली व जवळ जवळ चाळीस वर्षे त्यांनी त्या अकॅडमीत अध्यापकाचे काम केले. सॉक्रेटिसप्रमाणे प्लेटोही अध्यापनासाठी शुल्क घेत नसे.

प्लेटोने संभाषणाच्या स्वरुपात लिखाण केले. प्लेटोच्या संभाषणामध्ये बोलण्याची मुख्य भूमिका सॉक्रेटिसची आहे. संभाषणामध्ये प्लेटोने स्वतःचेही काही तत्त्वज्ञान सॉक्रेटिसच्या भूमिकाच्या निमित्ताने सॉक्रेटिसच्या तोंडून वदवून घेऊन तत्त्वज्ञान स्पष्ट केले आहे. प्लेटो हे

फक्त तत्त्वज्ञच नव्हते तर साहित्यिक व कलाकारही होते. गद्यामध्ये एखादी गोष्ट अचूकपणे मांडता येत नसेल तर त्यांनी दंतकथा, रुपककथा, अलंकार इत्यादीचाही वापर केला आहे.

वयाच्या ७० व्या वर्षी सॉक्रेटीसवरती राज्यधर्माचे पालन करत नसल्याचे व तरुणांना बिघडवत असल्याचे आरोप लादण्यात आले. या संदर्भातील सॉक्रेटीसवरील आरोप त्यांना झालेली शिक्षा, शिक्षेची अंमलबजावणी इत्यादी गोष्टी प्लेटोने डिफेन्स ऑफ सॉक्रेटिस, क्रिटो आणि फिडो यामध्ये सांगितलेल्या आहेत.

प्लेटोने लिहिलेल्या क्रिटो या संभाषणाचा मुख्य विषय म्हणजे 'कायद्याचे निरपेक्ष पालन' हा आहे. इतर संभाषणाप्रमाणे क्रिटोचा मुख्य चरित्र सॉक्रेटिस आहे. सॉक्रेटिसवर खटला भरल्यानंतर, वास्तविक पाहता सॉक्रेटिससाठी तुरुंगातून निसटून जाण्याची योजना तयार करण्यात आली असताना त्यांनी ते नाकारले व त्याला करण्यात आलेल्या शिक्षेच्या अमंलबजावणीसाठी वाट पाहत आहे, या सर्व गोष्टीचे वर्णन क्रिटोमध्ये आहे. सॉक्रेटिसने तुरुंगातून निसटून जाण्याची संधी नाकारली कारण राज्यातील प्रत्येक नागरीकाने स्वतःच्या राज्याशी व राज्यातील कायद्याशी प्रामाणिक राहावयास पाहिजे. असा त्यांचा दृष्टिकोन आहे. सॉक्रेटिसने स्वतःची बाजू मांडताना सांगितले आहे की, राज्याच्या कायद्यानुसार मी अपराधी ठरलो आहे. तेव्हा मला शिक्षा घेतलीच पाहिजे. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सॉक्रेटिसचा विचारांवर विश्वास होता. तेव्हा त्याचा दृष्टिकोन तुरुंगातून निसटून जाणे म्हणजे आपण जे काही करीत होतो, ते चूकीचे ठरणार पण मी चूकीचे काही केले नाही, असा होता. म्हणून स्वतः हेमलॉक हे विष मागून घेऊन स्वतः विषप्राशन करून जितक्या सुंदरतेने जगत होते, तितक्याच सुंदरतेने मानवी जीवनाच्या सर्वांगीण विकासासाठीच्या विचारासाठी बलिदान स्वीकारले.

सॉक्रेटिस तुरुंगात असताना पहाटेच्या थोडे अगोदर सॉक्रेटिस झोपेतून जागे झाल्यानंतर त्याच्याकडे पाहणाऱ्या त्याचा जुना मित्र क्रिटो यांच्याशी संभाषण झाले. क्रिटोने स्पष्ट केले की, काहीवेळ ते सॉक्रेटिसकडे पाहत होते. परंतु सॉक्रेटिसला जागे करण्याचे धाडस झाले नाही. आपल्या मित्राच्या जवळ येणा-या मृत्यूमूळे क्रिटोला रात्रभर झेप लागली नाही. त्यांनी सॉक्रेटिसला भेटायचे ठरविले. परंतु सॉक्रेटिस या बिकट परिस्थितीमध्येही शांतपणे झोपलेले पाहून क्रिटोने त्यांच्या शांत मनःस्थितीची प्रशंसा केली. तेव्हा सॉक्रेटिसने प्रत्युत्तर दिले की मृत्युला घाबरणे हे योग्य नाही. क्रिटोने आपल्या येण्याचा हेतु स्पष्ट केला व तुरुंगातून निसटून पळून जाण्यासाठी व हद्दपार होण्यासाठी त्यांनी सॉक्रेटिसचे मन वळवण्याचा प्रयत्न केला की ज्यामुळे सॉक्रेटिसची मृत्यूदंडाची शिक्षा टळणार होती. तेव्हा सॉक्रेटिसने जणूकाही स्वतःशीच संवाद साधला आणि काही वाक्ये चांगले आणि वाईट, योग्य व अयोग्य या संदर्भात काही वाक्ये उधृत करतो की ज्यामुळे सॉक्रेटिसचे चारित्र्य समजते. अर्थात् आतापर्यंत सॉक्रेटिसचे ज्यांनी ऐकलेले आहे, त्यांनी सॉक्रेटिसकडून वरील वाक्याचीच अपेक्षा केली असती. या छोट्याशा संभाषणातून एखाद्याला कायद्याने युक्त वागण्याची प्रेरणा मिळेल.

सॉक्रेटिसने तुरुंगातून निसटून जाणे ही योग्य कृती आहे असे सांगून क्रिटो सॉक्रेटिसने तुरुंगातून निसटून जावे. यासाठी सॉक्रेटिसचे मन वळवण्याचा प्रयत्न क्रिटो करीत आहे. आपला दृष्टिकोन योग्य आहे. यासाठी क्रिटो स्वतःच्या दृष्टिकोनाला आधार म्हणून खालील कारणे सांगत आहे.

१) क्रिटो पहिले कळकळीचे आव्हान करतो की, कोणत्याही प्रकारे उणीव भरून निघणार नाही. अशा मित्राला तो गमावू इच्छित नाही. क्रिटो दुसरे कळकळीचे आव्हान करतो की समाजामध्ये सॉक्रेटिसला वाचवण्यासाठी त्यांच्या मित्रांनी काहीही प्रयत्न केले नाहीत. अशी गैरसमजूत पसरेल अनेक लोकांच्या मतानुसार सॉक्रेटिसचे तुरुंगातून निसटणे योग्य

आहे. तुरुंगातून निसटून हद्दपार झाल्यानंतर सॉक्रेटिसच्या आर्थिक व्यवस्थेची जबाबदारी व त्याच्या आनंदी जीवन जगण्यासाठी लागणाऱ्या सर्व सोयी-सुविधांची जबाबदारी त्यांच्या मित्रांनी घेतलेली होती.

२) यानंतर नैतिक पातळीवरील दोन अत्यंत महत्त्वाचे युक्तिवाद क्रिटो करतो. ते पुढीलप्रमाणे पहिल्यांदा क्रिटो म्हणतो की जर सॉक्रेटिस निसटून न जाता तुरुंगातच राहिला तर त्याला देहांताचे शिक्षा होणार हे निश्चित आहे. सॉक्रटिस तुरुंगामध्येच राहून अन्यायाने वागून चूक करणाऱ्या शत्रूला मदत करीत आहे. दुसऱ्या युक्तिवादामध्ये क्रिटो म्हणतो, ''सॉक्रेटिस स्वतःच स्वतःच्या जीवनाचा विश्वासघात करत आहे. नैतिक दृष्टिकोनातून सॉक्रेटिस स्वतःशीच अन्यायाने वागत आहे.

३) पुढील नैतिक युक्तिवादामध्ये क्रिटो म्हणतो की, वडीलांची भूमिका निभावण्यासाठी, आपल्या मुलांचे संगोपन करणे व त्यांना शिक्षण देणे, ही सॉक्रेटिसची जबाबदारी आहे. सॉक्रेटिसला देहांताची शिक्षा झाल्यास त्यांची मुले अनाथ बनतील. अशाप्रकारे सॉक्रेटिस आपल्या स्वतःच्या मुलांचा विश्वासघात करत आहे आणि हे नैतिक दृष्टिकोनातून चुकीचे आहे.

अशाप्रकारे सॉक्रेटिसने तुरुंगातून निसटून जाऊन हद्दपार होण्यासाठी क्रिटोने सर्वसामान्य माणसांना सहज पटतील असे युक्तिवाद केले आहेत. परंतु सॉक्रेटिसने तुरुंगातून निसटून जाण्यासाठी नकार दिला आहे. ते बौद्धिक तत्त्वानुसार आचरण करणारे होते. ते विचार करीत होते की तुरुंगातून निसटून जाणे म्हणजे नियमाचा भंग करणे होय.

अशाप्रकारे सॉक्रेटिस तुरुंगातून निसटून जाणे कसे अयोग्य आहे, यासाठी महत्त्वाची कारणे पुढील प्रमाणे सांगत आहेत.

१) सॉक्रेटिसच्या विचारानुसार त्यांचे मित्र त्यांना निसटून जाण्यासाठी मदत करून स्वतःला शिक्षा होण्याची किंवा अतिशय वाईट परिस्थिती स्वतःवर ओढवून घेत आहेत.

२) सॉक्रेटिसला खात्री आहे की त्यांच्या मृत्युनंतर त्यांच्या मुलांची काळजी त्यांचे मित्र निश्चितपणे चांगल्याप्रकारे घेतील.

३) पहिल्यापासून निवासी शहरांचे नियम मोडून सॉक्रेटिस दुसया शहरांमध्ये राहू इच्छित नाही, कारण जवळ जवळ ७० वर्षे तो आपल्या मायभूमीत शांततेने राहिलेला आहे.

४) सॉक्रेटिस विचार करतो की आतापर्यंत मी न्यायी आणि पवित्र जीवन जगलो आहे. आता जर मी पळून गेलो तर ज्या शहरांमध्ये जाईन, तेथील नागरिकांकडून माझ्याविषयीची तुच्छतापूर्वक वागणे हे माझ्या पवित्र जीवनाला शोभणारे नाही.

५) क्रिटोच्या पहिल्या युक्तिवादावर सॉक्रेटिस प्रश्न करतात. ते म्हणतात काही मते बरोबर आहेत, आणि काही मते चुकीची आहेत. शहाण्या माणसांच्या मतांचा विचार करावयास पाहिजे. विश्वसनीय एक व्यक्ती असेल आणि त्याच्याविरोधात अनेक व्यक्ती असतील, तर अनेकांच्या एकमताऐवजी विश्वसनीय एका व्यक्तीचे मत स्वीकारले पाहिजे.

६) या संभाषणामध्ये सॉक्रेटिसने अथेन्सच्या नियमांचे व्यक्तिकरण केले आहे. सॉक्रेटिसच्या विचारानुसार तुरुंगातून पळून जाणे, ग्रीकच्या कायद्याशी विश्वाघात केल्यासारखे आहे.

अशाप्रकारे प्लेटोने लिहिलेले क्रिटो हे संभाषण फक्त राजकीय बंधनाच्या तत्त्वज्ञानात्मक विश्लेषणासाठीच प्रसिद्ध नसून ते अनेक शतके टिकून राहिले आहे. यासाठीही प्रशंसनीय आहे. या संभाषणामध्ये प्लेटोने समाजातील सर्व लोकांना एकत्रित बांधून ठेवणाऱ्या सामाजिक कराराचे

वर्णन केलेले आहे. हा करार अनेक नागरिकांमधील नसून हा करार व्यक्तिगत नागरिक आणि कायद्यामधील आहे. अथेन्समध्ये राहणे पसंत करून तेथील नागरिक कायदे योग्य आहेत, या मताचे असून स्वतःकडून त्या कायद्याचे बंधन स्वतःहून मान्य करणारे आहेत.

अशाप्रकारे सॉक्रेटिस क्रिटोला पटवून सांगत आहेत की तुरुंगातून निसटून न जाण्याचा प्रयत्न करणेच अधिक चांगले आहे.

प्लेटो त्यांच्या लिखाणात कायदे आणि कायदे बनविणाया व्यक्ती यांच्यात फरक करतात. राज्यातील कायदे चांगले असतात आणि चांगल्या हेतूसाठी तयार केलेले असतात जर असे असेल तर कायद्याचे निरपेक्षपणे पालन झाले पाहिजे. अशाप्रकारे प्लेटो कायद्याच्या निरपेक्ष पालनाची मागणी करतो परंतु लोकांकडून या कायद्याचे न्यायीपद्धतीने पालन केले जात नाही, ही मुख्य समस्या आहे. सॉक्रेटिसला जर चुकीच्या पद्धतीने तुरुंगवास झाला असेल आणि हा तुरुंगवास जर कायद्यानुसार असेल, तेव्हा प्लेटो निष्कर्ष काढतो की हे कायदे अन्यायी आहेत आणि असे कायदे मोडून काढण्यासाठी लायक आहेत. प्लेटो म्हणतो, की ''अन्यायी कायदे कधीच कायदे असू शकत नाहीत''

अशाप्रकारे क्रिटो या संभाषणामध्ये कायदे हे न्यायी असतात परंतु या कायद्याचे अंमलबजावणी करणारे लोक अन्यायीपणाने कायद्याची अंमलबजावणी करतात. सॉक्रेटिसला दोषी ठरवून त्यांना तुरुंगात ठेवणारे आणि देहांताची शिक्षा देणारे हे कायदे नसून या कायद्याचे अन्यायीपणाने अंमलबजावणी, अन्यायीपणाने उपयोजन करणारे अथेन्सचे नागरिक आहेत. ''क्रिटो'' या संभाषणामध्ये दिसून येते की सॉक्रेटिस स्वेच्छेने शिक्षा स्वीकारत आहे परंतु तेथील कायद्याचे अंमलबजावणी करणाया लोकांकडून त्यांच्यावर लादलेल्या गुन्ह्यांचा ते स्वेच्छेने स्वीकार करीत नाहीत.

**आपली प्रगती तपासा.**

१) प्लोटोच्या “क्रिटो” या संभाषणाचा विषय काय आहे ?

२) ‘क्रिटो’ या संभाषणात क्रिटो काय सांगतो ?

३) सॉक्रटिसने तुरंगातून निसटून जाणे योग्य आहे यासाठी क्रिटो कोणती कारणे सांगतो ?

४) सॉक्रेटिस तुरंगातून निसटून पळून जाण्यासाठी नकार का देतो ?

५) प्लेटो कायदे आणि कायदे बनविणाऱ्या व्यक्ती यात फरक कसा करतो ?

६) क्रिटो या संभाषणातून प्लेटो काय दाखवू इच्छितो ?

## १५.४ सविनय कायदेभंगाविषयी म. गांधीजींचा दृष्टिकोन

म. गांधीजी हे भारतीय स्वातंत्र्य लढ्यात अतिशय सक्रियतेने सहभागी झालेले स्वातंत्र्य सेनानी होते. भारतीय तत्त्वज्ञानात आधुनिक तत्त्वचिंतक म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो. म. गांधीजींवर रस्किनच्या ‘अन टु धिस लास्ट’ या ग्रंथाचा प्रभाव पडला. त्यामुळे त्यांनी या ग्रंथाच्या मार्गाने लढा दिला आणि तो लढा देत असताना जी विविध तंत्रे विकसित केली. त्यांना भारतीय व पाश्चात्य तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान आहे. अहिंसा व सत्य ही महत्त्वाची तत्त्वे किंवा मूल्ये यांच्या आधारे अनेक प्रकारे ब्रिटिशांविरुद्ध लढा उभा केला. त्यामध्ये असहकार, सत्याग्रह, धरणे, उपोषण, सविनय कायदेभंग या तंत्राचा अवलंब पूर्णतः सत्य आणि अहिंसेच्या मार्गाने केला.

**सविनय कायदेभंग**

प्राचीन ग्रीक नगर राज्यांमध्ये तेथील राज्यकर्त्यांनी जनतेवर अन्याय करणारे कायदे संमत केले होते. त्यांना सॉक्रेटिस या तत्त्वचिंतकाने सविनय कायदेभंगाद्वारे विरोध केला. जे कायदे जनतेवर अन्याय करतात ते कायदे असू शकत नाही. (Unjust Laws are not Laws)

याच विचारांना पूरक अशी महात्मा गांधीजींनी आपल्या चळवळीला स्वरुप दिले. सविनयाचा अर्थ स्पष्ट करताना महात्मा गांधीजी म्हणतात, 'विनयाने म्हणजेच अहिंसा, सत्य, सहनशीलता या मार्गाने आपल्यावर लादलेल्या अन्याय कायद्याचे पालन करावयाचे नाही. म्हणजे कायदे नाकारताना समोरच्याचे नुकसान होणार नाही. क्लेश निर्माण होणार नाही याची प्रत्येकाने काळजी घ्यावी. या चळवळीत गांधीजींनी आपल्या अनुयायांना असा आदेश दिला की,

१) सरकारचा कोणताही अन्याय करणारा कायदा पाळावयाचा नाही.

२) या आंदोलनात विनयशीलता, सोशिकता पाळावयाची.

३) सविनय कायदेभंग करताना सरकारकडून जे अत्याचार होतील ते सहन करण्याची मानसिकता प्रत्येक सत्याग्रहीने ठेवावी.

थोडक्यात राजकीय क्षेत्रात जुलमी किंवा अन्यायी सरकारविरुद्ध किंवा परकीय सत्तेविरुद्ध करावयाच्या देशव्यापी सत्याग्रहात सविनय कायदेभंग तंत्राचा अवलंब करावा असे महात्मा गांधीजी म्हणतात. अशा प्रकारचा कायदेभंग करीत असताना सरकारने दिलेल्या सोयी-सुविधांचा धिक्कार करावा म्हणजेच

१) सरकारकडून मिळालेल्या बहुमतांच्या पदव्या आणि किताब नाकारणे

२) सरकारी नोकरीचा त्याग करणे

३) कर न भरणे

४) न्यायालय, शिक्षण संस्था व सचिवालये यावर बहिष्कार टाकून अशा प्रकारच्या प्रतिसंस्था तयार करणे

१९३० साली ब्रिटिश सरकारने मिठावर कर लादला होता. त्यामुळे महात्मा गांधीजी यांनी लाखो अनुयायांच्या उपस्थितीत दांडी येथे मिठाचा सत्याग्रह करून ब्रिटिशांचा कायदा विनयशील मार्गाने मोडला.

महात्मा गांधीजींनी अहिंसा व सत्याचा जगाला दिलेला संदेश अत्यंत मोलाचा मानला जातो. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यास गांधीजींचे योगदान आहे. गांधीजींच्या विचारांवर टॉलस्टॉय, रस्किन, हेन्री, डेविल्ड, एमरसन, थोरो यांच्या विचारांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. टॉलस्टॉयच्या मतानुसार जर जगात अशी परिस्थिती निर्माण झाली की लोक स्वतःपेक्षा इतरांवर प्रेम करतील तर जगात आनंद निर्माण होईल. टॉलस्टॉयच्या हा प्रभाव गांधीजींच्या विचारांवर पडला आणि त्यांच्या सत्याच्या सिद्धांताचा आधारस्तंभ बनला. सत्याग्रहाच्या सिद्धांताला मजबूती देण्याचे कार्य हेन्री थोरो यांच्या विचारांनी केले. त्याने पहिल्यांदा सविनय कायदेभंगाच्या संकल्पनेचा वापर केला. गांधीजींनी थोरोच्या या संकल्पनेला नवीन आकार दिला. थोरोने सविनय कायदेभंगाचा वापर केवळ राजकीय क्षेत्रातच केला. परंतु गांधीजीनी त्याचा वापर सर्वच क्षेत्रात केला.

असहकाराच्या पुढची अवस्था म्हणजे सविनय कायदेभंग जो सशस्त्र उठावला शांततापूर्ण रक्तहीन पर्याय आहे. असहकार ही कायदेभंगाची सुरुवातीची अवस्था होय. कायदेभंग ही अहिंसक मार्गाने जाणारी क्रांती आहे. ज्यात अनैतिक किंवा चुकीचे कायदे मोडले जातात यात राज्याची अधिकारशाही मानली जात नाही. उदा. यात नागरीक कर भरणार नाहीत. अन्यायी शासनाविरुद्ध निदर्शने करण्यासाठी हेतूपूर्वक कायदा मोडला जातो. यात तुरुंगात जाण्याची व्यक्तीची तयारी असते. अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याचे ते एक तंत्र आहे.

महात्मा गांधीजींच्या मतानुसार कोणत्याही देशाचा विकास हा दुःख किंवा समस्यांशिवाय होत नाही. जे शासन आपल्या मर्जीविरुद्ध राज्य करते त्याचा सर्व पाठिंबा काढून घेणे योग्य राहील. त्यासाठी कोणत्याही प्रकारचे नुकसान किंवा गैरसोय झाली तर तो त्रास किंवा होणारे दुःख सहन करावे लागेल एखादा जर चुकीने वर्तन करत असेल तर त्याला चुकीची जाणीव होऊन तो सुधारेल अशी वाट पाहण्यास अर्थ नाही. आपल्याला इतरांना त्रास होईल या भीतीपायी त्यात सहभागी होणे योग्य नाही. त्या चुकीच्या वागणाऱ्या सरकारला सहकार्य करणे थांबवायला हवे. अन्याय करणाऱ्या शासनाला पूर्णतः असहकार करायला हवे. अशा प्रकारच्या असहकारात मानसिक किंवा शारिरीक दुःख होत असते. परंतु हे दुःख सहन केल्याशिवाय स्वातंत्र्य मिळत नाही.

महात्मा गांधीजींनी सविनय कायदेभंगाचा जो पुरस्कार केला होता. त्याचे अहिंसक मार्ग हे वैशिष्ट्य होते. कोणत्याही प्रकारच्या शक्तीचा त्यात वापर केला जात नाही. त्याच्या विरोधात बळाचा वापर झाला तर त्याला ही तो प्रतिकार करत नाही. तो तुरुंगात जाण्यासाठी तयार असतो. सविनय कायदेभंग हा राज्याची अधिकारशाही नाकारण्याचा मार्ग आहे. अन्यायकारक राज्याचे कायदे पालन करून स्वातंत्र्य उपभोगण्यापेक्षा त्या कायद्याचे उल्लंघन करून तुरुंगवासाची तो निवड करतो. सविनय कायदेभंग हे अन्यायकारक शासनाविरुद्ध पुकारलेले प्रभावी शस्त्र आहे. महात्मा गांधीजी म्हणतात की, सविनय कायदेभंग म्हणजे शांततापूर्ण रित्या केलेले बंड होय. जेव्हा शासन हे अन्यायी कायदे बनविते तेव्हा सामान्य व्यक्तीच्या हाती कायदेभंग करणे हेच शस्त्र ठरते. कारण त्या व्यक्ती प्रत्यक्षपणे सरकार बनवू शकत नाही. किंवा कायदेही बनवू शकत नाही. महात्मा गांधीजींच्या मतानुसार कायदा कोण मोडू शकतो तर ज्यांनी कायद्याचे पालन करण्याची शिस्त लावली आहे किंवा अशाच नागरिकांनी जर काही विशिष्ट प्रसंगी विशिष्ट कारणांमुळे कायदेभंग केला तर तो समर्थनीय ठरू शकतो. कायदेभंगाचे मूल्य जाणण्यासाठी हे आवश्यक आहे की, इतर सर्वच क्षेत्रामध्ये कायद्याचे पालन होणे गरजेचे आहे. सविनय कायदेभंगात हे ही अपेक्षित असते की सरकारने त्याविरुद्ध कठोर कारवाई करावी.

**आपली प्रगती तपासा.**

१) महात्मा गांधीजी यांचे सविनय कायदेभंग तंत्र विशद करा.

............................................................................................................................

............................................................................................................................

............................................................................................................................

............................................................................................................................

## १५.५ सारांश

गांधीजींच्या सविनय कायदेभंगाचा विचार डॉ. मार्टिन ल्यूथर किंग यांनी अमेरिकेत अवलंबिला आणि निग्रोंना न्याय मिळवून दिला. या सविनय कायदेभंगाचा आधार घेऊन त्यांनी अमेरिकेतील कायदेमंडळाला धक्का दिला. ते म्हणतात, वांशिक भेदामुळे सातत्याने निग्रो जमातीवर अन्यायच झाला आहे. त्यांना अन्यायकारक वागणूक मिळाली आहे. अशा कायद्याचे पालन न करणे नैतिकदृष्ट्या योग्य ठरते.

प्लेटोने आपल्या क्रिटो या ग्रंथात कायद्याचे पालन करावे की करू नये याचे विचार मांडले आहेत. जेव्हा एखादा कायदा अन्यायकारक किंवा नैतिकदृष्ट्या अनैतिक असेल तर कायदा न पाळणे योग्य ठरेल. लोकशाहीत बहूसंख्य लोकांचे मत महत्त्वाचे असते. त्यांच्या समोर कायदा अन्यायकारक कसा आहे हे सांगणे गरजेचे आहे.

म. गांधीजींनी इंग्रजांच्या विरुद्ध लढा देण्यासाठी सविनय कायदेभंग या तंत्राचा अवलंब केला. सविनय म्हणजेच  विनयाने, अहिंसा, सत्य, सहनशीलता या मार्गाने आपल्यावर लादलेल्या अन्यायी कायद्याचे पालन करावयाचे नाही. म्हणजेच कायदे नाकारताना समोरच्याचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी. म. गांधीजींनी सविनय कायदेभंगाचा जो पुरस्कार केला होता. त्याचे अहिंसक मार्ग हे वैशिष्ट्य आहे.

## १५.६ विद्यापीठीय दीर्घोत्तरी प्रश्न :-

१. डॉ. मार्टिन ल्यूथर किंगचे नागरी हक्क चळवळीविषयीचे विचार सविस्तर स्पष्ट करा आणि अहिंसक सविनय कायदेभंगाचे समर्थन कसे करतो ते सांगा.

२. सविनय कायदेभंग म्हणजे काय ? प्लेटो 'क्रिटो' या संभाषणात्मक ग्रंथाच्या आधारे कायद्याचे निरपेक्ष पालन झाले पाहिजे अशी मागणी का करतो ते सविस्तर स्पष्ट करा.

३. सविनय कायदेभंगविषयक म. गांधीजींचे विचार सुस्पष्ट करा.

४. सविनय कायदेभंग या तंत्राची म. गांधीजींच्या तत्त्वज्ञानाच्या संदर्भात माहिती द्या.

५. टीपा लिहा :

   १. डॉ. मार्टिन ल्यूथर किंगची वांशिक वर्णभेदाविरुद्ध चळवळ.

   २. कायद्याचे निरपेक्ष पालन : प्लेटोचा दृष्टिकोन.

   ३. सविनय कायदेभंगविषयक म. गांधीजींचे विचार.

❖❖❖